म. ग्रं सं. ठाणे.
विषय भू-प्रवास
सं. क्र. ६२०

REFBK-0025229

# मनुहार

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
REFBK-0025229

सौ. मनीषा शहा

मबुहाय

सौ मनीषा शहा

© सौ मनीषा शहा

प्रकाशक
चिरायू प्रकाशन
१४७ सी, अभिमानश्री सोसायटी
पुणे ४११ ००८

प्रथमावृत्ती
ऑगस्ट १९८६

मुखपृष्ठ व रेखाचित्रे
सुभाष अवचट

मुद्रक
प्रमोद वि बापट
स्मिता प्रिंटर्स
१०[illegible]९, सदाशिव
पुणे ४११ ०३०

एकमेव विक्रेते
वैभव प्रकाशन
७५५ सदाशिव
पुणे ४११ ०३०

मूल्य पंचेचाळीस रुपये

मनुहार

' MABUHAY '

A Chirayu Prakashan

(In Marathi)

by

Sou Maneesha Shah

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६६०


एक

# कॅपिटल ऑफ प्लेझर....

'युवर पॅलेस इन दी स्काय' या एअर इंडियाच्या महाकाय विमानाने गगनात गरुडझेप घेतली मनिला (फिलिपाईन्स) येथील आशियाई रोटरी कन्व्हेन्शनला उपस्थित राहण्यासाठी निघालेल्या आम्हा तेवीसजणांना, त्या प्रचंड जटायूने आपल्या उबदार अंतःकरणात सामावून घेतले

सधिप्रकाशास हतबल करून रात्र पुढे सरसावली होती मुबईहून निघालेले हे विमान दिल्ली, बँकॉक, हाँगकाँग मार्गे टोकिओला जाणार होते

इंग्लिश व जपानी भाषेत आम्हाला, भारतीय व जपानी हवाई सुंदरींनी योग्य त्या सूचना दिल्या

हवाई यात्रेकरूंची बडदास्त ठेवण्यासाठी हवाईसुंदरींची कसरत सुरू झाली. दिल्लीनंतर गया, कलकत्ता मागे टाकून रंगूनमार्गे आम्ही बँकॉकला निघालो स्वादिष्ट भोजन चालू असताना क्षणभर मन हेलावले, हात स्थिरावला आता आपला मातृभूमीशी संपर्क सुटला होता मातृभूमीशीच नव्हे, तर या क्षणी कुठल्याच भूमीशी संपर्क राहिला नव्हता

येथून पुढचा सगळा प्रवास हिरव्यागार ..निळ्याभोर काळ्याशार अशा गूढ गहन समुद्रावरूनच व्हायचा होता

समुद्राच्या तळाशी काय काय आहे याचे शास्त्रज्ञानी सखोल संशोधन केले आहे तेथील अणूरेणू मानवबुद्धीला परिचित झाला आहे.

पण माझ्यासारख्या भाबड्या मनाला मात्र या अथांग सागराच्या उदरातील गुपित कधीच गवसली नाहीत.. ते सारेच गूढमय. रहस्यमय .. अनाकलनीय !

अशा या [illegible]मध्ये परमेश्वराने किंवा निसर्गाने मधेमधे जमीन उपलब्ध करून मानवजातीवर असंख्य उपकार केले आहेत याची [illegible]णीव पायाखाली जमीन नसताना तीव्रतेने झाली अशा काही बेटांना— थायलंड, फिलिपाईन्स व सिंगापूर यांना— भेट द्यायला आम्ही निघालो होतो मातृभूमीचा फिरून स्पर्श व दर्शन व्हायला तेरा दिवस लागणार होते [illegible]रदेशगमनाच्या आनंदाबरोबर, उत्सुकतेबरोबर ही हुरहुरदेखील जाणवू लागली होती

'युवर पॅलेस इन दी स्काय' मधील अधिकतर प्रवासी अग्रूपतेने मदिरापानात मश्गुल झाले होते मी व माझे पती डॉ हिरालाल ज्यूसपान करीत, खारे बदाम चघळीत अवतीभवती न्याहाळू लागलो विमानाच्या प्रत्येक खिडकीभोवती कळापूर्ण महिरप रेखाटली होती गोपगोपिकांच्या रासक्रीडा रंगवल्या होत्या विमानाचं 'युवर पॅलेस इन दी स्काय' हे नाव आतील चित्र–नक्षींनी सार्थ झालं होतं

असा हा आमचा गगनमहाल, गगनप्रासाद, हवामहल होऊन दर्यावरून तरंगत, अंबरात संचारू लागला या पक्षरूपी राजमहालात अनेक प्रवासी होते. .वेगवेगळ्या देशाचे.. अलग अलग भाषेचे. भिन्न रूपाचे. भिन्न रंगाचे. .भिन्न स्वभावाचे .प्रत्येकाच्या मनात वेगवेगळ्या कल्पनांचे इच्छामहाल, आशामहाल, आकांक्षा महाल उभे राहत असावेत .मद्याच्या नशेचे महाल ..लक्ष्मीच्या कैफाचे महाल भूतकालातील गोड स्मृतींचे महाल भविष्य काळातील स्वप्नांचे, मनोरथांचे महाल. रोमांचकारी प्रणयाच्या धुंदीचे महाल

अशा या एका गगनमहालात अनेक कल्पनांचे महाल समाविष्ट झाले होते.

मधूनमधून खिडकीतून खाली डोकवायला फार गमत वाटत होती एखादं शहर आलं की क्षणभर वाटायचं, तारागण वर नसून खालीच आहे तारकांच्या पुंजक्याप्रमाणे ती शहरं पाहिली की वाटायचं धरित्रीने विद्युतरोषणाईचा साजशृंगार लेवून आकाशाचं तर रूप धारण केलं नाही ना ? की आकाशातील ग्रहताऱ्यांनी सागराच्या आईन्यात आपापलं प्रतिबिंब न्याहाळायची स्पर्धा लावली आहे ? . .देहाने वायूयानाची व मनाने कल्पनेची पिसं लावून मी गगनात मुक्तपणे विहार करण्याची हौस मनसोक्तपणे

पुरवू लागले.

दिल्ली ते बँकॉक हा २९६० किलोमीटरचा प्रवास सहा तासात झाला. रात्री बारा वाजता बँकॉकच्या डाँग मुआग या आंतरराष्ट्रीय विमानतळावर येताच वेळ पाहिली बँकॉकची वेळ आपल्यापेक्षा दोन तास पुढं होती म्हणजे थायलडमध्ये सूर्योदय भारताच्या आधी दोन तास लवकर होतो

डाँग मुआंग विमानतळावर एकदम शातता होती पासपोर्ट वगैरे कागदपत्राची तपासणी करताना थायी अधिकारी आमच्याकडे, आम्ही कोणी स्मगलर अथवा गुन्हेगार आहोत अशा सशयित करडचा नजरेने पाहत आहेत किंवा आम्ही रात्री-अपरात्री येऊन त्याची झोपमोड केली म्हणून त्रासल्यासारखे होऊन पाहत आहेत अस मला वाटल पण नतर लक्षात आल, या सर्वच थायी लोकाचे डोळे तसेच असतात डोळे नाकाची, कपाळ आणि गालामधील बारीक अरुद फट खालून व वरून दोन्ही बाजूनी आकुचित झाल्यामुळे नजर कशी तीक्ष्ण ! जुलमी !

थोडचाच वेळात टी सी आय या आमच्या प्रवासी कपनीने, आमच्यासाठी थायलडमध्ये नियुक्त केलेला गाईड, गॅरी नाव त्याच, हाजिर झाला गॅरी भारतीय होता पण आता थायलडचा नागरिक आहे त्याला हिंदी आणि इग्लिश दोन्ही भाषा चागल्या अवगत होत्या

आमचा पहिला मुक्काम बँकॉक शहरापासून दीडशे किलोमीटर अतरावर असलेल्या पताया या शहरी होता आमच्या स्वागतासाठी व आम्हाला पताया शहरी नेण्यासाठी एक वातानुकुलित आरामगाडी सुसज्ज होती आम्ही बसकडे निघालो तोच एका अपऱ्या नाकाच्या व छोटचा मिचमिच्या डोळचांच्या गोऱ्यापान प्रमत्त युवतीने अनपेक्षितपणे आमच्या एकेकाच्या गळचात मोगऱ्यासारख्या टपोऱ्या सुवासिक फुलाचा हार घालण्यास सुरुवात केली हार घालताच सुसज्ज असलेला थायी फोटोग्राफर त्या थायी तरुणीबरोबर आम्हा एकेकांचे फोटो काढू लागला त्या पोरीने मला व माझे पती डॉ हिरालाल याना हार घालून आमच्या दोघांच्या गळचात आपली नाजूक करमाला घालून फोटोला मस्त पोझ दिली आणि ती चिवचिवली,

" कोपखुन . कोपखुन ! "

प्रत्येक फोटोनतर तेवढा एकच शब्द ती प्रत्येकापुढ प्रसन्न चेहऱ्याने उच्चारीत होती

' कोपखुन ' म्हणजे थायी भाषेत थँक यू !

मी त्या थायी छोकरीला तिच नाव विचारल ती पुन्हा चिवचिवली,

" सुपत्रा "

" सुभद्रा ?"

" नो...नो...सुपत्रा ..सुपत्रा !"


मी त्या सुपत्रानामक सुभद्रेला ' कोपखुन ' म्हटल

त्या नाजूक, तरुण पुष्पलतेने पुष्पमाला आमच्या गळयात घालून केलेल स्मितहास्य स्वागत पाहून हे थायी लोक भलतेच आतिथ्यशील असावेत अस वाटल्यावाचून राहिल नाही किंवा आम्ही मनिला येथील रोटरीच्या आशियाई कन्व्हेन्शनला निघालोय म्हणून हे लोक आपल स्वागत व सत्कार करत असावेत असही वाटलं

गळयातील पुष्पहाराचा सुगध घेत, ' कोपखुन म्हणजे थँक्यू ' अस स्वत:शीच पुटपुटत मी बसमध्ये जाऊन बसले बस वातानुकूलित व भलतीच आरामशीर होती तिच्या भरधाव वेगाची गती व आवाजदेखील जाणवत नव्हता जणू काही आम्ही अजूनही हवाई जहाजातच आहोत ड्रायव्हर हसन ऊर्फ बॉबी मुस्लिमधर्मीय थायी होता

" बॉबीने ही बस जपान सरकारकडून कर्जाने घेतली आहे, बसचे कर्ज तो हप्त्या हप्त्याने फेडतो आहे अशा अनेक वातानुकूलित बस व टोयॅटो वगैरे गाड्या जपानने येथील लोकाना हप्त्याने दिल्या आहेत " आमचा गाईड गॅरी याने आम्हास ही माहिती दिली

पहाटे पहाटे आम्ही पताया शहरी पोहोचलो या शहराला ' कॅपिटल ऑफ प्लेझर ' .आनदनगरी. असे म्हणतात येथे प्रवासी येतात मौजमजा करायला, मुक्त आनद लुटायला पण आम्ही मात्र नाइलाजाने आलो होतो परदेशातील पहिला दिवस होता उत्साह भरपूर होता पण सर्वांचच मन थोडस नाराज होत कारण पूर्वीच्या आमच्या योजनेत दोन दिवस बँकॉक, नतर दोन दिवस हाँगकाँग, नतर मनिला व सिंगापूर अशी ट्रीप आखण्यात आली होती पण निघण्यापूर्वी केवळ चारच दिवस आधी टी सी आय कपनीने आमच्या या दौऱ्यातून हाँगकाँग रहित झाल्याचे सागितले का तर म्हणे हाँगकाँगला कसलातरी चायनीज सण चालू असल्यामुळे कोठल्याच हॉटेलात जागा शिल्लक नाही ! आम्ही ज्या दिवशी मुबईतून निघालो, त्या दिवशी सहार विमानतळावर असे अनेक प्रवासी ग्रुप आम्हाला भेटले की ज्यांच्या ट्रीपमध्ये हाँगकाँग आवर्जून होत त्यांच्या प्रवासी कपनीने आमच्या प्रवासी कपनीसारखा, हाँगकाँग दौरा अचानक वगळला नव्हता त्या सर्व प्रवाशाना हाँगकाँग येथील हॉटेलात खोल्या उपलब्ध झाल्या होत्या केवळ आमची टी सी आय प्रवासी कपनी आम्हा तेवीसजणाची राहण्याची सोय हाँग



काँगसारख्या शहरात करू शकली नाही ।

आपला लाभांश वाढवण्यासाठी आमच्या प्रवासी कंपनीने ही सबब पुढे माडली असावी पण आता खंत करण्यात काहीच अर्थ नव्हता सारी सूत्रं प्रवासी कंपनीच्या हाती देऊन आम्ही मोकळे झालो होतो

हाँगकाँग नाही म्हणजे आग्र्याला जाऊन ताजमहाल न पाहणं । पॅरिसला जाऊन आयफेल टॉवर न पाहताच परत येणं ।

हाँगकाँगला पर्याय म्हणून हे पताया शहर । आमच्या दृष्टीने या 'कॅपिटल ऑफ प्लेझर' मधील प्लेझरच निघून गेला होता जाने दो । पुन्हा केव्हातरी हाँगकाँगला जाऊ अशी मनाची समजूत काढून आम्ही दुसऱ्या दिवशी पताया बीचच्या सहलीत सहभागी झालो हाँगकाँग फिर कभी . अब तो चलो पताया बीच ।

समोर अथांग ' गल्फ ऑफ सयाम ' पसरला होता ' कोरल आयलँड'ला जाण्यासाठी लाँचने तास दीड तास प्रवास करायचा होता गाईड गॅरीच्या सूचनेप्रमाणे आम्ही चप्पल-बूट काढून हातात घेतले कारण किनाऱ्यावरची वाळू भलतीच मुलायम व निसरडी होती चप्पल घालून चालणं शक्यच नव्हतं आम्ही चप्पल हातात घेऊन सरळ मार्गाने लाँचकडे निघालो तोच आमच्या एका प्रवासी साथीदाराने आम्हाला हाक मारली,

" अहो मडळी वा वा काय पण दृश्य आहे ! अगदी फोटो काढण्या-सारखं ! या पतायासारख्या ' कॅपिटल ऑफ प्लेझर ' शहरात आपण दोन्ही हातानी भरभरून आनद लुटायला आलो आहोत ना ? मग हातामध्ये पाद-त्राणाचं हे अमंगल ओझं कशाला वागवायचं ? आपण तर बुवा आपले जोडे या झाडाच्या ढोलीत ठेवून दिले आहेत आणा इकडे, तुमचे पण ठेवून देतो "

" अहो पण हरवतील ना "

' हरवणार नाहीत हो ! मी गॅरटी देतो तुम्हाला हा काय आपला भारत देश आहे का, मदिरापुढच्या चपलासुद्धा चोरीला जायला ? आणि हरवल्या तर हरवल्या बँकॉकला चप्पल बूट-स्वस्त आणि मस्त मिळतात "

नको नको म्हणता एका पाठोपाठ एक याप्रमाणे सर्वांनीच आपापल्या चपला व बूट त्या झाडाच्या ढोलीत ठेवून दिले ही युक्ती काढलेला आमचा हा सहप्रवासी म्हणजे खरोखर सुखी प्राणी अगदी बिनधास्त ! त्यामुळे या सफरीत मी त्या व्यक्तीला मिस्टर बिनधास्त हेच नाव ठेवून दिलं मिस्टर बिनधास्त नावाप्रमाणेच निर्धास्त !

हा गल्फ ऑफ सयाम ' म्हणजे चिनी समुद्र सयाम हे थायलडचं जुनं नाव जो समुद्र काल रात्री आकाशातून गूढ रहस्यमय भासत होता, त्या समुद्रावरील आनदी व आल्हाददायक वातावरणातून आम्ही लाँचने पताया बीचला पोहोचलो लाँचमधून उतरून छोट्या नावेने ' कोरल आयलँडच्या किनाऱ्याला निघालो या नावेच्या तळाला ठराविक भागात लाकडाऐवजी पारदर्शक काच बसवली होती त्या काचेतून समुद्राचा तळ स्पष्टपणे दिसत होता समुद्रप्राणी, मासे, प्रवाळ व वनस्पती आपण अगदी जवळून पाहत आहोत असा आगळाच आनद प्राप्त झाला

आम्ही ज्या ' कोरल आयलँड'वर पदार्पण केलं त्याचं रूढ नाव ' कोलार्न आयलड ' आम्ही किनाऱ्यावर येताच अनेक थायी लोकानी आम्हाला घेराव घातला त्या थायी लोकांची जलक्रीडाची वाहनं आम्ही भाड्यानं घ्यावीत म्हणून ते आम्हाला आग्रह करू लागले

या आनंद नगरीत आनंद लुटण्यासाठी विविध प्रकारच्या जलक्रीडांच्या सुविधा उपलब्ध आहेत वॉटर स्कूटर, पॅरा सेलिंग, पॅराशूट, मोटार सायकल, स्कूबा ड्रायव्हिंग, वॉटर स्की, हॉर्स रायडिंग वगैरे वगैरे या सर्व जलक्रीडांसाठी उत्तम पोहता येणे हे मात्र आवश्यक आहे

या जलक्रीडांची वाहने भाड्याने घेतानादेखील ' बारगेनिंग करावं लागत मि बिनधास्त एक वॉटर स्कूटर भाड्याने घेऊन समुद्रावर चक्कर मारायला निघाले, एकटेच समुद्रकिनाऱ्यापासून शंभर सव्वाशे फूट जाताच त्यांची वॉटर स्कूटर अचानक बंद पडली त्या वॉटर स्कूटरच्या थायी मालकाचे तिकडेच लक्ष असावे तो मोठ्या तत्परतेने दुसरी वॉटर स्कूटर घेऊन समुद्रावर गेला व त्याने नादुरुस्त स्कूटर व मि बिनधास्त यांना किनाऱ्यावर आणून सोडलं तो थायी वॉटर स्कूटर मालक आता स्कूटरचे वाटेल ते भाडे व तिच्या दुरुस्तीचा अफाट खर्च मि बिनधास्तकडून मागणी करू लागला. थोडेफार अधिक पैसे देऊन प्रकरण मिटवायचा मि बिनधास्तचा इरादा होता पण ' माझी वॉटरस्कूटर उत्तम स्थितीत होती, ती तुम्ही बिघडवलीत, तरी आता तिच्या दुरुस्तीसाठी तुम्ही मला ५०० अमेरिकन डॉलर्स दिले पाहिजेत, नाहीतर मी पोलिसाकडे तक्रार करेन ' अशी जबर धमकी त्या थायी माणसाने मि बिनधास्तला दिली

दुरुस्तीच्या खर्चाची, अंदाजे सहा ते सात हजार रुपयाची अफाट मागणी ऐकताच बिनधास्तचा पारा एकदम चढला,

" पोलिसको क्यू तुम्हारे बाप को बुलाव । "

एक, थायी व मोडकी तोडकी इंग्लिश अशा संमिश्र भाषेत धमकी देत होता, तर दुसरा त्याला हिंदी भाषेत प्रत्युत्तर देत होता प्रकरण हातघाईवर आले होते या जुगलबंदीतील ' बाप फक्त गॅरीला समजला हातात बीयरची बाटली आणि कवेत एक मैत्रीण घेऊन गॅरी बराच वेळ लापता झाला होता. हा शोरगुल ऐकून तो घाईघाईने उगवला

काय गडबड आहे हे त्यानं ताबडतोब ओळखलं. गॅरीला पाहताच जरबेने बोलणारा तो थायी माणूस आता एकदम नरमला

" वॉटर स्कूटरच्या दुरुस्तीच्या खर्चासाठी हा माणूस तुम्हाला चीट करतोय ना ? वास्तविक तुम्ही एकटे न जाता यालाही बरोबर घेऊन गेला असता तर नादुरुस्तीची ही भानगड झाली नसती " गॅरीने मि. बिनधास्तला धीर दिला

' या लोकांचा हा नेहमीचा धंदा आहे नादुरुस्त वॉटरस्कूटर किंवा मोटारसायकल प्रवाशांना भाड्याने द्यायची व नंतर तिच्या दुरुस्तीसाठी

तोंडाला येईल तशी अफाट रक्कम वसूल करायची काही काही परदेशी प्रवासी घाबरून याच्या या कारस्थानाला बळी पडतात पण तुम्ही काही घाबरू नका मी आता याला वाटेला लावतो एन्जॉय युवरसेल्फ...बी मेरी! हॅव्ह अ प्लेझर !''

आणि गॅरी आपल्या छैलछबीलीबरोबर पुन्हा गायब झाला मि विनधास्तची अशी धास्तावलेली अवस्था पाहून माझे पती डॉ हिरालाल व आमचे सहप्रवासी नारायणगावचे विद्यमान आमदार श्री वल्लभ बेनके मि बिनधास्तच्या जवळ गेले मनिला येथे असणाऱ्या रोटरी कनव्हेनशनला उपस्थित राहणाऱ्या प्रतिनिधींना सप्रेम भेट देण्यासाठी आम्ही श्री क्षेत्र ओझर येथून विघ्नहराच्या एक हजार छोट्या मॅग्नेटिक प्रतिमा बरोबर आणल्या होत्या त्यातील एक प्रतिमा मि बिनधास्तना देऊन श्री बेनके म्हणाले, "हा विघ्नहर्ता जवळ ठेवा, म्हणजे कोठेही असे विघ्न न येता प्रत्येक गोष्टीत तुम्हाला प्लेझर घेता येईल !' विघ्नहराची मूर्ती भावुकतेने खिशात ठेवून मि बिनधास्त खरोखरच निर्धास्त झाले आम्ही आमच्या सर्वच साथीदाराना एकेक मूर्ती सप्रेम भेट दिली

सकाळचे अकरा वाजून गेले होते प्रखर सूर्यकिरणामुळे सागराचा निळसर पृष्ठभाग वर्ख लावल्याप्रमाणे तळपत होता त्याच्या तकतकीत कांतीवर अनेक पाश्चिमात्य युवती मत्स्याप्रमाणे सुळसुळत होत्या काही गौरांगना वाळूत लोळत सूर्यस्नान घेत होत्या एकदर अशा समुद्रस्नानाचे, सागरक्रीडाचे व सूर्यस्नानाचे वेड पौर्वात्यापेक्षा पाश्चिमात्यानाच अधिक !

'कॅपिटल ऑफ प्लेझर' म्हणण्यासारख मात्र आम्हाला इथ विशेष काही आढळल नाही कुठेही समुद्रकिनाऱ्यावर अशा प्रकारच्या सुविधा उपलब्ध करता येण्यासारखा आहेत

या कोलार्न आयलँडवर अनेक विक्रेते होते जेथे प्रवासी विपुल तेथे विक्रेतेही बहुसख्य हे समीकरणच झाले आहे टी शर्ट, स्वीमिंग ड्रेस, फ्रॉक, लाकडी कलाकुसरीच्या वस्तू, शख-शिपल्याचे अलकार काहीही खरेदी करताना येथेदेखील भावासाठी भरपूर हुज्जत घालावी लागते

या सर्व वस्तूमध्ये नायलॉनच्या धाग्याचा, दोन झाडांना बाधण्याचा झोपाळा कुणालाही आवडावा असाच होता रगाने मोहक, स्पर्शाने मुलायम, वजनाला तर अतिशय हलका घडी तर एखाद्या शर्टएवढी होते अशा झुलत्या झोपाळ्याला थायी भाषेत थायफीन असे म्हणतात मी एका विक्रेत्याकडे त्याच्या किमतीची चौकशी केली, तर त्या विक्रेत्याने किंमत सांगितली, '२५० बहथ'' 'बहथ' हे थायलडचे चलनी नाणे साधारण

२५ बहृथ म्हणजे एक अमेरिकन डॉलर झोपाळ्याची दहा अमेरिकन डॉलर्स किमत फारच महाग वाटल्यामुळे मी त्या झोपाळ्याचा नाद सोडून दिला. पण तो थायी विक्रेता काही आमची पाठ सोडत नव्हता त्याला इंग्लिश भाषा कळत नव्हती पण किमतीचे साधारण आकडे कळायचे शेवटी कटाळून तोच त्या झोपाळ्याची किमत खाली आणू लागला

"मॅडम, २०० बहृथ"

त्या मऊ मुलायम नायलॉनच्या झूल्याच्या नाजूक धाग्यांत माझ मन केव्हाच गुरफटल होत, पण मी जाणून बुजून दुर्लक्ष केल

"मॅडम १५० बहृथ. १५० "

हा माणूस किमत अजून उतरवेल याची मला खात्री वाटू लागली शेवटी मी सहज खडा टाकून पाहिला,

"२५ बहृथ ?"

"नो नो. " म्हणत तो थायी विक्रेता हसला आमचे पतिराजदेखील मला हसले थोडेसे रागावलेदेखील,

"कशाला बिचाऱ्याची चेष्टा करतेस ? २५० बहृथची वस्तू, २५ बहृथला कोणी देईल का? तुला आवडलाच असेल तर पटकन घेऊन टाक हा झोपाळा पधरा मिनिट तुझा घोळ चाललाय .. तू पुढे तो मागे अस हे कुठवर चालायच ? "

आपण तो झोपाळा फारच कमी किमतीत मागितल्याच मलाही जाणवल. पण आश्चर्य .

"ओके मॅडम. २५ बहृथ ओके !"

माझ्या मागणीनुसार २५० बहृथचा झोपाळा, फक्त २५ बहृथला द्यायला तो थायी माणूस राजीखुषीने तयार झाला ! मी मोठ्या उत्साहाने एक सोडून दोन झोपाळे खरेदी केले

त्या सौद्यामध्ये मला अप्रतिम यश मिळाल होत पतिराज साहजिकच या खरेदीवर आणि माझ्यावर बेहद्द खूष झाले आमच्या ग्रुपमध्ये त्या विक्रेत्याचे डझनावारी झोपाळे खपले

आता कुठ मला 'कॅपिटल ऑफ प्लेझर 'मधील थोडासा प्लेझर गवसला!

थायलडमध्ये पिण्याचे पाणी असे कोठेही मिळत नाही मिळते ते पिण्यासारखे नसते बहुतेक, थडगार बीयर किंवा सॉफ्ट पेयच पाण्याऐवजी येथे पितात, हे गॅरीने आदल्या रात्री सांगितल होत त्यामुळे आम्ही ५ बहृथ देऊन पिण्याच्या पाण्याची सीलबद बाटली घेतली लोक पाण्याची तहान मद्य पिऊन कशी शमवतात देव जाणे ! त्याच्या लेखी 'पाणी हे जीवन आहे !'

अशी व्याख्या नसून ' मद्य हेच जीवन आहे ! ' अशी व्याख्या असावी !

अजून जलक्रीडा चालूच होत्या कोणी पॅरॉशूट घेऊन आकाशात विहरत होत, तर कोणी हॉर्स रायडिंग करत वाळूत दौडत होत आमच्या ग्रुपमध्ये एक दाते नावाच दांपत्य होत वयाची पन्नाशी ओलांडलेल दोघही स्वभावाने अगदी शात व सोज्वल आयुष्यात आता काही करण्याच, पाहण्याच, उपभोगण्याच राहिल नाही, अशा दृष्टीने वावरणार हे दाते दापत्य, दूर वाळूत अलिप्त बसल होत त्याना पॅरॉशूटच्या सहाय्याने गगनात उच भरारी मारावीशी वाटत नव्हती, की वॉटरस्कूटरवरून पाणी कापत समुद्रावरून भरधाव धावावस वाटत नव्हत, मुक्तपणे सागरात डुबावस वाटत नव्हत . की घोड्यावरून बेफाम रपेट करावीशी वाटत नव्हती, माझ्यासारख वयाच भान विसरून रगीबेरगी शख-शिपले वेचावेसे वाटत नव्हत की घासाघीशीन खरेदी करावीशी वाटत नव्हती ! आमच्यापासून त्यानी अस अलिप्त रहाव हे मलाच कस तरी वाटल मी मिसेस दातेंना आमच्याबरोबर वाळूत खेळायला बोलवल

" अग मनीषा, तुमच्यासारख बागडण्याच आमच वय राहिलेल नाही आत्ता या वयात सार काही, अस त्रयस्थासारख आणि तटस्थतेन पाहण्यातच आम्हाला समाधान वाटत तुमचे खेळ मोठ्या आनदात चालू देत आम्ही येथेच मजेत आहोत परत जाताना मात्र आम्हाला विसरून जाऊ नका म्हणजे झाल ! "

एकेकाचा पिंड वयसापेक्षच, तोच ज्याचा त्याला घडवीत असतो हेच खर तोच सार करवतो आमच्यासारख आनद लुटायला, मि बिनधास्तसारख निर्धास्त रहायला आणि या दाते दापत्यासारख अलिप्तपणेच सर्व काही पाहण्यात समाधान मानायला तोच तर कारणीभूत ठरत असतो

दुपारी लॉंचने आम्ही परत निघालो माथ्यावरील सूर्याचे तेजस्वी किरण समुद्राच्या जलाशयात शिरत होते व त्याच्या कितीतरी पटीनी प्रखर होऊन परावर्तित होत होते डोळे दिपवत होते

किनाऱ्याजवळ लॉंच येताच एकदम जोराचा पाऊस सुरू झाला रस्ते नदीसारखे वाहू लागले थायलडमध्ये उन्हाळा व पावसाळा हे दोनच सीझन असतात एप्रिल ते ऑक्टोबर या काळात पावसाळा व नोव्हेंबर ते मार्च या काळात उन्हाळा असा अचानक पाऊस वर्षभर केव्हाही पडत असतो

धो धो पावसानतर थोड्याच वेळात लख्ख ऊन पडल रस्ते पुन्हा कोरडे झाले

पायाखालच्या वाळूच्या स्पर्शाने आम्हाला आमच्या पादत्राणाची

आठवण झाली ती बिचारी वृक्षाच्या ढोलीमध्ये आरामात विसावली होती आश्चर्य म्हणजे किनाऱ्यावर एवढी गर्दी होती तरी एकाही माणसानेच काय, पण त्या ढोलीतील एका मुंगीनेदेखील आमच्या पादत्राणाना स्पर्श केला नव्हता म्हणूनच ती आम्हाला जशीच्या तशी सुखरूप परत लाभली होती

सध्याकाळी पताया येथील एका थिएटरमध्ये 'टिफनी शो' नावाचा कार्यक्रम होता त्याच स्वरूप आम्हाला माहीत नव्हत पण आम्ही तो आव-र्जून पहावा अस गॅरीने सुचवल्यामुळे आम्ही सर्वजण 'टिफनी शो' पहायला गेलो

लोक मद्याचे चषक घेऊन आत जात होते आपल्याही हाती काहीतरी असाव म्हणून फ्रूट ज्यूसचे पेले घेऊन आत गेलो कार्यक्रम सुरू झाल्यानतर हळूहळू त्याच स्वरूप कळू लागल या कार्यक्रमात जवळजवळ साठ तरुणी होत्या त्यानी विविध प्रकारची मादक नृत्य, छोटचा नृत्यनाटिका, विनोदी फार्स, असे विविध कार्यक्रम सादर केले प्रत्येक नृत्याच्या वेळी निरनिराळे आकर्षक उची पोषाख, भडक सौदर्यप्रसाधन, आणि स्टेजवरच्या नानाविध सेटस्‌ची व विद्युतरोषणाईची करामत, त्याच्या जोडीला पाश्चात्त्य सगीताचा धूमधडाका. प्रेक्षक नुसते चेकाळून जात होते अनेक प्रेक्षक स्टेजवरच्या एका विशिष्ट गणमान्य तरुणीचे अधिकतर फोटो काढण्यासाठी पुढे पुढे जात होते ती तरुणीही अनेक प्रकारच्या पोझ देऊन हवे तेवढे फोटो काढू देत होती ती बहुधा कोणी विख्यात अभिनेत्री असावी

रगमचावर नृत्य चालू असताना थायी तरुणी नागिणीसारख्या सळसळत होत्या त्याची अगकाती नितळ व मुलायम दिसत होती त्याच्या हालचाली अत्यत चपळ व मोहक होत्या पण का कुणास ठाऊक स्त्री देहाच पुष्ट शरीरसौष्ठव मात्र त्यांच्या ठायी अभावानच आढळत होत स्त्री देहाचा '३२ २८ ३२' हा आकर्षक फॉर्म कुठतरी चुकल्यासारखा निश्चितच वाटत होता। सर्वजणी जरी स्वत च्या जवानीच उत्तान प्रदर्शन करीत होत्या तरी तारुण्याची उभारी त्याच्या वक्षस्थलावर शोधूनही सापडत नव्हती थायी सौदर्याची अद्याप पुरीपुरती ओळख न झाल्याने थायी स्त्रीची जडणघडण बहुधा अशीच असावी असे क्षणभर वाटले

एकीलाही असायला पाहिजे तशी 'छाती' नव्हती तरीही सौदर्याचा दिमाख मिरवण्याची त्याना कशी छाती होत होती, याच कुणालाही आश्चर्य वाटाव वक्षस्थलाची उभारी, शारीरिक गोलाई याचा अभाव असूनही रूप-

गर्वितेचा आविर्भाव मात्र प्रत्येकीच्या सर्व हावभावांतून निहायत प्रकटत होता
पाश्चिमात्त्य स्वरूपाच्या या कॅबरे टाईप कार्यक्रमाच्या शेवटी एक तरुणी लचकत मुरडत मिस् युनिव्हर्सच्या रुबाबात स्टेजवर आली याच युवतीवर अनेक कॅमेरे व असंख्य डोळे थोड्या वेळापूर्वी खिळले होते आता तिने हळू हळू आपल्या चेहऱ्यावरचा लाल गुलाबी मेकअप पुसला, ओठाची लाली पुसली, डोळ्यावरच्या कृत्रिम पापण्या काढल्या, डोक्यावरील लांबसडक केसाचा विग काढून टाकला . शेवटी ब्लाऊजमधील पॅडिंगची ब्रेसियर काढून टाकली! आपण स्त्री नसून पुरुष असल्याचा त्याने ' उलगडा ' केला नारीचा नारायण झाला आणि टाळ्याच्या कडकडाटात पडदा पडला !

आम्ही थिएटरच्या बाहेर येऊन पाहतो तर समोर मघाच्याच सर्व नृत्यांगना लोभस हास्य व मादक नेत्रकटाक्ष फेकीत उभ्या होत्या ! त्याच्या सोबतीला अनेक फोटोग्राफर्सही हजर होते प्रेक्षकांपैकी ज्याला इच्छा असेल त्याने आवडेल त्या तरुणीला बाहूत, कवेत, मिठीत घेऊन हवा तसा फोटो काढून घ्यावा, व फोटोला साथ दिली म्हणून त्या तरुणीला मात्र कमीत कमी पाच बहथ मोबदला द्यावा. पाच बहथ कमविण्यासाठी कोणतीही मुलगी कोणाही परपुरुषास फोटोसाठी पोझ घेऊन साथ देत होती आता ही साथ केवळ छायाचित्रापुरती मर्यादित होती की आणखी कशासाठी अमर्यादित होती हे त्या नटरंग्या थायी तरुणीच जाणे ! विशेषकरून त्या तरुणी परदेशी पर्यटकाच्या मनधरणीसाठी उत्सुक आणि मनोरंजनासाठी तत्पर दिसत होत्या.

आमच्यापैकी फारसा कोणी त्यात विशेष रस घेतला नाही त्या अफलातून फोटोग्राफीकडे दुर्लक्ष करून आम्ही आमच्या बसमधे येऊन बसलो इन्तजार होता तो मि बिनधास्तचा तोपर्यन्त आमच्या साथीदारांत चर्चा सुरू झाली—

" काय ह्या थायी मुली ! याना काही लाजलज्जा आहे की नाही ? दोन-चार रुपयांसाठी कोणाही अनोळखी व्यक्तीबरोबर फोटोला कसही उभा रहायच म्हणजे काय ! आणखी थोडे पैसे मिळाले तर त्या नको ते करायला तयार होतील "

" अहो हे पाच बहथ . हे फोटो हे सगळ निमित्त असाव त्या निमित्ताने या पोरी आपल्या मादक तारुण्याचच परदेशी पर्यटकाच्या पुढे उत्तान प्रदर्शन करत असाव्यात. "

' आणि मौजमजा करायला आलेला एकेक गलेलठ्ठ मासा गळाला लावत असाव्यात "

' हा चक्क वेश्या व्यवसाय नाहीतर काय '' कुणाच काय तर कुणाच काय मि बिनधास्त अशा शब्दजंजाळात न अडकता सरळ सरळ मोह-

आलात अडकले होते. नकट्या गवळणीमध्ये रमलेल्या मि बिनधास्तला गॅरीने अक्षरश: ओढून बसकडे आणल

" गॅरी, कसला रे गाईड तू ? थायलडसारख्या या प्रसिद्ध इद्रसभेत असच का मार्गदर्शन करणार तू आम्हाला ? मला त्या पोरीशी तू साध बोलू देखील दिल नाहीस काय पण पोरी होत्या त्या ..फटाकड्या . गुलछड्या. एकीपेक्षा एक चढ जणू काही साऱ्या थायलडच तारुण्य आणि लावण्य त्याच्यात पुरेपूर ओतल गेलय ! "

बॉबी ड्रायव्हरने बस चालू करताच गॅरीने हातात माईक घेतला

" मित्रहो, टिफनी शो चा कार्यक्रम तुम्हाला आवडला का ? या कार्यक्रमाच वैशिष्टच म्हणजे यामध्ये एकही स्त्री नव्हती ! हे मी आपणास मुद्दामच आधी सागितल नाही या कार्यक्रमात भाग घेतलेले साठ कलाकार सर्वच्या सर्व स्त्री वेष धारण केलेले पुरुष होते ! " अनपेक्षित तेच ऐकायला मिळाल होत-- त्यामुळ साहजिकच क्षणभर आश्चर्याचा धक्काच बसला

एका कलाकाराने कार्यक्रमाच्या शेवटी हे सूचित केल होत पण सर्वच कलाकार नारी नसून नर होते हे कळल्यावर खरेखरच आश्चर्य आणि त्याबरोबरच कार्यक्रमाच कौतुकही वाटल

कलाकाराच्या बेडौल छात्या पाहून या नारी नाहीत हे प्रथमदर्शनी छातीठोकपणे कोणीच सांगू शकल नाही हे तर आणखी धक्कादायक आश्चर्य !

जबरदस्त आश्चर्याचा धक्का कुणाला बसला असेल तर तो मि बिनधास्तला ! त्यांच्या बहकण्याल किती 'बहथ' खर्ची पडले असतील हे सागायला त्याची आता काय छाती होणार होती !

मघाशी परपुरुषाबरोबर कशीही पोझ देत होते ते सर्वच तरुण पुरुष होते आमच्यापैकी अनेकानी त्याच्यावर बेधडक चर्चा करून जे अनुमान काढले होते ते असे खोटे ठरले होते

आपल्याकडे पूर्वी स्त्रिया रगभूमीवर काम करीत नसत म्हणून पुरुषवर्गच स्त्रियाच्या भूमिका करत असे पण त्या भूमिकातील पुरुष तावडतोब ओळखू येत असत पण या टिफनी कार्यक्रमातील तरुण मुल मात्र बेमालूमपणे तरुण मुलीच दिसत होत्या शरीरसौष्ठवात थोडीसी उणीव भासली तरी त्यांच अभिनयकौशल्य, नेत्रपल्लवी, मोहक हालचाली व चेहऱ्यावरच मार्दव वाखाणण्याजोग निश्चितच होत

मि बिनधास्तसारख्या अनेक परदेशी प्रवाशांच्या चाणाक्ष नजरेला त्यांनी मोहित केल, आपल्या जवानीन, सौंदर्यान पागल करून सोडल यातच या कार्यक्रमाच खर यश आहे

या टिफनी शो मधील कलाकाराच्या फक्त रंगभूषेचा आणि वेशभूषेचा खर्च तीस हजार अमेरिकन डॉलर्स आहे गॅरीने सांगितले तेव्हा मि बिनधास्तसारखे हजारो पुरुष या तरुणींच्या फशी कसे पडतात यातले रहस्य उलगडले पडदा पडण्यापूर्वी एका कलाकाराने आपला साजशृंगार सर्वांसमक्ष उतरूनही प्रेक्षकांच्या डोळ्यावरचा कैफ थिएटरबाहेर येऊनही उतरत नाही हे विशेष नव्हे, तर उलट त्या कैफातच हे माशूक प्रेक्षक तरुणींच्या उन्मादक सहवासाला अधिकच हपापतात आणि त्यांच्या नखरेल मिठ्ठास बाहुपाशात अडकून आपली छबी खेचली जावी अशी अभिलाषा धरतात हे तर या कार्यक्रमाचे आणखी फलित म्हणावे लागेल, की, जे मि बिनधास्तसारख्या विदेशी पर्यटकाकडून अधिक फुलत, फळत असावे ! असा हा टिफनी शो. . कफनीवाल्यानाही क्षणभर चक्रावून टाकणारा !

या कार्यक्रमातील मुल, स्त्रीप्रमाणे सुंदर, नाजूक,कोमल, मोहक दिसण्यासाठी, स्त्रीसारखा अभिनय वठवण्यासाठी किती परिश्रम घेतात हे नंतर गॅरीशी गप्पा मारताना समजले आपल्या शरीरातील राकट पुरुषीपणा कमी करण्यासाठी व स्त्री देहाची कमनीयता प्राप्त करण्यासाठी ही मुलं फीमेल हार्मोन्सची इंजक्शन घेत असावीत आपले तन आणि मन वेचून हे कलाकार परिश्रम करतात, त्यामुळेच अशा आगळ्या कार्यक्रमास अप्रतीम यशाची, अफाट धनाची प्राप्ती होत असावी

टिफनी शोचं खरं गमक कळलं नाही ते मिसेस् दातेंना

"कसला ग बाई हा कार्यक्रम ! उघडे नागडे अश्लिल अंगविक्षेप नुसते !"

हे निवृत्तीच्या मार्गाला लागलेले दाते दांपत्य बॅकॉक-सिंगापूरला या वयात काय पाहायच्या अपेक्षेने आले होते कुणास ठाऊक !

टिफनी शो नंतर गॅरीने आम्हाला पताया शहराच्या मार्केटमधे सोडलं येथे रात्री अकरा वाजेपर्यंत दुकानं उघडी असतात

फूटपाथवर जागोजागी मासमासे व समुद्रप्राण्यांचे गरमागरम पदार्थ शिजवले व तळले जात होते पावलोपावली मद्याचे बार होते प्रत्येक दुकानावर तारुण्याने मुसमुसलेल्या व चेहऱ्यावर भरपूर सौंदर्यप्रसाधन थापलेल्या पाश्चिमात्य पद्धतीच्या उंची आणि तोकड्या पोशाखातील थायी मुलीच काम पाहत होत्या सिगारेटी शिलगावल्या जात होत्या चषक मद्याने भरले जात होते उफाळणारी उन्मत्त जवानी. .फेसाळणारी मादक मदिरा . सारं नशील आणि संमोहक ' अशा वेळी माशूकच्या आशिक दिलावर काबू

राहण मुष्किलच ।

येथे आपणाला आपले हवे तसे पोर्ट्रेट काढून देणाऱ्या चित्रकाराची देखील अनेक दुकान आहेत पण त्यासाठी लागणारा दीर्घ वेळ आमच्याजवळ नव्हता दुतर्फा असलेली चप्पल-बूट व तयार कपड्याची दुकान न्याहळत आम्ही फूटपाथवर भटकत होतो इथ पुन्हा नायलॉनचे झूले विकणारे अनेक विक्रेते भेटले सकाळी कोरल आयलँडवर केलेल्या अफलातून खरेदीचा आनद पुन्हा चाखावा म्हणून मी एकाला त्याची किंमत विचारली,

" हाऊ मच ?"

" ओन्ली २० बहथ "

काहीही घासाघीस न करता त्या माणसाने त्याच प्रकारच्या झोपाळ्याची किमत २० बहथ सांगितली आपण २५० बहथची वस्तू फक्त २५ बहथला घेतली होती या पराक्रमाचा विजय क्षणात पराजित झाला माझ्या मुद्रे-वरच्या आनदाने अवचित झेप घेऊन आता आमच्या पतिराजांच्या मुख-मडलावर ठाण माडले व तेथूनच तो मला वाकुल्या दाखवीत आहे असा मला विचित्र भास झाला कसला हा चचल आनद ..एखाद्याची न कळत आणि न बोलताही फिरकी घेणारा ! सर्वच जोडप्यांच्या वाटचालीला आलटून पालटून येणारा मानला तर बोचक, मानला तर गोचकही .

अर्थात असे अनुभव मिळवायला परदेशगमनाचीच आवश्यकता नाही आपल्याकडे देखील काश्मीर, म्हैसूर वगैरे स्थळी हे अनुभव येतातच

दोन

# रोज गार्डन विदाऊट रोजेस...

दुसरे दिवशी सकाळी वॉबीच्याच गाडीतून पतायाहून बँकॉक येथे आलो भोवतालच निसर्गदृश्य नेहमीप्रमाणेच होत वातावरण व सृष्टिसौंदर्य यातही काही फरक जाणवला नाही खास वेगळेपण जाणवल ते गाड्याच्या मॉडेल-मध्ये आणि माणसाच्याही मॉडेलमध्ये ! सर्व छोट्या खाजगी गाड्या व टॅक्सी जपानमेक होत्या थायी माणसाच मॉडेल मात्र सर्वसाधारण चिनी माणसा-प्रमाणे बारीक किलकिले डोळे, अपर व नकट नाक छोटासा बांधा, उंचीच्या मानाने खांदे थोडेसे रुंद गाड्या जपानी मॉडेलच्या व माणस चिनी मॉडेलची ! जपानी व चिनी लोकात तसा फार फरक नसला तरीही थायी माणस दिसण्यात अधिकतर चिन्यांसारखीच

थायी स्त्रिया सर्वच क्षेत्रात पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम कर-ताना आढळतात स्त्रीला भरपूर स्वातंत्र्य असल्यामुळे स्त्री-मुक्ती चळवळ अस काही प्रकरण येथे नसाव अस वाटत


बँकॉक येथे आलो त्याच दिवशी येथून तीस ते पस्तीस किलोमीटर अंतरा-वरील नाकोन फतोम या गावी असलेल्या रोझगार्डनमधील 'थायी कल्चरल शो' पाहण्यास आम्ही गेलो थायी जीवनाची व संस्कृतीची झलक पाहण्यासाठी प्रत्येक परदेशी व्यक्तीने हा सांस्कृतिक कार्यक्रम जरूर पहावा अस गॅरीने आम्हाला आवर्जून सांगितल होत

थाचीन नदीच्या काठी नाकोन फतोम या गावी एका चिनी गृहस्थाने

एक थायी व्हिलेज तयार केल आहे तेथेच ही रोझगार्डन आहे येथे बांबूच्या लाकडाने तयार केलेले एक पारपरिक थिएटर आहे येथील पूर्वापार बाबू-सस्कृती दाखवण्यासाठी हे थिएटर जुन्या स्थितीतच, होत तसच बाबूमध्ये जतन करून ठेवल असाव

ते बाबूचे सास्कृतिक भवन 'हाऊस फुल' झाल होत कित्येक लोक बसायला जागा नसल्यामुळे उभेच होते प्रेक्षकवर्गात सर्व परदेशी प्रवासीच होते येथील स्थानिक प्रेक्षक कोणीच नव्हता थिएटर वातानुकूलीत तर नव्हतच, पण साधे पखेही नव्हते त्यामुळे आत येताना देण्यात आलेले पाढरेशुभ्र, उडीकोलनमधे भिजवलेले थडगार नॅपकिन चागलेच उपयोगाला आले

शृगारित हत्तीच्या सलामीने व कलाकारानी गायलेल्या स्वागत गीताने कार्यक्रमास प्रारभ झाला त्यानतर साचिक थायी पारपरिक नृत्य, दीपनृत्य, बाबूनृत्य अशी विविध प्रकारची नृत्य व कोंबड्याची झुज, विविध द्वद्व युद्ध, थायी बॉक्सिग असे अनेक खेळांचे प्रकार सादर करण्यात आले



थायी लोकाना बॉक्सिग या क्रीडाप्रकाराचे विलक्षण वेड आहे येथील दोन दिवसाच्या मुक्कामात आम्ही पाहिल टी व्ही वर कधीही कोणताही चॅनेल लावावा तर हा बॉक्सिगचाच कार्यक्रम ! रस्त्याने जातानादेखील

बॉक्सिंगचे स्टेडियम जागोजागी आढळतात हे थायी लोक सतत बॉक्सिंग हा खेळ खेळत असतात म्हणूनच यांच्या नाकाचे शेंडे गायब झाले असावेत की काय अशी मिस्कील शंका कोणाच्याही मनात आल्यावाचून राहत नसेल

या सर्व कार्यक्रमात आवडला, तो बाबूडान्स थायलंड, मलेशिया, फिलि-पाईन्स वगैरे बेटावर बाबूचे उत्पादन विपुल असल्यामुळे या बाबूचा उपयोग विविध क्षेत्रामध्ये केला जातो-- मोठमोठी घरे बांधण्यापासून ते घरातील नाजूक फुलदाणी व पुष्परचनेपर्यंतदेखील ! अशा या नित्योपयोगी बाबूने या लोकांच्या सांस्कृतिक जीवनातही महत्त्वाचे स्थान पटकावल आहे बाबूच्या गतीमय हालचाली, त्यामुळ त्यातून निघणारा सुरेख नाद व ठेका, जमिनीवर गतीने आपटल्या जाणाऱ्या अनेक बाबूच्या आत बाहेर चपलख पदन्यास करीत केल जाणार नृत्य मनोहर वाटत

थायी नृत्याचा प्रारभ भारतीय नृत्याप्रमाण गुरुनमस्कारानच होतो एक-दर थायी नृत्यकलेवर आपल्या भारतीय नृत्याचा फारच मोठा प्रभाव आढ-ळतो त्यामुळे त्यात आपल्याला नावीन्य आढळत नाही, तरी आपल्या मनाल ते पाहताना आत्मीयता निर्माण होते

नृत्य प्रकारानतर आपल्या रामायण या ग्रथातील एक भाग मुखवटा नाट-काच्या रूपाने सादर करण्यात आला तो प्रसग होता हनुमान व सीतेची भेट आणि राम-रावण युद्ध थाई सस्कृतीमध्ये, इतिहासामध्ये, रामायणाला अत्यत महत्त्वपूर्ण व आदरणीय स्थान आहे थायी लोकाची राम-सीतेवर नितात श्रद्धा आहे रामायणातील कथानकावर आधारित, मुखवटा नाटक हा नाट्य प्रकार येथे विलक्षण लोकप्रिय आहे

थायलडमध्ये विवाहसोहळा कसा सपन्न होतो याच नृत्यमय प्रात्यक्षिक शेवटी कलाकारानी दाखविले भारतीय व थायी विवाहपद्धतीमध्ये बरच साधर्म्य आहे प्रत्येक दहा मैलावर भाषा बदलत असली तरी सस्कृतीच स्थित्यतर इतक्या सकोचान होत नसत

एकदर या थायी कल्चरल शोमध्ये मला तरी विशेष नावीन्य आढळल नाही कारण थायी सस्कृतीची पाळमुळच मुळात भारतीय सस्कृतीमध्ये आहेत पाश्चिमात्य पर्यटक मात्र हे कार्यक्रम लक्ष देऊन कौतुकाने पाहत होते, फोटो व मुव्ही घेत होते अशा प्रकारचे, याही प्रकारचे आकर्षक व परिणामकारक सांस्कृतिक कार्यक्रम भारतातील विविध प्रेक्षणीय स्थळी आयोजित झाले तर ते परदेशी पर्यटकाच फार मोठ आकर्षण ठरेल

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व कलाकारानी एकत्र येऊन आम्हाला अभिवादन केले आपण नमस्कार करतो अगदी त्याचप्रमाणे ! नतर त्याच्याबरोबर

सामूहिक नृत्यात सहभागी होण्यासाठी प्रेक्षकाना आमत्रण दिले बरेच गोरे स्त्री-पुरुष त्याच्यामधे आनदाने, उत्साहाने सामील झाले

थकल्याने की सुस्तावल्याने मि बिनधास्तला हा कार्यक्रम 'इटरेस्टिग' वाटला नसावा तरीही आमच्या एका सहप्रवाशाने मिस्कीलपणे त्याना आवाहन केल,

"मि बिनधास्त, तुम्हीपण आपल्या सर्वांच्या वतीने त्या मुलीबरोबर नृत्यात सामील व्हा ना!"

इतर सर्वांनी या प्रस्तावास अनुमोदन दिले सुस्तावलेल्या बिनधास्तच्या अगी उत्साह सचारला,

"पण मडळी, आमची एक शर्त आहे आमचा फोटो काढला पाहिजे"

"एखादी फक्कड छोकरी पकडा जरूर मी तुमचा फोटो काढेन पण मि बिनधास्त, पाच बहथ द्यावे लागतील ह!".. माझ्या पतिराजांनी मि बिनधास्तला फोटो काढण्याच भरघोस आश्वासन दिल

"अहो डॉक्टरसाहेब, पाच का? चांगले पन्नास बहथ घ्या की!" रगमचाकडे निघालेले मि बिनधास्त पुन्हा मागे वळून म्हणाले,

'पण मडळी, एक शका विचारू का? या कार्यक्रमात नाचणाऱ्या या तरुणी प्रत्यक्षात तरुणीच आहेत ना? का कालच्या टिफनी शो प्रमाणे स्त्रियाचे रगरूप धारण केलेल्या साऱ्या मोरूच्या मावशाच आहेत?"

"ते आम्ही एवढ्या लांबून कस काय सागू शकणार? म्हणूनच आम्ही तुम्हाला या नृत्यात सहभागी व्हायला सागतोय तुम्ही आधी त्या मुलींच्या-बरोबर सामील व्हा आणि शोधा झाल त्या तरुणी आहेत की तरुण ते! शोधायला गेल्यावर सत्य सापडेल!".

पडत्या फळाची आज्ञा मिळताच मि बिनधास्त अती उत्साहाने त्या थायी नर्तकीच्या घोळक्यात अगविक्षेप करायला सामील झाले.

आश्चर्य म्हणजे, थोड्याच वेळात त्या थायी युवती मि बिनधास्तच्या भोवती भोवती नाचू लागल्या मि बिनधास्तने अशी काय करामत केली कोण जाणे! नृत्यानतर प्रत्येकीने बिनधास्तबरोबर स्वतत्र फोटो काढून घेतला मि बिनधास्तने त्याच्यावर 'बहथ' ची मुक्त हस्ताने नुसती खैरात केली त्या जल्लोषात डॉक्टरसाहेब मात्र मि बिनधास्त आणि त्याच्या सख्याचा फोटोच काढायचा विसरून गेले झाल, म्हणजे आमचे पाच की पन्नास बहथ चक्क हातचे निसटले!

उडीकोलनचे पांढरे नॅपकीन पुनश्च परत करून आम्ही बसकडे निघालो कलाकाराच्या वेढ्यातून व प्रेक्षकाच्या गर्दीतून मि बिनधास्त बाहेर येईपर्यंत

आम्हा सर्वांची उत्सुकता अगदी शिगेला पोहोचली होती सर्व मंडळी बसमध्ये स्थानापन्न झाल्यानंतर त्या थायी कल्चरल शोच्या पॉप्युलर ठरलेल्या हीरोने बसमध्ये पदार्पण केलं

" मग काय दोस्तहो, जमलं का आम्हाला नृत्य करायला ?

" वा, मि बिनधास्त तुम्ही तर कमालच केलीत ! त्या थायी पोरी तुमच्याभोवती नुसत्या पिंगा घालीत होत्या अशी काय मोहिनी टाकली तुम्ही ?"

" सांगू ? .. मी प्रत्येकीच्या कमरेत हात घालून तिच्या कानात गुणगुणलो—

' नयना हैं जादूभरे

गोरी तोरे नयना हैं जादूभरे '

" मी गुणगुणलो त्यातलं एक अक्षरही न समजता त्यामागील आशय जाणून त्या पोरी माझ्यावर खूष झाल्या जशा गोपी, कृष्णावर लट्टू व्हायच्यात तशा आता गोपी कृष्णावर एवढ्या का फिदा होत्या हेही तुम्हाला सांगायला हवं का ? . तुमचा रामायणाचा अभ्यास जेमतेमच असावा ! '

आता मात्र मलाही त्या संभाषणात सहभागी व्हावंस वाटलं

" रामायणाचा नव्हे, महाभारताचा म्हणा ! तुमचा गोपीकृष्ण रामायणाचा नसून महाभारताचा नायक आहे बरं पण मि बिनधास्त, तुमच्याभोवती नाचणाऱ्या त्या सर्व मुलीच होत्या ना ? का कालच्या टिफनी शो प्रमाणेच त्या नारी रूपधारी नटेश्वर होत्या ? "

" आता त्या सगळ्या माझ्याभोवती पिंगा घालीत होत्या, त्या स्त्रिया असल्याशिवाय का ?"

" पण कशावरून ?"

" आता तेही सांगायला हवं का ? आम्ही सर्वज्ञानी असोत वा नसोत, स्पर्शज्ञानी मात्र खासच आहोत बरं ! '

मि बिनधास्तने आत्मविश्वासाने दिलेला बिनचूक निर्णय ऐकून हॉटेलवर परतणाऱ्या आमच्या बसमध्ये हास्याचे फवारे उडाले माझं मन मात्र क्षणभर अंतर्मुख झालं सुन्न झालं . थायलंडसारख्या एका परक्या देशातील लोक रामायणावर नितांत श्रद्धा ठेवतात, राम-सीतेला पूज्य मानतात, आणि आमच्या मि बिनधास्तला मात्र भारतीय संस्कृतीचा कणा असलेल्या रामायणाचा हीरो राम नसून कृष्ण वाटतो ! ...

दिवस मावळायच्यावेळी आम्ही आमच्या विंडसर हॉटेलवर परतलो आमच्या हॉटेलमध्येच एक शॉपिंग सेंटर होते तेथे एका भारतीय शीख सरदारजींचे कपड्याचे दुकान होते बँकॉक शहरात एक ते दीड दिवसात सफारी सूट शिवून देणारे अनेक दुकानदार व शिंपी आहेत येथे कापड व शिलाई याचे दर फार स्वस्त असल्यामुळे येथे येणारा एकही प्रवासी सफारी किंवा सूट शिवल्याशिवाय येथून हालत नसावा किमतीसाठी येथेही हुज्जत घालावी लागते डॉ हिरालालचे कापड पसंत करणे, माप देणे चालू असताना मी सरदारजींशी खूप गप्पा मारल्या सरदारजींचे नाव खुशवतसिंग सचदेव

थायलंडमध्ये आल्यापासून आम्हा भारतीयांना पाहून अनेक थायी लोकांनी आमच्या पुढे, नुकत्याच झालेल्या, दिवंगत पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या अमानुष हत्येबद्दल हळहळ व निषेध व्यक्त केला होता श्रीमती इंदिरागांधी व पंतप्रधान राजीव गांधी यांच्याबद्दल या लोकांत असलेली प्रेमाची व आदराची उत्कटभावना आम्हाला वारंवार जाणवली

खुशवतसिंग सचदेव गेली वीस वर्षे बँकॉकमध्ये राहतात त्यांचे सर्वच कुटुंबिय बँकॉकमध्ये आहेत भारतात त्यांचे कुणीही नातेवाईक नाहीत म्हणून एका तटस्थ व्यक्तीची मत जाणण्याच्या उत्सुकतेने मी त्यांच्याकडे चौकशी केली

"भाईसाहब, अब तो आप थायलंडके नागरिक हैं। फिरभी इंडियाके बारेमें आपकी क्या भावना है ?'

"एक माँ की तरह "

"अब आप इंडिया वापस आना चाहेंगे ?"

"जी नहीं, यहाँ हमारा अच्छा खासा बडा बंगला है, गाडी है, अच्छी खासी दुकान है । आप जैसे बहोत इंडियन भाई-बहन हमे रोज मिलते हैं। अच्छा लगता है, मगर सच बोलू ? ये इंडियन लोग हमे बहोत सताते हैं, बहोत बारगेनिंग करते है जी ।"

मी थोडासा विषय बदलून प्रश्न केला,

"आपके लडके और लडकियाँ तो होगी, उनकी शादी आप इधरकेही थायी लोगोंके साथ करेंगे ?"

"हरगीज नही ' हम हमारे बेटेकी शादी इंडियन लडकीसेही करेंगे, बहु भारतसेही लायेंगे, और लडकीकोभी इंडियन लडकेसे ब्याह कर इंडिया भेजेंगे । ये थायी लोग दौलतके दीवाने है । यहाँकी जवान लडकियाँ पैसोंके खातिर किसी के भी पीछे भागती हैं ।"

" अच्छा भाईसाब, खलिस्तानके बारेमें आपका क्या खयाल है ?"

' देखोजी, हम इंडियासे दूर जरूर रहते हैं, मगर हम अपनी मातृभूमीका बटवारा सोच भी नही सकते, हमे खलिस्तानसे सख्त नफरत है।"

सरदारजींनी डॉक्टरांच्या सफारीची मापे पटापटा लिहून घेतली आणि लगेच दुसऱ्या दिवशी ट्रायलसाठी बोलवले

घरी पत्र लिहायचे होते एका दुकानात शिरलो तेथे काऊंटरवरच कार्डे होती सकाळी आमच्या हॉटेलच्या रिसेप्शन काउंटवर आम्हाला थायलंड-विषयीची बरीचशी माहितीपत्रके व मार्गदर्शिका मोफत मिळाल्या होत्या त्यामुळे आमच्या एक सहप्रवाशाला वाटले की कार्डेदेखील मोफतच असतील त्या दुकानात एक थायी मुलगी उकडलेला बटाटा खात उभी होती आमच्या सहकाऱ्याने एक कार्ड हातात घेऊन तिला विचारले,

" फ्री ?"

त्या मुलीला असा राग आला, तिने आमच्या मित्राच्या हातातून ते कार्ड घाईघाईने हिसकावून घेतले व मोठ्या ठसक्यात ती म्हणाली,

" हियर नथिंग फ्री ! इंडियन्स नेव्हर बाय !"

आम्हालाही असा राग आला त्या मुलीचा ! क्षणभर वाटले, बॉक्सिंगचा एक ठोसा देऊन तिचे नाबापुरते असलेले नाकदेखील ठेचून टाकावे ! भार-तीय लोक म्हणे खरेदी करत नाहीत ! इंपोर्टेड वस्तूंच्या मागे अक्षरश वेडेपणाने लागून असंख्य भारतीय लोक बँकॉक, सिंगापूर, हॉंगकॉंग येथे डोळे झाकून भरमसाठ खरेदी करतात तरीही ही पोरगी भारतीयाबद्दल असं म्हणते म्हणजे काय ? खरोखर अशा ठिकाणी खरेदीवर बहिष्कार टाकावा ! एके काळी स्वदेशीच्या ध्येयाने प्रेरित झालेल्या आपल्या देश-बंधूंनी चौकाचौकातून पेटवलेली परदेशी मालाची होळी आठवली . तेच भारतीय लोक आज परदेशी मालाच्या मागे वेडेपिसे होऊन धावत सुटले आहेत ! स्वदेशाभिमानाची धगधगणारी अग्निदेवता आज थंडावून निस्तेज मलूल झाली आहे !

बँकॉक वास्तव्यातील दुसरा दिवस सकाळी बरोबर आठ वाजता गॅरी आणि बॉबी उपस्थित झाले आम्हाला घेऊन बस निघाली आज गॅरी आणि बॉबी यांच्यामध्ये एक थायी षोडशा बसली होती ही कोण असावी हे जाणण्याची मला उगीचच उत्सुकता लागली मी डॉक्टरांना विचारले,

' ही गॅरीची मैत्रीण असेल की बॉबीची ?"

कोणी का असेना ती, आपल्याला काय त्याच ?"

पण ती थायी ललना कोण आहे हे कळल्याशिवाय मला चैन पडेना मी सरळ त्या मुलीलाच तिचे नाव विचारले तिने मोठ्या आनंदाने आपले नाव सांगितले,

"चथना चथना !" निर्झराचा झुळझुळ आवाज माझ्या कानी आला चथना . किती नाजूक आणि कोमल उच्चार .

"गॅरी, तुम शादीशुदा हो ?"

माझ्या या अनपेक्षित प्रश्नामुळे त्याने चपापून चथनाकडे पाहिले पण तिला कुठं आपली भाषा समजते, हे ध्यानी येताच, गॅरीने प्राजळपणे माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले,

"जी हाँ ! एका थायी मुलीशी मी लग्न केलं आहे"

"मग ही चथना कोण आहे ?"

"माझी मैत्रीण !"

आता माझी उत्सुकता शमली, पण विचारचक्राला गती देऊनच ! घरी बायको बाहेर एक सोडून अनेक छैलछबील्या मैत्रिणी . बायकोला याची कल्पना नसेल. कदाचित असेलही. तिचाही कोणी बॉयफ्रेंड असेल, यार असेल हे मग एकमेकाचा मत्सर करत असतील का ? मत्सर तसा देशातीत असतो. . जसा भारतात तसाच इथेही

चथना गॅरीला बिलगून बसली होती बस चालू होती मधेमधे गॅरी थायलंडविषयी माहितीवजा पोपटपंची करीत होता

थायलंड हा देश मलेशिया देशाचा एक शेजारी येथील लोकसंख्या पाच कोटींच्या आसपास आहे हा कृषिप्रधान देश असून प्रामुख्याने तांदळाचे येथे विपुल उत्पादन होते जगातील मोठ्या प्रमाणात तांदळाची निर्यात करणाऱ्या देशांमध्ये थायलंडची गणना होते तांदळाबरोबर रबराचेही मोठ्या प्रमाणात येथे उत्पादन होते रबर निर्यात करणाऱ्या राष्ट्रामधे थायलंडचा तिसरा नंबर लागतो पहिला नंबर मलेशियाचा व दुसरा इंडोनेशियाचा

थायलंड म्हणजे जगातील हौशी पर्यटकाचं फार मोठं आकर्षण ! त्यामुळे थायलंडला परदेशी चलनाची फार मोठ्या प्रमाणात प्राप्ती होते

येथील ९५ टक्के लोक बौद्धधर्मीय आहेत. जागोजागी गौतमबुद्धाची मंदिरे आहेत पाचूच्या बुद्धाचं मंदिर, सुवर्णबुद्धमंदिर, संगमरवरी बुद्धमंदिर, पहुडलेल्या बुद्धाचं मंदिर एकाच गौतमबुद्धाची शेकडो रूपं आणि हजारो मंदिरे

एकट्या बँकॉक शहरामध्ये चारशेच्या जवळपास छोटी-मोठी बुद्धमंदिरे आहेत बुद्धगया भारतात नसून थायलंडमधेच असावी की काय असा क्षणभर

संभ्रम पडलो 'थायलंड' या नावाऐवजीं या देशाने 'बुद्धलँड' असे नाम धारण केले असते तर ते अधिक समर्पक झाले असते, असाही विचार मनात येऊन गेला

बस सुवर्णबुद्धमंदिराजवळ थांबली चपला बाहेर काढून आम्ही मंदिरात प्रवेश केला मंदिराची जडणघडण आपल्या हिंदूमंदिराप्रमाणेच– विस्तीर्ण प्रांगण, उंच उंच गोपुरे, त्यावर कलाकुसरीचे नक्षीकाम, आतील दैवतांची प्रसन्न धीरगंभीर मूर्ती आपल्या मंदिराच्या आवारात उंच उंच दीपमाळा असतात, तर येथे उंच उंच स्तूप या सुवर्णबुद्धमंदिराच्या मुख्य सभामंडपा-समोरच, आतील सुवर्णमूर्तीच्या बरोबर सामोरा एक छोटा मंडप आहे तेथे अनेक कमलपुष्प खोचली होती, त्याचबरोबर पुष्कळ मेणबत्त्याही प्रज्वलित करून ठेवल्या होत्या गौतमबुद्धाला कमळाचे फूल मोठ्या भक्तिभावाने येथील लोक वाहतात कारण गौतमबुद्धाला जेव्हा बोधिवृक्षाखाली बुद्धत्व प्राप्त झाले होते तेव्हा लोकांनी कमलपुष्पे बोधिसत्वाच्या चरणावर अर्पण केली होती शरणभाव व्यक्त करण्याचे हे तेव्हापासून साधन ठरले त्याच-बरोबर मेणबत्त्या पेटवूनही येथे शरणभाव व्यक्त केला जातो

ख्रिश्चनधर्मीय लोक चर्चमध्ये अशाच मेणबत्त्या लावतात हिंदुधर्मीय आपल्या मंदिरात उदबत्त्या लावतात कोठेही पाहा, मनुष्य आपल्या अंतः-करणातील अमूर्त शरणभाव, भक्तिभाव व्यक्त करण्यासाठी अशा काही ना काही मूर्त माध्यमाचा आधार घेत असताना आढळतो

येथील थायी लोक, जैनधर्मीय लोकांप्रमाणेच, खाली वाकून जमिनीवर डोके ठेवून, मूर्तीच्या पाया पडत होते अशा नमस्काराला जैन लोक 'खमा-सण' असे म्हणतात मुस्लिम लोकदेखील नमाज पठन करताना असेच खाली वाकून नतमस्तक होतात या सर्व पद्धतीमागे समान भावना असते. त्या अदृश्य, अविनाशी, अमर शक्तीपुढे माथा झुकवावासा वाटणे . अहंभाव क्षणभर विसरावासा वाटणे अशातूनच या विनाशी, अशाश्वत मनुष्य-प्राण्याच्या जीवाला शांती मिळते मानव आपापले वेगळे धर्म, पंथ प्रस्थापित करून, त्यांचे वेगळेपण सतत टिकवण्याचा प्रयत्न करीत असला तरी पर-मात्म्यापुढे लीन होताना त्याचे हे वेगळेपणाचे भान हरपून जाते आणि तो असा नतमस्तक होतो

येथील सुवर्णबुद्ध मंदिरातील गौतम बुद्धाची मूर्ती पद्मासनात आहे तिची उंची अकरा फूट असून वजन साडेपाच टन आहे ही संपूर्ण सोन्याची आहे तिच्या चक्षूमध्ये मोती बसवले असून आतील बुबुळे नीलमण्यांची आहेत बुद्ध-मूर्तीची मुद्रा अत्यंत शांत, प्रसन्न, धीरोदात्त आहे ही मूर्ती पुरातन असून

थायी लोकांच्या हृदयात व थायलंडच्या इतिहासात या मूर्तीला अनन्यसाधारण स्थान आहे. पूर्वी ब्रह्मदेशाचे व सयामचे युद्ध चालू असताना ही सुवर्णमूर्ती पळवण्याचा ब्रह्मी राजाचा मानस होता, पण त्या वेळच्या थायी राजाने या मूर्तीचे प्राणपणाने जतन केले. तिच्यावर सिमेंटचे लेप लावून ती शत्रूपासून लपवून ठेवली. सयामची राजधानी जसजशी एका शहरातून दुसऱ्या शहरी बदलत होती, तसतशी ही बुद्धप्रतिमा सयामचा राजा आपल्याबरोबर नवनवीन राजधानीत नेत होता. आज ती मूर्ती थायलंडची राजधानी बँकॉक या शहरातल्या या मंदिरात प्रतिष्ठित केलेली आहे. म्हणून या मंदिरास सुवर्णबुद्धमंदिर असे म्हणतात. थायी राजाचे आणि प्रजेचे या सुवर्णमूर्तीवर अपार प्रेम आहे. पूर्वी शत्रूपासून लपवून ठेवण्यासाठी मूर्तीवर लावण्यात आलेले सिमेंटच्या लेपाचे अवशेष आजही मंदिराच्या प्रांगणात आपणास पहायला मिळतात. कित्येक वर्षं सिमेंटमधे लपून राहिलेली ही सुवर्णबुद्ध मूर्ती आज प्रत्येक थायी व्यक्तीच्या अंतःकरणात सामावून राहिली आहे.

थायलंडमधे सध्या लोकशाही राज्यपद्धती असली तरी येथे इंग्लंडप्रमाणे नामधारी राजा आहे. येथील राजाला 'रामा' असे म्हणतात. ही गोष्ट त्यांच्यावर रामायणाचा किती प्रभाव आहे हे सिद्ध करते. रामा एक, रामा दोन, रामा तीन ... सध्याचा रामा नऊ म्हणजे नववा राजा आहे. सध्याच्या 'रामा नऊ' राजाचे नाव आहे भूमिबाल. भूमिबाल म्हणजेच भूमिपाल, भूपाल ! राजा येथील राजकारणात सक्रिय भाग घेत नाही किंवा ढवळाढवळ करीत नाही. राजा-राणी, युवराज-युवराज्ञी राजवाड्यात राहतात. या शाही परिवारातील मुलांसाठी एक स्वतंत्र 'रॉयल स्कूल' आहे.

राजाला रामा म्हटल्यावर राजधानीला अयोध्या म्हणणारच. हे मूळ अयोध्या नाव, अपभ्रंश किंवा इतर भाषांचा प्रभाव होऊन आज 'आयुथया' असे झाले आहे. सयामची राजधानी इ. स. १३०० ते १३५० या काळात सुकोथाय या शहरी होती. त्यानंतर आयुथया ही नगरी राजनगरी झाली. ही राजनगरी पुनश्च इ. स. १७६८ ते १७८२ या कालात थोनबुरी येथे स्थलांतरित झाली. सयाम आणि ब्रह्मदेश यांच्या झालेल्या युद्धामधे आयुथया हे राजधानीचे शहर उद्‌ध्वस्त झाले. इ. स. १७८२ साली रामा एक या राजाने बँकॉक हे शहर वसवून येथे सयामची राजधानी थाटली. ती आजपर्यंत येथेच आहे. आज बँकॉक हे एक अद्ययावत शहर आहे. समुद्रकिनाऱ्यापासून १८ मैल अंतरावर चाओप्राया या नदीच्या काठी हे शहर वसले असून थायलंड देशाचा ८० टक्के व्यापार बँकॉक या बंदरातून चालतो.

लडन शहराची टेम्स, पॅरिसची सीन, तशी बँकॉकची चाओप्राया !
चाओप्राया ही नदी बँकॉकच्या जीवनाचे अविभाज्य अग आहे कित्येक थायी लोक आजही या नदीमधे नावामधे आपली घरकुल थाटून राहतात त्यांचा एक 'तरगता बाजार' रोज सकाळी भरतो त्या तरगत्या बाजाराचा उत्साह, जल्लोष पाहण्यासारखा असतो पूर्वी या बँकॉक शहरात जागोजागी रस्त्याऐवजी पाण्याचे कालवेच अधिक होते त्या कालव्यातूनच वाहतूक चालायची त्यामुळे या शहराला काही युरोपियन पर्यटकांनी 'पूर्वेकडचे व्हेनिस' असे नाव पाडले होते, पण आज मात्र स्वच्छ आणि प्रशस्त रस्ते सर्वत्र दिसतात बँकॉकचा तरगता बाजार पाहून त्याचे 'पूर्वेकडचे व्हेनिस' हे नाव काही अशाने खरे वाटते

थायलड देशाचे मूळचे नाव 'मुआगथायी' असे होते, पण सोळाव्या शतकात येथे आलेल्या युरोपियन लोकानी याचे 'सयाम' असे नामातर केले रामा सहा या राजाने सयाममध्ये लोकशाही राज्यपद्धतीची स्थापना केली व सयामचे थायलड असे नामकरण केले थाय म्हणजे फ्री .स्वतत्र ! थायलंड थायलँड म्हणजे स्वतत्र लोकांचा देश, स्वायत्तभूमी !

आशियातील इतर देशाप्रमाणे, थायलडवर परकीय सत्तेने कधीच वर्चस्व गाजवले नाही त्यामुळे नावाने स्वायत्त असलेला हा देश आजपर्यंत राजकीय-दृष्टयाही स्वतत्र राहिला आहे

राजकीयदृष्टया स्वतत्र असलेल्या या देशातील लोकांचा धर्म, सस्कृती, आचारविचार, राहणीमान या गोष्टी मात्र, अमेरिका, भारत, मलेशिया, चीन यासारख्या अनेक परकीय प्रभुत्वाच्या गुलामगिरीत पूर्णत जखडलेल्या आढळतात

येथील प्रत्येक बौद्ध धर्मीय व्यक्तीला आयुष्यात केव्हातरी कमीत कमी तीन महिन्यासाठी सन्यासी जीवनाची दीक्षा घ्यावी लागते. केशमुडन करून, भगवी वस्त्रे परिधान करून मठामध्ये व्रतस्थ रहावे लागते ब्रह्मचर्याचे पालन करावे लागते मासाहार वर्ज्य करावा लागतो अशा सन्यासी व्यक्तीला भिक्षुक किंवा 'मॉंक' म्हणतात व्रतस्थ स्त्रीला भिक्षुकी किंवा 'नन्' म्हणतात व्रतस्थ राहण्याचा हा नियम स्त्रियांच्या बाबतीत मात्र ऐच्छिक असतो

गौतम बुद्ध या सिद्ध पुरुषाला थायी लोक परमेश्वर मानतात त्याच्यावर नितात प्रेम करतात भारतातील बुद्धगयेला पवित्र तीर्थक्षेत्र समजतात येथील अनेक बुद्धमदिरांच्या प्रागणात गौतम बुद्धाच्या प्रतिमा, मूर्ती, फोटो, वॉल-फ्रेम विक्रीसाठी मांडलेले असतात आपल्याकडे अष्टविनायक गणपतीच्या

स्थानी, साईबाबाच्या शिर्डीत किंवा श्रीकृष्णाच्या द्वारकेत जसे दृश्य दिसते तसेच थोडेफार येथेही आढळते विशेष आश्चर्य वाटते ते थायलंड सरकारने केलेल्या एका अजब नियमाचे थायलंडमधे कोठेही खरेदी केलेली गौतम बुद्धाची मूर्ती, कोणालाही थायलंडच्या बाहेर परदेशी नेता येत नाही परदेशी पर्यटकांनी बुद्धप्रतिमा, मूर्ती खरेदी कराव्यात म्हणून बाजारात मांडल्या जातात, प्रवाशांनी त्यांची खरेदी करावी म्हणून विक्रेत्याकडून आग्रह केला जातो, बारगेनिंगची प्रलोभन दाखवली जातात, परंतु ती परदेशी नेण्यावर सरकारी निर्बंध घालण्यात येतात या अजब विरोधाभासाचे आश्चर्य वाटल्या-वाचून राहत नाही

एखाद्या परदेशी व्यक्तीस एखादी बुद्धमूर्ती आपल्या देशात न्यायची इच्छा झाली तर त्याला आपण ही बुद्धमूर्ती भक्तिभावाने, श्रद्धेने व आदराने नेत आहोत, या मूर्तीचा आपल्याकडून अनादर होणार नाही, अवहेलना होणार नाही असे सिद्ध करावे लागते, तरच ' फाईन आर्टस डिपार्टमेंट 'कडून त्या व्यक्तीला एक्स्पोर्ट लायसेन्स मिळते या सोपस्कारानंतरच हवी ती मूर्ती थायलंडच्या बाहेर नेता येते बुद्धमूर्ती जेवढी पुरातन, तेवढी तिची एक्स्पोर्ट फी जास्त

आपल्या पूज्य भगवानाच्या मूर्तीचा कोणी केवळ शोभेची वस्तू असा उपयोग करू नये, किंवा इतर धर्मीयांकडून तिची विटंबना होऊ नये हा प्रामाणिक हेतू या निर्बंधामागे आहे आपल्या लाडक्या मुलाच्या जीवाला कसलाही धोका पोचू नये म्हणून त्याला चोवीस तास डोळ्यांत तेल घालून जपणाऱ्या आईप्रमाणे ही दक्षता घेतली जात असावी

आम्हाला कोणाला बुद्ध मूर्ती विकत घ्यायची नव्हतीच ज्या भूमीत हा महापुरुष जन्मला, अवतरला, जेथे चैतन्यमय देहाने वावरला व महान तपश्चर्या करून बोधिसत्व झाला, ज्या पवित्र भूमीवर त्याचे महानिर्वाण होऊन तो मोक्षपदी पोहोचला, त्या पावन देशातील आम्हा भारतीयांना, अशा या सिद्धपुरुषाची जड, अचेतन मूर्ती परदेशातून ' इंपोर्टेड म्हणून आयात करण्यात औचित्य वाटत नव्हते

दुपारचा वेळ खरेदीसाठी होता गॅरी आम्हाला बँकॉकमधील प्रसिद्ध ' इंद्रा मार्केट 'कडे घेऊन चालला प्रशस्त युवराज रोडवरून आमची गाडी चालली होती दुतर्फा नजर टाकीत मी बँकॉक शहराचं रूप न्याहाळीत होते येथील जवळजवळ प्रत्येक इमारतीच्या अंगणात, सिमेंटच्या अथवा लाकडाच्या चार पायांवर एक छोटेसे बुद्धमंदिर उभारलेले असते ते पाहून आपल्या-कडील तुळशीवृंदावनाची आठवण येते या बुद्धमंदिराला छोटासा पॅगोडा-

लडन शहराची टेम्स, पॅरिसची सीन, तशी बँकॉकची चाओप्राया !
चाओप्राया ही नदी बँकॉकच्या जीवनाचे अविभाज्य अग आहे कित्येक थायी लोक आजही या नदीमधे नावामधे आपली घरकुल थाटून राहतात त्यांचा एक 'तरगता बाजार' रोज सकाळी भरतो त्या तरगत्या बाजाराचा उत्साह, जल्लोष पाहण्यासारखा असतो पूर्वी या बँकॉक शहरात जागोजागी रस्त्याऐवजी पाण्याचे कालवेच अधिक होते त्या कालव्यातूनच वाहतूक चालायची त्यामुळे या शहराला काही युरोपियन पर्यटकानी 'पूर्वेकडचे व्हेनिस' असे नाव पाडले होते, पण आज मात्र स्वच्छ आणि प्रशस्त रस्ते सर्वत्र दिसतात बँकॉकचा तरगता बाजार पाहून त्याचे 'पूर्वेकडचे व्हेनिस' हे नाव काही अशाने खरे वाटते

थायलड देशाचे मूळचे नाव 'मुआगथायी' असे होते, पण सोळाव्या शतकात येथे आलेल्या युरोपियन लोकानी याचे 'सयाम असे नामातर केले रामा सहा या राजाने सयाममध्ये लोकशाही राज्यपद्धतीची स्थापना केली व सयामचे थायलड असे नामकरण केले थाय म्हणजे फ्री स्वतत्र ! थायलंड थायलँड म्हणजे स्वतत्र लोकाचा देश, स्वायत्तभूमी !

आशियातील इतर देशाप्रमाणे, थायलडवर परकीय सत्तेने कधीच वर्चस्व गाजवले नाही त्यामुळे नावाने स्वायत्त असलेला हा देश आजपर्यंत राजकीय-दृष्ट्याही स्वतत्र राहिला आहे

राजकीयदृष्टया स्वतत्र असलेल्या या देशातील लोकांचा धर्म, सस्कृती, आचारविचार, राहणीमान या गोष्टी मात्र, अमेरिका, भारत, मलेशिया, चीन यासारख्या अनेक परकीय प्रभुत्वाच्या गुलामगिरीत पूर्णत जखडलेल्या आढळतात

येथील प्रत्येक बौद्ध धर्मीय व्यक्तीला आयुष्यात केव्हातरी कमीत कमी तीन महिन्यासाठी सन्यासी जीवनाची दीक्षा घ्यावी लागते. केशमुडन करून, भगवी वस्त्रे परिधान करून मठामध्ये व्रतस्थ रहावे लागते ब्रह्मचर्याचे पालन करावे लागते मासाहार वर्ज्य करावा लागतो अशा सन्यासी व्यक्तीला भिक्षुक किवा 'मॉक' म्हणतात व्रतस्थ स्त्रीला भिक्षुकी किंवा 'नन्' म्हणतात व्रतस्थ राहण्याचा हा नियम स्त्रियाच्या बाबतीत मात्र ऐच्छिक असतो

गौतम बुद्ध या सिद्ध पुरुषाला थायी लोक परमेश्वर मानतात त्याच्यावर नितात प्रेम करतात भारतातील बुद्धगयेला पवित्र तीर्थक्षेत्र समजतात येथील अनेक बुद्धमदिराच्या प्रागणात गौतम बुद्धाच्या प्रतिमा, मूर्ती, फोटो, बॉल-फ्रेम विक्रीसाठी माडलेले असतात आपल्याकडे अष्टविनायक गणपतीच्या

स्थानी, साईबाबाच्या शिर्डीत किंवा श्रीकृष्णाच्या द्वारकेत जसे दृश्य दिसते तसेच थोडेफार येथेही आढळते विशेष आश्चर्य वाटते ते थायलंड सरकारने केलेल्या एका अजब नियमाचे थायलंडमधे कोठेही खरेदी केलेली गौतम बुद्धाची मूर्ती, कोणाल्लाही थायलंडच्या बाहेर परदेशी नेता येत नाही परदेशी पर्यटकांनी बुद्धप्रतिमा, मूर्ती खरेदी कराव्यात म्हणून बाजारात मांडल्या जातात, प्रवाशांनी त्याची खरेदी करावी म्हणून विक्रेत्यांकडून आग्रह केला जातो, बारगेनिंगची प्रलोभन दाखवली जातात, परंतु ती परदेशी नेण्यावर सरकारी निर्बंध घालण्यात येतात या अजब विरोधाभासाचे आश्चर्य वाटल्या-वाचून राहत नाही

एखाद्या परदेशी व्यक्तीस एखादी बुद्धमूर्ती आपल्या देशात न्यायची इच्छा झाली तर त्याला आपण ही बुद्धमूर्ती भक्तिभावाने, श्रद्धेने व आदराने नेत आहोत, या मूर्तीचा आपल्याकडून अनादर होणार नाही, अवहेलना होणार नाही असे सिद्ध करावे लागते, तरच ' फाईन आर्टस डिपार्टमेंट 'कडून त्या व्यक्तीला एक्स्पोर्ट लायसेन्स मिळते या सोपस्कारानंतरच हवी ती मूर्ती थायलंडच्या बाहेर नेता येते बुद्धमूर्ती जेवढी पुरातन, तेवढी तिची एक्स्पोर्ट फी जास्त

आपल्या पूज्य भगवानाच्या मूर्तीचा कोणी केवळ शोभेची वस्तू असा उपयोग करू नये, किंवा इतर धर्मीयांकडून तिची विटंबना होऊ नये हा प्रामाणिक हेतू या निर्बंधामागे आहे आपल्या लाडक्या मुलाच्या जीवाला कसलाही धोका पोचू नये म्हणून त्याला चोवीस तास डोळ्यात तेल घालून जपणाऱ्या आईप्रमाणे ही दक्षता घेतली जात असावी

आम्हाला कोणाला बुद्ध मूर्ती विकत घ्यायची नव्हतीच ज्या भूमीत हा महापुरुष जन्मला, अवतरला, जेथे चैतन्यमय देहाने वावरला व महान तपश्चर्या करून बोधिसत्व झाला, ज्या पवित्र भूमीवर त्याचे महानिर्वाण होऊन तो मोक्षपदी पोहोचला, त्या पावन देशातील आम्हा भारतीयांना, अशा या सिद्धपुरुषाची जड, अचेतन मूर्ती परदेशातून ' इंपोर्टेड म्हणून आयात करण्यात औचित्य वाटत नव्हत

दुपारचा वेळ खरेदीसाठी होता गॅरी आम्हाला बँकॉकमधील प्रसिद्ध ' इंद्रा मार्केट 'कडे घेऊन चालला प्रशस्त युवराज रोडवरून आमची गाडी चालली होती दुतर्फा नजर टाकीत मी बँकॉक शहराच रूप न्याहाळीत होते येथील जवळजवळ प्रत्येक इमारतीच्या अंगणात, सिमेंटच्या अथवा लाकडाच्या चार पायावर एक छोटेसे बुद्धमंदिर उभारलेले असते ते पाहून आपल्या-कडील तुळशीवृंदावनाची आठवण येते या बुद्धमंदिराला छोटासा पॅगोडा-

देखील असतो आतील बुद्धमूर्तीसमोर भरपूर आरास केलेली असते अशा मदिरास थायी भाषेत ' बान फी ' असे म्हणतात, म्हणजे ' स्पिरीट हाऊस '

' स्पिरीट हाऊस ' म्हणजे ' स्फूर्तिस्थान ' ' चैतन्यगृह या चैतन्यदायी ' बान फी 'मुळे सर्व अमगलाचा नाश होऊन आपले कल्याण होते अशी या थायी लोकांची श्रद्धा आहे आम्ही राहिलो होतो त्या पचताराकित हॉटेल विडसरच्या प्रागणातदेखील असे सजवलेले ' स्पिरीट हाऊस आहे

इद्रा मार्केटजवळ येताच बस थाबली आम्ही बसमधून उतरताच आमच्या-भोवती अनेक विक्रेते जमले कोणी नायलॉनचे झूले, कोणी तयार कपडे, तर कोणी कृत्रिम फुल आणि फुलपाखरे घ्या म्हणून आमच्या मागे लागले ती कृत्रिम फुलपाखरे हवेत चागली दहा-बारा फूट उच उडवूनही त्यानी दाखवली मि बिनधास्तच्या विकृत डोक्यात मात्र वेगळ्याच तितलियाँ उडू लागल्या त्यानी गॅरीला बाजूला घेऊन विचारले,

" गॅरी, ये तो बच्चोंके लिए है, बडोंके लिए नही क्या कोई तितली ? "

" क्यो नही जी ? .. बहोत है और वो भी असली उसके लिए तो हमारा बँकॉक मशहूर है "

गॅरी आणि चयना आम्हाला बाय बाय करून निघून गेले मि बिन-धास्तही त्यांची पाठ धरून आमच्यातून निसटले आम्ही इद्रा मार्केटकडे निघालो

बारीक डोळ्यांचे, नकटे, गोरे चेहरे मोहरे तेवढे वेगळे, बाकीचा बाजा-राचा सारीपाट व थाटमाट गजबजलेल्या मुबईसारखा, भुलेश्वरच्या भूल-भुलैय्यासारखा येथेदेखील विक्रेत्यांना फूटपाथवर बसायला परवानगी नाही तरी खाद्यपदार्थांपासून, चप्पल-बूट, तयार कपडे, सूटकेसेस, कृत्रिम फुल, अशा नानाविध वस्तू विकणारे असख्य विक्रेते दोन्ही पदपाथावर बसले होते पण विशेष म्हणजे प्रत्येक विक्रेत्याने आपापल्या समोरच्या दुकान-दाराबरोबर सधान साधून ठेवले होते की काय कुणास ठाऊक आम्ही पद-पाथावरून जात असतानाच, त्याच्यापैकी कोणाला तरी पोलिसाची चाहूल लागली, आणि गमत म्हणजे काही क्षणातच ते सर्व फूटपाथ व्यापारी आपापले चबूगबाळे चपळाईने आवरून समोरच्या एकेक दुकानाच्या उद-रात अशा काही शिताफीने सामावून गेले की, थोड्याच वेळापूर्वी या फूट-पाथवर फुललेला बाजार होता हे कोणालाही खरे वाटले नसते पोलिसाची पाठ वळताच पुनश्च जसे थे ! आमच्या डोळ्यादेखत ते असख्य थायी विक्रेते चार्ली चॅपलीनप्रमाणे वेगाने अदृश्य झाले, व धोका टळताच तितक्याच चपळाईने बाहेर पडून आपापल्या पाठीवरचे बिऱ्हाड पुनश्च मांडून बसले

ती 'फास्ट मुन्ही' अजूनही आठवावी इतकी ताजी आहे !

रस्त्यावरील एका गल्लीत इद्रा मार्केट होते 'इद्रा' हे नाव किती भारतीय आहे ! एका बोळातून दुसऱ्या बोळात, दुसऱ्या बोळातून तिसऱ्या बोळात, .चार अरुद बोळामध्ये छोटासा चौक ..पुन्हा चार दिशाना चार चिचोळ्या गल्ल्या, प्रत्येक गल्लीच्या दुतर्फा छोटी छोटी, दाट दाट दुकाने बहुतेक सगळी लेडिज तयार कपड्याची, पादत्राणांची व सूटकेसेस, बॅग्ज याची मधेमधेच मास-मासे व समुद्र प्राण्याचे खाद्यपदार्थ बनवणारी छोटी हॉटेलदेखील प्रत्येक दुकानात थायी स्त्रियाच विक्रेत्या त्या छोट्या छोट्या दुकानाच्या बाहेर थायी मुलीचे मशीनवर भराभर कपडे शिवणे चालू

'इद्रा' म्हटल्यावर अप्सरा हव्यातच त्या थायी ललनानी रभा-उर्वशीचा दरबार भरवला होता, म्हणूनच याला इद्रा मार्केट असे नाव पडले की काय ? या थायी लोकाना कामातुर इद्रदेवदेखील माहीत असावेत म्हणायचे

पण छे, कुठे इद्राच्या दरबारातील रभा, उर्वशी, मेनकासारख्या मोहक, मादक सौंदर्यवती अप्सरा, आणि कुठे या रूपसौंदर्याचा अभाव असलेल्या, पण आपल्या उफाड तारुण्याचे भडक, उत्तान प्रदर्शन करणाऱ्या या नखरेल सुमार थायी पोरी !

एक मात्र खरे, सौंदर्याचा रसास्वाद जसा व्यक्तिसापेक्ष असतो, तसा तो प्रदेशसापेक्षही असतो हेच खरे भारतातील आणि विशेषत सस्कृत वाड्मयातील सौंदर्य सकल्पना, कमलनेत्र आणि चाफेकळीसम नासिका यावरच अधिकतर केंद्रित झालेल्या आहेत सौंदर्याचे हे मानदंड इतरत्र मान्य झालेले आहेत असे नाही

पाश्चिमात्य देशाचे अधानुकरण, ऐहिक सुखाची लालसा...त्यासाठी लागणाऱ्या भरमसाठ धनाचा सचय, भरपूर पैसा मिळवणे हेच अंतिम ध्येय विक्री मग ती वस्तूची असो अथवा वासनेची...भरपूर मोबदला मिळाला पाहिजे ही आस आणि ध्यास !

ही प्रवृत्ती मात्र सर्वत्रच आढळते म्हणून मि बिनधास्तसारखे प्रेमवेडे कुठेही रस घेऊ शकतात

इद्रा मार्केटमधील अरुद लाबलचक बोळ, माणसांची व सामानाची गर्दी; शिजत असणाऱ्या मांसाहारी पदार्थांचे उग्र दर्प, जागोजागी गिऱ्हाईकाची आणि विक्रेत्यांची चाललेली किमतीची हुज्जत, अशा कोंदट चक्रव्यूहात फार काल थाबवेना, गुदमरल्यासारखे वाटू लागले त्या 'गल्ली मार्केट'मधून बाहेर पडताच छाती भरून दीर्घ श्वास घेतला तेव्हा कुठे बरे वाटले

बँकॉक शहरामध्ये, 'बिगबेल', 'एक्सेल', 'थायीडमरु' अशी अनेक

मोठमोठी सुपरमार्केटस् आहेत या दुकानांतून पेन्सिल, पेन, हातरुमाल अशा छोटया गोष्टींपासून अगदी फुल, पक्षी, प्राणी, ते टोयेटो वगैरे कपनीच्या गाडयापर्यंत हर एक चीज विकत मिळते प्रत्येक दालनात फॅशनेबल पाश्चिमात्य पोशाख ल्यालेल्या, भरपूर सौदर्यप्रसाधने थापलेल्या, उच उच टाचांच्या सॅंडलमध्ये पाय जखडलेल्या, हसतमुख यायी विक्रेत्या मुली गिऱ्हाईकांची बडदास्त ठेवण्यासाठी तत्पर असतात सर्वत्र शांतता, स्वच्छता आणि प्रसन्नता यामुळे सारे प्रशस्त वाटते फिरत्या जिन्याच्या झूल्यांवरून अशा अवाढव्य दुकानातून वरखाली होण्यामध्ये, खरेदी करण्यामध्ये, किंबहुना सर्व काही नुसते पाहण्यातदेखील मजा वाटते.

तीन

# रिक्लायनिंग बुद्ध....

रात्रीच्या वेळी बँकॉक शहर पाहत पाहत आम्ही पायीच आमच्या हॉटेल-वर निघालो रस्त्याने खाद्यपदार्थांची दुकाने जागोजागी उघडी होती मधे मधे हातगाडीवालेदेखील उभे होते त्यावर सर्वत्र समुद्रप्राणी, मासे, साप, अजगर आदी प्राणी शिजवून ठेवलेले आढळले ससासारखे काही पांढरेशुभ्र प्राणी देखील उकडून गाड्यावर उलटे टांगले होते हे सर्व खाद्यपदार्थ उघडेच होते खाद्यपदार्थ झाकून ठेवण्याविषयी येथे काही सक्त नियम असावेत असे काही आढळून आले नाही त्या पदार्थांवर थायी लोक जागो-जागी ताव मारीत उभे होते

रामायणाचा प्रभाव, बौद्धधर्माचा जनमानसावरील पगडा, या गोष्टीमुळे इथ आल्या आल्या मन अभिमानाने फुलले होते पण केवळ उदरनिर्वाहा-साठी रोज होत असलेली, अशा हजारो लाखो जीवाची हत्या पाहून मन विषण्ण झाल्यावाचून राहिले नाही थायलंड, चीन, जपान या मोठमोठ्या देशानी बौद्धधर्म फार मोठ्या प्रमाणावर स्वीकारलेला आहे परंतु गौतम-बुद्धाने प्रतिपादलेल्या, अहिंसा या महान तत्त्वाचा त्यानी अंगीकार केलेला दिसत नाही वास्तविक हे देश कृषिप्रधान असून मोठ्या प्रमाणावर तांदळाची निर्यात करतात तरी आपल्याप्रमाणेच ज्याना जगण्याचा अधिकार आहे, त्या मूक प्राण्याच्या जीवांवरच आपला उदरनिर्वाह का करतात हे समजत नाही

गौतमबुद्धासारख्या श्रेष्ठ महापुरुषावर ज्याची नितांत श्रद्धा आहे, बौद्धधर्मावर ज्यांचे अपार प्रेम आहे, तेच लोक आपल्या पूज्य, आदर्श, परमेश्वराने, परमपवित्र धर्माने शिकवलेल्या उपदेशाची पायमल्ली का करतात ?

बोधिसत्व, बुद्धत्व प्राप्त झाल्यानंतर महात्मा बुद्धाने मानव जातीच्या कल्याणासाठी सतत चाळीस वर्षं, अष्टविध मार्गाचा उपदेश केला, सम्यक दृष्टी, सम्यक् आचार, सम्यक जीवन, सम्यक चिंतन वगैरे वगैरे. यातील सम्यक आचारामध्ये महात्मा बुद्धाने प्रामुख्याने हिंसा न करणे हे तत्त्व प्रतिपादले आहे

आयुष्यात एकदा केव्हातरी तीन महिने मांसाहार वर्ज्य करून व्रतस्थ राहण्याला हे लोक अनन्यसाधारण महत्त्व देतात याचा अर्थ बुद्धाने प्रतिपादलेल्या अहिंसा या तत्त्वाला हे लोक तत्त्वत मान्यता देतात. परंतु त्याचा पूर्णत अंगीकार करू शकत नाहीत उभ्या आयुष्यात तीन महिने मांसाहार वर्ज्य करून, आपण बौद्धधर्म पूर्णपणे अनुसरला आहे, मग आता कधीही, कितीही प्रमाणात मांसाशन केले तरी आपल्या धार्मिकतेला यत्किंचितही बाध येणार नाही अशी या लोकांची कल्पना असावी.

गौतमबुद्ध अहिंसावादी होता, याला त्याच्या आयुष्यात घडलेला एक प्रसंग फार मोठा आधार देतो ती एक छोटीसीच कथा आहे

एकदा सिद्धार्थ गौतम उद्यानात विहरत होता तोच एक पांढराशुभ्र हंस पक्षी फडफडत, त्याच्या चरणांशी येऊन पडला शरसंधानाने रक्तबंबाळ झालेल्या त्या हंसपक्ष्याकडे पाहून गौतमाच्या प्रेमळ मनाला अती दुःख झाले, त्याच्या नयनामधून अश्रू वाहू लागले. त्याने त्या हंस पक्ष्याच्या शरीरातून हलकेच बाण काढला, पुष्करिणीमध्ये त्याची जखम धुतली व आपल्या देहावरचे उंची तलम वस्त्र फाडून हंसाच्या जखमेवर बांधले त्या घायाळ पक्ष्याला मांडीवर घेऊन तो हळुवारपणे कुरवाळू लागला तेवढ्यात सिद्धार्थ गौतमाचा चुलत बंधू देवदत्त, घाईघाईने तेथे आला

" गौतमा, या हंस पक्ष्याला मी आपल्या शरसंधानाने टिपले आहे या हंसावर माझा अधिकार आहे. माझा पक्षी तू त्वरित मला देऊन टाक "

हंसाला प्रेमाने छातीशी धरत गौतम अत्यंत शांतपणे उद्गारला,

" देवदत्ता, तुझ्या हातून हे क्रूर कृत्य घडले आहे आपल्याप्रमाणेच हे मूक प्राणीदेखील परमेश्वराची लेकरे आहेत आपल्याप्रमाणेच यानादेखील आपले प्राण प्रिय असतात या निष्पाप जीवांनादेखील आपल्याइतकाच जगण्याचा अधिकार आहे मग यांची हत्या करून, यांचा जीव घेण्याचा आपल्याला काय अधिकार आहे ? हा हंस पक्षी विद्ध होऊन माझ्या चरणांजवळ

येऊन पडला होता, याला जीवदान देणे माझे परम कर्तव्य आहे देवदत्ता, मी हा पक्षी तुला देणार नाही "

क्रोधिष्ठ देवदत्ताचा नाइलाज झाला योग्य शुश्रुषा करून जीवदान व अभयदान देऊन गौतमाने त्या हंस पक्ष्याला गगनामध्ये मुक्त सोडून दिले

बौद्ध धर्मामध्ये काही विशिष्ट मर्यादेत मांसाशनाला मान्यता आहे, असे काही लोक समर्थन करतात एक घायाळ झालेला पक्षी पाहून ज्याचे अंतः-करण द्रवले, ज्याच्या नेत्रातून अश्रू वाहू लागले, असा कोमल हृदयी गौतम बुद्ध केवळ उदरभरणासाठी मूक जीवाची हिंसा करून मांसाहार करण्यास मान्यता देईल का ?

उदास झालेल्या माझ्या मनाला विचारांती त्या महात्म्याला सकल मानव जातीच्या वतीने शरण जावेसे वाटले,

" बुद्धं सरणं गच्छामि "

पायी चालत आम्ही हॉटेल विंडसरमध्ये येऊन पोहोचलो आमच्यापैकी काही मंडळी इंडियन रेस्टॉरंट शोधायला गेली श्री व सौ दाते दहीभाताच्या शोधात होते आम्ही दोघे मात्र कोठेही गेलो नाही तेवढ्यात मि बिनधास्त घाईघाईने आले

" डॉक्टरसाहेब, समोरच्या हॉटेलात थायी सी फूड फार छान मिळतं असं म्हणतात चला तुम्ही दोघेपण आमच्याबरोबर "

" आम्ही तसलं काही खात नाही हो ! "

" तुमच्यासारखे सोवळ्यातले लोक परदेशात येऊन चक्क उपाशी मर-तील मॅन मेड प्रॉब्लेम आहे हा तुमचा ! "

" आम्ही उपाशी कसे राहू ? हा पहा ताजा ब्रेड आणलाय आम्ही अमूल मिल्क पावडर आणि नेस कॉफी पण आहे आमच्याजवळ शिवाय खाकरे, लाडू, चिवडादेखील भरपूर आणलाय आम्ही तुम्हीच चला आमच्याबरोबर आपले इंडियन पदार्थ खायला "

"परदेशात येऊन लाडू-चिवड्यासारखे ' मेड इन इंडिया ' हे मिळमिळीत पदार्थ खायचे ? छे छे, आपण तर चाललो थायी सी फूडचा समाचार घ्यायला "

परदेशातील सगळ्याच चविष्ट आणि रसरशीत गोष्टींचा आस्वाद घेता घेता या लोकांचे जड खिसे झपाट्याने हलके होऊ लागले होते ..हा देखील मॅन मेड प्रॉब्लेमच होता !

रात्री नऊ वाजता गॅरी पुन्हा आला मला एखाद्या सुशिक्षित, प्रगल्भ थायी व्यक्तीशी चर्चा करायची होती पण तसे कोणीच भेटेना शिवाय येथे

इंग्लिश भाषा फार कमी लोकांना येते थायलंडमध्ये इंजिनियरिंग, मेडिकल-सारखे शिक्षणक्रमदेखील थायी भाषेतून उपलब्ध आहेत त्यामुळे इंग्रजी आलेच पाहिजे, अथवा शिकलेच पाहिजे असा येथे अट्टाहास नाही शेवटी मी गॅरीलाच सहज विचारले,

" गौतमबुद्धाने शिकवल्याप्रमाणे हे लोक अहिंसा तत्त्वाचे पालन न करता मांसाहार का करतात ?"

अत्यंत शांतपणे व निर्विकारपणे गॅरीनेच मला प्रतिप्रश्न केला,

" अहिंसेचा आणि मांसाहाराचा काय संबंध ?"

आणि गॅरी हळूच पसार झाला. गॅरीचे प्रगल्भ ज्ञान पाहून मी अवाक् झाले !

इच्छुक मंडळींना गॅरी आता बँकॉकचा सुप्रसिद्ध ' लाईव्हली शो ' पहायला नेणार होता लाईव्हली शोचे खरे स्वरूप आम्हाला आधीच कळाल्यामुळे आम्ही हा शो पहायला जायचे नाही असे ठरवले होते मि बिनधास्त आणि मंडळी गॅरीभोवती जमली तितक्यात श्री व सौ दाते बाहेरून आले मी त्यांना विचारले,

" मिळाला का हो वहिनी, तुम्हाला दहीभात कोठे ?"

" हो, हो, मिळाला बाई एकदाचा दही-भात नाहीतर ' दह्यासाठी जग-दीशा आम्हा फिरवी दाहीदिशा ' असे म्हणण्याची वेळ आली होती आज अगदी जेवल्यासारखे वाटले बघ आणि वर का मनीषा, येथे दह्याला ' योगर्ड म्हणतात, योगर्ड !"

" म्हणजे ' योगर्डसाठी दाहीदिशा आम्हा फिरवी जगदीशा ' असं म्हणा-यला हवं !" श्री व सौ. दातेंच्या चेहऱ्यावर दहा दिशांना भ्रमंती करून खायला मिळालेल्या योगर्डचे तृप्त समाधान होते

लाईव्हली शो पहायला जाणारी उत्साही मंडळी गॅरीसह बसमध्ये चढली आश्चर्य म्हणजे पाहता पाहता श्री व सौ दाते देखील गॅरीच्या पाठोपाठ गेले !

आम्ही पाहतच राहिलो...पताया बीच येथे सागर किनारी सर्वांच्या-पासून अलिप्त बसणारे, टिफनी शो ला कॅबरे म्हणून अश्लिल समजणारे, दही-भात मिळताच मनापासून संतुष्ट होणारे हे वयस्क दांपत्य लाईव्हली शो पहायला निघाले . त्यांना जाऊ नका म्हणून सांगावे असे आम्हा दोघांना खूप वाटले पण केवळ दोन दिवसाच्या साहचर्यामुळे आम्हाला तेवढा अधि-कार प्राप्त झाला नव्हता तारुण्य ओसरले म्हणून तारुण्याच्या लीला पाहू नयेत असे थोडेच आहे या जोडीने बहुधा सोवळं आणि त्याबरोबरच कातही

झटकली असावी

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही नाश्टा घेण्यासाठी गेलो तेव्हा सौ दातेवहिनी शांतपणे ब्रेडला बटर लावीत होत्या मी त्यांच्याच टेबलावर जाऊन बसले रात्रीच्या लाईव्हली शो बद्दलची उत्सुकता मला कोठे शांत बसू देत होती ! चौकस बुद्धीचा मूलमंत्र घेऊनच मी परदेश प्रवासाला सुरुवात केली होती

" वहिनी, कसा काय वाटला रात्रीचा लाईव्हली शो ?"

माझा प्रश्न ऐकताच सौ दाते विलक्षण शरमल्या. त्या शरमण्यात लज्जांकित लाली नव्हती, तर संताप होता .उद्वेग होता

" छे ग बाई .मनीषा, बरं झालं हो तुम्ही दोघे आला नाहीत ते सहाशे रुपये खर्चून मनस्तापच मिळाला बाई !"

" का हो, चांगला नव्हता का शो ?"

" अगदी घाणेरडा आणि बीभत्स. ."

अंग शहारल्यासारखे करून माझ्या कानात त्या हळूच म्हणाल्या,

" सारे नग्न स्त्री-पुरुषांचे अश्लिल चाळे . मला तर मुळीच बघवलं नाही आम्ही मधूनच परत निघून आलो फुकट मेले पैसे गेले"

" अहो पण वहिनी, अशा शो ला तुम्ही गेलाच कसे ?"

" अग मला वाटलं, कालच्यासारखा कल्चरल शो असेल, म्हणून मीच यांना जाऊ या म्हटलं पण तिथं तर सारं उघडं आणि नागडंच !"

श्रीयुत दाते मात्र महा बिलंदर असावेत लाईव्हली शो ला कल्चरल शो समजण्याएवढे ते दुधखुळे नव्हते ! तरी पण त्यांच्या भोळ्या भाबड्या बायकोने मात्र त्यांना अर्ध्या शो मधूनच उठवून परत आणले रंगाचा बेरंग...भरल्या ताटावरून उठावं लागल्यामुळे त्यांची भूक अर्धीच शमली असावी ! प्यास अर्धीच बुझली असावी

वहिनीच्या कानाला लागून खोडसाळपणे विचारले,

" अर्ध्या खेळातून उठून खोलीवर यायची तुम्हास एवढी कसली घाई झाली होती, वहिनी ?"

माझ्या या मर्मभेदी प्रश्नावर वहिनींचा निरागस चेहरा लज्जेने लाल झाला लाजून चूर होत त्या म्हणाल्या,

" अग, पूर्ण तृप्तीपेक्षा प्यास आधी-अधुरी राहण्यातच खरी गमत असते"

" आधी है प्यारकी भाषा .

आधी रहने दो मनकी अभिलाषा"

पूर्णत्वाला पोहोचलेल्या, सिद्धत्त्व आणि मोक्षपद प्राप्त केलेल्या, गौतम बुद्धाच्या महानिर्वाणाची प्रतिमा पाहण्यास आम्ही निघालो या मंदिरास ' रिक्लायनिंग बुद्ध टेंपल ' असे म्हणतात चथना आज देखील गॅरीबरोबर आली होती तिने आज आकर्षक पोशाख केला होता थायी स्त्रियांचा, लुंगी आणि वर पोलक व त्यावर छोटीशी ओढणी हा परंपरागत पोशाख आता क्वचितच सांस्कृतिक कार्यक्रमात आढळतो बहुतेक सर्व स्त्रिया आता केसांचा बॉबकट करून पाश्चिमात्य पद्धतीचाच पोशाख वापरतात चथनाने आज निळ्या रंगाचा स्कर्ट व ब्लाऊज घातला होता ब्लाऊज म्हणजे एक सेंटीमीटर रुंदीचे दोन नाजूक बंद ! ते निळे बंद तिच्या गोऱ्यापान भरदार छातीत व पाठीवर रुतून बसले होते तिच्या गोऱ्यापान मुलायम पोटऱ्याची गोलाई भलतीच आकर्षक होती पायाचे छोटेसे तळवे निमुळत्या उंच टाचांच्या सँडलमध्ये जखडले होते चथनाला जुजबी इंग्लिश कळत होते तिच्याकडून मी ' चायी ' म्हणजे येस् व ' मायी ' म्हणजे नो, हे दोन थायी शब्द शिकून घेतले मी चथनाबरोबर चायी मायी करत असतानाच आमची बस रिक्लायनिंग बुद्ध मंदिराजवळ थाबली

काल सुवर्ण गौतमबुद्ध मंदिर पाहिले होते आज पहुडलेल्या बुद्धाचे मंदिर पहायचे बोधिसत्व प्राप्त झालेल्या बुद्धाचे धीरगंभीर तेजस्वी स्वरूप काल पाहिले जगाला सतत चाळीस वर्षं शांतीचा व सुखाचा महामार्ग दाखवण्यासाठी उपदेश करून भ्रमंती करणाऱ्या गौतम बुद्धाचे महानिर्वाण आज पाहायचे आम्हाला बुद्धाची ही दोन मंदिर दाखवताना गॅरीने एवढे एकच काम औचित्यपूर्वक केले होते म्हणायचे आधी काम नंतर विश्राम, आधी जनजागृती नंतर मोक्ष, आधी लोकोद्धार नंतर महानिर्वाण !

गाडी थाबताच आम्ही गॅरीसह खाली उतरलो चथना गाडीतच बसली या मंदिराच्या प्रशस्त प्रांगणात सुरुवातीलाच मेडिकल मसाज सेंटरची एक छोटीशी इमारत आहे मसॉज सेंटर पाहताच, मि बिनधास्त लगबगीने पुढे चालले गॅरीने त्यांना अडवल

" मि बिनधास्त, तुम्ही समजता तसे हे मसाज सेंटर नाही हे खरोखरचेच मसाज सेंटर आहे येथे अनेक शारीरिक व्याधीवर वैद्यकीयदृष्टया मसाज करून उपचार केला जातो "

तरीही मि बिनधास्त घाईघाईने आत शिरलेच आतमध्ये तीस ते चाळीस रुग्ण होते, चिंताग्रस्त, व्याधीग्रस्त त्या मसाज सेंटरचे अंतरंग पाहताच मि बिनधास्त मुकाट्याने बाहेर आले त्यांना अशा वैद्यकीय मसाजमध्ये दिलचस्पी नव्हती कारण तेथे कोणी ' दिलवाली 'च नव्हती !

पूर्वी सयाम आणि ब्रह्मदेश यांच्यामध्ये वारंवार युद्ध होत असत युद्धावरून दमून भागून आलेल्या योद्धयांना, श्रमपरिहारार्थ शारीरिक मसाजाची आवश्यकता भासे त्यामुळे थायलंडमध्ये अशी अनेक मसाज केंद्र सुरू झाली सध्या अशा मसाज सेंटर्सची संख्या भरपूर वाढली असून त्याचे पूर्वीचे स्वरूप मात्र बदलले आहे सध्या अशा मसाजसेंटरमध्ये परदेशी पर्यटकांना राजरोसपणे अनेक सुंदर तरुणी मैत्रिणी व कॉलगर्ल्स म्हणून पुरवल्या जातात येथील अनेक मासिकांतून व हॉटेलमध्ये असणाऱ्या ' where ' सारख्या माहितीपत्रकांतून मुली पुरवणाऱ्या अशा सेंटर्सच्या, नाईट क्लबच्या उघड उघड जाहिराती असतात येथे फक्त थायी मुलीच आहेत असे नाही, तर अमेरिकन, जपानी, फ्रेंच, चिनी वगैरे अनेक परदेशी सौंदर्यवती युवती आहेत, असा स्पष्ट उल्लेख या जाहिरातीमध्ये आढळतो अशा काही तरुणींचे प्रलोभनात्मक फोटोही त्यामध्ये आढळतात थोडक्यात भरमसाठ पैसा मिळवण्यासाठी येथे मसाज सेंटरच्या बुरख्याखालीही वेश्या व्यवसाय चालवला जातो

स्त्री ही उपभोग्य वस्तू आहे, हे चित्र एकट्या भारतातच नव्हे, तर पूर्वेकडील या देशातही अधिक विकृत स्वरूपात दिसते विशेष म्हणजे ज्या ठिकाणी स्त्रीला विशेष सन्मान मिळतो त्या पाश्चात्य देशातही ही विकृती रुजलेली आहे पुरुषप्रधान संस्कृतीच्या विषवेलीला लागलेले हे भयंकर फळ आहे

थायी लोकांची रामायणावर श्रद्धा आहे रामसीतेवर नितांत भक्ती आहे एकीकडे सीतामाईला वंदनीय मानायचे, आणि दुसरीकडे ऐहिक सुखासाठी देहविक्री करून राजरोसपणे वेश्याव्यवसाय करायचे परदेशी पर्यटकांना मोठ्या प्रमाणावर आकर्षित करण्यासाठी सरकारनेही अशा बाजाराला प्रोत्साहन द्यायचे .एकपत्नी एकवचनी श्रीरामाला आदर्श मानायचे आणि इकडे मात्र पत्नीला दिलेल्या वचनाचा भंग करून पावलोपावली मैत्रिणी बदलायच्या संपूर्ण देशाने बौद्ध धर्म स्वीकारायचा, परंतु गौतम बुद्धाने प्रतिपादलेले अहिंसेचे महान तत्त्व तेवढे नाकारायचे .बुद्धाच्या जड अचेतन मूर्तीची परदेशी परधर्मीयांकडून विटंबना होऊ नये म्हणून निर्बंध घालायचे, परंतु स्वदेशातील चैतन्यमय स्त्री जातीला, परदेशी पर्यटकांपुढे देहविक्रीचा बाजार बेबदपणे मांडू द्यायचा केवढा हा विरोधाभास ! थायलंड म्हणजे विरोधाभास !

येथील समाजव्यवस्थेचे वर्णन थोडक्या शब्दात करता येईल आध्यात्मिक क्षेत्रात भारतीय संस्कृती आदर्श, आणि ऐहिक बाबतीत मात्र पाश्चिमात्यांचं अंध अनुकरण ! हे चित्र तसं थोडफार सर्वच देशातून आजकाल आढळते विज्ञानाने केलेल्या क्रांतीचेच हे अपत्य आहे !

मेडिकल मसाज सेंटर पाहून आम्ही रिक्लायनिंग टेंपलकडे निघालो प्रवेशद्वाराजवळ सात-आठ थायी स्त्रिया फळे विकायला बसल्या होत्या आम्हा भारतीयांचा ग्रुप पाहताच त्या म्हणू लागल्या .

" पपीता पपीता ,मीठा मीठा पपीता मीठा मीठा केला केला. पपीता मीठा मीठा . "

परदेशी लोक आल्यानंतर त्यांच्या भाषेतील एक दोन शब्द उच्चारून त्यांना आकर्षित करण्याची कला या थायी स्त्रियांनी चांगलीच आत्मसात केली होती आपल्यालादेखील आपल्या मातृभाषेतील एक-दोन शब्द नवख्या परक्या लोकांच्या तोंडून ऐकायला मिळताच त्याचं वेगळंच अप्रुप वाटतं !

" पपीता मीठा मीठा पपीता " या लडिवाळ शब्दांचा योग्य तो परिणाम झाला त्या फळविक्रेत्यांची भरपूर फळं खपली येथील पपईची चव आपल्या पपईप्रमाणेच असते, परंतु रंग मात्र गडद केशरी व आकर्षक असतो फलाहारानंतर आम्ही मंदिराकडे निघालो गॅरी त्या थायी स्त्रियांच्या घोळक्यात दिसेनासा झाला

येथील विस्तीर्ण प्रांगणात उंच उंच बौद्ध स्तूप आहेत येथे काही थायी तरुणी पारंपरिक भरजरी पोशाख व पुरातन अलंकार लेवून नृत्य करीत होत्या मानलेला नवस फेडण्यासाठी अशा प्रकारे हे लोक येथे नृत्य करतात नृत्याद्वारे आपली भक्ती अर्पण करतात प्रवेशद्वारापासून मुख्य मंदिरापर्यंतच्या रस्त्यात हस्तकला वस्तूंची अनेक छोटी-मोठी दुकाने आहेत सर्व कलावस्तूंचा मुख्य विषय म्हणजे गौतम बुद्ध हे सर्व न्याहळत मंदिरात प्रवेश केला तो एकदम आश्चर्य वाटलं मंदिराची संपूर्ण वास्तू व्यापणारी, निद्राधीन अवस्थेतील गौतमबुद्धाची मूर्ती येथे आहे

गौतम बुद्धाचे महानिर्वाण झालेल्या अवस्थेची ही मूर्ती आहे निर्वाणाला थायी भाषेतदेखील ' निर्वाण ' हाच शब्द आहे महानिर्वाण ही स्थिती म्हणजे मोक्ष जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका ब्रह्मैक्य ,पूर्णत्व ' पुनरपि जननं, पुनरपि मरणं नाही अखंड चिरशांती '

सुळावरच्या येशू ख्रिस्ताला ख्रिश्चन लोक वंदनीय मानतात त्याचप्रमाणे महानिर्वाणाच्या या अंतिम स्थितीत असलेल्या या महात्मा बुद्धाला बौद्धधर्मीय पूज्य मानतात येशू ख्रिस्त व गौतम बुद्ध या दोन्ही महात्म्यांनी आपापल्या काळातील अंधश्रद्धा, भोळसटपणा, दुष्ट रूढी यांचे निर्मूलन केले येशू ख्रिस्त ज्यू धर्माचा जितका विरोधी होता त्याहीपेक्षा गौतमबुद्ध यज्ञायागावर भर देणाऱ्या वैदिक धर्माचा विरोधी होता, असे असूनही गौतमबुद्ध ऐंशी वर्षांपर्यंत जगला गौतम बुद्धाला हुतात्मा व्हावे लागले नाही

त्याचे महानिर्वाण झाले याचे कारण भारतीयाची उदारता व सहिष्णुता !

या मदिरामधे गौतमबुद्ध आपल्या उजव्या हाताची उशी करून, उजव्या कुशीवर पहुडलेला आहे या बुद्धमूर्तीची लाबी ४५ मीटर असून रुदी १५ मीटर आहे मूर्तीच्या अगावर सोनेरी मुलामा आहे त्यावर वेलबूट्टीची नक्षी चितारलेली आहे पायाची दहाही बोटे सारखी आहेत, ती बुद्धाचे माहात्म्य सुचवतात

गौतमबुद्धाची नेहमीची शात धीरगभीर, अभयमुद्रा, मला किंचित चिता-ग्रस्त भयग्रस्त वाटली असे वाटले की, हा महात्मा अजूनही मानवजातीची, सकल प्राणिमात्राची चिंता करीत असावा ज्या मानवजातीच्या उद्धारासाठी आयुष्य वेचले, त्याच मानव जातीची होत असलेली अधोगती पाहून, पराजित होऊन जगाच्या कल्याणासाठी पुनश्च जन्म घ्यावा की काय, असे हा महात्मा चिंतन करतोय असा भाव त्याच्या अर्धोन्मीलित नेत्रातून जाणवत होता !

या अवाढव्य मूर्तीच्या भोवतालच्या व्हराड्यात काही थायी विद्यार्थी व विद्यार्थिनी, निरीक्षण करत करत आपल्या वह्यामध्ये काहीतरी लिहून घेत बसले होते मी त्यातील चार-सहा विद्यार्थ्याना इग्लिशमधून त्याची नाव विचारली पण सर्व मूकपणे माझ्याकडे पाहतच राहिले तेवढ्यात एक प्रौढ थायी व्यक्ती माझ्याकडे आली त्या व्यक्तीने मला आपल्या भारतीय पद्धतीने नमस्कार केला व इग्लिशमधे ती माझ्याशी बोलू लागली,

" मॅडम, या माझ्या विद्यार्थ्यांना इग्लिश कळत नाही मी तुम्हाला याची नाव सागतो या मुलीचे नाव सुकोमला, ही अजली व ही अनिता, या मुलाचे नाव अश्विन व हा सचिन "

ती सर्व परिचित नाव ऐकून मला सुखद आश्चर्याचा धक्का बसला मी त्या व्यक्तीला म्हणाले,

" कृपया आपणही आपले नाव सागितले तर मला खूप आनद होईल "

" जरूर जरूर ! माझे नाव प्रोफेसर सुपिसा हे माझेच विद्यार्थी आहेत "

" तुम्हा सर्वांची नाव, आम्हा भारतीयाच्या नावासारखीच आहेत हे पाहून मला फार आनद झालाय "

" बरोबर आहे तुमचे सस्कृत, पाली आणि चिनी या भाषाचे मिश्रण होऊन आमची थायी भाषा तयार झाली आहे तुमची सस्कृत भाषा तर मला फार आवडते, फार गोड भाषा आहे सस्कृत ! "

" प्रो सुपिसा, तुम्हाला सस्कृत भाषा कशी काय येते ? कोठे शिकलात आपण ती ? "

" मॅडम, पूर्वी मी भारतात आलो होतो बुद्धगया येथे काही वर्षं राहिलो होतो फार छान ठिकाण आहे हे मला तर असे वाटले की तेथेच कायमचे वास्तव्य करावे त्यावेळी मी संस्कृत भाषेचा थोडासा अभ्यास केला

" प्रोफेसर साहेब, आवडला का तुम्हाला आमचा भारत देश ?"

" व्हेरी ब्यूटिफुल ! फार फार आवडला मला इंडिया ! ज्या भूमीत महात्मा गौतम बुद्धाने जन्म घेतला तो पवित्र देश कोणाला आवडणार नाही ? बौद्ध धर्माची पवित्र देणगी देऊन तुमच्या देशाने आमच्यावर असंख्य उपकार केले आहेत आम्ही सर्वजण या धर्मावर, आणि या धर्मात्म्यावर फार प्रेम करतो "

" प्रो सुपिसा, तुम्ही रागावणार नसाल तर एक शंका विचारते तुम्ही थायी लोक, तसेच चिनी व जपानी लोक गौतम बुद्धाला परमेश्वर मानता, त्याच्यावर अपरंपार प्रेम करता, मग असे असताना, गौतम बुद्धाने, प्राणीमात्राचीदेखील हिंसा न करण्याचा, मांसाहार न घेण्याचा शिकवलेला उपदेश विसरून, तुम्ही लोक मोठ्या प्रमाणावर मांसाहाराचा अवलंब का करता?"

क्षणभर शून्यात पाहून प्रो सुपिसांनी माझ्या प्रश्नाचे तात्काळ उत्तर दिले,

" जीवो जीवस्य जीवनम !"

केवढे प्रखर सत्य आहे हे ! तेवढेच अनेकार्थी ! स्वतःच्या उदरभरणासाठी दुसऱ्याचे प्राण घेणे ! दुसऱ्याच्या प्राणांचे संरक्षण करून त्याला जीवदान देणे ! ज्याला जो हवा तो अर्थ कोणीही घेऊ शकतो प्रोफेसर सुपिसांनी स्पष्टपणे उच्चारलेले महान संस्कृत सुभाषित ऐकून माझी मती गुंग झाली.

" जीवो जीवस्य जीवनम् !'

पहिल्या दिवशी बँकॉकच्या 'डाँग मुआंग' विमानतळावर आमच्या गळ्यात पुष्पमाला घालून आमचे प्रसन्न स्वागत करणारी सुभद्रादेवी .सुपत्रा आज सकाळी गॅरीबरोबर पुनश्च आली आज आपण थायलंडला रामराम म्हणणार म्हणून, सुपत्रा आपल्याला गोड निरोप द्यायला आली आहे असे मला वाटले कारण आमचे सुस्वागतम् हिनेच केले होते ना ! आज सुपत्राच्या हातात पुष्पहारांऐवजी फ्रेम केलेले बरेच फोटो होते म्हणजे प्रथम दिनी हार घालून स्वागत करताना काढलेले फोटो, आम्हाला द्यायला सुपत्रा आठवणीने, आवर्जून आली होती तर ! हे थायी लोक किती जागृत प्रवाशाची यांना किती आस्था

प्रत्येकाच्या हातात ज्याचा त्याचा फोटो देऊन सुपत्रा विनम्रपणे म्हणाली,

"या फोटोची किमत पाच अमेरिकन डॉलर्स आहे ज्याला हवा असेल त्याने पाच अमेरिकन डॉलर्स देऊन आपला फोटो घ्यावा"

म्हणजे पुष्पहार . सुहास्य स्वागत .. अगत्य .. आस्था या साऱ्या भ्रमाचा भोपळा पाच अमेरिकन डॉलरनी फोडला सत्य केवळ धंदा ! पैसा पाच रुपयांची वस्तू जरा वेगळ्या युक्ती-प्रयुक्तीने पंचाहत्तर रुपयांना विकणे !

वरमाला घालून आम्हा दोघाच्या गळ्यात करमाला घातलेल्या सुकुमार सुपत्राचे मोहक छायाचित्र पाहून पतिराज गुणगुणू लागले,

"दो नयना मतवाले तिहारे
हमपर जुलुम करे .."

मला वाटले, स्वारी त्या मतवाल्या, जादूभऱ्या थायी नयनावर भलतीच फिदा झालीय फोटो नक्कीच घेणार पण पाच अमेरिकन डॉलर्स ऐकताच स्वारीनी ते सैगलचे रसाळ गीत अर्ध्यावरच सोडून, फोटो सुपत्राला साभार परत दिला इतरानीदेखील डोळेभरून फोटो पाहून घेतले व सुपत्राच्या हवाली केले आमची विमानतळाकडे निघण्याची वेळ झाली शेवटी चार अमेरिकन डॉलर्स असे त्या फोटोंच्या किमतीचे सुपत्रा 'बारगेनिंग' करू लागली आमच्यापैकी कोणाही 'इंडियन'ने त्या बारगेनिंगला दाद दिली नाही सुपत्राच्या चेहऱ्यावरची रुझची लाली आता फिकट झाली आम्हा सर्वांच्या तर्फे मी तिला म्हटल,

"कोपखुन कोपखुन थँक यू व्हेरी मच !",

आता या रद्दी फोटोंचे काय करावे असा विचार करीत सुपत्रा आमच्या बसमधून उतरली आणि बँकॉकच्या विमानतळाकडे आमची बस निघाली

अस हे राम नसलेल 'रामा' च राज्य, .

असा हा खऱ्या आणि खोट्या फुलपाखराचा देश. .

बुद्ध मदिराचा, पण बुद्ध तत्व आचरणात आणण्याची बुद्धी नसणाऱ्याचा देश .

रामायणावर मुखवटा नाटक करणारा मुखवट्याचा देश .

थाय म्हणजे फ्री स्वतंत्र स्वैराचारी लोकांचा देश

अशा या देशा, तुला आमचा रामराम !

मनिलाला जाण्यासाठी आम्ही बँकॉकच्या विमानतळावर आलो पुढचा बँकॉक ते मनिला हा प्रवास आम्ही एअर फ्रान्सच्या विमानाने करणार होतो सुरक्षा कक्षात मी निर्धास्तपणे शिरले हातातील छोटी बॅग व पर्स कनव्हेअर

बेल्टवर ठेवून सुरक्षा तपासणीसाठी आत गेले कनव्हेअर बेल्टवरून सावकाश सरकत येणाऱ्या माझ्या बॅगेचा मी इतजार करू लागले उगीचच उत्सुकता म्हणून स्कॅनिंग मशिनच्या स्क्रीनवर, कुणाच्या बॅगेचे, कुणाच्या पर्सचे अंत-करण कसे दिसते हे पाहत उभी राहिले तोच एका बॅगेत असलेली एक छोटीसी सुरी मला स्कॅनिंग मशीनच्या स्क्रीनवर दिसली आणि माझे अत करण थरथर कापू लागले क्षणार्धातच ब्रह्मांड आठवल !

सकाळी पोटात जरा मळमळल होत म्हणून लिंबाचा रस घेतला होता. तोपर्यंत आमचे सामान बसमध्ये गेले होते म्हणून लिंबू कापायची छोटीशी सुरी व दोन लिंब घाईघाईत हँडबॅगमध्ये कशीबशी ठेवून दिली होती

स्कॅनिंग मशिनवर दिसलेली बॅग व सुरी अस्मादिकाचीच होती ! आता हा थायी सुरक्षाअधिकारी माझी बॅग अडवणार आणि नेमक तसच झालं त्या थायी अधिकाऱ्याच्या तीक्ष्ण नजरेतून ती सुरी निसटली नाही त्याने माझी बॅग उचलली, व उचकली आणि आतील सुरी मोठ्या शिताफीने बाहेर काढली सुरी हातात घेऊन तो मला जाब विचारू लागला,

"हे काय आहे ?"

असे विचारताना तो थायी अधिकारी त्याचे जुलमी डोळे रोखून माझ्या-कडे संशयाने पाहू लागला आपल्या डोळ्याच्या तीक्ष्ण फटीतून एकदा तो माझ्याकडे पाही . एकदा त्या सुरीकडे पुन्हा माझ्याकडे. . झाल ! . म्हणजे आम्ही काय कोणी हवाई चाचे होतो की काय !

मला प्रश्न विचारताना त्या सुरक्षा अधिकाऱ्याने माझे निरीक्षण केले त्याला बहुधा माझा चेहरा साधाभोळा आणि निरागस वाटला असावा ती बिनधारेची सुरी पुन्हा पुन्हा खालीवर करून पाहताना मला त्याच्या मुद्रे-वरचे बदलते भाव वाचावयास मिळाले होते या वेळेपर्यंत त्या थायी अधिकाऱ्याच्या तीक्ष्ण नजरेची धारही जरा बोथट झाली होती

मी बॅगेतील दोन लिंब काढून समोरच्या टेबलावर ठेवली.

"मला विमानात कधीकधी मळमळत, म्हणून लिंबाचा रस घ्यावा लागतो लिंबू कापण्यासाठी, मला ही सुरी जवळ बाळगावी लागते पण मला आता या सुरीची मुळीच गरज नाही आपण ही सुरी वाटल्यास आपल्या-कडेच ठेवून घ्यावी किंवा हवी तर फेकून द्यावी"

माझे हे निष्पाप समर्थन त्या व्यक्तीला पटले असावे साक्षीला दोन लिंबही होतीच !

हे सर्व होईपर्यंत आमच्या ग्रुपमधील सहप्रवासी आपले चेहरे उगीचच सुतकी आणि लांबुळके करून उभे राहिले होते. त्याना बहुधा वाटले असावे,

आता या बाईच्या सुरीमुळे आपल्या सगळ्यानाच त्रास होणार आपली एअर फ्रान्सची फ्लाईट आता चुकणार . मनिलाच्या रोटरी कॉन्फरन्सला-सुद्धा उपस्थित राहता येणार नाही... हे अधिकारी वेडेवाकडे प्रश्न विचारून आपल्याला हैराण करून सोडणार थायलडसरकार, भारतसरकार व फ्रेंचसरकारदेखील आपल्या सगळ्यावर 'हायजॅकर्स' म्हणून खटले भरणार. अमुक अमुक दहशतवाद्याचा एअर फ्रान्सचे विमान अपहरण करण्याचा असफल प्रयत्न! दहशतवादी, आतंकवादी, अतिरेकी, याचा जगभर चालू असलेला धुमाकूळ . असे एक ना दोन अनेक प्रसग या वेळी न आठवतील तो निर्बुद्ध !

अर्थातच जो तो मला उपदेश करू लागला,

"अहो बाईसाहेब, विमानप्रवासात अस काही जवळ बाळगायच नसत !"

"अहो, साध नेलकटरसुद्धा जवळ ठेवता येत नाही आणि तुमच्याजवळ तर चक्क चाकू (रामपुरी?) मिळाला!"

"तुम्हाला विमानप्रवासाचे नियम माहीत नाहीत का?"

आता काय सागायचे? मला सर्व नियम तोंडपाठ होते. हा काही माझा पहिला विमानप्रवास नव्हता पण ऐन वेळी लिबाचे आणि सुरीचे सख्य जमले क्ष किरण मशिनवर डोकावून त्यांनी मला असा दगा दिला, माझा विश्वासघात केला त्याला मी तरी काय करणार? आमच्या साथीदारात मात्र एकच घबराट निर्माण झाली एका सुरीच्यापायीच, त्या थायी अधि-काऱ्याऐवजी माझ्या या मित्रमडळीच्या तीक्ष्ण नजरेच्या अनेक सुऱ्या आता मला घायाळ करू लागल्या होत्या प्रसग मोठा आणीबाणीचा! मि बिन-धास्तसुद्धा या प्रसगी धास्तावले होते! यावरून प्रसगाचे गाभीर्य मला अधिक प्रकर्षाने जाणवले होते बुद्धाला शरण जाण्याच्या विनम्र मन:स्थिती-तून एका थायी अधिकाऱ्याला जुलूम-जबरदस्तीने व अगतिकतेने शरण जाण्याची आफत आम्हा सर्वांवरच येऊन ठेपली होती

'टू बी ऑर नॉट टू बी' ही गभीर समस्याच जणू उपस्थित झाली होती.

पण काही मिनिटांतच हा सारा तणाव दूर झाला त्या थायी सुरक्षा अधिकाऱ्याने ती सुरी स्वत:जवळ ठेवून घेतली, आणि आम्हाला एअर फ्रान्सच्या विमानात जाऊन बसण्यास हसतमुखाने परवानगी दिली आमच्या ग्रुपचा एवढा वेळ ताणलेला चेहरा आता कुठे जरा सैल झाला

बँकॉकच्या विमानतळावरील त्या थायी अधिकाऱ्याचे सशयित डोळे मला

आता कृपाळू आणि कनवाळू वाटू लागले त्याना 'कोपखुन' आणि वायबाय म्हणत एअर फ्रान्सच्या विमानात, मी सर्वासमवेत मोठ्या जेत्याच्या रुबाबात जाऊन बसले!

अशा या घडू पाहत असलेल्या अभूतपूर्व अपहरण नाट्यावर पडदा पडला!

→

चार

# मबुहाय .

" बगळ्यांची माळ फुले अजुनी अबरात..."

अशीच एक बेटरूपी मण्याची माळ पृथ्वीच्या नकाशावर दिसते त्या बेटसमूहांचे नाव फिलिपाईन्स !

बँकॉकहून एअर फ्रान्सच्या जंबोजेटने आम्ही फिलिपाईन्सला निघालो, मनिला येथे दुसऱ्या दिवसापासून सुरू होणाऱ्या रोटरीच्या आशियाई कन्व्हेन्शनला उपस्थित राहण्यासाठी एअर फ्रान्सच्या विमानातील हवाई सुंदरी कशा असतील याची आधीच उत्सुकता वाटत होती पण या मुली काही पॅरीस सुंदरी वाटत नव्हत्या या फ्रेंच हवाई सुंदरींकडे पाहून, आपल्याकडे आपण एअर होस्टेस या व्यवसायाला उगीचच अधिक ग्लॅमर देतो असे वाटले या फ्रेन्च सुंदरी एकदम साध्या होत्या सौंदर्यप्रसाधनाचा लवलेशही त्यांच्या चेहऱ्यावर नव्हता याचा पोशाख म्हणजे एक साधा फ्रॉक वागायला साध्या आणि वृत्तीनेही तशाच थंड हे फ्रेंच सरकारचे हवाई जहाज पॅरीस-हून, मुंबई, बँकॉक, मनिला व हाँगकाँगमार्गे टोकिओला जाणार होते

जेवणाच्या ट्रेवरील प्लॅस्टिकचे आवरण काढून आम्ही जेवणाला प्रारंभ केला जेवण साधारण भारतीय पद्धतीचेच होते एक पदार्थ तेवढा नवीन होता, ' फ्रेंच मशरूम फ्रेंच मशरूमची चव मी प्रथमच मोठ्या उत्सुकतेने चाखू लागले, तेवढ्यात विमानातील एक फ्रेंच फ्लाईट पर्सर माझ्या पुढ्यात येऊन उभा राहिला पण माझे कुठे त्याच्याकडे लक्ष होते ! मी फ्रेंच मश-

रूमचा समाचार घेण्यात मश्गुल झाले होते, तोच बँकॉकच्या थायी सुरक्षा अधिकाऱ्याने विमानतळावर जप्त केलेली माझी ती जीवघेणी सुरी, त्या फ्रेंच तरुणाने अनपेक्षितपणे माझ्यापुढे पेश केली ती सुरी पाहून मी दचकले अपराधी जाणिवेने, ओशाळलेल्या नजरेने मी त्या फ्लाईट पर्सरकडे पाहिले मला वाटले, आता पुन्हा जाबजबाब पण छे ! काहीही न बोलता तो फ्रेंच तरुण अत्यंत मिस्कीलपणे माझ्याकडे पाहून स्मित करीत होता त्याचा तो मिस्कील, उमदा, हसरा चेहरा पाहून मनातील सारी भीती दूर पळाली काय बोलावे ते माझे मला समजलेच नाही तो तरुण मात्र अजूनही खट्याळपणे हसून माझ्याकडे पाहत होता त्याला कशाची एवढी गमत वाटत होती ?

एक साधी, भोळसट स्त्री आणि ही बिनधारेची सुरी, ही काय विमान अपहरण करणार ? कदाचित माझ्या या लुटुपुटीच्या हायजॅकिंगच्या योजनेचे त्याला हसू आले असावे. अर्थात हाही माझ्याच मनातला खेळ

त्या घातकी दगाबाज सुरीची मला मुळीच आवश्यकता नाही, ती फेकून द्या असे मी थायी सुरक्षा अधिकाऱ्याला सांगितले तरी ती सुरी भलतीच मौलिक समजून, त्या थाई व्यक्तीने या फ्रेंच विमानातील अधिकाऱ्याकडे पाठवली होती फ्रेंच फ्लाईट पर्सरने ती सुरी मला वास्तविक मी मनिलाच्या विमानतळावर उतरल्यावर द्यायची. पण या फ्रेंच जंटलमनने ती सुरी मला आमचे विमान ताशी सातशे मैल वेगाने, ३५ हजार फूट उंचीवरून उडत असतानाच दिली. ती देत असताना त्याच्या गोऱ्यापान नितळ चेहऱ्यावर प्रसन्न हास्य आणि नीलवर्णीय डोळ्यात माझी थट्टा करण्याची खोडकर मिस्कील उर्मी होती हे मी ताडल

मी नको म्हणत होते तरी माझी अनमोल सुरी माझ्या ट्रेजवळ ठेवून तो तरुण निर्धास्तपणे निघून गेला ती सुरी तशीच उचलून समुद्रार्पण करावी असे वाटले, पण क्षणभरच. त्या 'असामान्य सामान्य' सुरीला निरोप द्यायलाही मन राजी नव्हत

कसेही असो माझा छोटासा चाकू मोठ्या आत्मविश्वासाने व निश्चित मनाने मला परत करून त्या फ्लाईट पर्सरने एअर फ्रान्सच्या भर दरबारात माझा सन्मान केला होता आमच्या सर्व सहप्रवाऱ्याकडे मी विजयोन्मादाने पाहून घेतले आणि मोठ्या ऐटीत ती सुरी माझ्या पर्समध्ये ठेवून दिली लिंबू कापायला कधी ना कधी पुन्हा उपयोगी पडेल बिचारी !

सुरी परत देणाऱ्या फ्रेंच फ्लाईट पर्सरची व माझी या प्रवासात बऱ्यापैकी ओळख झाली मी माझ्या इंडियन इंग्लिशमधून व तो त्याच्या फ्रेंच

इंग्लिशमधून असे आम्ही एकमेकांशी वारवार बोलत राहिलो घडीभराचे मित्रही असेच जोडले जातात

आम्ही ज्या ठिकाणी बसलो होतो त्याच्या जरासा पुढे एक छोटासा जिना होता मला उगीचच वाटले, विमानाला वरती हवेशीर गच्ची वगैरे आहे की काय असे दुमजली विमान मी अजून पाहिले नव्हते मी त्या फ्रेंच मित्राला त्याविषयी माहिती विचारली वरती वैमानिकाची कॉकपिट असून तुम्हाला पहायची असेल तर मी दाखवतो, असे तो म्हणताच आम्ही चार-चार जण ती पायलट कॉकपिट पहायला वर गेलो

दोन वैमानिक व असंख्य छोटी छोटी बटणे याव्यतिरिक्त मला तरी त्या केबिनमधले काहीच कळाले नाही सभोवार दिसणारे विहंगम नीलांबर पाहून मात्र मी मंत्रमुग्ध झाले असे वाटले, चोचीने विस्तीर्ण आकाशाचा छेद घेऊन जाणाऱ्या प्रचंड गरुड पक्ष्याच्या पाठीवर स्वार होऊन आपण पुढे पुढे चाललो आहोत आपण आपल्याच पंखावर विहरत आहोत असाही भास झाला अशा मधुर कल्पनेत असतानाच माझ्या हातातील पर्समधल्या सुरीची आठवण झाली आता मात्र कोणत्याही परिस्थितीत हे पायलट आपल्याला माफ करणार नाहीत सुरीच्या आठवणीने माझ्या कल्पनेचे पंख क्षणार्धात छाटले गेले माणूस कधी कधी नको त्या गोष्टीची अपराधी मनाने उगाचच धास्ती घेतो अशा धास्तावलेल्या मनःस्थितीतच, पुढच्याच क्षणी भराभर जिना उतरून मी माझ्या आसनावर गुपचूप येऊन बसले

आमचे एक-एक सहकारी वरची कॉकपिट शांतपणे पाहून खाली येऊ लागले

"वहिनी, पाहण्यासारखी आहे नाही का वरची वैमानिकाची केबिन !" मि बिनधास्तच्या आवाजाने मी भानावर आले

"हो...हो छान आहे की !"

"अहो, तुमच्या त्या सुरीमुळेच त्या फ्रेंच माणसाशी तुमची ओळख झाली म्हणूनच त्याने तुमच्याबरोबरच आम्हा सर्वांनाच आत जाऊन पाहू दिले नाहीतर इतर वेळी कोणाला असे वैमानिकाच्या केबिनमधे जाऊ देत नाही बर का कोणाचा विमान पळवण्याचा हेतू नसेल कशावरून ?"

बँकॉकच्या विमानतळावर माझ्या सुरीमुळे सर्वांवरच आफत ओढवणार या विचाराने चिंताग्रस्त झालेली आमची दोस्तमंडळी, त्या सुरीमुळेच आता माझ्यावर प्रसन्न झाली होती म्हणूनच मी धास्तीच्या धुक्यातून बाहेर पडत मि बिनधास्तना म्हटलं,

"चला, माझ्या सुरीचा असाही उपयोग झाला म्हणायचा"

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रमांक

" अहो थोडा कमळा, चांगलाच उपयोग झाला "

" मग मि बिनधास्त, ठेवा ना ही सुरी तुमच्याजवळ "

' नको. नको " म्हणत, माझी विनती अमान्य करीत मि बिनधास्त घाईघाईने खिसकले

पधरा-वीस मिनिटानी आम्ही मनिलाच्या विमानतळावर उतरणार होतो सामानाची आवराआवर करीत असताना मला खिडकीतून खाली एक मजेशीर दृश्य दिसले खालील निळ्याशार समुद्रात लबगोलाकार तबकडीसारखे एक बेट दिसत होते, त्या लबगोलाकृती बेटात पुन्हा छोटा जलाशय दिसत होता आम्हा दोघानाही ते काय असावे हे जाणण्याची उत्सुकता लागली होती पण तेवढ्यात ' आपण आता मनिलाच्या विमानतळावर लँडिंग करीत आहोत, सर्व यात्रींनी सिगारेटस् विझवाव्यात व आपापल्या कमरेचे पट्टे बांधावेत ' अशी सूचना मिळाली

फिलिपाईन्समधे नुकतेच सागरी तुफान होऊन गेले होते. समुद्राचे पाणी किनाऱ्यापासून बरेच आतपर्यंत पसरलेले वरूनच दिसत होते मनिलाचा आतरराष्ट्रीय विमानतळ समुद्रकिनाऱ्यालगतच आहे

बँकॉकपासून पाच तासाच्या प्रवासानतर आम्ही मनिला येथे पोहोचलो ट्रॉलीत सामान भरून आम्ही निघालो तोच फिलिपाईन्सच्या काही फिलिपिनो लोकानी आमच्या गळ्यात हार घालून आमचे स्वागत केले येथे देखील बँकॉकसारखा, पाहुण्याच्या गळ्यात हार घालून काढलेले फोटो नतर त्याना विकण्याचा प्रकार आहे काय असे वाटले पण येथे युवती, छायाचित्रकार वगैरे कोणी नव्हते मनिला येथे सुरू होत असलेल्या रोटरीच्या आशियाई कनव्हेन्शनसाठी आलेल्या सर्व परदेशी रोटरी सभासदांचे येथील स्थानिक रोटरी सभासद स्वागत करायला आले होते हे खरोखरीचे स्वागत होते यात ओलावा होता हा केवळ फोटोग्राफीचा धदा नव्हता

मनिलाचा विमानतळ स्वच्छ आणि प्रशस्त आहे नाताळचा सण जवळ आल्यामुळे वातावरण अधिकच प्रसन्न होते जागोजागी मोठमोठे ख्रिसमस ट्री उभे केले होते रंगीबेरंगी विद्युतरोषणाईने त्याना सजवले होते सर्वत्र आनदाला आणि उत्साहाला उधाण आले होते

आम्ही विमानतळाच्या बाहेर येताच,

" मबुहाय ! सुस्वागतम् ! वेलकम माय फ्रेंडस् ! " .मधुर स्वरात फिलिपाईन्समधील एका व्यक्तीने आमचे सुहास्य स्वागत केले फिलिपाईन्सच्या नागरिकाना फिलिपिनो असे म्हणतात आमचे स्वागत करणारा तो फिलीपिनो माणूस आमचा येथील गाईड होता, त्याचे नाव ' जन ' समोर वातानुकूलित

बसही सुसज्ज होती बसमध्ये बसल्यानतर 'जून' पुन पुन्हा कमरेत वाकून म्हणाला,

"मबुहाय ! मबुहाय माय फ्रेंडस् ! सुस्वागतम् !"

जूनने सुस्वागतम् हा शब्द पाठ करून ठेवला असावा 'मबुहाय' याचा अर्थ फिलिपिनो भाषेत सुस्वागतम् वेलकम ! 'मबुहाय' चा कोमल उच्चार कर्णमधुर वाटला, मबुहाय या शब्दाने मनामधे नकळत घर केले

'मनिला मिडटाऊन' या पचतारांकित हॉटेलमधे आमच्या निवासाची व्यवस्था करण्यात आली होती हॉटेलपर्यंतच्या अर्ध्या तासाच्या प्रवासात जून गाईडने, फिलिपाईन्स या आपल्या देशाविषयी बरीचशी माहिती, अत्यत विनोदी शैलीत सागण्यास सुरुवात केली

"डियर फ्रेंडस् आमच्या या फिलिपाईन्स देशामधे एकूण छोटीमोठी ७१०७ बेट आहेत फिलिपाईन्सला भेट देण्याची आपणा सर्वांना ७१०७ वेळा इच्छा व्हावी व ७१०७ वेळा तशी सधीही आपणास लाभावी अशी माझी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे !"

वा म्हणजे पहिलीच सलामी झक्क झाली गाईड जूनने, अक्षरश मे महिन्याच्या उलघालीनतर जून महिन्यातील मृगाच्या सरीचे सुखद शितोडे अगावर पडावेत, असे मधुर हास्य, व खुसखुशीत विनोद फेकण्यास सुरुवात केली

थायलडमधील आमचा गाईड केवळ कर्तव्य किंवा व्यवसाय म्हणून जुजबी मार्गदर्शन करून आपल्या मैत्रिणीच्या सहवासातच अधिक रमत होता पण या फिलिपिनो गाईडने अल्पकाळातच आमच्याशी जवळीक साधली तो आमचा मित्र झाला गाईड जूनचे मनिला शहरात स्वत च्या मालकीचे एक छोटेसे हॉटेल आहे पण केवळ छद म्हणून त्याने हा गाईडचा व्यवसाय स्वीकारला होता हॉटेलपर्यंत जाताना जूनच्या निवेदनात, फिलिपाईन्सविषयी पुष्कळ माहिती प्राप्त झाली

फिलिपाईन्स हे लोकशाही राष्ट्र आहे एकूण ७१०७ बेटाच्या या समूहाचे क्षेत्रफळ ११७, ७३९ चौरस मैल आहे या ७१०७ बेटापैकी फक्त एक हजार बेटावरच लोकवस्ती आढळते ही फिलिपाईन्सची बेट पॅसिफिक महासागराच्या पश्चिम दिशेला आहेत फिलिपाईन्स हा एक लहान देश असला तरी त्याचा समुद्रकिनारा अमेरिकेच्या समुद्रकिनाऱ्याएवढा लाब आहे हा कृषिप्रधान देश असून येथील ६० टक्के लोक शेती व्यवसायावर अवलबून आहेत वास्तविक येथील नैसर्गिक परिस्थिती कृषिव्यवसायाला तितकीशी अनुकूल नाही एक तर येथे होणाऱ्या पावसाचे प्रमाण पुरेसे नाही येथे मोठमोठ्या

नद्याही नाहीत येथे अनेक ज्वालामुखी असले तरी जावा बेटातील जमिनी-सारखी येथील जमीन ज्वालामुखीमुळे सुपीक झालेली नाही शिवाय येथील बहुसंख्य शेतकरी जुन्या पद्धतीनेच शेती करणे इतके दिवस पसंत करीत होते परंतु अनेक प्रयत्नांती ही परिस्थिती बदलली आहे जबरदस्त इच्छा-शक्ती आणि अखंड परिश्रम यामुळे फिलिपाईन्ससारखा छोटा देश आता तांदूळ, ऊस व नारळ याची निर्यात करू लागला आहे येथे हजारो प्रकारच्या तांदळाचे उत्पादन होते इ स १९६८ साली येथे ' मिरॅकल राईस ' नावाच्या तांदळाच्या उत्पादनास प्रारंभ झाला, व या मिरॅकल राईस ' ने खरोखर मिरॅकल केले

फिलिपाईन्सची राष्ट्रभाषा ' फिलिपिनो ' असून व्यवहाराची भाषा मात्र प्रामुख्याने इंग्लिश आहे शाळा-कॉलेजातून इंग्लिश हा विषय सक्तीचा आहे त्यामुळे लोकांशी संभाषण करणे आपणास सोयीस्कर होते मोठ्या प्रमाणा-वर इंग्लिश भाषा बोलल्या जाणाऱ्या राष्ट्रांपैकी फिलिपाईन्स हे जगातले तीन नंबरचे राष्ट्र आहे

भारतीय, अमेरिकन, स्पॅनिश, चिनी, जपानी, अरबी व मलाया या अनेक संस्कृतीचे बेमालूम मिश्रण होऊन फिलिपिनो संस्कृती तयार झाली आहे जगातील दोन मोठे धर्म येथे रुजले आहेत— एक इस्लाम व दुसरा ख्रिश्चन १६ व्या शतकात येथे आलेल्या अरबी व्यापाऱ्यांनी इस्लाम धर्माचा व स्पॅनिश लोकांनी ख्रिश्चन धर्माचा येथे मोठ्या प्रमाणावर प्रसार केला येथील बहुसंख्य ख्रिश्चन लोक रोमन कॅथॉलिक पंथाचे आहेत

इ स १५२१ साली फर्डिनांड मॅगेलन या व्यक्तीने या बेटाचा प्रथम-शोध घेतला, तद्नंतर ही बेट जगाला ज्ञात झाली फिलिप दुसरा याने इ स १५६५ साली या बेटसमूहावर स्पेनचे राज्य प्रस्थापित केले त्यामुळे या बेटसमूहाचे फिलिपाईन्स असे नामकरण झाले इ स १८९८ साली फिलि-पाईन्सने स्पेनसत्तेविरूद्ध युद्धक्रांती करून स्वातंत्र्य मिळवले पण त्यानंतर हा देश अमेरिकेच्या वर्चस्वाखाली गेला पुन्हा ४५ वर्षं अमेरिकेची गुलामगिरी दुसऱ्या महायुद्धाचेवेळी, जपान आणि अमेरिका यांच्यात झालेल्या लढ्या-नंतर फिलिपाईन्स या देशाला पूर्ण स्वातंत्र्य मिळाले आज आपला देश पूर्णपणे स्वतंत्र व स्वायत्त आहे याचा येथील प्रत्येक फिलिपिनो नागरिकाला स्वाभि-मान वाटतो

या अविकसित देशाने, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विकासाच्या मार्गाने वेगाने पावले उचलायला सुरुवात केली प्रगत जगाच्या दृष्टीने इतके दिवस दुर्लक्षित असलेल्या या छोट्या छोट्या बेटांनी, आज साऱ्या जगाचे लक्ष

आपल्याकडे आकर्षित केले आहे

जूनचे निवेदन ऐकत ऐकत, आमची बस 'मनिला मिडटाऊन' हॉटेल-जवळ कधी येऊन थांबली, कळलसुद्धा नाही.

"माय फ्रेंडस्, तुम्हाला ही मनिला भेट अविस्मरणीय, आनंददायी वाटेल अशी आम्हाला खात्री आहे आम्हा फिलिपिनो लोकाना पाहुण्यांचे स्वागत करायला फार आवडते पाहुण्याना सर्व प्रकारच्या सुखसोई उपलब्ध करून देण्यामधे आम्हाला मोठा आनद मिळतो येथील वास्तव्यात आपणास काही अडचणी आल्या, तर नि संकोचपणे आम्हास सागाव्यात आपणास योग्य ती मदत करण्यास आम्ही तत्पर आहोत आम्ही आपल्या सेवेसाठी सदैव हजर आहोत तुमच्यापैकी जे लोक सपत्निक आले आहेत, त्याचा वेळ आनदात जाईलच पण जे एकटे एकटे आले आहेत, त्यांनाही येथे हवी असल्यास, हवी तशी, यग, ब्यूटिफुल, व जॉली 'कपनी' मिळेल, व त्याचीही मनिला ट्रीप मजेत 'एन्जॉय' होईल उलट आम्ही तर असे म्हणतो की मनिलाला बायको घेऊन येण म्हणजे हॉटेलात जाऊन घरचा डबा खाण्यासारख आहे . नदीला भेटायला येताना बरोबर 'वॉटर' आणण्यासारख आहे. ."

माणसाच्या आयुष्यात अशा नर्म विनोदाला पावसाच्या पहिल्या सरी-सारखे, मातीच्या सुगधासारखे, दवबिंदूनी भिजलेल्या हिरवळीसारखे स्थान असते

इतका वेळ डुलकी घेणारे मि बिनधास्त, जूनचे शेवटचे वाक्य ऐकताच खाडकन् जागे झाले गाडीतून खाली उतरल्यावर मि बिनधास्त, जूनच्या मागे मागे रेंगाळू लागले

"मडळी, तुम्ही पुढे व्हा, आम्ही येतोच जूनला भेटून, जरा येथील नद्याचा शोध घेऊन येतो काय करता ? तुमच्यासारख 'वॉटर' आणल नाही ना आम्ही बरोबर?"

झाल म्हणजे बिनधास्तसाहेबांना बँकॉकमध्ये उडती फुलपाखरं भेटली होती येथे आता नद्या, वाहत्या उफाळत्या ..खळखळत्या भेटणार होत्या प्रीतीसगमासाठी स्वारीच मन जणू आसुसल होत

आपण नदीला मातेच्या स्वरूपात पाहतो, तर तेथील एका फिलिपिनोने नदीला, प्रेयसीची...तीही दोन दिवस शय्यासोबत करणाऱ्या प्रेयसीची उपमा दिली होती ही कदाचित त्याची वैयक्तिक दृष्टी असावी कदाचित त्याच्यावर झालेल्या सस्काराचा हा परिपाक असावा येथे येणाऱ्या पर्य-टकांची ही बहुधा 'देन' असावी !

आश्चर्य म्हणजे फिलिपाईन्समधे भारत, ब्रह्मदेश, थायलड या देशांप्रमाणे

मोठमोठ्या नद्याच नाहीत आहेत त्या खूप लहान व अरुंद आहेत सामाजिक दृष्ट्या अथवा व्यावसायिक दृष्ट्या या नद्यांची उपयुक्तता अत्यंत अल्प प्रमाणात आहे या कारणामुळेही कदाचित येथील लोक आपल्याप्रमाणे नदीला देवी अथवा पवित्र मानत नाहीत, त्यांची पूजा करीत नाहीत

मनिला मिडटाऊन हॉटेलमधे प्रवेश करताच, समोरच्या प्रशस्त भिंतीवरील ' मबुहाय या सोनेरी अक्षरांच्या झगमगाटाने लक्ष वेधले मबुहाय सुस्वागतम् .शुभेच्छा. वगैरे वगैरे ! हॉटेल एकदम प्रशस्त आणि 'पॉश' होते फिलिपाईन्सचे आम्ही सन्माननीय पाहुणे असल्यामुळे अशा अद्ययावत, अत्याधुनिक, पंचतारांकित हॉटेलमधे आमची राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती मबुहाय असे गोड आवाजात म्हणत काही फिलिपिनो तरुणींनी थंडगार अननसाच्या रसाचे प्याले आमच्यापुढे पेश केले, पाण्याची तहान आता बर्फमिश्रित ज्यूसवर भागवण्याची सवय झाली होती कारण ज्यूस, शीतपेय किंवा बीयरऐवजी पाणी मागणे म्हणजे येथे मूर्खपणाच ठरतो पाश्चात्त्य पद्धतीचा एवढा असर या पूर्वेकडील बेटांवर झालेला आहे पाश्चात्त्यांबरोबर आता ही इतरांचीही चैनीची केंद्रे झालेली आहेत

येथे येताच लाभलेल्या सुहास्य आदरातिथ्याने प्रसन्न होऊन, हॉटेलच्या २५ व्या मजल्यावरील आमच्या शयनमहालात आम्ही प्रवेश केला आमच्या सर्व सहकाऱ्यांचा निवास याच २५ व्या मजल्यावर होता पण एकेक मजला अवाढव्य व विस्तीर्ण असल्यामुळे कोणाची खोली कोठे आहे याचा पहिल्या दिवशी तर थांगपत्ताच लागला नाही

आमच्या खोलीत येताच 'ख्वाबगाह'मधे आल्यासारखेच वाटले स्वच्छ, सुंदर स्नानगृह, आकर्षक शयनगृह त्याच्यामागे समुद्रकिनाऱ्याच्या सुंदर निसर्गदृश्याचे भव्य पोर्ट्रेट.. सागरतीर, रम्य सायंकाळ दिनकर मावळतोय मावळताना दर्याच्या आईन्यात आपलं गोजिरवाण रूप न्याहाळतोय किनाऱ्यावर छोट्या छोट्या नावा डुलताहेत. .दूरवर मोठमोठी जहाज नांगरली आहेत पोर्ट्रेटच्या दिशेने दोन पावलं पुढे जाताच लक्षात आले हे पोर्ट्रेट नव्हते. चित्र नव्हते.. हे सत्य होते वास्तव दृश्य होते ! समोर भिंत नव्हती प्रचंड पारदर्शक काच होती त्या काचेतून समोरच्या जिवंत समुद्राचाच तो मनमोहक देखावा आमच्या शयनमंदिरातून दिसत होता मनाच्या व देहाच्या नसानसांतून चैतन्य निर्माण करणारी थंडगार झुळूक पाठवून, आम्हाला दर्याराजानेदेखील सुखद स्वागताची सलामी दिली होती तर !

' मनिला बे 'च्या किनाऱ्यावरच आमचे हॉटेल होते खोलीतून दिसणाऱ्या

सागराचे रम्य रूप न्याहाळतानाच, का कुणास ठाऊक, मनिलामधे वारंवार होत असलेल्या सागरी वादळाची अचानक आठवण झाली फिलिपाईन्सला जाण्याचे नक्की झाल्यानंतर, इंग्लिश पेपरमधील मनिलाविषयीच्या बातम्या आम्ही दोघेही सातत्याने वाचत होतो जेथे जायचे आहे, तेथील वातावरण, राजकीय व नैसर्गिक परिस्थिती याबद्दल थोडीफार माहिती असावी या उद्देशाने निघण्यापूर्वी मनाची द्विधा अवस्था करणारी एक बातमी वाचली होती, ती येथील सागरी तुफानाच्या थैमानाविषयीचीच ! मनिला येथे वादळ होऊन ५००० लोक बेपत्ता मृत्युबळी असंख्य बेघर झाले होते इतका वेळ मनाला आल्हाददायक वाटणारे, रम्य नेत्रसुख देणारे सागराचे ते मोहक दृश्य मनाला आता रौद्रस्वरूप भासू लागले वाऱ्याच्या मंद झुळकीवर हेलावणाऱ्या लाटा आता थैमान घालताहेत असे दिसू लागले सागरावरच्या शीड तुटलेल्या दिशाहीन नावेसारखी मनाची अवस्था झाली येथील तुफानी वादळात सापडण्यासाठी आपल्याला ही मनिलाला यायची दुर्बुद्धी झाली होती की काय ! दैवाचाच हा सापळा नसेल ना ?

मनातील साऱ्या अभद्र शंकाकुशंकांना झटकणे भागच होते काल्पनिक भुतांना घाबरून परदेशप्रवासाचा मजा किरकिरा होऊ द्यायचा नव्हता स्नानानंतर थोडीशी हुशारी आली संध्याकाळ झालेली होती आज कोठे बाहेर जायचा कार्यक्रम नव्हता खोलीतच कॉफी मागवली, आणि टेलिव्हिजन सुरू केला– येथील काही खास फिलिपिनो कार्यक्रम पाहण्याच्या दृष्टीने फिलिपिनो भाषेतील कुठलातरी कार्यक्रम संपताच संध्याकाळच्या सातच्या इंग्रजी बातम्या सुरू झाल्या आधीच कातर झालेल्या मनावर पुन्हा आघात झाला

" विरोधी पक्षनेता ॲक्विनो याच्या खुनाच्या निषेधार्थ, विरोधी पक्षाने मनिला येथील सर्व पंचतारांकित हॉटेलांना आगी लावण्याची व बाँब स्फोटाने उद्ध्वस्त करण्याची धमकी दिलेली आहे " आता मात्र आमची चांगलीच पाचावर धारण बसली मनिला मिडटाऊन हे मनिलातील प्रसिद्ध हॉटेल्स-पैकी एक होते आपल्या हॉटेलला आग लागली तर बाँबस्फोट झाला तर .या २५ व्या मजल्यावरील आपल्या गुहेतून सहीसलामत बाहेर कसे पडायचे ? खाली कसे जायचे ? .आपण बाथरूममध्ये असताना काही गडबड झाली तर ? रात्री निद्रावस्थेत असतानाच संकटाने घेरले तर?

मनिलाला येताच, उत्साहाने आनंदाने तरंगणाऱ्या मनाला भीतीने आता पुरते ग्रासून टाकले शयनमहाल, शयनमंदिर, ख्वाबगाह आता भीतिदायक सापळा वाटू लागला

मृत्यू ' तो तर भयानकच ' पण तोही अशा अवस्थेत आपल्या देशापासून, घरापासून हजारो मैल दूर, जगाच्या कुठल्यातरी अपरिचित कोपऱ्यात मायेच्या माणसापासून दूर अजनबी लोकात ! माणसाला आपल्या जिव्हाळ्याच्या माणसांत जसे जगावेसे वाटते, तसे मरावेदेखील आपल्या प्रेमाच्या माणसातच, असेदेखील वाटत असते आपल्या निर्जीव, निष्प्राण देहाभोवतीसुद्धा कोणीतरी आपले माणूस असावे असेच वाटत असते

अग्निदेवता आणि जलदेवता दोन्ही कोपिष्ठ झाल्या होत्या जीवनाला वरदान असणाऱ्या या महाशक्ती महाशाप ठरू पाहत होत्या देवता दानवरूप घेऊ पाहत होत्या मानवाच्या हातात हात घालून निसर्गानेदेखील विध्वंसक व्हायचे ठरवले होते

आपण आता स्वदेशात, आपल्या घरी परत जातोय की नाही ? मनिलाला अगदी याच वेळी यायची कशी दुर्बुद्धी झाली ? हाँगकाँगऐवजी, मनिलाच ट्रीपमधून वगळले गेले असते तर किती बरे झाले असते. पण छे, काहीतरी अघटित व्हायचे असेल, म्हणूनच दैवाने पूर्वनियोजनानुसार, आपल्याला अक्षरश हातातील बाहुल करून या विध्वसाच्या, मृत्यूच्या सापळ्यात आणून सोडले आहे .यामागे नियतीचा काहीतरी संकेत असेल, विधिलिखित असेल, आपलही आयुष्य आता सरत आल असेल . वेड्यापिशा मनाला शका-कुशकानी घेरल असताना एकाएकी, परेमाउट पिक्चरचा ' टॉवरिंग इन्फर्नो ' (उचावरील नरक) या इग्रजी चित्रपटाची प्रकर्षाने आठवण झाली त्यामुळे मनाची अवस्था अधिकच दारुण झाली या चित्रपटामध्ये जगातील अत्युच्च अशा १७५ मजली हॉटेलला, त्याच्या उद्घाटनाच्या दिवशीच आग लागलेली असते उद्घाटनाच्या सोहळ्याची पार्टी मोठ्या जल्लोषात चालू असते, आणि इकडे एकेक मजला वेगाने पेट घेत असल्याची बातमी पसरते त्या वेळी मृत्यूच्या भयाने लोकाची झालेली केविलवाणी, दीनवाणी अवस्था त्याची जगण्याची विलक्षण धडपड, या गोष्टीचे अगदी वास्तव चित्रण, ' टॉवरिंग इन्फर्नो ' या चित्रपटामध्ये आहे चित्रपटातील सारी दृश्य मन चक्षूपुढे झरझर सरकू लागली

डॉक्टरांनी टेलिव्हिजनचे केन्द्र बदलले बातम्या सपून फिलिपिनो नृत्याचा कार्यक्रम सुरू झाला होता खाली जरा फेरफटका मारावा म्हणून लिफ्टने आम्ही खाली आलो आपण लिफ्टमध्ये असताना काही गडबड झाली तर ? पुढील चार दिवस मनिलामध्ये कसे काढायचे ? मनातील भीतीच्या सावल्या काही केल्या दूर होईनात

तळमजल्यावरील, प्रशस्त दिवाणखान्यात आमची काही मित्रमंडळी गप्पा मारत बसली होती त्याना पाहताच खूप बरं वाटलं. रोटरी कॉन्फरन्स-साठी इतर देशातील काही रोटरी सभासदही आमच्या हॉटेलमध्ये येऊ लागले होते गर्दी भरपूर होती तरी वातावरण एकदम शांत व गंभीर होते दोन तासापूर्वीच्या आणि आताच्या वातावरणात आश्चर्यकारक फरक पडला होता मबुहायचे मंजूळ स्वर कानी येत नव्हते, स्वागताचा उत्साह नव्हता, सारं काही शांत, गुमसुम।

सुरक्षा बंदोबस्त एकदम वाढवण्यात आला होता हॉटेलमध्ये प्रवेश कर-णाऱ्या प्रत्येक व्यक्तीची, तिच्या सामानाची तपासणी केल्यानंतरच त्या व्यक्तीला आत प्रवेश दिला जात होता

आमच्या हॉटेलपासून दहा मिनिटाच्या अंतरावर एक ' रेनबो ' नावाचं सुपर मार्केट होते दोन तास ते मार्केट पाहण्यात घालवले येथील चकचकीत फिरत्या जिन्यावरून वरखाली झुलताना मघाशी भयाने जड झालेले मन आता मोरपिसासारखे हलके झाले होते

मनिलातील वास्तव्यात कसलीही चिंता करायची नाही, अगदी निश्चिंत मनाने, आनंदाने वावरायचे ठरवून टाकले मनाची समजूत घालीत असता एक शेर याद आला,

' वोही होता है जो मजूरे खुदा होता है ' '

हॉटेलवर परतल्यानंतर तेथील लॉकरमध्ये ठेवून दिलेले आमचे पासपोर्ट व पैसे पुन्हा आपल्या ताब्यात घेतले कोणत्याही क्षणी मनिला सोडायची वेळ आलीच तर तयारी असावी।

टेलिव्हिजनवर चालू असलेला इंग्लिश चित्रपट पाहत पाहत झोप लागली निद्रादेवीने मनातील सारी वादळ शमवली

सकाळच्या वेकिंग अलार्मनेच जाग आली पडदे सारताच, काचेतून दिसणाऱ्या बाहेरच्या दृश्याकडे प्रथम लक्ष गेले सूर्योदय होत होता त्याच्या लाल केशरी किरणकरानी समुद्राच्या पाण्यावर मखमली तरंगाची उधळण केली होती मनातील भयशंकाच्या लाटा आता नाहीशा झाल्या होत्या सागराच्या दुसऱ्या दिशेला थोडसं धुकं होतं समुद्राचे पाणी बरेचसे पुढे आलेले दिसत होते काल पाहिलेल्या भूपृष्ठावर जागोजागी जलाशय साठलेले दिसत होते

सकाळच्या टी व्ही च्या बातम्या ऐकल्यावर कळाले की रात्री समुद्रावर छोटेसे वादळ झाले होते पुढील दोन तीन दिवसात देखील सागरी वादळ होण्याची दाट शक्यता बातमीदाराने सांगितली होती पण त्या टायफूनच्या

बातमीमुळे कालच्यामारखे मन आज घाबरून गेले नाही की, कावरे-बावरे झाले नाही मनाला जशी अनेक गोष्टींची सवय होत जाते तशी भीतीची सुद्धा होऊन ते निढावत असावे

दुसरी बातमी टी. व्ही बातमीदाराने सागितली ती आपल्या भारता-विषयी पतप्रधान राजीव गाधींनी इ स १९८५ च्या लोकसभेच्या निवड-णुका जाहीर केल्या होत्या पतप्रधानाची एक छोटीशी फिल्मदेखील टी व्ही वर दाखवली येथील लोकाना आपल्या देशाविषयी बरीच आस्था दिसतेय!

.क्षणभर वाटल की, आपण दूर कोठेतरी परदेशात नसून आपल्या देशा-तच आहोत ही निवडणूक विषयीची आनदी वार्ता डॉक्टरसाहेबांनी आपले मित्र श्री वल्लभ बेनके याना, त्याच्या खोलीवर फोन करून तावडतोब सागितली कारण राजकारणात इटरेस्ट असलेले आमचे दोस्त श्री बेनके त्याच सधीची प्रतीक्षा करत होते भारतात परतल्यानतर सुदैवाने त्याना तशी सधी प्राप्त झाली, आणि ते यशस्वी होऊन विद्यमान आमदारही झाले

परदेशातील वास्तव्यात आपल्या देशातील, वैशिष्टचपूर्ण कपडेच वापरा-यचे मी ठरवले होते मी बॅगेतील नवी कांजीवरम् सिल्कची साडी काढली इतर रोटरी सभासदाना सप्रेम भेट देण्यासाठी बरोबर आणलेल्या विघ्न-हराच्या मॅग्नेटिक प्रतिमा आठवणीने बॅगेत घेतल्या आजपासून रोटरीच्या आशियाई कनव्हेन्शनला शुभारभ होणार होता

बॅकॉकच्या मानाने येथे सकाळचा नाष्टा पुष्कळ चांगल्या प्रकारचा होता केळी, अननस, पपई, आबा या फळाचे काप, आणि सत्री-मोसब्याचा ज्यूस चहा, कॉफी, ब्रेड, बटर, टोस्ट, केक वगैरे हव त्याच्यासाठी अनेक मासाहारी पदार्थ बाकी फळफळावळ म्हणजे आमच्यासारख्या शुद्ध शाकाहारी लोकांना बुडत्याला तिनक्याच्या आधाराप्रमाणे ! ज्यूस म्हणजे बियर वगैरे मादक पेय न घेणाऱ्यांना अमृतच !

मनिला येथील फिलिपाईन्स इटरनॅशनल कनव्हेन्शन सेंटर'– 'पी आय सी सी ' या इमारतीत आशियाई रोटरी कॉन्फरन्सचा कार्यक्रम आयोजित केलेला होता इतर अनेक देशातील लोक आपल्या देशात एकत्र यावेत, त्याच्यात ऐक्यभाव निर्माण व्हावा, ज्ञानाची क्षितिज विस्तारावीत, हे फिलिपाईन्सचे राष्ट्राध्यक्ष मार्कोस व सर्व फिलिपिनो नागरिकाचे एक स्वप्न हे स्वप्न या फिलिपाईन्स इटरनॅशनल कनव्हेन्शन सेंटरच्या निर्माणामुळे साकार झाले आहे फिलिपिनोच्या दृष्टीने या सेंटरला अनन्यसाधारण महत्व आहे कारण या भव्य वास्तूमुळे कोणत्याही

स्वरूपाची आंतरराष्ट्रीय परिषद, ते आता आपल्या या छोट्याशा देशात केव्हाही आयोजित करू शकतात प्रेसिडेंट मार्कोस यानी तर या ' पी आय सी सी ' इमारतीला ' आपल्या देशाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास ' अशीच उपाधी दिली आहे

फिलिपाईन्सचा, मनिला येथील समुद्र मागे हटवून येथे बारा हेक्टर जमीन तयार करण्यात आली आहे समुद्र मागे हटवून तयार केलेल्या भूमी-पैकी जवळजवळ सहा हेक्टर भूमी या पी आय सी सी च्या वास्तूने व्यापली आहे आंतरराष्ट्रीय मॉनेटर फडाच्या बँकेची परिषद येथे भरवण्या-साठी ही इमारत इ स १९७६ साली येथे बाधण्यात आली

आंतरराष्ट्रीय पाहुणे चार असोत अथवा चार हजार, आपले हे पी आय सी सी सर्वांचे आतिथ्य व व्यवस्था चोखपणे करण्यास सदैव सुसज्ज असते, असा प्रत्येक फिलिपिनो नागरिकाला अभिमान वाटतो मेहमानांची योग्य ती खातिरदारी करण्यासाठी आपण तत्पर असले पाहिजे असा त्याना ध्यास असतो

समुद्र हटवून, उभ्या केलेल्या या भागाला ' मार्कोस सिटी ' असेही म्हण-तात मनिला शहरात वारवार अधिवेशने भरवली जातात म्हणून हे लोक मनिला शहराला ' कनव्हेन्शन सिटी ' .. ' परिषद नगरी ' असे सबोधून आपल्या या राजधानी नगरीचा गौरव करतात आशिया खडातील पहिला रोटरी क्लब, या मनिला शहरातच इ स १९१९ साली स्थापन झाला दुसरा शाघाय येथे अमेरिकेव्यतिरिक्त, इतर देशातील रोटरी क्लबमध्ये मनिला येतील रोटरी क्लब सध्या मोठा आहे सध्या त्याच्या सभासदाची सख्या ४०० हून अधिक आहे जागतिक काव्य परिषदेचे पहिले अधिवेशन देखील, फिलिपाईन्सचे कवी श्री अमॅडो युझॉन यानी इ स १९६९ साली मनिला येथेच भरवले होते

अस हे मनिला केवळ एक स्थळ नाही, तर या फिलिपिनो लोकांच्या इच्छा-आकाक्षेचे एक उत्तेजक प्रतीक आहे ! त्याचे साकार होऊ पाहत अस-लेले एक स्वप्न आहे !

रोटरी क्लबची अशी आतरराष्ट्रीय अधिवेशने अनेक होतात पण फिलि-पाईन्समध्ये असे हे आशियाई अधिवेशन प्रथमच भरत आहे त्यामुळे सर्वत्र अपार आनद उदड उत्साह !

रोटरी ही एक आतरराष्ट्रीय सघटना आहे इ स १९०५ साली पॉल हॅरीस या तरुण कायदेपडिताने शिकॅगो येथे रोटरीची स्थापना केली दिवसें-दिवस या सघटनेची चक्रीय रूपाने व्याप्ती वाढत जाऊन तिने आता विशाल

जागतिक स्वरूप धारण केले आहे या संघटनेचे एक मोठे वैशिष्ट्य आहे, ते हे की ही संघटना राजकारणापासून पूर्णपणे अलिप्त आहे विश्वकल्याण हे हिचे ध्येय आहे विविध व्यवसायातील लोकांनी या संघटनेत सहभागी होऊन समाजसेवेचे कंकण हाती बांधले आहे रोटरीमध्ये उच्चवर्गीय लोकच प्राभुख्याने असतात असा काही लोकांचा गैरसमज आहे तो काही अंशी सत्य आहे परंतु रोटरी हे असं चक्र आहे, की, ते विविध व्यवसायातील उच्चभ्रू मंडळींना आपापल्या आयव्हरी टॉवर मधून बाहेर काढते व मध्यमवर्गीयांपर्यंत, मागासवर्गीयापर्यंत पोहोचवते समाजातील विविध वर्गांमध्ये ऐक्य साधणारा हा एक सेतू आहे, एक दुवा आहे ही एक कार्यक्षम संघटना आहे

या रोटरी संघटनेचे साऱ्या जगभर दहा लाखांपेक्षा अधिक सदस्य आहेत आजच्या या अधिवेशनाला, तेवीस देशातील, अंदाजे चार हजार रोटेरियन्स उपस्थित झाले होते भारतातून तीनशे सभासद आले होते जास्तीतजास्त सभासद आलेला देश म्हणजे भारत ! युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया येथील रोटेरियन्सदेखील सन्माननीय पाहुणे म्हणून बहुसंख्येने हजर होते

रोटरी संघटनेचे विविध विभाग असतात त्या विभागाला ' डिस्ट्रिक्ट असे म्हणतात आमचा जुन्नर रोटरी क्लब डिस्ट्रिक्ट ३१३ या विभागात आहे आमच्या डिस्ट्रिक्टचे १९८४ ते १९८५ या वर्षाचे प्रमुख म्हणजे, गव्हर्नर (प्रांताधिकारी), श्री कल्याण वर्दे व सौ नीला वर्दे हे अर्थातच आमच्याबरोबर होते श्री कल्याण वर्दे व सौ नीलाताई हे एक प्रगल्भ, अनुभवी, सालस व प्रेमळ दांपत्य ! यांच्या शांत व मनमिळाऊ स्वभावामुळे आमच्या या दौऱ्याला एक वेगळाच भारदस्तपणा प्राप्त झाला होता !

फिलिपिनो स्त्री-पुरुषांनी केलेले मधुर ' मबुहाय ' स्वीकारून आम्ही पी आय सी सी मध्ये प्रवेश केला, तर येथे देखील

" यात्रियों अपनी अपनी सुरक्षा जाँच करवायें ! " पोलिसांचा कडक बंदोबस्त, सुरक्षा तपासणी ! राजकीय अशांत वातावरणामुळे केव्हाही, कोठेही गोंधळ, गडबड होण्याची शक्यता होती त्यातून हे फिलिपाईन्स इंटरनॅशनल कनव्हेन्शन सेंटर ' म्हणजे तर सत्तारूढ सरकारचे प्रिय स्वप्न ! आशियाई रोटरी कनव्हेन्शन म्हणजे सरकारला वाटत असलेला गौरव ! येथे काही दंगा होणे म्हणजे मोठी नामुष्की, सुरक्षा व्यवस्थेच अपयश, साऱ्या देशाला कालिमा ! सर्वांची काटेकोरपणे तपासणी होतेय, हे पाहून एका दृष्टीने मनाला फार बरं वाटलं तसल्ली मिळाली, दिलासा प्राप्त झाला !

एक हजार रुपये भरून या कॉन्फरन्सचे रजिस्ट्रेशन आम्ही एक महिन्या-

पूर्वीच केले होते ज्यांनी आधी केले नव्हते, ते आता करीत होते रजिस्ट्रेशन केल्यानतर सर्व सभासदाना, प्रत्येकाच्या नावाचा कॉन्फरन्स बॅज (सन्मानिका) घेतल्यानतरच आतील सभागृहामध्ये प्रवेश मिळत होता मी माझा बॅज आणण्यासाठी रजिस्ट्रेशन काउटरजवळ गेले तेथे असलेली फिलिपिनो तरुण सुदरी माझा बॅज तयार करताना माझ्या साडीकडे मोठ्या उत्सुकतेने पाहत होती बॅज माझ्या हातात देताना, इग्लिशमध्ये ती मला म्हणाली,

"तुमची 'सारी' फार छान आहे रियली ब्यूटिफुल ! मला इडियन सारी फार आवडते माझ्या मैत्रिणीने माझ्यासाठी एक सारी इडियातून आणली आहे पण ती कशी नेसायची हेच मला माहीत नाही कारण ती खूप खूप लांब आहे अदाजे पाच-सहा मीटर.. माय गॉड !"

"'सारी' नेसणे सोप आहे, मी तुला एक दिवस आमची 'सारी' नेसायला शिकवेन ह !"

"थँक यू व्हेरी मच !"

आता तो एक दिवस कधी उगवणार होता कुणास ठाऊक ! पण माझ्या प्रेमळ आश्वासनाने ती तरुणी खूष झाली माझ्या साडीची प्रशसा ऐकून मी देखील बेहद्द खूष झाले ! नुकत्याच केलेल्या कांजीवरम साडीच्या खरेदीचे सार्थक झाले ! स्त्रीची ही वस्त्रप्रावरणाची, सौंदर्यालकाराची आसक्ती देशातीत कालातीत असावी स्त्री, मग ती कोणत्याही देशातील, कोणत्याही धर्मातील, कोणत्याही वयाची असो, स्वत पेक्षा दुसऱ्या स्त्रीच्याच अगावरचे कपडे तिला अधिक आवडतात दुसऱ्या स्त्रीने केलेल्या प्रशसेने ती मोहरून जाते ! असा हा मनुष्यस्वभाव, देश, काळ, धर्म याचे बधन न जुमानणारा— सर्व भावभावनांना साधणारा !

प्रवेशद्वारावरील सुरक्षासैनिकानी आमचे बॅज पाहिल्यानतरच आम्हाला आतील सभागृहामध्ये जाऊ दिले अधिवेशनाचा कार्यक्रम सुरू होईपर्यंत आम्ही सर्व सभासद 'हाउस ऑफ फ्रेंडशिप' हे नाव असलेल्या मैत्रीगृहामध्ये जमलो होतो जपान, कोरिया, इडोनेशिया, सिलोन, मलेशिया, थायलड, पाकिस्तान, सिंगापूर अशा अनेक देशांतील प्रतिनिधी आम्हाला भेटत होते आम्ही आमच्याबरोबर आणलेल्या विघ्नहराच्या प्रतिमा, डॉक्टर हिरालाल आणि श्री वल्लभ बेनके, नवीन रोटेरियनची ओळख होताच त्यांना सप्रेम भेट देत होते हस्तादोलन होत होते इतर प्रतिनिधीदेखील आम्हाला असेच तोहफे देत होते काही अल्प किमतीच्या भेटीही स्वीकारताना बहुमोल नजराणा वाटत होत्या एकमेकाच्या वलबच्या ध्वजाची उत्साहाने देवाण-

घेवाण होत होती फोटो काढले जात होते

'हाउस ऑफ फ्रेंडशिप या सभागृहात आमचा जागतिक जनसपर्क त्याचबरोबर मैत्रीसपादनही मोठ्या जोशात चालू होत अखिल जगताच्या दृष्टीने आपण फार मोठ बहुमोल कार्य करीत आहोत, मानवी ऐक्य साधून विश्वकल्याण आपल्या हातून साधतय अशी अस्पष्टशी भावना नकळत मनामध्ये डोकावत होती मैत्री सपादन करताना आपण नेमके कोणते विश्वकार्य करीत होतो हे आता मात्र विचार करूनदेखील कळत नाही

जपानी लोकाना इंग्लिश भाषा येत नाही, किंबहुना येत असली तरी ते हेतुपुरस्सर इंग्लिश भाषेचा वापर टाळतात असे पूर्वी कोठेतरी वाचलेले होते त्यामुळे येथे भेटलेल्या जपानी लोकाशी आम्ही मूक हस्तादोलन करीत होतो त्यांचा राष्ट्रभाषेचा प्रखर स्वाभिमान दुखावला जाऊ नये याची काळजी घेत होतो त्यामुळे जगातील एका मोठ्या, प्रगत, विकसित अशा देशाच्या नागरिकाशी आपली बातचीत झाली नाही याची रुखरुख वाटायला लागली होती तोच एका जपानी दांपत्याने स्वत हून आपली ओळख करून दिली त्याचे नाव मि तमुरा आणि त्यांच्या पत्नीचे नाव रिको मि तमुरा यानी आपल्या शर्टला 'आय कॅन स्पीक इंग्लिश' असा बॅज लावला होता ते पाहून आम्ही आमचे जपानी माणसाशी राखलेले मौन झटकून टाकले तमुरा दापत्याना पाहताच, हे जपानी असावेत हा माझा पूर्वतर्क तंतोतंत खरा ठरला, इतकी त्याची चेहरेपट्टी जपानी होती

थायी, चिनी, जपानी या सर्वच लोकांचे डोळे बारीक असतात पण त्या डोळ्याची बारीक असण्याची ठेवण एकमेकापासून इतकी वेगळी असते की तीच अरुद ठेवण त्याचे वेगळे राष्ट्रीयत्व स्पष्टपणे सांगून जाते मि तमुरा व रिको याचा पेहेराव पाश्चिमात्य पद्धतीचा होता जपानी लोकानी पाश्चात्य भाषा स्वीकारलेली नाही, परतु वेषभूषा आणि केशभूषा या बाबतीत मात्र पाश्चात्य पद्धतींचे अनुकरण स्वीकारले आहे पारपरिक जपानी पद्धतीची बाहुलीसारखी वेषभूषा व आकर्षक केशभूषा केलेली, हातामधील छोटासा सुबक पखा हलवीत 'सायोनारा' म्हणणारी एक तरी खास जपानी स्त्री आपल्याला भेटावी असे फार वाटत होते येथे मला अनेक जपानी स्त्रिया भेटल्या पण एकही जपानी ' स्त्री दिसली नाही

रिकोला इंग्लिश जुजबीच कळत होते पण तमुरासाहेबाना मात्र इंग्लिश चांगले बोलता येत होते त्यामुळे त्यांनी आमच्याशी खूप गप्पा मारल्या रिकोची आणि माझी विशेष बातचीत झाली नाही, पण स्मितहास्याची आणि तोहफ्यांची गोड देवाणघेवाण झाली रिकोने मला एक छोटीसी

मऊ पर्स भेट म्हणून दिली मि तमुरानी एक छोटासा पखा दिला त्या पख्यावर मात्र ' किमेनो ' घातलेल्या जपानी स्त्रीचे आकर्षक चित्र होते

तमुरा दांपत्याला आमचा सहवास आवडला असावा त्यांनी त्यांच्या कॅमेऱ्याने आम्हा दोघाबरोबर स्वत चे चार पाच फोटो खेचले आमचा पत्ताही आवर्जून घेतला हे दापत्य आमचा निरोप घेताना तरी आम्हाला सायोनारा म्हणेल अशी माझी खुळी अपेक्षा होती पण तसे काहीच न म्हणता ती दोघे जाऊ लागली, मग मीच हळूच सायोनारा म्हणत हात हलवला मी ओठातल्या ओठात सायोनारा म्हटलेल रिकोने कसे ऐकले कुणास ठाऊक ! पुढे गेलेली रिको मेमसाब लगबगीने माझ्याकडे आली आणि तिने अनपेक्षितपणे माझ्या गालाची चक्क पप्पी घेतली ! आपला गोरापान गुबगुबीत हात हलवत ' सायोनारा .सायोनारा ' म्हणत मला निरोप दिला आता मात्र एका जपानी स्त्रीने खऱ्या अर्थाने आपला निरोप घेतला याचे समाधान मला प्राप्त झाले

आपल्या भाषेतील एखादा शब्द जरी परदेशात कोणी परकीयाने उच्चारला तरी आपल्याला किती आनद होतो याचे प्रत्यतर बँकॉक येथील थायीफळ विक्रेत्यानी उच्चारलेले 'पपीता, मीठा मीठा पपीता ' हे शब्द ऐकून घडले होते. मी म्हटलेला सायोनारा हा एकच शब्द परकीय भाषेच्या दबावाखाली दबलेल्या रिकोच्या अत करणाला जाऊन भिडला, आणि ती आनदाने मोहरून गेली तिचा तो आनद माझ्या गालावर लिप्स्टीकच्या लालीच्या रूपाने मौजूद झाला होता

भारतात परतल्यानतर तमुरासाहेब आणि रिको याचे आम्हाला थोडेसे विस्मरण झाले होते पण एक दिवस अचानक जपानहून एक पाकीट आमच्या पत्त्यावर आले मि तमुरानी त्यांच्या कॅमेऱ्यावर काढलेले आमचे रंगीत फोटो एका पत्रासह आठवणीने पाठवले होते पत्र खूप जिव्हाळ्याने लिहिले होते याला म्हणतात खरी मैत्री ! त्या फोटोंच्या रूपाने तमुरा दापत्याची आणि आमची अल्पकाळाची मैत्री आता अविस्मरणीय झाली आहे तमुरा पतिपत्नी आमच्या फोटो अल्बमप्रमाणे, स्मरणातदेखील कायमचे ठसले आहेत कधी जपान भेटीचा योग आला तर त्यांना भेटल्याशिवाय परतायचे नाही असे ठरवले आहे

मैत्रीभावाचा, बधुभावाचा, असा एकेक झरा उगम पावत होता अशीही गोड, थोडी वेगळी आणि वेडी मैत्री सपादन करत असतानाच अधिवेशनाला प्रारभ झाला

' प्लेनरी हॉल ' या विशाल सभागृहामध्ये अधिवेशनाचा कार्यक्रम होता

समोरच्या मचकावर झगमगीत अक्षरात 'मबुहाय' लिहिलच होत 'डिस्कव्हर ए न्यू वर्ल्ड ऑफ सर्व्हिस' 'सेवेची नवी क्षितिजे शोधा' हे, रोटरीचे या वर्षाचे घोषवाक्य मोठ्या दिमाखाने मचकावर चकाकत होते। त्याच्याखाली या आशियाई कॉन्फरन्सचे ध्येयवाक्य, 'युनिटी इन डायव्हर्सिटी' हेही लावले होते दरवर्षी रोटरीचे अखिल जगताचे जे अध्यक्ष असतात, ते अशा बोधवाक्याच्या रूपाने सदस्याना सदेश व प्रेरणा देत असतात

मचकावर दोन्ही बाजूला रेडा किंवा म्हैस या प्राण्याचे दोन कृत्रिम मुखवटे लावले होते त्याच्याभोवती दोन दोन मोठे भाले उभे केले होते म्हैस या प्राण्याला फिलिपीनो भाषेत 'कॅलाबाऊ' असे म्हणतात असा हा बफेलो, 'कॅलाबाऊ' हा फिलिपाईन्स देशाचा राष्ट्रीय प्राणी आहे कॅलाबाऊ आणि भाला हे हत्यार यांना फिलिपाईन्सच्या सस्कृतीमध्ये महत्त्वाचे स्थान आहे

सभागृहामध्ये क्षणभर अधार झाला प्रकाशाच्या वर्तुळाकार झोतात, १९८४ ते १९८५ या वर्षाचे रोटरीचे आतरराष्ट्रीय अध्यक्ष, मेक्सिकोचे डॉ कार्लोस कॅन्सॅको व त्यांच्या पत्नी, फर्स्ट लेडी, मारीया अरोरा याचे हातात हात घालून मचकावर आगमन झाले... टाळ्याचा प्रचड गजर, वाद्याचा जल्लोष... अशा मत्रमुग्ध वातावरणात।

पारपरिक पोशाख केलेल्या फिलिपिनो तरुणीनी कोमल, मधुर स्वरात 'मबुहाय, मबुहाय' म्हणत स्वागतगीत गायले त्यानतर फिलिपाईन्स आणि मेक्सिको या देशाची राष्ट्रगीते झाली अधिवेशनाचा शुभारभ, उद्घाटन, सन्माननीय पाहुण्याचे स्वागत आणि ओळख हा आजच्या प्रथम दिनाचा प्रमुख कार्यक्रम जगामध्ये विविध ठिकाणी चाललेल्या रोटरीच्या कार्याच्या व्हिडिओ फिल्म्स दाखवल्यानतर कार्यक्रम सपला अधिवेशनाचा कार्यक्रम रोज सकाळी नऊ ते दुपारी दोन वाजेपर्यंतच असायचा दुपारचा वेळ परदेशी पाहुण्यासाठी मुद्दाम मोकळा ठेवला होता

अधिवेशनाच्या प्रतिनिधींच्या 'लच' ची व्यवस्था मनिलातील सप्ततारांकित हॉटेलमध्ये करण्यात आली होती रोटरीची जी डिस्ट्रिक्टची अधिवेशने होतात, त्यामध्ये आपण भरलेल्या रजिस्ट्रेशन फी मध्येच आपल्याला सकाळचा नाष्टा, दोन्ही वेळचे जेवण व हवी तेव्हा गार-गरम पेय, या गोष्टी मिळतात त्यामुळे आधी आमचा असा गोड समज होता की, आपण भरलेल्या या एक हजार रुपये रजिस्ट्रेशन फीमध्ये येथे देखील नाष्टा, जेवण सर्व मिळणार परतु आमचा हा गोड समज, गैरसमज ठरला आतरराष्ट्रीय

अधिवेशनामध्ये खाण्यापिण्याचा खर्च आपला आपण करावा लागतो सकाळी 'हाउस ऑफ फ्रेंडशिप' या सभागृहात दोन कप कॉफी मागवली तर त्याचे पन्नास रुपये बिल द्यावे लागले !

आम्ही रोटरीच्या कॉन्फरन्ससाठी मनिलाला चाललोय असे समजल्यावर आमच्या अनेक मित्रमंडळींचा व आप्तेष्टाचा असा गैरसमज झाला की आम्ही रोटरीच्याच खर्चाने जात आहोत परंतु अशा कॉन्फरन्ससाठी प्रत्येकाला वैयक्तिक खर्चाने जावे-यावे लागते राहण्याचा खर्चही आपला आपणच करावा लागतो इतकेच नव्हे, तर उलट कॉन्फरन्सची रजिस्ट्रेशन फीही भरावी लागते त्यानुसार एक एक हजार रुपये भरून आम्ही रजिस्ट्रेशन केले होते, त्याच्या मोबदल्यात आम्हाला मिळाला आमच्या नावाचा एक बॅज आणि अधिवेशनाला उपस्थित राहण्याचा हक्क ! . आणखी काय काय मिळाल याचा हिशेब मांडण तस अवघडच होत

←

पाच

# माय लास्ट फेअरवेल

आम्ही पी आय सी. सीच्या बाहेर आलो तो जून महाशय हाजिरच होते रोटरी सदस्यासाठी आयोजित केलेल्या सप्ततारांकित हॉटेलमधील 'लंच'ला जाण्याची आमची कोणाचीच इच्छा नव्हती जेवण घ्यायला कोठे जायचे अशी चर्चा चालू असताना मि बिनधास्तने एक मार्ग सुचवला

"आपला गाईड जून याचे येथे स्वतःचे हॉटेल आहे उगीच इकडेतिकडे भटकण्यापेक्षा आपण आज गाईडच्याच हॉटेलात जेवायला जाऊ या".

मि बिनधास्तचा हा प्रस्ताव सर्वानुमते मान्य झाला आम्हाला घेऊन बस जूनच्या हॉटेलाच्या दिशेने धावू लागली आमचे गव्हर्नर श्री कल्याण वर्दे व सौ वर्दे देखील आपला 'शाही खाना' सोडून जूनच्या गरीबखान्यात भोजन घेण्यासाठी आमच्यामध्ये मोठ्या आनंदाने सामील झाले

जूनच्या हॉटेलमध्ये जेवायला जायचा आमचा अनपेक्षित निर्णय ऐकून जून क्षणभर गोंधळला, पण त्याने लगेच आमच्या निर्णयाचे स्वागत केले

"मित्रहो, मोठमोठ्या हॉटेलमधील रुचकर जेवण सोडून आपण माझ्या गरीबखान्यात यायला तयार झालात हे पाहून मला आश्चर्य वाटले माझ्या-सारख्या गरीब माणसाला तुम्ही तुमची सेवा करण्याचा जो बहुमान देत आहात त्याबद्दल मी आपला आभारी आहे !"

मनिलाच्या प्रशस्त रस्त्यावरून तळपत्या उन्हामध्ये आमची बस धावत होती तशा धगधगत्या वातावरणात जूनने शिडकावा केला,

" सभ्य स्त्रीपुरुषानो, तुमच्या रोटरी कॉन्फरन्सला अनेक देशाचे प्रतिनिधी आले असतील– जपान, थायलड, मलेशिया वगैरे वगैरे यावरून मला एक गोष्ट आठवली परवा आमच्या फिलिपाईन्सला भेट द्यायला एक दापत्य आले होते अर्थातच मी त्याचा गाईड होतो त्या जोडप्यापैकी, नवरा जपानी होता व बायको चिनी होती कदाचित त्याचा हा आंतरराष्ट्रीय प्रेमविवाह असावा ! तुम्ही पाहिले असेलच जपानी लोकाच्या डोळ्यांच्या वरच्या पापण्या खाली झुकलेल्या असतात तर चिनी लोकाच्या डोळ्यांच्या पापण्या वर तिरक्या गेलेल्या असतात त्या जपानी व चिनी पती-पत्नीला दोन मुल होती त्या मुलांचे डोळे कसे असावेत ? मुलाचा एक डोळा वरती झुकला होता व दुसरा डोळा खाली झुकला होता ! अशी ही नवीन सकरित जमात तयार होत आहे, तिचे नाव चिपानी !"

जूनला अभिप्रेत असलेल्या नवीन सकरित जमातीचे नेत्र कदाचित एक रामेश्वरी एक सोमेश्वरीही असावेत !

अधिवेशनामध्ये मोजून मापून ठेवलेले आमच्या चेहऱ्यावरचे स्मित आता मनमुराद हास्यामध्ये फुलले ! हास्यकल्लोळात, आमची गाडी जूनच्या 'हॉटेल फिलिपिनो 'समोर कधी येऊन थाबली कळलसुद्धा नाही 'हॉटेल फिलिपिनो ' हे नाव वाचून ' पूना गेस्ट हाऊस ', ' बॉम्बे हॉटेल ', ' इडिया गेस्ट हाउस ' ही नाव आठवली, आणि हे आपले नेहमीचेच गप्पा-विनोद करण्याचे ठिकाण आहे असे आत्मीयतेने वाटले

जूनच्या हॉटेलमध्ये एकदम सामसूम होती सर्वजण दुपारची वामकुक्षी घेत होते परदेशी पाहुणे असे अनाहूत आलेले पाहून सर्व मडळी उत्साहाने कामाला लागली फिलिपिनो भाषेत जूनने पटापट अनेक सूचना दिल्या टेबल चकचकीत झाले पखे सुरू झाले दहा ते पधरा या वयोगटातील मुलं कुतूहलाने आमच्याकडे पाहत पाहत विजेच्या चपळाईने धावू लागली ती मुल गरीब होतकरू विद्यार्थी होते मोकळचा वेळात पडेल ते राधायचे, वाढायचे काम करून स्वखर्चाने आपले शिक्षण शिकत होते, हे कळल्यावर जूनबद्दल व त्याच्या या कष्टाळू विद्यार्थी सहकाऱ्याबद्दल अधिकच जिव्हाळा वाटू लागला

थोड्याच वेळात पदार्थांचा खमग सुवास दरवळू लागला अर्ध्या-पाऊण तासात आम्ही सागितलेले सर्व पदार्थ आमच्यापुढे पेश झाले मासाहारी आणि शुद्ध शाकाहारीदेखील ' सूप आणि पुलाव सर्वांना फारच आवडला. जेवताना आपण कोठे परदेशात, परकीय लोकात जेवण घेत आहोत असे जरासुद्धा जाणवले नाही सार घरगुती .जिव्हाळ्याच . पदार्थ वाढणाऱ्या

मुलाची उत्सुकता आणि जूनचा प्रेमळ आग्रह ! . 'अन्नदाता सुखी भव' हा तृप्त आशीर्वाद वारवार मुखी आल्यावाचून राहिला नाही

जेवण झाल्यानतर जूनने आणलेल विल पाहून मात्र आश्चर्य वाटल ! . एकूण बिल फक्त चारशे रुपये ! जेवणाआधी काहीनी बियर व व्हिस्की ही पेयदेखील मागवली होती पोटभर मनपसत रुचकर जेवण फक्त चारशे रुपयात ! विश्वासच बसेना हेच आम्ही आमच्यासाठी आयोजित केलेल्या मोठ्या हॉटेलात लच घेतला असता तर एकेका व्यक्तीच्या जेवणाचे कमीत-कमी चारशे रुपये बिल झाले असते शिवाय असे स्वादिष्ट जेवण मिळालेच असते याची खात्री नव्हती जिव्हाळा, आपुलकी तर दूरच त्यामुळे माझ्या मनातील आश्चर्य मी लपवू शकले नाही

"जून महाशय, आम्ही असे ऐकले होते की, बँकॉक, मनिला, सिंगापूर वगैरे ठिकाणी खाद्य पदार्थांची फार महागाई आहे त्याचे प्रत्यतर आम्हाला गेले तीन-चार दिवस आले देखील मग असे असताना तुमच्या हॉटेलमध्ये आम्ही एवढे लोक पोटभर जेवलो तरी त्याचे बिल एवढे कमी कसे झाले ?"

"मॅडम, आपण जे दर ऐकले आहेत ते फाईव्हस्टार, सेव्हनस्टार हॉटेल-मधील असावेत त्याच अन्नाचे दर आमच्यासारख्या सामान्य हॉटेलात कमीच असणार आमच्याकडे अन्नधान्याची टचाई अथवा महागाई मुळीसुद्धा नाही थायलड किंवा आमचा फिलिपाईन्स काय, दोन्ही देश तांदळाचे विपुल उत्पादन घेतात आणि निर्यातदेखील करतात तुमच्या इडियातसुद्धा फाईव्हस्टार हॉटेल आणि सर्वसामान्य हॉटेल याच्या पदार्थांच्या किमतीमध्ये अशीच तफावत असणार"

माझ्या शकेचे निरसन जूनने योग्य प्रकारे केले होते परदेश पर्यटनाचा अनुभव प्राप्त असलेल्या अनेक अनुभवी लोकानी आम्हाला, अर्थात बरीच फुशारकी मारून सागितले होते की, 'अहो, तिकडे जेवण फार महाग आहे हो !...तीनशे ते पाचशे रुपये ! एक कप चहाला शभर रुपये पडतात !' वगैरे वगैरे

आपल्याकडेही नाही ही तफावत ? मुबईच्या कोणत्याही इराण्याच्या हॉटेलमध्ये जो 'स्पेशल' चहा एक रुपयाला मिळतो तोच किंबहुना बेचव, चहा ताजमहाल हॉटेलमध्ये पन्नास रुपयाला पडतो पण परदेशी श्रीमत पाहुण्याना इराण्याच्या हॉटेलात कोणी नेत नाही कारण आपल्या देशाबद्दल पर्यटकाच्या मनावर चांगला प्रभाव ठसवणे व भरपूर परदेशी चलन प्राप्त करणे मुख्यत सर्वांचे धोरण असते आमच्यासारखे क्वचितच कोणी पर्यटक जूनसारख्या व्यक्तीशी मैत्री सपादन करून त्याच्या सामान्य हॉटेलात, घर-

गुती वातावरणात जेवायला जात असतील.

परदेशी जाताना दुसऱ्यांचे अनुभव गाठीला अवश्य असावेत, पण त्यावरच पूर्णत विसबून राहावे असे नाही

मला वाटते, आपल्या केवळ चार दिवसाच्या वास्तव्यात प्रत्येकाने त्या त्या देशाबद्दल मते ठरवायची म्हणजे 'चार आधळे आणि एक हत्ती या गोष्टी-सारखेच आहे ज्याचा जो अनुभव तेच त्याचे निर्णायक मत ' व्यक्ती तितक्या प्रकृती तसे व्यक्ती तितके अनुभव सत्य स्वरूप जाणण्यासाठी डोळस राहून दीर्घ वास्तव्य केले पाहिजे

विश्रातीची वेळ असूनही जूनने व त्याच्या सहकाऱ्यांनी आमचे उत्तम आदरातिथ्य केले होते चारशे रुपये बिलाऐवजी, पाचशे रुपये देऊन आम्ही उठलो पुढील दोन-तीन दिवसाच्या वास्तव्यात पुन्हा 'होटेल फिलिपिनो'ला भेट द्यायचे आश्वासन आम्ही जूनला दिले पण तसा योग पुनश्च आला नाही याची अजूनही रुखरुख लागली आहे निघताना मी जूनला आणि वेटरचे काम करणाऱ्या त्याच्या विद्यार्थी सहकाऱ्याना उद्देशून म्हणाले,

"परमेश्वर कृपेने तुमच्या फिलिपाईन्सच्या ७१०७ बेटांना, आम्हाला ७१०७ वेळा भेट द्यायची सुवर्णसधी प्राप्त होवो, आणि तुमच्या या हॉटेला-तील स्वादिष्ट पदार्थांचा, ७१०७ वेळा आम्हाला आस्वाद घ्यायची गोड सधी लाभो "

आपली प्रशसा ऐकून ते होतकरू विद्यार्थी खूप भारावून गेले जूनला कृतकृत्य झाल्यासारखे वाटले त्या प्रसगापासून जूनला आमच्याबद्दल अधिक जवळीक वाटू लागली

जेवणानतर आम्ही लगेचच मनिला पाहायला निघालो कालपासून मी पाहत होते, बस चालू असताना देखील, बसचालक एकटाच काहीतरी बोलायचा मला आधी वाटले तो स्वत शीच पुटपुटत असेल पण नतर कळाले, येथील बहुसख्य गाड्यामधे वायरलेस सेट बसवलेले असतात बस-चालक, साधारण तीनशे किलोमीटर्सच्या अतरामधील आपले घरचे लोक, पोलिस किंवा इतर गाडीचे चालक याच्याशी या वायरलेस सेटद्वारे केव्हाही सपर्क साधू शकतो ही व्यवस्था सिंगापूर येथील बसेसमधून देखील आढळली

रोक्सास रोडवर जूनने एक स्थळ दाखवले त्याला 'इडियन गार्डन' असे म्हणतात कारण फिलिपाईन्समधील भारतीय लोक या ठिकाणी आठवड्यातून एक दिवस एकत्र जमतात, एकमेकाना भेटतात येथील भारतीयांमधे बहुसख्य लोक सिंधी व पजाबी आहेत सिंधी लोक येथे प्रामु-ख्याने कापडाचा व्यापार करतात व पजाबी लोक सावकारकी अशा

प्रकारच्या जपानी गार्डन व चिनी गार्डन देखील येथे आहेत

रोक्सास रोड मनिला बे च्या किनाऱ्या किनाऱ्याने जातो याच रोक्सास रोडवर पुढे ' रिझल पार्क ' आहे येथे फिलिपाईन्सचे राष्ट्रीय नेते डॉ जोस रिझल यांचे हुतात्मा स्मारक आहे

डॉ जोस रिझल म्हणजे फिलिपाइन्सचे महात्मा गांधी '

डॉ जोस रिझल हे अत्यंत बुद्धिमान शास्त्रज्ञ, लेखक, कलाकार व कवी होते इ स १८६१ ते १८९३ या काळात डॉ जोस रिझल यांनी फिलिपाईन्सच्या स्वातंत्र्यासाठी स्पॅनिश सत्तेविरुद्ध चळवळ केली होती या स्वातंत्र्य संग्रामात, स्पॅनिअर्ड अधिकाऱ्यांनी डॉ रिझल यांना अटक करून फाशीला दिले होते फिलिपिनो लोकांची आपल्या या हुतात्मा वीरपुरुषावर अनन्यसाधारण श्रद्धा व प्रेम आहे या रिझलपार्कमधे डॉ जोस रिझल यांचे अवशेष त्यांच्या स्मारकामधे जतन करून ठेवलेले आहेत त्यावर त्यांचा पुतळा उभारलेला आहे या स्मारकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर ब्रॉझ धातूच्या प्लेटवर, डॉ रिझल यांच्याच ' माय लास्ट फेअरवेल ' या कवितेच्या ओळी कोरलेल्या आहेत

मनिला येथील रस्त्याने धावणाऱ्या वाहनात जीप गाड्या बहुसंख्येने आढळल्या. या विशिष्ट जीप-गाडीला येथील लोक ' जीपनी ' असे म्हणतात जीपची ' जीपनी ', म्हणजे तरुणीची दुल्हन ! अशा या जीपनीला नववधूसारखे नटवले सजवलेले असते आपापल्या जीपनीला शृंगारण्याची येथील जीपनी चालकामधे जणू काही स्पर्धा लागलेली असते जीपनी गाडीचे इंजिन जपानमधून आयात करतात व त्यावर येथेच बहुरंगी, बहुढंगी सांगाडा तयार करतात जीपनीला सजवण्यासाठी हे लोक तिच्यावर वेगवेगळ्या रंगाचे झेंडे, रंगीबेरंगी दिवे, फुगे लावतात बहुतेक सर्व जीपनीवर वरच्या बाजूला ' बकलारन ' असे लिहिलेले असते ' बकलारन ' याचा अर्थ फिलिपिनो भाषेत ' ग्रूप ऑफ पीपल '– लोकांचा समुदाय त्यानंतर प्रत्येक जीपनीवर तिचे स्वतंत्र वैशिष्ट्यपूर्ण नावही लिहिलेले असते. गॉड ब्लेस, रॉयल ब्यूटी, समथिंग स्पेशल, स्वीट हार्ट, माय लव्ह, फेथफुल, जपान एक्सप्रेस वगैरे वगैरे अशा या जीपनी खासगी मिनी बस म्हणून शहरात व शहराबाहेर कोठेही प्रवाशांना नेतात टॅक्सीच्या मानाने अशा जीपनीचा प्रवास फार स्वस्त पडतो एका वेळी साधारण वीस-बावीस लोक यात बसू शकतात सर्व-सामान्य फिलिपिनो लोक अशा जीपनीतूनच जा ये करणे पसंत करतात

अशा अनेक जीपनी आमच्या समोरून जात-येत होत्या आमच्या वाता-नुकूलित बसमधे असून देखील जूनचे लक्ष त्या जीपनीमधे गुंतले होते

" बघा, बघा, हे जीपनी ड्रायव्हर आपल्या जीपनीला कस नवरीसारख सजवतात ते ! आणि जरा नीट लक्ष देऊन पहा, प्रत्येक ड्रायव्हर आपल्या कामाच्या वेळी देखील आपल्या गर्लफ्रेंडला बरोबर नेतो आणि तिला आपल्याजवळ अस खेटून बसवतो की, गीयर बदलताना प्रत्येक वेळी आपल्या हाताला तिच्या मऊ, गुबगुबीत, रेशमी मांडीचा रोमांचकारी स्पर्श व्हावा "

जूनने वर्णन केलेल्या अशा जीपनीमधून प्रवास करायची फार इच्छा होती परंतु ही वातानुकूलित आरामगाडी सतत आमच्या सेवेला तत्पर असल्यामुळे, या सर्वसामान्य फिलिपिनोला परवडणाऱ्या जीपनीतून प्रवास करण्याची रोमांचकारी संधीच प्राप्त झाली नाही जूनने वर्णिलेला तो रंगेल जीपनी ड्रायव्हर आणि त्याची रंगेल फिलिपिनो मैत्रीण याची शेवटपर्यंत ओळख झालीच नाही ! निदान त्यासाठी तरी आम्ही फिलिपाईन्सला ७१०७ वेळा भेट द्यावी ही जूनची सदिच्छा संपूर्ण सफल होवो !

माणसाच्या अंतरंगात शिरल्याखेरीज त्याच्या देशाची खरीखुरी ओळख होत नाही वरवरचे दर्शन तसे फसवेच !

' पासिग ' नावाची नदी मनिला शहरातून वाहते तिच्या काठावर फोर्ट-सॅन्तिआगो नावाचा ऐतिहासिक किल्ला आहे दुसऱ्या महायुद्धाचे वेळी हा किल्ला बराच उद्ध्वस्त झाला त्याचे भग्न अवशेष सध्या शिल्लक आहेत या ऐतिहासिक फोर्ट सॅन्तिआगोच्या एका दालनात सध्या रिझल म्युझियम थाटलेले आहे दुसऱ्या महायुद्धाचे वेळी, इ स १९४१ साली जपान, संपूर्ण आशिया खंड पादाक्रांत करण्याच्या महत्त्वाकांक्षेने पछाडला होता त्या वेळी फिलिपाईन्सवर अमेरिकेचे वर्चस्व होते फिलिपाईन्स हे छोटे राष्ट्र आपण चार-सहा दिवसात काबीज करू अशी जपानला खात्री होती या युद्धात फिलि-पाईन्सच्या नागरिकांनी अमेरिकेच्या बाजूने जपानशी युद्ध केले

जपानचे सैन्य शिस्तबद्ध व प्रशिक्षित होते फिलिपिनोंना मात्र युद्धाचे तंत्र अवगत नव्हते त्यासाठी लागणारे प्रशिक्षण त्यांच्याजवळ नव्हते, योग्य ती आधुनिक युद्धसामग्रीही नव्हती फिलिपिनोंनी या युद्धात आपली भाल्या-सारखी पुरातन हत्यारे वापरात आणली म्हैस व रेडे यांच्या सहाय्याने त्यांनी जपानी सैनिकांना पळो की सळो करून सोडले जे फिलिपाईन्स चार-सहा दिवसांत जिंकायची जपानला जबरदस्त महत्त्वाकांक्षा होती, त्या फिलि-पाईन्सच्या ७१०७बेटांपैकी कॉरीडॉर व बॉटन ही दोन बेटं सुद्धा जपान तीन महिन्यात जिंकू शकला नाही म्हैस व भाले यांच्या सहाय्याने प्रतिकार करून फिलिपिनोंनी जपानची आसुरी इच्छा पुरी होऊ दिली नाही

तेव्हापासून म्हैस या प्राण्यास फिलिपाईन्स देशाचा राष्ट्रीय प्राणी होण्याचा सन्मान लाभला आहे ज्या प्राण्याने स्वदेशसरक्षणार्थ शत्रूशी प्राणपणाने झुज दिली त्या मूक प्राण्याला राष्ट्रीय प्राण्याचा मान देऊन फिलिपिनो लोकानी कृतज्ञतेने त्याच्या मूक बलिदानाचा सन्मानपूर्वक गौरवच केला आहे त्या मूक प्राण्याचे ऋण अजूनही ते मानतात फिलिपिनोनी आपल्या देशाचे राष्ट्रीय प्रतीक सार्थ ठरवले आहे

रोटरी कनव्हेन्शनच्या उद्घाटन समारभाचे वेळी मचकावर भाले व म्हशीचे कृत्रिम मुखवटे का लावले होते याचे कारण आता लक्षात आले आपण भारतीय गाईला पूज्य मानतो हे फिलिपिनो म्हशीला वदनीय मानतात कारण काहीही असो मानवाच्या श्रद्धा अलग अलग बाह्यरूप धारण करीत असल्या तरी अतरगात अशा कुठतरी एकमेकीशी सूर जुळवीत असतात तो सूर सापडला की आपण कोठेतरी दूर परक्या देशात, परक्या लोकात वावरत आहोत या जाणिवेचा नकळत विसर पडू लागतो निसर्गाने निर्माण केलेले फासले आपोआप नाहीसे होतात मानवनिर्मित धर्म, देश यातील दरी मिटू लागते

हा सँतिआगो फोर्ट स्पॅनिशाच्या काळातला दुसऱ्या महायुद्धाचे वेळी जपानने केलेल्या बॉम्बहल्ल्यात या किल्ल्याचा बराचसा विध्वस झाला लाखो अमेरिकन आणि फिलिपिनो लोक येथे प्राणास मुकले आज तो तशा भग्नावस्थेतच आहे, आपल्याकडील ऐतिहासिक किल्ल्याप्रमाणेच फक्त इतिहास वेगळा, पार्श्वभूमी वेगळी

सॅन्तिआगो फोर्टच्या उजाड आवारात सध्या ' राजा सुलेमान ' नावाचे एक ओपन एअर थिएटर आहे नाटक हा फिलिपाईन्सच्या सस्कृतीचा एक अविभाज्य घटक आहे. ' झारझुएलास ' नावाचा नाटचप्रकार येथे लोकप्रिय आहे तरुण पिढीमात्र अमेरिकन चित्रपटाची शोकीन आहे नाटचवेडचा रसिकामधे शेक्सपियर व इब्सेन या लेखकाची नाटके येथे लोकप्रिय आहेत या नाटकाचे इग्रजी व फिलिपिनो दोन्ही भाषामधे प्रयोग होतात

' एक ऐतिहासिक वास्तू, सॅन्तिआगो फोर्ट. त्याचे उजाड मन . भग्न अवस्था .उद्ध्वस्त रूप भूतकालीन प्रसगाच्या पुसट स्मृती ' विस्मृतीच्या पडद्यामागचा ऐश्वर्य काल एक मूक दु:ख ' काळाच्या गर्तेत लोपत असताना, मातीमोल होत असताना देखील ते उजाड, भग्न मन कुठतरी, कधीतरी विव्हळत असेल, उसासे टाकीत असेल, त्याच्या अधुक होत जाणाऱ्या इच्छा-आकांक्षाना कुठतरी आविष्कार प्राप्त व्हावा, हुकाराना अकुर फुटावेत, दडपलेल्या भावनाना मुक्त व्हायचा मार्ग मिळावा म्हणूनच की काय कुणास

ठाऊक, या वैराण आवारात नाटकाचे प्रयोग होत असावेत ! शेक्सपिअर आणि इब्सेनसारख्या गाजलेल्या नाटककारांचे सामाजिक आणि ऐतिहासिक नाट्यप्रयोग !

राजा सुलेमान मध्ये अशी नाटकं रंगली की या सॅन्तिआगो फोर्टचे मृतवत मन थोडेसे शहारत असावे, भग्न हृदय धगधगत असावे. येथे कुरबान झालेल्या लाखो हुतात्म्याच्या आत्म्याना कदाचित ही श्रद्धांजली तर वाटत नसेल ना ?

सॅन्तिआगो फोर्ट नंतर आम्ही ' वॉर मेमोरियल ' पाहावयास गेलो.

दुसऱ्या महायुद्धात जपानच्या आक्रमणाचा प्रतिकार करताना धारातीर्थी पडलेल्या अमेरिकन व फिलिपिनो योद्ध्याची स्मशानभूमी व स्मारक येथे आहे. ही स्मशानभूमी एका विस्तीर्ण आवारात आहे. सर्वत्र हिरवीगार हिरवळ, मधे मधे तुकतुकीत डांबरी रस्ते व जागोजागी कतारीने दाट उभे असलेले हजारो लाखो पांढरेशुभ्र क्रॉस. येथील स्वच्छता, प्रशस्तता, शांतता व मोठ्या आदराने राखलेली निगा पाहून हुतात्म्यांच्या आत्म्यांना खरोखरच शांती व समाधान मिळत असेल. मनामध्ये खंत व खेद निर्माण करणारे तरीही दृष्टीला स्वच्छतेचे, सुसबद्धतेचे आगळे सुख देणारे हे अपूर्व दृश्य !

ही युद्धस्मारकभूमी म्हणजे फिलिपिनोच्या हळव्या, तरल, भावुक मनाची श्रद्धांजली, आदरांजली, भक्तांजली !

अशी ही स्मशानभूमी पाहताना भारतातील, सौराष्ट्र राज्यातील, जामनगर येथील ' माणेकबाई सुखधाम 'या वैकुंठभूमीची आवर्जून आठवण झाली. या स्मशानभूमीच्या प्रवेशद्वारावर एक घोषवाक्य लिहिलेले आहे, ' इट इज हेवन फॉर डेड बॉडीज !' हेच घोषवाक्य फिलिपाईन्समधील या युद्धस्मारकाविषयी समर्पक वाटते.

स्मशानभूमी ही केवळ 'कायमचेच जाण्यासाठी' असते असे नाही, तर ती पाहण्यासारखी व पाहण्यासाठी सुद्धा असते, असे हे ' वॉर मेमोरिअल ' युद्धस्मारक पाहून प्रकर्षाने जाणवले. मूक आदरांजली समर्पित करून आम्ही तेथून निघालो.

सॅन्तिआगो फोर्ट व युद्धस्मारक यांच्या रूपाने फिलिपाईन्सचा इतिहास अधिक स्पष्ट झाला. क्रौर्य व करुणा अशा संमिश्र जाणिवांनी मन थोडेसे उद्विग्न झाले होते. कंटाळाही थोडासा आला होता. हलकं फुलकं व्हावंसं वाटत होतं. या आमच्या शुष्क आणि सुस्त अवस्थेवर जूनने हलकीशी फुंकर घालण्याचा प्रयत्न केला,

' मित्रांनो, एक गंमत सांगतो ऐका. नुकत्याच विवाहबद्ध झालेल्या, एक

अमेरिकन नववधू व एक फ्रेंच नववधू यांच्या गोडगोड गप्पा ऐकण्याचा मला गोड चान्स मिळाला मी कान लावून ऐकू लागलो दोन्ही नववधू एकमेकींशी खूप लाडीगोडीत बोलत होत्या दोघींच्याही गालावर गुलाब फुलले होते त्यातील फ्रेंच नववधू लाजत, मुरडत मोठ्या कौतुकाने सांगू लागली,

'जेव्हा एखादा फ्रेंच तरुण प्रेमात पडतो, तेव्हा तो फार हळवा व रसिक होतो तो आपल्या प्रेयसीच्या हाताच्या नाजूक बोटाचे प्रथम हळुवारपणे चुंबन घेतो त्यानतर तिच्या खांद्याचे गोड चुंबन घेतो. मग हळुवारपणे तिच्या गळ्याचे '

अमेरिकन नववधू घाईघाईने मध्येच म्हणाली,

'बापरे ! एवढं होईपर्यंत आमचा एखादा अमेरिकन तरुण आपला हनीमून साजरा करून परत देखील येईल !' अशा या अमेरिकन आणि फ्रेंच नवविवाहिता !"

रुक्ष, सुस्त मनामध्ये हास्याचे फव्वारे उडाले जूनचे 'जून' हे नाव किती समर्पक होते ! चुकून त्याचे 'मे' असे नाव असते तर आमच्या या मनिला ट्रीपचा उदंड उन्हाळाच झाला असता ' जूनच्या विनोदाला दाद मिळत असतानाच आमची बस एका प्रशस्त आवारात शिरली

"प्रिय बंधू भगिनींनो ! इतका वेळ आपण फिलिपाईन्सचा भूतकाळ पाहिला, आता उज्ज्वल वर्तमानकाळ व उन्नत भविष्यकाळ पाहू या मघाशी विध्वंस पाहिला, आता विजय पाहू या विनाशाकडून निर्मितीकडे, शून्यातून उत्कर्षाकडे पाहू या ! समोरच हस्तकला व्यवसायाचे एक भव्य केंद्र आहे अशी अनेक केंद्र आमच्या फिलिपाईन्समध्ये आहेत येथे आपण आपणास आवडेल ती चीज विकत घेऊ शकता आमच्या फिलिपाईन्सचे एक खास वैशिष्ट्यपूर्ण उत्पादन आहे, ते म्हणजे 'बनाना फॅब्रिक !' केळीच्या झाडापासून आम्ही कापड तयार करतो हे बनाना फॅब्रिक, सिथेंटिक कापडासारखेच दिसते, पण त्याहीपेक्षा अधिक मऊ व मुलायम असते अशा कापडाचे येथे शर्ट, मॅनिला व लेडीज ब्लाऊज बनवतात प्रत्येक फिलिपिनो अशा बनाना फॅब्रिकचे कपडे मोठ्या स्वाभिमानाने वापरतोच, पण परदेशी लोकसुद्धा मोठ्या आनदाने हे नाविन्यपूर्ण कपडे खरेदी करतात व आवडीने वापरतात आपल्यालासुद्धा असा एखादा बनाना फॅब्रिकचा कपडा जरूर खरेदी करावासा वाटेल, आणि आम्हाला खात्री आहे, तो कपडा फिलिपाईन्सच्या सुगंधित स्मृतींनी आपले आयुष्य सदैव दरवळत ठेवेल ! '

जूनच्या शुभेच्छा घेऊन आम्ही हस्तकला व्यवसाय केंद्राकडे निघालो एका फिलिपिनो चंद्रमुखीने काचेचे विशाल प्रवेशद्वार उघडताच, आम्ही

भारतीय मोहरे मोठ्या उत्साहाने आत शिरलो आत जाताच दुसरी एक यौवनलतिका आम्हा सर्वांच्या गळ्यात, छोट्या छोट्या पांढऱ्याशुभ्र शंखाची लांबलचक माळ घालू लागली ते पाहताच मी नको नको म्हणत तिच्यापासून बाजूला सरले काय सांगावे या नवख्या लोकांचे ? लोभसवाणे स्मित करीत अत्याग्रहाने गळ्यात शंखाची साधी फुटकळ माला घालतील आणि नंतर चार-सहा अमेरिकन डॉलर्सचे बिल वसूल करतील . मग करावा लागेल डॉलरच्या नावाने शंख ! त्यापेक्षा शंखाची ती फालतू माळ न स्वीकारणेच उत्तम ! . पण ती फिलिपिनो युवती शंखमाला घेऊन माझ्या मागेच लागली "प्रेझेंट ..प्रेझेंट," म्हणत तिने तो शुभ्र शंखहार माझ्या गळ्यात घातलाच !

"प्रेझेंट ? ओ रियली ब्यूटिफुल प्रेझेंट !" म्हणत मी ती माळा शेवटी मोठ्या आनंदाने स्वीकारली तीच फुटकळ शंखाची फालतू माळ, मला आता सुंदर आणि सुबक भासू लागली कारण ती खरोखरच बिनपैशातली सप्रेम भेट होती !

मी पुढे आणि ती युवती माला घेऊन माझ्या मागे मागे हे दृश्य पाहताच मि बिनधास्त लगबगीने आमच्याकडे आले—

"अहो वहिनी, तुम्ही माळ स्वीकारायला नाही म्हणताय म्हणजे आश्चर्य आहे आपण तर, वरमाला गळ्यात घालायला आसुसलेली ही स्वयंसिद्धा सुद्धा आनंदाने स्वीकारायला तयार आहोत ! होऊन जाऊ दे एकदाच स्वयंवर!"

स्वयंसिद्धेला स्वयंवर ' कळाले नाही, तरी मि बिनधास्तच्या मनातील खळबळ न ओळखण्याइतकी ती तरुणी भोळीभाबडी, अनजानी नव्हती तिने हळूच आपल्या पत्त्याचे कार्ड मि बिनधास्तच्या खिशात सरकवले आता मि बिनधास्तला 'वॉटर' साठी जूनच्या ओंजळीने पाणी प्यायची गरज नव्हती

ते हस्तकला व्यवसाय केंद्र म्हणजे एक भव्य डिपार्टमेंटल स्टोअर, सुपर मार्केटच होते एकेका प्रकारच्या वस्तूसाठी एकेक भव्य दालन हे सर्व पाहण्यात रम्य नयनसुख लाभत होते पण फक्त पाहणेच रम्य होते ! खरेदी करणे आवाक्याबाहेरचे होते कारण एखादी आवडलेली वस्तू भव्य असायची किंवा दुसरी एखादी आवडलेली वस्तू छोटी असली तरी तिची किंमत अतिभव्य असायची ! शेवटी नयनसुखच दिव्य आणि रम्य वाटायच !

मनापासून आवडला तो बनाना फॅब्रिकचा बनाना शर्ट केळीच्या झाडाच्या सोपापासून बनवलेल्या या कापडाचा मूळ रंग मोतिया रंग (क्रीम) असतो

तो तसाच मोतिया रंग ठेवला जातो त्या रंगामधेच या बनाना फॅब्रिकचे खरे सौंदर्य आहे हे कापड पातळ व तलम असून वजनाला अतिशय हलके असते याचे शर्ट, मॅनिला ब्लाऊज शिवून, त्याच रंगाच्या दोऱ्याने अथवा रेशीमने त्यावर सुंदर नक्षीकाम करतात आपल्याकडे अशी एम्ब्रॉयडरीची फॅशन दहा-पंधरा वर्षांपूर्वी फार लोकप्रिय होती पण आताशा, ती 'आऊट ऑफ डेट' झाली आहे फिलिपाईन्समधे मात्र सध्या ही फॅशन प्रचलित आहे-- स्त्रियांइतकीच पुरुषात देखील सकाळी रोटरी अधिवेशनाचे वेळी बहुतेक सर्व फिलिपिनो रोटरी सदस्यांनी असेच वेगवेगळे, आकर्षक नक्षीकाम केलेले, बनाना शर्टच घातले होते एकही फिलिपिनो सदस्य सूट अथवा सफारीमधे नव्हता यावरून फिलिपिनो लोकांना आपण खास पद्धतीने तयार करीत असलेल्या, आपल्या देशाचे खास वैशिष्ट्यपूर्ण उत्पादन असलेल्या या बनाना फॅब्रिकचा किती प्रखर अभिमान वाटत असावा हे लक्षात येते

या हस्तकला व्यवसाय केंद्रामधे एक फिलिपिनो तरुण सेल्सगर्ल आम्हाला बनाना शर्ट दाखवत होती आतापर्यंत जवळजवळ पंचवीस-तीस बनाना शर्ट तिने आम्हाला दाखवले होते काहींच्या खांद्यावर नक्षीकाम होते, काहींच्या कॉलरवर, तर काही शर्ट मागून पुढून संपूर्ण भरलेले होते तन्मयतेने शर्ट दाखवणाऱ्या त्या फिलिपिनो तरुणीस मी तिचे नाव विचारले तिने तत्परतेने सांगितले—

"माझे नाव ज्युली फर्नांडिस!"

"जुली फर्नांडिस?"

'पुकार' चित्रपटातील 'मयके' जाणारी अमिताभ बच्चनची ज्यूली फर्नांडिस, 'मयके' जाता जाता मनिलाला कशी गेली कळेना म्हणूनच अमिताभला, 'ज्युली फर्नांडिस! बेबी...तू मयके मत जइयो मत जइयो मेरी जान!' असे आर्जवी स्वरात म्हणायची पाळी आली असावी!

शर्ट दाखवताना ज्युली अधूनमधून सारखी माझ्या चेहऱ्याकडे पाहत होती डॉक्टरांकडे ती तशी पाहत राहिली असती तर मला आश्चर्य वाटले नसते पण तिच्या अशाप्रकारे माझ्याकडे टक लावून पाहण्यामुळे मी निष्कारण गोंधळून गेले असे वाटले, तिला समजावून सांगावे, "बाई ग, माझ्याकडे पाहून तू समस्त भारतीय स्त्रियांच्या सौंदर्याबद्दल लावण्याबद्दल भलत अनुमान काढू नकोस भारतीय स्त्रीचे सौंदर्य फार देखणे, मोहक, लोभस असते मी मात्र त्याला अपवाद आहे" ज्युलीच्या मादक कटाक्षांनी मी पुरती घायाळ झाले होते तोच तिने विचारले,

" मी मघापासून पाहतेय, आणि विचार करतेय, तुमच्या कपाळावर हा लाल ठिपका कसला आहे ?"

ज्युलीचा प्रश्न ऐकून माझ्या मनाची उलघाल क्षणात शांत झाली ती माझ्याकडे पाहून भारतीय स्त्रीसौंदर्याविषयी काही निष्कर्ष काढीत नव्हती तर ! तिला माझ्या कपाळावरील सौभाग्य कुंकुमाबद्दल उत्सुकता वाटत होती अपराधी भावनेतून माझे मन आता मुक्त झाले होते मी समाधानाने सांगितले,

" हा आम्हा भारतीय स्त्रियांचा सौभाग्यलंकार आहे प्रत्येक सुवासिनी स्त्री अशा प्रकारचा लाल ठिपका 'कुंकू' आपल्या कपाळी लावते. "

सौभाग्यलंकार, सुवासिनी वगैरे गोष्टी ज्युलीला स्पष्ट करून सांगताना माझ्या इंग्लिश भाषेला भलतीच कसरत करावी लागली एवढे करून बिचारीला काय समजले असेल देव जाणे !

भाषेचे माध्यम समाधानकारक न वाटल्यामुळे मी माझ्या पर्समधील टिकल्यांचे सबंध पाकीटच काढून ज्युलीला सप्रेम भेट देऊन टाकले त्यातील एक टिकली मी तिच्या गोऱ्यापान विशाल भालप्रदेशावर लावली, आणि त्या फिलिपिनो मादक सौंदर्यात सौज्वल्याची भर पडली ! ज्युलीने आरशात न्याहाळून पाहिले

" मी रियली ब्यूटिफुल दिसतेय ! हो ना ?"

स्वत:च्या त्या ठसठशीत लावण्याकडे पाहून ज्युली अतिशय आनंदी झाली बराच वेळ ती आरशात पाहत राहिली तेवढ्यात तेथील चार-सहा फिलि-पिनो मुली तिच्याभोवती जमल्या 'हाऊ नाईस', 'लव्हली' असे उद्गारत 'कुंकवा'च्या कौतुकाचा सोहळा सुरू झाला, पण अचानक एक फिलिपिनो मथरा ज्युलीच्या कानात काहीतरी कुजबुजली, त्या अर्धवट शहाणीने तिचे कान फुंकले असावेत त्या रूपगर्वितेचा मुखचंद्र लगेच साशंकित झाला ज्युलीने घाबरून मला विचारले,

" हे लग्न झाल्यानंतर लावतात ?"

तिची शंका विचित्र होती तरीही मी 'हो' म्हणताच ज्युलीने आपल्या कपाळावरची टिकली घाईघाईने काढून टाकली

"मला लग्नच करायचे नाही, लग्न करून मी माझे स्वातंत्र्य गमवू इच्छित नाही "

असे सांगून तिने टिकल्यांचे पाकीट मला साभार परत केले मीही अधिक भाष्य न करता ते परत घेतले

ज्युली विवाहबद्ध होऊन सासरी जाऊ इच्छित नव्हती 'शादी म्हणजे

बरबादी असा तिचा ग्रह होता अमिताभ बच्चन त्याच्या ज्युली फर्ना-
डिसला 'मयके मत जइयो' असे म्हणत होता, तर ही फिलिपिनो ज्युली
फर्नांडिस 'जाऊ कशी कशी मी नादायला' म्हणत 'मयके' सोडून 'ससुराल'-
लाच जाऊ इच्छित नव्हती '

अमेरिका व ऑस्ट्रेलिया म्हणजे या फिलिपिनो तरुणींच्या स्वप्ननगरी !
त्यांच्या स्वप्नातील राजकुमार येथे नांदत असतात

'स्वप्ननगरच्या सुंदर माझ्या राजस राजकुमारा असे आळवीत,
एखादा श्रीमंत उमदा अमेरिकन किंवा ऑस्ट्रेलियन राजबिंडा तरुण गळाला
लागताच, लग्न न करण्याचा निश्चय करणारी, शादीला बरबादी समजणारी
ज्युली फर्नांडिस कदाचित विवाहबद्ध होऊन आपल्या 'ससुराल'ला
एखाद दिवशी जाईलही ! बहुतेक सर्व फिलिपिनो युवतींचे असे गोडस स्वप्न
असते किंबहुना त्यांच्यात ती क्रेझच असते परदेशी जवानांना भुरळ पडावी
अशी त्यांची मस्त जवानी दीवानीही असते की काय, न कळे !

जुळत चाललेले माझे आणि ज्युलीचे सूर टिकली प्रकरणामुळे नंतर
जरासे बेसूर झाले मी तिचा धर्म भ्रष्ट करून तिला जबरदस्तीने विवाहाच्या
बंधनात जखडतेय असा संशय तिच्या मनात निर्माण झाला होता की काय?

बनाना शर्ट खपवायचा असल्यामुळे ज्युलीचा मोर्चा पुनश्च माझ्या पती-
कडे वळला कोणताही शर्ट यांनी घालून पाहिला की ज्युली मोकळ्या
मनाने तारीफ करायची,

"व्हेरी स्मार्ट यंग मॅन ! यू लुक व्हेरी हँडसम इन धिस शर्ट !"

मी ज्युलीला म्हटल,

"माझा नवराच मुळी दिसायला देखणा आणि रुबाबदार आहे, म्हणून
तुमचा बनाना शर्ट यांच्या अंगावर आणखी चांगला दिसतो"

"येस .येस मॅडम, रियली ही इज व्हेरी हँडसम मला इंडियन
लोक फार आवडतात . मोठे मोठे डोळे, सरळ नाक. ."

अमेरिकन किंवा ऑस्ट्रेलियन राजकुमाराकडून हिचा इंडियन राजकुमारा-
कडे मोर्चा वळू नये म्हणून मी पटकन एक बनाना शर्ट पसंत करून टाकला

बनाना फॅब्रिकचे कपडे दिसायला साधे दिसत असले तरी किमतीने महाग
असतात एका शर्टची किंमत कमीतकमी चारशे ते हजार रुपयापर्यंत असते
माझ्या पतीची 'हँडसम' म्हणून वारंवार तारीफ करीत पाचशे रुपयाचा
एक शर्ट ज्युलीने गळ्यात मारलाच '

"तुम्हाला 'पाईनॲपल फॅब्रिक'चा शर्ट किंवा फ्रॉक दाखवू का?" बनाना
फॅब्रिक झाले, आता पाईनॲपल फॅब्रिक' हिला काय वाटले, एकादशी

किंवा मोमवारसारख्या उपवासासाठी आम्ही खरेदी करायला आलोत की काय ?

" तुमच्याकडे मँगो फॅब्रिक नाही का ?"

मी छद्मी स्वरात विचारले त्यावर ज्युली ओळखायचे ते ओळखली आणि मनमुराद हसू लागली आमची खरेदी सफलीय हे तिच्या लक्षात आले

केळी व अननस या झाडाच्या वाया जाणाऱ्या भागापासून हे लोक तलम कापड तयार करतात ही गोष्ट मात्र खरोखर वैशिष्ट्यपूर्ण व कौतुकास्पद आहे

थायी लोकाच्यापेक्षा या फिलिपिनो लोकांची चेहरेपट्टी बरीच वेगळी आहे थायी लोकाचे चेहरे बसके असतात नाक नकट असूनदेखील फिलिपिनो लोकाचे चेहरे त्यामानाने उठावदार वाटतात डोळे बारीक असले तरी बोलके भासतात थायी लोकाचा रग गोरा तर फिलिपिनोंचा गव्हाळ फिलिपिनो पुरुषांच्या मानाने स्त्रिया खूपच तरतरीत, स्मार्ट व आकर्षक वाटतात

अनेक सस्कृतीचा मिलाफ होऊन ज्याप्रमाणे फिलिपिनो सस्कृती तयार झाली आहे, त्याचप्रमाणे चिनी, स्पॅनिश, अमेरिकन, जपानी अशा अनेक वशाचे सकरण होऊन ही फिलिपिनो जमात तयार झाली आहे स्पेन, अमेरिका या राष्ट्रांनी येथे बरीच वर्षे राज्य केल्यामुळे त्याचा प्रभाव प्रामुख्याने आढळतो तरी फिलिपिनो सस्कृतीला आकार मात्र मलाया सस्कृतीने दिला आहे

आपल्या या विविध प्रकारच्या उगमाची या फिलिपिनो लोकाना जाणीव आहे पण आताची तरुण पिढी मात्र आपली ही वेगवेगळी उगमस्थान विसरून फक्त फिलिपिनो म्हणून राहू इच्छित आहे फिलिपिनो चायनीज, फिलिपिनो ख्रिश्चन, फिलिपिनो मुस्लिम असे देखील भेदभाव आपल्या देशात राहता कामा नयेत असे त्यांना वाटते परकीय वर्चस्वाच्या, परकीय प्रभावाच्या स्मृती हे फिलिपिनो आत्ता विसरू पाहत आहेत समाजाच्या व राष्ट्राच्या ऐक्यासाठी हे लोक उत्सुक आहेत याना फिलिपिनो म्हणून एकच 'युनिटी इन डायव्हर्सिटी' साधायची आहे याची अगदी विरुद्ध प्रवृत्ती आपल्याकडे निर्माण होऊ पाहत आहे 'डायव्हर्सिटी इन युनिटी' निर्माण करण्याची !

मनिला शहराच्या 'मकाती' या भागातील 'रुस्तम' या सुपर मार्केटमध्ये आम्हाला सोडून जूनने आमचा निरोप घेतला रुस्तम मार्केटच्या

बाहेर पायऱ्यांवरच अनेक विक्रेते त्याच्या विविध वस्तू विकत घ्याव्यात म्हणून आमच्या मागे लागले होते तिकडे दुर्लक्ष करून आम्ही दुकानात निघालो त्यांतील एक विक्रेता मात्र चिकाटीने मागेच आला आपली वस्तू काय आहे, एकदा जरूर बघून घ्या असे तो विनवू लागला आता थांबणे भागच पडले आम्ही त्याच्या विनतीला मान दिलेला पाहून, आपल्या बॅगे-तून त्याने किल्लीचे अनेक आकडे काढले त्या आकड्याच्या गोल कडीमधे स्टीलच्या एक एक इंचाच्या, स्त्री-पुरुषांच्या छोट्या आकृत्या होत्या त्या किल्लीच्या आकड्यांना काय एवढे पहायचे म्हणून आम्ही त्या माणसाकडे पाठ फिरवून चालू लागलो तोच पुन्हा त्याने,

" या कीचेनची मूव्हमेंट तरी पहा मूव्हमेंट. " म्हणून आम्हाला पुन्हा थांबवलेच एक आकडा हातात घेऊन, दोन बोटांनी तो त्याची हालचाल करू लागला स्टीलच्या कडीतील स्त्री-पुरुषांच्या आकृत्या रतिक्रीडा करू लागल्या प्रणयक्रीडा समागम . मी क्षणभर सुन्नच झाले...पाहणे अवघड वाटत होते तरी पाहतच राहिले ।

दुकानात गेल्यानंतर देखील माझ्या मनातील कल्लोळ ओसरला नव्हता तो चेहऱ्यावर ओसंडत असावा डॉक्टरांनी मला कोपरखळी दिली,

" कीचेनमधील त्या आकृत्यांच्या प्रेमक्रीडा पाहून तू एवढी संको-चलीस, मग बँकॉकचा लाईव्हली शो प्रत्यक्ष कसा पाहिला असतास ? "

पतिराजाच्या नजरेला नजर मिळवतानादेखील माझ्या सर्वांगावर रोमांच उठत होते ।

' हस्नम ' च्या वरच्या मजल्यावरून, सहज खाली दृष्टी गेली किल्ल्याचे आकडे विकणारा तो विक्रेता भलताच खूष दिसत होता आपले सर्वच्या सर्व आकडे खरेदी करणारे त्याला मोठे गिऱ्हाईक मिळाले होते. मि बिनधास्त ।

रात्री दहा वाजता आम्ही आमच्या हॉटेलवर परतलो आत जाताना पुन्हा सुरक्षा तपासणी । सकाळच्यापेक्षा सुरक्षा सैनिकाचा बंदोबस्त अधिक वाढवला होता हॉटेलमधील वातावरण खूपच गंभीर होते कारण मनिला शहरातील एका पंचतारांकित हॉटेलला काही राजकीय विरोधकानी दहशत निर्माण करण्यासाठी आग लावली असल्याची बातमी नुकतीच कळाली होती

दिवसभरात आनंदाने फुललेले मन पुन्हा भयभीत झाले दिवसाच्या प्रकाशात जे मनिला शहर मोहक वाटत होते, तेच रात्रीच्या अंधारात आता भेसूर भासू लागले मनिला आहे तसेच होते पण दिवसा अदृश्य झालेल्या, मना-

तील भीतीच्या सावल्या रात्रीच्या अंधारात दृश्य होऊन थैमान घालू लागल्या होत्या !

बरोबर आणलेल्या 'विघ्नहर्त्याच्या' प्रतिमावर भरोसा टाकून आम्ही आमच्या हॉटेलच्या पंचविसाव्या मजल्यावरील 'टॉवरिंग इन्फर्नो'— 'उंचावरील नरका'मध्ये शिरलो !

सहा

# ' ताल व्होलकॅनो..'

अधिवेशनाचा दुसरा दिवस सुरक्षा तपासणी करणाऱ्या सुरक्षा सैनिकानाही बरोबर आणलेल्या सप्रेम भेटींचा नजराणा देऊन आम्ही पी आय सी सी मध्ये प्रवेश केला योग फार छान होता नेमके त्याच वेळी रोटरीचे आतरराष्ट्रीय अध्यक्ष व अधिवेशनाचे प्रमुख पाहुणे, डॉ कार्लोस कॅन्सॅको, आपल्या पत्नी मारिया अरोरा याच्यासह उपस्थित झाले या उमद्या, हसऱ्या, सुस्वरूप दांपत्याला आज अगदी जवळून पाहता आले त्यांच्या भोवती रोटेरियन्सचा व फोटोग्राफर्सचा गराडा होता, तरी निवांत वेळ असल्यामुळे कॅन्सेको दांपत्याशी छान बातचीत करता आली आम्ही त्यांना आमची छोटीशी भेट व आमच्या जुन्नर क्लबचा ध्वज भेट दिला त्याच्या-सह फोटोही काढले

अधिवेशन सुरू व्हायची वेळ झाल्यानतर डॉ कार्लोस कॅन्सेको याच्या पाठोपाठ आम्ही आतील सभागृहात निघालो तोच प्रवेशद्वारातील सुरक्षा सैनिकांनी अनपेक्षितपणे प्रमुख पाहुणे डॉ कार्लोस कॅन्सेको याना थाबवले, व निर्विकारपणे कॉन्फरन्सचा बॅज् दाखवण्यास सांगितले कारण अध्यक्ष महाशयाच्या कोटाला आज कॉन्फरन्सचा बॅज् लावलेला नव्हता कॉन्फरन्स बॅज् ते आज हॉटेलवरच विसरून आले होते पण त्यानी तो बॅज लावण्याची काय गरज होती ? ते रोटरीच्या अखिल जगताचे अध्यक्ष होते फिलिपाईन्सचे व या अधिवेशनाचे सन्माननीय प्रमुख पाहुणे होते अधिवेशनाचे उद्-

घातक होते त्यांनी कॉन्फरन्सचा बॅज् लावला नाही तर काय बिघडलं ? पण नाही ! त्याचाही बॅज् पाहिल्याशिवाय सुरक्षा सैनिक त्याना आतमध्ये प्रवेश देईनात आमच्याजवळ आमचे बॅजेस् होते त्यामुळे आम्हाला आधी आत पाठवले सुरक्षा सैनिकाना दिलेले कडक हुकूम त्यांनी तंतोतंत बजावले होते नियम म्हणजे नियम ! मग तो रोटरीचा सामान्य सदस्य असो अथवा जागतिक प्रमुख अध्यक्ष ! अर्थात असे कडक हुकूम द्यायला व ते काटेकोर-पणे अमलात आणायलादेखील फिलिपाईन्समधील अशात व अस्थिर परि-स्थिती कारणीभूत होती !

सेक्रेटरीने हॉटेलमध्ये जाऊन अध्यक्षसाहेबाचा बॅज् आणल्यानतर कॅन्सेको दांपत्य सभागृहामध्ये आले त्याहीपेक्षा आश्चर्य म्हणजे या प्रसगामुळे डॉ कार्लोस कॅन्सेको याना मुळीच राग आला नाही अथवा अपमान वाटला नाही आपल्या भाषणात त्यानी नतर या प्रसगाचे मोठ्या विनोदी शैलीत आवर्जून वर्णन केले व सुरक्षा व्यवस्थेची दिलखुलास तारीफ केली

तेव्हापासून आम्ही आमचे बॅज् जागेवर आहेत का हे राहून राहून चाच-पून पाहू लागलो अधिवेशन सपेपर्यंत त्याना जीवापाड जपणे भागच होते !

मी, डॉक्टर हिरालाल व श्री वल्लभ बेनके निघालो असताना अचानक एका गोऱ्यापान, उंच, धिप्पाड व्यक्तीने आम्हाला मोठ्या अदबीने थाबवले, व आमचे नाव, गाव याची मोठ्या आपुलकीने चौकशी केली चेहऱ्यावरून ती आसामी हिंदुस्तानीच दिसत होती त्यानी आम्हाला काही छोट्या पण सुबक वस्तू भेट दिल्या मग डॉक्टरानी वक्रतुड महाकायचा छोटासा नजराणा व श्री बेनके यानी आमच्या क्लबचा ध्वज त्याना पेश केला आमचा नजराणा स्वीकारताना त्या व्यक्तीने स्वत:ची ओळख करून दिली--

" मी अब्राहिम सईदखान मैं कराची, पाकिस्तानसे आया हूँ "

पाकिस्तान ऐकल्यावर क्षणभर हादरल्यासारखे झाले आम्ही समजलो तशी ही आसामी हिंदुस्तानी नव्हती तर पाकिस्तानी होती ! आपण आपल्या मित्राला भेटतोय की शत्रूला हेच कळेना एक पाकिस्तानी, त्यातून कट्टर मुस्लिम .बूतपरस्ती न मानणारा. .चक्क अशा काफर व्यक्तीच्या हाती आम्ही आपल्या भोळ्याभाबड्या गणरायाची 'बूत' दिली होती !...
आता हा माणूस त्या मूर्तीचे नक्की काय करील असा आम्हाला निमिषार्ध संभ्रम पडला असतानाच ते गृहस्थ आश्चर्याने उद्गारले,

" बहोत खूब, बहोत खूब ! गजानन देव ! बहोत अच्छा है आपका ये प्रेझेंट आप हिंदुस्तानी भाई-बहनको मिलके हमे बहोत खुशी हुई! . "

असे हसतमुखाने म्हणत त्या पाकिस्तानी सईदखान भाईदजाननी आमची

भेट मोठ्या आदराने आपल्या खिशात ठेवली आम्हा तिघाबरोबर स्वत:चा फोटो काढून घेण्यासाठी जवळच असलेल्या व्यावसायिक फोटोग्राफरला सईद-खानने मोठ्या उत्साहाने पाचारण केले कसे कोणास ठाऊक पण फोटोच्या आकर्षणामुळे मि बिनधास्तची स्वारी घाईघाईत तेथे उपस्थित झाली व सईदखानशी शेकहँड करताना स्वत:चा फोटोही काढून घेतला फोटोमध्ये डॉक्टर आणि श्री बेनके बिचारे सईदखानपासून दूरच राहिले ! फोटो-ग्राफरबरोबर मि बिनधास्तही पुढच्या क्षणी गुल झाले

हिंदुस्तानातील अनेक स्थळं सईदखानना परिचित होती त्याचे अनेक जुने मित्र हिंदुस्तानात आहेत औपचारिकपणा दूर सारून त्यांनी आमच्याशी खूप गप्पा मारल्या डॉक्टर हिरालाल व बेनके याच्याशी हस्तांदोलन करून मला नमस्कार करून सईदखानने निरोप घेतला पाकिस्तानी व हिंदुस्तानी लोकांच्या मनामध्ये एकमेकाबद्दल बंधुभाव अजून जागृत आहे जिव्हाळा अजून ओला आहे याची ही साक्षच होती संघर्ष आहे तो सत्ताधाऱ्यांच्या पातळीवर !

पाकिस्तानी तर हिंदुस्तानच्याच मुशीतले आणि कुशीतले ! पण आम्हाला भेटलेल्या इंडोनेशियाच्या दोन-तीन स्त्रियादेखील आम्ही दिलेल्या भेटीवर प्रसन्न झाल्या "ओ गॉड गणेश !" म्हणून त्यानी गणेश प्रतिमेवर चक्क माथाही टेकला इंडोनेशियाची संस्कृती आपल्या रामायण-महाभारता-वरच आधारलेली, जोपासलेली आहे मग श्रीगणेशाला ते पूज्य मानणारच ! या पी. आय सी सी च्या बाहेरच्या भव्य सभागृहामध्ये इंडोनेशिया सर-कारने फिलिपाईन्सला भेट दिलेला धातूचा जटायूचा एक प्रचंड पुतळा ठेवलेला आहे थायलंड, इंडोनेशिया, पाकिस्तान, जावा, सुमात्रा ही सारी भारतभूमीचीच भावंड .कोणी सख्खी, कोणी चुलत कोणी मावस तर कोणी सावत्र ..पण आता मात्र पूर्णपणे स्वतंत्र व स्वायत्त !

एकदर गजानन महाराजांच्या मध्यस्तीमुळे आमचा मित्रपरिवार खूप समृद्ध झाला होता ! मूर्ती लहान पण कीर्ती महान म्हणतात ती अशी !

अधिवेशनाच्या आजच्या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण होते, फिलिपाईन्स या लोकशाही राष्ट्राचे राष्ट्राध्यक्ष फर्डिनांड मार्कोस व त्यांच्या पत्नी इमेल्डा मार्कोस याची उपस्थिती, राष्ट्राध्यक्षाचे भाषण ! भ्रष्टाचार वगैरे अशा अनेक अडचणीतून मार्ग काढून राष्ट्राध्यक्ष फर्डिनांड मार्कोस यानी फिलि-पाईन्ससारख्या अविकसित राष्ट्राला विकसनशील राष्ट्र केले आहे बहुसख्य फिलिपिनो लोकांची आपल्या या नेत्यावर श्रद्धा आहे, प्रेम आहे अशा या लोकप्रिय नेत्याचे दर्शन व स्फूर्तिदायक भाषण फिलिपिनोच्या व आम्हा सर्व

परदेशी पाहुण्यांच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण व औत्सुक्यपूर्ण होते । लेडी इमेल्डा मार्कोस या एक अत्यंत बुद्धिमान व महत्त्वाकांक्षी स्त्री असून फिलिपाईन्स राष्ट्राची खरी सूत्रे त्यांच्याकडूनच हलतात असा येथे एक लोकप्रवाद आहे आपल्या दिवंगत पंतप्रधान श्रीमती गांधी यांच्या अंत्यसंस्काराचे प्रसंगी, प्रेसिडेंट मार्कोसच्या ऐवजी ऐनवेळी लेडी इमेल्डा मार्कोस याच स्वतः दिल्लीत उपस्थित झाल्या होत्या त्यांना आम्ही टेलिव्हिजनवर पाहिले होते अशी ही महत्त्वाकांक्षी, धूर्त, धोरणी रझिया सुलतान, मलिका नूरजहान, प्रत्यक्ष पाहायची उत्सुकता लागली होती ।

'आयर्न बटरफ्लाई ऑफ एशिया' (एशियाची फौलादी तितली) असा इमेल्डा मार्कोसचा उल्लेख केला जातो तो कदाचित तिच्या जबरदस्त महत्त्वाकांक्षेमुळे किंवा तिच्या हुकुमशाही स्वभावामुळे असावा । किंवा फिलिपाईन्सच्या राष्ट्रप्रमुखावर तिने घातलेल्या मोहिनीमुळे असावा । सौंदर्यवती स्त्री एखाद्या अती लाडावलेल्या मुलासारखी असते असं म्हणतात स्वतःच्या मादक मोहक लावण्याचा स्वाभिमानच त्या रूपगर्वितेला महत्त्वाकांक्षी, आत्मप्रेमी व दुराग्रही बनवीत असावा अशी ही रूपगर्विता, सौंदर्याभिमानी इमेल्डा मार्कोस गेली वीस वर्षे, राष्ट्राध्यक्ष फर्डिनांड मार्कोसची अत्यंत प्रिय पत्नी या नात्याने सातत्याने निरंकुश सत्ता उपभोगीत आहे

इ स १९५४ साली इमेल्डाने मनिलाच्या सौंदर्य प्रतियोगितामध्ये भाग घेतला व मनिला क्वीन म्हणून तिची नियुक्ती झाली ही मनिला क्वीन तेव्हापासून फर्डिनांड मार्कोसच्या हृदयाची राणी झाली व पुढे राष्ट्राध्यक्ष मार्कोसची सम्राज्ञीही झाली । मार्कोसने आपल्या या प्रिय पत्नीला मनिलाचे गव्हर्नर पद बहाल केले

मार्कोसच्या इमेल्डावरील प्रेमाविषयी एका फिलिपिनो नागरिकाने आम्हाला एक मिस्किल किस्सा सांगितला होता

" इमेल्डाबाई सोबतीला असल्याशिवाय राष्ट्राध्यक्ष मार्कोस यांचे भाषण कधीही रंगत नाही मार्कोस आपल्या भाषणाच्या शेवटी विनोदाने कधी कधी म्हणतात, 'माझ्याजवळ जे जे काही आहे ते सर्व मी आपणास देईन फक्त माझी पत्नी सोडून ।' .."

जगातील अतिशय श्रीमंत अशा दहा स्त्रियांमध्ये इमेल्डाची गणना केली जाते काही लोक तिची तुलना जॅकलिन केनेडी व इलीनॉर रुजवेल्ट यांच्याबरोबर करतात अनमोल दुर्मिळ, महागड्या वस्तूंची खरेदी करण्याचा इमेल्डाला अफाट सोस आहे ती नेहमीच आपल्या मैत्रिणींसह न्यूयॉर्क, टोकिओ, रोम येथे शॉपिंगसाठी जात असते १९७८ मध्ये न्यूयॉर्कमधील एका ज्युवेलरीच्या

दुकानात इमेल्डाने काही तासातच पधरा लाख डॉलर्सच्या किमतीचे अलकार खरेदी केले होते म्हणे !

शाही इज्जत, शोहरत, अफाट धनदौलत, असीम सत्ता प्राप्त होऊन देखील इमेल्डा मार्कोसची महत्त्वाकाक्षा शमली नाही अस येथील लोक दबत्या आवाजात सागतात मार्कोस दापत्याचे गौरवगान मोठ्या उच स्वरात होते ते केवळ त्याच्या निरकुश सत्तेला, हुकुमशाहीच्या जरबेला घाबरून होत असाव हे आता लक्षात आल होत

केवळ राष्ट्राध्यक्षाची पत्नी म्हणून राहण्यात इमेल्डा समाधानी नाही स्वत: राष्ट्राध्यक्ष होण्याची तिची आकाक्षा आहे तिची ही महत्वाकांक्षा सफल अथवा असफल करणे आता फिलिपिनो नागरिकाच्या हाती आहे

दिवगत विरोधी पक्षनेता ॲक्विनो याची चतुर पत्नी श्रीमती कोराजॉन ॲक्विनो, मार्कोस व इमेल्डाच्या निरकुश सत्तेला, बेलगाम आसुरी महत्त्वाकाक्षेला शह देण्यासाठी मोठ्या हिमतीने सुसज्ज झाली आहे इमेल्डा आता एका राष्ट्रप्रमुखाची पत्नी म्हणून मिरवते, की स्वत राष्ट्राध्यक्ष होऊन हुकुमत गाजवते, की केवळ एका पदच्युत नामशेष राष्ट्राध्यक्षाची सामान्य पत्नी म्हणून उरते हे आता काळ लवकरच ठरवेल !

दोन वर्षांपूर्वी ज्या ॲक्विनो नावाच्या विरोधी नेत्याचा मनिलाच्या विमानतळावर गोळ्या झाडून खून करण्यात आला होता, तो ॲक्विनो, प्रेसिडेंट मार्कोस याचा जानी दोस्त होता असे म्हणतात त्या प्रसगापासून फिलिपाईन्सचे राजकीय वातावरण ढवळले होते प्रेसिडेंट मार्कोस याची चित्तशांती सुद्धा ढळली होती आपल्या लाडक्या नेत्याची हत्या करण्यात आल्यामुळे विरोधी पक्षाचे लोक भलतेच क्रोधिष्ठ झाले होते जिवत असताना ॲक्विनो एवढा लोकप्रिय नव्हता, परतु त्याच्या हत्येनतर तो अधिक लोकप्रिय झाला असेही काही लोक म्हणतात अखिल जनमानसाचे मानसशास्त्रच असे आहे... मृत्यूनतर अधिक लोकप्रिय होण ! हौतात्म्याने अनेकांना लोकप्रियतेचे अहेवलेणे लाभते !

गेली दोन वर्षं मनिलामध्ये वारवार निदर्शने व मोर्चे चालू होते या चार दिवसात तर त्या चळवळीनी उग्र रूप धारण केले होते त्याना हिसक वळण लागले होते आदल्या दिवशी सध्याकाळीच मदर टेरेसा याचे स्वागत करण्यासाठी गेलेल्या, बोगो शहराच्या मेयरची, काही अतिरेकी लोकानी, विमानतळावरच अमानुष हत्या केल्याची बातमी तेवढ्यातच आम्हाला समजली भेदरून सोडणारी आणखी एक विलक्षण जबरदस्त घटना ' या घटनेमळे प्रेसिडेंट मार्कोस व लेडी मार्कोस, कॉन्फरन्सला उपस्थित राहू

शकणार नसल्याचे समजले कारण त्याचेही जीवित• सुरक्षित नव्हते अशा अशांत वातावरणात कोणत्याही सार्वजनिक स्थळी जाणे त्याच्या दृष्टीने धोक्याचे होते सर्वांच्याच आनंदावर असे अनपेक्षितपणे विरजण पडले

कार्यक्रमाचा प्रमुख गाभाच नाहीसा झाला होता, चैतन्य निघून गेले होते ती एक निराशा . त्यात पुन्हा घडलेल्या व घडू पाहत असलेल्या विध्वंसक प्रसंगाची हिंसक भयप्रद शक्यता !

वास्तविक सगळ्यांचाच मूड गेला होता तरी फिलिपिनो सदस्यांनी आपला निरुत्साह दिसू दिला नाही आपली निराशा यत्किंचितही जाणवू दिली नाही इतर कार्यक्रम शांततेने सुरळीतपणे सुरू झाले

मनिला शहराचे मेयर श्री रमण भगतसिंग हे भारतीय असून गेली कित्येक वर्षं, ते फिलिपाईन्समध्ये स्थायिक झालेले आहेत त्यांची आमची जेव्हा ओळख झाली तेव्हा हिंदीतून ते आमच्याशी अगदी मनमोकळेपणाने बोलले हिंदी बोलायला मिळाल्यामुळे आपले मन आज खूप मोकळे झालेय असे ते आम्हाला म्हणाले होते आपला एक देशबांधव मनिलासारख्या राजधानीच्या शहराचा मेयर आहे हे पाहून आम्हाला आनंद तर वाटलाच, पण या गोष्टीचा स्वाभिमानही वाटला आज श्री रमण भगतसिंग यांनी सर्वांचे स्वागत करून कार्यक्रमाला प्रारंभ केला त्यानंतर रोटरीच्या आंतर-राष्ट्रीय कार्याचे समालोचन झाले

शेवटी जपानचे टोकिओ युनिव्हर्सिटीचे प्रमुख डॉ अकिरा ताकाशाही यांनी ' शैक्षणिक माध्यमातून शांतता ' या विषयावर इंग्लिशमधून भाषण केले या कार्यक्रमाचे वेळी मात्र जपानहून आलेले सर्व रोटेरियन्स उपस्थित होते इंग्लिश कळत नसल्यामुळे किंवा रस नसल्यामुळे इतर कार्यक्रमाचे वेळी ते उठून बाहेर जात असत आज मात्र सर्व जपानी सभासदांनी, इंग्लिशचा जपानी भाषेतील अनुवाद ऐकण्यासाठी कानाला रिसीव्हर लावले होते

आशियाई रोटरी अधिवेशनाचा मुख्य सूर होता ' जागतिक ऐक्य ' आणि ' जागतिक शांतता ' ! या विषयांना पार्श्वभूमी मात्र लाभली होती, फिलि-पाईन्समधील हिंसक, विध्वंसक, अशांत, अस्थिर वातावरणाची ! या विरोधाभासामध्ये त्यामुळे एक वेगळेच औचित्य जाणवले ! किंबहुना या विरोधाभासामुळेच तो सूर अत्यंत निकडीचा जाणवला

कॉन्फरन्सच्या कार्यक्रमापैकी एक जिव्हाळ्याचा कार्यक्रम म्हणजे ' होम हॉस्पिटॅलिटी ' . ' घरगुती पाहुणचार ' हा कार्यक्रम आजच सध्याकाळी होता या कार्यक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी आम्ही नावनोंदणी केली होती ' होम हॉस्पिटॅलिटी कार्यक्रमाच्या निमित्ताने आम्हाला एका

फिलिपिनो कुटुबात आपुलकीने मिसळण्याची सुवर्णसंधी प्राप्त होणार होती म्हणून या कार्यक्रमाची विशेष प्रतीक्षा होती पचताराकित हॉटेलमधील देखणा दिमाख पाहून झाला होता आता घरगुती कौटुबिक देखावा पाहायचा होता, अनौपचारिक जिव्हाळ्याचा अनुभव घ्यायचा होता

आलेल्या परदेशी पाहुण्याची वेगवेगळ्या फिलिपिनो यजमान सदस्यानी त्याच्यामध्ये विभागणी करून घेतली होती त्यामुळे आमच्या ग्रुपमधील सहकाऱ्याचेदेखील वेगवेगळ्या फिलिपिनोंकडे या ' होम हॉस्पिटॅलिटी 'साठी विभाजन झाले होते

मि रेयस हे मनिला शहरातील एका रोटरी क्लबचे प्रेसिडेंट मनिलामधे याची इटरनॅशनल पाईप इडस्ट्रीज नावाची कपनी आहे मि रेयससाहेब आमचे यजमानपद भूषवणार होते आम्हा दोघा पति-पत्नीबरोबरच, आमच्या-बरोबर आलेले, सोलापूरचे सिव्हिल सर्जन डॉ शरद होशिग व सौ अजली होशिग यानाही मि रेयस याच्याकडे पाहुणे म्हणून पाचारण करण्यात आले होते या होशिग दापत्याने, आमच्या परदेश वास्तव्यामधे आम्हाला गोड व प्रेमळ साथ दिली त्यांच्या शांत व चौकस स्वभावामुळे आमच्या ज्ञानातही बरीच भर पडली

यजमानाच्या घरी आम्हाला कशा प्रकारचे जेवण हवे हे यजमानाना कळविण्यासाठी आम्हाला फॉर्म भरण्यासाठी दिले गेले त्या फॉर्मवर ' शाका-हारी ' असं लिहून आम्ही आम्हा चौघाची नावे लिहिली, तोच मि बिनधास्त नेहमीप्रमाणे उल्कापाताप्रमाणे अचानक समोर येऊन ठाकले

' डॉक्टरसाहेब मी आज अगदी एकटा पडलोय बघा ! माझे सर्व मित्र वेगवेगळ्या ठिकाणी जाणार आहेत माझ्या यजमानांनी मलाच तेवढे येथील ' फिलिपाईन्स प्लाझा ' या हॉटेलमधे बोलावले आहे " (मि बिनधास्तला घरी आमन्त्रित करण्यापेक्षा एखाद्या हॉटेलमध्येच बोलवणे इष्ट, हे त्याच्या यजमानानी ओळखल होत की काय न कळे ! )

' मि बिनधास्त तुम्ही लकी आहात फिलिपाईन्स प्लाझा ' हे तर मनिलातील अत्युत्तम हॉटेल आहे "

पण मि बिनधास्त नाराजीच्या स्वरात म्हणाले,

" अहो, हॉटेलात कसली आलीय होम हॉस्पिटॅलिटी ?" हॉटेल म्हटल्या-वर कदाचित मि बिनधास्तच्या डोळ्यासमोर बिलाच्या रूपाने तारे चमकले असावेत ..

' त्यापेक्षा डॉक्टरसाहेब, मला तुमच्याच यजमानाच्या घरी येऊ द्यात लिहा फॉर्मवर माझे पण नाव पण माझा मेनू मात्र शुद्ध मांसाहारी लिहा ह ! "

"पण मि बिनधास्त, तुम्हाला रेयससाहेबांकडून आमंत्रण आहे का ?"

"नसू द्यात हो आमंत्रण मान ना मान, मै तेरा मेहमान असे मी तुमच्या रेयससाहेबांना सांगेन !"

आमचे यजमान मि रेयस यांच्या पाहुण्यात आणखी एका अनाहूत पाहुण्याची भर पडली

'अॅन आयलँड विदिन अॅन आयलँड
अ लेक विदिन अ लेक
अ व्होलकॅनो विदिन अ व्होलकॅनो !

अथांग सागरात फिलिपाईन्सच्या बेटामधील एक बेट त्या बेटामध्ये एक विस्तीर्ण जलाशय त्या जलाशयामध्ये पुन्हा बेट व त्या बेटामध्ये पुन्हा एक तळं ! त्या तळ्यामध्ये एक ज्वालामुखी ! त्या ज्वालामुखीमध्येही आणखी एक ज्वालामुखी !



फिलिपाईन्समधील एक प्रेक्षणीय स्थळ ताल व्होलकॅनो ! हा जरूर पहावा या आमच्या गाईडच्या प्रस्तावास आमचे एक सहप्रवासी डॉ बी जी देशपांडे यांनी आवर्जून अनुमोदन दिले डॉ बी जी देशपांडे हे पुण्याचे रहिवासी भूगर्भशास्त्राचे डॉक्टरेट, भूवैज्ञानिक, पुणे युनिव्हर्सिटीमधे जिऑलॉजीचे प्राध्यापक, काही वर्षं आफ्रिकेतील टांझानिया येथील युनिव्हर्सिटीमधेही प्राध्यापकी, एक अत्यंत विद्वान, प्रगल्भ, जिज्ञासू बुद्धिमत्तेचे गृहस्थ वयाने प्रौढ, स्वभावाने शांत त्यामुळे आम्हा तरुणापासून साहजिकच अलिप्त पण वयाचा लिहाजा न बाळगता अभ्यास व संशोधन करण्याची मात्र विलक्षण धडपड व जिद्द ! त्यांच्या संशोधनकार्यासाठीच ते आमच्यासह या ट्रीपमधे सामील झाले होते सिंगापूर व कुलालपूर येथील युनिव्हर्सिटीमधे लेक्चर्स देण्यासाठी त्यांना पाचारण करण्यात आले होते त्यामुळे ते सिंगापूर येथे काही दिवस राहणार होते अशी विद्वान व्यक्ती आमच्या या दौऱ्यात सहभागी होती याचा आम्हाला अत्यंत अभिमान वाटतो पण मनिलापर्यंत त्यांची-आमची ओळख झाली नाही, बातचीत होऊ शकली नाही, त्यामुळे आपण एका मोठ्या अनुभवी, ज्ञानी व्यक्तिमत्वाच्या सहवासास पहिले चार-सहा दिवस मुकलो याची अजूनही खंत वाटते

दुपारी एक वाजता अधिवेशनाचा त्या दिवसाचा कार्यक्रम संपला होता होम हॉस्पिटॅलिटी या कार्यक्रमास संध्याकाळी सहा वाजता जायचे होते डॉ देशपांडे यांच्या सूचनेनुसार, मधल्या वेळात ताल व्होलकॅनो पाहण्यास आम्ही निघालो आज खाण्यापिण्यात वेळ घालवायचा नव्हता म्हणून आम्ही आपापले खाद्य पदार्थ बरोबर घेतले बस चालू असताना खाऊच्या पिशव्या दिलखुलासपणे खुल्या झाल्या जादूगाराच्या पोतडीप्रमाणे एकेक खमंग, स्वादिष्ट पदार्थ बाहेर येऊ लागले

" बघा, बघा . आता लवकरच सिंगापूरला जायचंय आणि सिंगापूरला भारतीय पद्धतीचे जेवण चांगले मिळते, हे सर्वांना ठाऊक आहे तेथे या खाद्य पदार्थांचे ओझे कशाला वागवायचे म्हणून सगळ्यांनी अगदी मुक्तहस्ताने आपापल्या मेव्याचा आज गौप्यस्फोट केला आहे खाकरा, गुळाची पोळी, चकल्या, लाडू वा वा, आज तोंडाला चव आली हो ! "

मि बिनधास्त यांनी संतुष्ट होऊन अभिप्राय देता देता सर्व पदार्थांचा समाचार घेण्यास सुरुवात केली आमच्या एका सहकाऱ्याला, बिनधास्त-साहेबांची जरा फिरकी घ्यायची लहर आली

" पण का हो बिनधास्त, तुम्हाला परदेशात येऊन असे मिळमिळीत 'मेड इन इंडिया' पदार्थ खायला आवडत नाही ना ? अहो, हॉटेलात जाऊन

घरचा डबा खातात का ?"

"शेवटी घरच ते घरचच हो !"

या मि बिनधास्तच्या समर्थनाशी कोणीतरी सूर जुळवून हळूच कुजबुजल, शेवटी घरची ती घरचीच हो !"

खाद्यपदार्थांच्या पिशव्या धावत्या बसमधे वरच्यावर मागे-पुढे झुलू लागल्या विशेष म्हणजे आमचा गाईड जून व बसचा चालक हेदेखील उत्साहाने आमच्या फराळात सामील झाले भारतीय पदार्थांचे खमग प्रलोभन त्यानाही टाळता येईना सर्व पदार्थ त्यांनी कौतुकाने खाल्ले असे रुचकर स्वादिष्ट पदार्थ आपण आयुष्यात प्रथमच खात आहोत असे जूनने आम्हाला वारवार सागितले त्या वातानुकुलित आरामगाडीत खालील गालिचावर खूपच कचरा पडला आपल्याकडील 'यात्रा स्पेशल' गाडीचे तिला स्वरूप आले, पण जून आणि ड्रायव्हर दोघेही आमच्यावर नाराज झाले नाहीत उलट "असू द्या असू द्या आम्ही करू नतर साफ" असे त्यानी अत्यत सहिष्णुतेने आम्हाला सागितले आम्ही त्याच्या रसनादेवीला आधी सतुष्ट आणि प्रसन्न करून घेतले होते ना !

ताल व्होलकॅनोपर्यंतच्या प्रवासात अगदी गोव्यामधे आल्यासारखे वाटले रस्त्याच्या दुतर्फा उच उच नारळाची झाडी लाल माती आणि तिच्यामधे रुजलेली आबा, फणस, केळी, अननस, पपई, कॉफी यांची दाट झाडी आब्याची, फणसाची, नारळाची वृक्षराजी तीच, त्याच्या झावळ्याच्या तारा-मधून आपल्या अदृश्य करागुल्यांनी वीणावादन करणारी दृश्य निसर्गराणी तीच ! त्यातून उमटणारे मधुर झकारही तेच ! कोठेही जा, मनुष्यस्वभाव जसा तोच, तसा निसर्गही तोच ! तफावत असते ती मनुष्याच्या 'माझ' 'तुझं' या पाहण्याच्या दृष्टिकोणात ! गमत म्हणजे मधेमधे पाईनवृक्ष देखील भरपूर आढळले उच उच नारळाची झाडे, त्याना साथ देणारे उच उच पाईनवृक्ष आणि त्याच्या पायथ्याशी विपुल पाईनॲपलची झुडप वृक्ष-राजीची ही काश्मीर कन्याकुमारी मनोहर युती, मन आणि नयन पल्लवित करणारी होती !

ताल व्होलकॅनो, मनिला शहराच्या दक्षिण दिशेला, 'बटनगास' या जिल्ह्यातील 'तगयताय' या गावात आहे आम्ही तगयताय गावातील एका छोट्या पण टुमदार हॉटेलजवळ आलो हॉटेलमध्ये जाताच जूनने सर्वांसाठी आइस्क्रीम मागवले तहान लागलीच होती आधी शहाळ्याचे थडगार मधुर पाणी आले पाठोपाठ फोडलेल्या त्याच शहाळ्यात आइस्क्रीम आधी शहाळ्या-तील पाणी प्यायचे, मग त्याच शहाळ्यात घेऊन आइस्क्रीम खायचे शेवटी

शहाळ्यातील कोवळ खोबर चघळायच नावीन्यपूर्ण वाटली ही पद्धत !

या हॉटेलच्या मागील बाजूला एक छोटीशी बाग आहे तेथून एक विशाल जलाशय दिसत होता त्याचे नाव 'ताल लेक' या ताल नावाच्या तलावामध्ये एक छोटस बेट दिसत होत त्या बेटात मध्यभागी एक उचवटा दिसत होता, त्यात पुन्हा एक तळ होत, व त्यामध्ये ज्वालामुखी होता हाच तो ताल व्होलकॅनो !

दुरूनच व्होलकॅनोचे दृश्य पाहताना डॉ बी जी देशपाडे यानी आम्हाला ज्वालामुखीविषयी भूरचनाशास्त्राच्या दृष्टीने भरपूर उपयुक्त मार्गदर्शन केले कोणत्याही स्थळाची पार्श्वभूमी कळाली तरच ते पाहण्यात खर औचित्य आणि खरी गमत ! प्रोफेसर डॉ देशपाडे साहेबाचे याबाबतीत आभारच मानायला पाहिजेत

समोरचे ज्वालामुखीचे दृश्य पाहताना आठवले, आम्ही बँकॉककडून एअर फ्रान्सच्या विमानाने मनिला येथे येत असताना, विमानाच्या खिडकीतून एक अडाकृती तबकडीसारखा भूभाग दिसला होता त्यामध्ये एक तलाव व त्या तलावात पुन्हा एक भूखड, व त्यामध्ये एक तळ, अशा विहगम दृश्याने आमचे लक्ष वेधले होते हे ज्वालामुखीचे बेट मनिलाला येण्यापूर्वीच आपण आकाशातून मोठ्या उत्सुकतेने पाहिले होते, या स्मृतीने, डॉ देशपांडे यानी दिलेल्या बहुमोल ज्ञानात एका आगळ्याच आनदाची भर पडली !

हा ताल ज्वालामुखी जगातील अत्यत कमी उचीच्या ज्वालामुखींपैकी एक आहे समुद्रसपाटीपासून याची उची अवघी सहा मीटर इतकी आहे

इ स १५७२ सालापासून या ज्वालामुखीचे आतापर्यंत सव्वीस वेळा लहान-मोठे उद्रेक झाले आहेत प्रत्येक वेळी हे उद्रेक ज्वालामुखीच्या एकाच विवरातून न होता वेगवेगळ्या विवरातून झाले आहेत या ज्वालामुखीचा सर्वांत अधिक तीव्र व उग्र स्वरूपाचा उद्रेक इ स १९११ साली झाला त्या स्फोटामुळे प्रचड प्राणहानी व वित्तहानी झाली त्या वेळी ज्वालामुखीच्या भोवतालच्या २३० चौरस किलोमीटर भागाचे नुकसान झाले होते मनिला शहरातदेखील या ज्वालामुखीची राख आणि धूळ तेव्हा पसरली होती या बेटावरचे एक छोटेसे कुत्र्याचे पिल्लू तेवढे त्या वेळी मोठ्या आश्चर्यकारकरीत्या जिवत राहिलेले होते असे म्हणतात

प्राणिमात्रांना आपल्या इद्रियाद्वारे अशा प्रकारच्या ज्वालामुखीच्या स्फोटाची पूर्वसूचना मिळते या विषयावर सध्या सशोधन चालू आहे आमचे सहकारी डॉ देशपांडे हे देखील सध्या या विषयावर सशोधन करीत आहेत

इ स १९११ च्या उद्रेकानंतर हा ताल ज्वालामुखी सुप्त झाला त्याच्या-विषयी लोकांच्या मनात निर्माण झालेली भीती हळूहळू लुप्त होऊ लागली पुनश्च या ज्वालामुखीच्या बेटावर लोकवस्ती हळूहळू निर्धास्तपणे बसू लागली लोकजीवन सुरळीतपणे चालू लागले अन्नधान्य उगवण्याइतपत येथील जमीन सुपीक होऊ लागली हा ज्वालामुखी सध्या सुप्तावस्थेत असला तरी तो केव्हाही जागृत होऊन त्याचा स्फोट होण्याची शक्यता आहे, तरी कोणीही या बेटावर वास्तव्य करू नये, असा भूगर्भशास्त्रज्ञानी वारवार इशारा दिला होता पण लोकानी त्याकडे दुर्लक्ष केले भूतकाळ विसरून लोक निर्धास्तपणे राहू लागले

फिलिपाईन्स सरकारने या ज्वालामुखीचा अभ्यास करण्यासाठी, त्याच्या हालचालीचे निरीक्षण करण्यासाठी इ स १९५३ साली, 'बॅरिओ अलास' येथे एक निरीक्षण केंद्र स्थापन केले ज्वालामुखीच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी शक्य ते मानवी प्रयत्न चालू झाले पण पण

१९६५ साल, सप्टेंबर महिना ! जीवघेणा ग्रीष्मऋतू सरलेला असतो हवेतील दाहकता सरून गारवा निर्माण झालेला असतो या सप्टेंबर महिन्यात वास्तविक नेहमी सुखद हवा असते पण या वर्षी मात्र कमी झालेले तपमान हळू हळू वाढत होते

ती एक चादणी रात्र होती ताल तलावात, चादणे आपले प्रतिबिंब न्याहाळत होते बेटावरच्या कोळी वस्तीतील दीप शांतपणे जळत होते येथे लोकवस्ती आहे याची ते एकमेव साक्ष देत होते दिवसभराच्या श्रमाने, श्रांत क्लांत झालेले लोक शांतपणे, मोठ्या विश्वासाने, निर्धास्तपणे निद्रादेवीच्या कुशीत पहुडले होते विसावले होते .कुणी मातेच्या कुशीत तर कोणी पित्याच्या कुशीत कुणी प्रियकराच्या बाहूत तर कुणी प्रियेच्या मिठीत . कालच्या विवंचना विसरून .उद्याचे मनसुबे रचीत भविष्याची मनोहर स्वप्न रगवीत अपेक्षाची फुल फुलवीत .

ज्या ज्वालामुखीच्या सहवासात ते वर्षानुवर्षं निश्चित मनाने राहत होते, त्या ज्वालामुखीच्या रहस्यमय उदरात काय धगधगत होते, खदखदत होते, याची त्या अश्राप, निष्पाप जीवाना कुठ कल्पना होती ? त्याना कुठ माहीत होते की नियतीने त्याना या ज्वालामुखीच्या रगभूमीवरील जीवनमृत्यूच्या शोकांतिकेतील पात्र म्हणून नियोजिले आहे !

तीस सप्टेंबर ! या शोकनाट्याचा क्लायमॅक्स परमोच्च क्षण ! ताल ज्वालामुखीचा प्रचड उद्रेक ! तीव्र, उग्र, भेसूर विस्फोट ! निसर्गाचा जीव-

घेणा खेळ। नियतीचे बेताल रौद्र नाट्य।

निरीक्षण शाळेमधे या स्फोटाची एखादा दिवस आधी तरी पूर्वसूचना मिळावी। सार अचानक, अकल्पित, अघटित घडल। रात्री झोपलेल्या जीवाची ती काळरात्र ठरली निद्रादेवीच्या काळ्याकभिन्न कुशीतच तार काही सपल ज्वालामुखीच्या जबरदस्त तडाख्याने काही लोक जागच्या-जागीच गेले काही लोक गुदमरून मेले, काहीजण बुडून निरीक्षण केंद्रदेखील पूर्णपणे उद्ध्वस्त झाले मानवी प्रयत्नावर अनाकलनीय निसर्गाने मात केली

हा स्फोट ज्वालामुखीच्या नवीनच विवरातून झाला हे विवर अदाजे दीड किलोमीटर लाब व अर्धा किलोमीटर रुद होते याची खोली जवळ-जवळ पचवीस मीटर होती उद्रेकानतर या ज्वालामुखीतून सतत तीन दिवस गरम वाफा काळ्या, रगाचे खडक, तप्त लाव्हारस, राख, वाळू, हिरवट रगाचा तेलकट पदार्थ व विषारी वायू बाहेर पडत होते

स्फोटापूर्वी जलाशयाचे नेहमीचे तपमान तीस डिग्री सेंटीग्रेडवरून, पचे-चाळीस डिग्री सेंटीग्रेड झाले आहे एवढाच काय तो फरक मानवी बुद्धीला ज्ञात झाला होता आपल्या हालचालीचे अनेक उपकरणाद्वारे रात्रदिवस बार-काईने निरीक्षण करणाऱ्या मानवी बुद्धीला व मानवी प्रयत्नाना या रहस्यमय ज्वालामुखीने, गनिमीकाव्याने अत्यत जबरदस्त तडाखा दिला होता। ताल व्होलकॅन असा बेताल व्होलकॅनो ठरला होता।

या उद्रेकानतर पचवीस सेंटीमीटर्स जाडीचा राखेचा थर भोवतालच्या साठ चौरस किलोमीटर्सच्या परिसरात आच्छादला गेला तप्त ज्वालारस, ज्वालामुखीपासून पाच किलोमीटर्स अतरापर्यंत वाहत गेला रगभूमीचे, काही क्षणांतच अशा धगधगत्या अग्निकुडात रूपांतर झाले।

इ स १९६५ सालच्या या थैमानानतर हा ताल ज्वालामुखी पुन्हा सुस्त, सुप्त, निद्रिस्त झाला आहे तो ज्वालामुखी आम्ही जवळून पाहू शकलो नाही कारण त्याच्याजवळ जाणे शक्यच नव्हते पण दुरूनही, त्याच्या अनेक विवरा-तून बाहेर पडणारा धूर मात्र आम्हाला स्पष्टपणे दिसला आपल्या अस्ति-त्वाची जाणीव, हा निद्रिस्त ज्वालामुखी, या धूराच्या वलयातून प्राणिमात्राना करून देत होता। तरीही पुन्हा या वीस वर्षांत या ताल बेटावर मनुष्य-जीवन वसले व पूर्ववत् सुरळीतपणे सुरू झाले आहे या परिसराची पूर्वीपेक्षा अधिक सुधारणा झाली आहे

मनुष्य, भूतकाळातील कटु स्मृती घोळत बसण्यापेक्षा, भविष्यातील स्वप्नांचे उच उच मनोरे निर्माण करणेच अधिक पसत करतो। भूतकाळा-तील विध्वमाच्या नैराश्याच्या मनहूस काळ्या सावल्या दूर सारून, स्वप्नाच्या

या मनोऱ्यामध्ये आशा-अपेक्षाचे आकर्षक आणि भरण्याचांचे प्रदर्शन करीत असतो !

फिलिपाईन्स देशामध्ये असे अनेक ज्वालामुखी आहेत त्यातील कमीत कमी एक डझन ज्वालामुखी तरी सध्या ज्वलत आहेत 'हीबॉक-हीबॉक' नावाचा एक प्रसिद्ध ज्वालामुखी येथे असून तोही ज्वलत आहे याचाही इ स १९४८ साली प्रचड उद्रेक होऊन अपार प्राणहानी व वित्तहानी झाली होती 'माऊट मायॉन' या ज्वालामुखीचाही इ स १९६८ साली उग्र उद्रेक झाला होता

एकदर सहवास गूढ अनाकलनीय, अविश्वसनीय, रहस्यमय, अशा ज्वालामुखींचाच ! .येणारा प्रत्येक क्षण बेभरवशाचा ! ज्वालामुखी...आज तो सुप्त अवस्थेत असला तरी त्याचा केव्हाही उद्रेक होण्याची शक्यता आहे... आज ..कदाचित उद्या ..दोन दिवसानी ..पधरा दिवसानी...पुढच्या वर्षी दहा वर्षांनी किंवा शभर वर्षांनीदेखील !

जपानी लोक जपानमधील 'फुजियामा' या ज्वालामुखी पर्वताला पूज्य मानतात मनुष्यजीवनाला वरदान ठरणाऱ्या तसेच अभिशापही देणाऱ्या, अशा दोन्ही नैसर्गिक शक्तीपुढे मनुष्य शेवटी लीन, दीन, नम्र, नतमस्तक होतो आणि श्रद्धने अशा अनाकलनीय महाशक्तीची पूजा करू लागतो !

ईश्वरकृपेने जगातील अशा सर्व ज्वालामुखीच्या हालचालीचे निरीक्षण करण्याची, त्याच्या उद्रेकामुळे घडणाऱ्या विध्वसावर मात करण्याची शक्ती मानवाला प्राप्त व्हावी आणि,

"परमेश्वरा ! आम्हाला या ज्वालामुखीच्या तडाख्यातून वाचव बाबा !" अशी दीनवाणी प्रार्थना करणाऱ्या असंख्य जीवाना आपल्या प्राणरक्षणाची शाश्वती मिळावी !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## सात

# सा माय निलाद....

ताल व्होलकॅनो पाहून आल्यानंतर अर्ध्या तासात, 'होम हॉस्पिटॅलिटी' या कार्यक्रमास मि. रेयस यांच्या घरी जाण्यासाठी आम्ही अगदी सुसज्ज झालो. ही 'होम हॉस्पिटॅलिटी' म्हणजे एक प्रकारचे 'स्नेह मीलनच!' मी बनारस सिल्कची साडी नेसले होते, तर सौ. अंजलीताई पटोला सिल्कची. शाही मेजवानीला जायचे होते तर शाही मेहमानाच्याच दिमाखात जायला हवं ना!

मि. रेयस यांनी आम्हाला त्यांच्या घरी नेण्यासाठी त्यांची गाडी व सेक्रेटरी पाठवला होता. मेहमानांची संख्या चाराची पाच झालेली पाहून त्यांच्या सेक्रेटरीने क्षणभर विचार केला. गाडीत अडचण होईल का.. पण लगेच अगत्याने कमरेत वाकून त्याने गाडीचा दरवाजा उघडला व आम्हाला गाडीत बसण्याची विनंती केली.

वातानुकूलित मर्सिडीस गाडीच्या रथामधून आमची शाही सवारी मोठ्या इतमामाने निघाली. मि. रेयस यांचे घर मनिला शहरापासून पंचवीस किलोमीटर्स अंतरावरील 'मकाती व्हिलेज' या भागात होते. घर कसलं, एक अलिशान बंगलाच होता तो!

'होम हॉस्पिटॅलिटी' हादेखील रोटरी कन्व्हेन्शनचाच एक भाग असल्यामुळे मी व डॉ. हिरालाल, आमचे कॉन्फरन्सचे बॅजेस् लावून आलो होतो. प्रवेशद्वारातच रेयससाहेब व त्यांच्या सुंदर सुस्वरूप पत्नी आमचे

स्वागत करण्यासाठी उभे होते येथे आमचे स्वागत, आमच्या अपेक्षेप्रमाणे 'मबुहाय' ने न होता 'वेलकम' ने झाले

आम्ही खाद्याला लावलेले कॉनफरन्सचे बॅजेस् पाहून रेयस दांपत्याला खूप आश्चर्य वाटले रेयससाहेब मोठ्या आश्चर्याने उद्गारले,

"अरे वा! डॉ शहा, तुम्ही येथे देखील तुमचे बॅजेस् लावून आलात!"

"आज सकाळीच, बॅज् नसल्यामुळे प्रेसिडेंट डॉ कार्लोस कॅन्सेको याना-देखील पी आय सी सी मध्ये प्रवेश मिळाला नाही आमच्याजवळ आमचे बॅज् नसल्यामुळे तुम्हीही आम्हाला तुमच्या घरात प्रवेश नाकारला असता तर?"

माझ्या पतीचा युक्तिवाद ऐकून रेयस पतिपत्नीला अगदी मनापासून हसू आले

होम हॉस्पिटॅलिटी या कार्यक्रमाची मला विशेष प्रतीक्षा होती कारण या निमित्ताने मला एका फिलिपिनोचे 'होम' .घरकुल पहायचे होते त्याची कुटुंबपद्धती, त्याचे रीतीरिवाज जवळून, अगदी घरात शिरून पहायचे होते फिलिपिनो संस्कृती, फिलिपिनो संस्कार, फिलिपिनो संसार याचा 'आँखो-देखा' अनुभव घ्यायचा होता

पण रेयससाहेबांच्या या अलिशान बंगल्यातील शानशौकत काही निराळीच होती येथे मेहमानाच्यापेक्षा यजमानाचाच थाटशाही होता आम्हाला वाटले होते, आम्ही चार-सहा जणच येथे पाहुणे म्हणून असू पण येथे तर दुसरे छोटेसे अधिवेशनच भरले होते 'होम'ला एखाद्या पंचतारांकित हॉटेलचे स्वरूप आले होते रेयस दांपत्याची आलीशान हवेली, तरुण-तरुणींच्या तारु-ण्याने फुलली होती, सौंदर्याने बहरली होती, उत्साहाने मोहरली होती, सुवासाने दरवळली होती, मधुर स्वरानी धुंद झाली होती!

एक फिलिपिनो गृहस्थी. पण येथे तर सारा पाश्चिमात्य थाटमाट! वेस्टर्न साजशृंगार...युरोपियन मुखवटा!...

मला अभिप्रेत असलेले फिलिपिनो कुटुंब कोठेच दिसले नाही खास फिलिपिनो असे जर काही आढळले असेल तर ते यजमानांचे, रेयससाहेबाचे रंग रूप. नाक डोळे आणि बांधा! यजमानीणबाईंचा मात्र नूर आणि सूर, रंग आणि ढंग सारं काही निराळंच होतं! नावसुद्धा वेगळंच. 'बॉनेट' असे होते असे नाव मी प्रथमच ऐकत होते मि रेयस याची पत्नी बॉनेट, यत्किंचितही फिलिपिनो दिसत नव्हती गोरापान रंग, नितळ कांती, निळे टपोरे डोळे, तरतरीत नासिका, उंच आणि सडपातळ बांधा! वयाने नुक-तीच कुठं पंचविशी गाठली असावी रेयस दांपत्याचे नुकतेच लग्न झाले असावे असे वाटले

मिसेस् बॉनिटच्या चपलख हालचालींनी, आकर्षक हसऱ्या चेहऱ्याने सर्वां-चेच लक्ष वेधले होते गप्पाच्या ओघात मी निःसंकोचपणे बॉनेटला विचारले,

" तुम्ही फिलिपिनो दिसत नाही तुमचा आंतरराष्ट्रीय प्रेमविवाह आहे का ? स्पष्टपणे विचारले म्हणून रागवू नका हं ! "

हा प्रश्न विचारून नकळतपणे मी बॉनेटची स्तुतीच केली होती त्यामुळे ती रागवण्याचा प्रश्नच नव्हता अशा प्रकारचा प्रश्न आपल्याला कोणीतरी विचारावा याचीच जणू काही ती वाट पाहत असावी माझ्या प्रश्नाचे मोठ्या तत्परतेने व आनंदाने बॉनेटने उत्तर दिले,

" तुमच्या अभिप्रायाबद्दल मेनी मेनी थँक्स् ! मी फिलिपिनोच आहे फिलि-पाईन्समध्येच जन्मले व फिलिपाईन्समध्येच वाढले पण मी ही अशी वेगळी दिसते याचे कारण माझे वडील फिलिपिनो असले तरी माझी आई स्पॅनिश आहे मी अगदी माझ्या आईसारखी दिसते "

" तुम्ही खरोखरच सुंदर दिसता ! "

" थँक यू व्हेरी मच ! "

प्रशंसा ऐकून मेहमानांच्यावर यजमानीण बाईसाहेब प्रसन्न ! मि रेयस याना छानपैकी कलमी गुलाब मिळाला होता तर !

बॉनेटने नंतर आपल्या कुटुंबाची ओळख करून दिली मी पुन्हा आश्चर्य-चकित झाले बॉनेटला एक अठरा वर्षाचा सुपुत्र व एक पंधरा वर्षाची सुकन्या होती ! म्हणजे बॉनेट पंचवीस तीस वर्षाची असावी रेयस दाप-त्याचा नुकताच विवाह झाला असावा हा माझा अंदाज साफ चुकला होता एकंदर चेहऱ्यावरून व बांध्यावरून फिलिपिनो लोकांच्या वयाचे अनुमान काढणे अवघडच !

रेयस याच्या बंगल्यातील दिवाणखान्याची रचना अतिशय कलापूर्ण व आकर्षक होती एकेका उंची वस्तूतून त्याचे वैभव व्यक्त होत होते सजावटीतून श्रीमंतीचे ऐश्वर्य डोकावत होते दिवाणखान्याच्या एका कोपऱ्यात, एका मोठ्या कुंडीत उंबरासारखा दिसणारा एक डेरेदार वृक्ष होता त्या वृक्षाने दिवाणखान्याच्या सजावटीला सुशोभित केले होते त्यात नैस-र्गिक सौंदर्याची भर घातली होती इतर उंची शोभेच्या वस्तूपेक्षा त्या वृक्षराजाने माझे लक्ष वेधून घेतले होते तो जपानी प्रकारचा ' बोनसाय ' वृक्ष असेल असे मला वाटले कोणाचे लक्ष नाही असे पाहून मी त्या झाडाच्या पानांना हळूच हात लावला आपण नैसर्गिक नसल्याचे पानाच्या त्या स्पर्शाने मला सांगून टाकले बेमालूमपणे नैसर्गिक दिसणाऱ्या त्या वृक्षाची

पाने नैसर्गिक नव्हती ! .झाडाचा जाडसा बुधा मात्र अगदी नैसर्गिक, जिवत दिसत होता तो वृक्ष नक्की कोणत्या प्रकारचा असावा याबद्दलची उत्सुकता मला आता शात बसू देईना बॉनेटशी आता बऱ्यापैकी परिचय झाला होता म्हणून मी विचारले,

" बॉनेट, मला तुमचा हा वृक्ष फार आवडला याच्यामुळे तुमच्या हॉलला किती शोभा आली आहे ! शिवाय येथे नैसर्गिक, आल्हाददायक शीतलता निर्माण झाली आहे पण हा वृक्ष नैसर्गिक आहे का कृत्रिम हेच मला कळत नाही याचा बुधा सजीव दिसतोय, पण पान मात्र याच्या स्पर्शावरून कृत्रिम वाटतात "

माझ्या या असामान्य सशोधनामुळे, " अय्या खरच का ?" म्हणत बॉनेटच्या सर्व मैत्रिणी त्या झाडाच्या पानांना स्पर्श करून पाहू लागल्या . त्याच्या कोमल स्पर्शाने त्या बेजान पानांना देखील शहारल्यासारखे झाले. बिचारा वृक्ष ! .आणि बिचारी बॉनेट !. माझ्या अती शहाणपणामुळे तिची मोठी नाजूक अवस्था झाली असावी ! क्षणभर गोंधळून तिने आपल्या मत्रिणीकडे पाहिले मग ती हळू आवाजात मला म्हणाली,

" या झाडाचे खोड नैसर्गिक झाडाचे आहे परतु त्याला लावलेल्या फाद्या व पाने मात्र कृत्रिम आहेत "

"अय्या खरच का हे ? याची पाने आर्टिफिशियल आहेत ? आय डोंट बिलिव्ह ! आम्हाला हे माहीतच नव्हते आम्ही याला नॅचरल ट्री च समजत होतो ! रियली वडरफुल ! ब्यूटिफुल !...व्हेरी लव्हली अँड लाइव्हली ट्री !"

त्या वृक्षाच्या कृत्रिमतेचे पितळ माझ्यामुळे उघडे पडले म्हणून बॉनेटने मला मनामधे चक्क दोन-चार शिव्या घातल्या असतील पण तिने ते जाणवू दिले नाही हसत-मुखाने तिने माझीच प्रशसा सुरू केली–

" तू फार चाणाक्ष आहेस इतके दिवस जी गोष्ट माझ्या मैत्रिणीच्या लक्षात आली नाही, ती तू ताबडतोब ओळखलीस " वगैरे .वगैरे माझे कुतुहल, माझी जिज्ञासा आता शमली होती अशाच प्रकारचा एखादा छोटा पण डेरेदार वृक्ष आपल्याही दिवाणखान्यात असावा, तो कोठे विकत मिळेल वगैरे चौकशी बॉनेटकडे करण्याचे मी आधी योजिले होते पण आता मात्र अधिक चौकशी करण्याचा इरादा सोडून दिला बॉनेटची क्षणभर द्विधा झालेली मन स्थिती पाहून आपण भलत्या वेळी, भलत्या स्थळी, भलती चौकशी करायला नको होती ही रुखरुख, स्वत च्या चाणाक्ष बुद्धीची प्रशसा ऐकताना सुद्धा मला लागून राहिली

आपल्या इतर मित्र-मैत्रिणींशी आमचा परिचय करून देऊन रेयस दांपत्य पुढच्या बडदास्तीला लागले त्यांचा मित्रपरिवार उच्च श्रीमंत वर्गातला होता. त्यांच्या चालण, बोलण, वागण, वावरण, प्रत्येक गोष्टीवर अमेरिकन प्रभावाचे वर्चस्व होते मद्यपान व धूम्रपानाच्या पार्श्वभूमीवर गप्पागोष्टींना हास्यकल्लोळाची साथ मिळत होती त्यातील बहुतेक सगळ्या तरुणी फिलिपिनो होत्या पुरुषमंडळीत मात्र काही ऑस्ट्रेलियन तरुणही होते त्यापैकी काही फिलिपाईन्सचे दत्तक पुत्र होते तर काही फिलिपाईन्सचे जामात ! या सर्व जटलमनचा एक जात बनाना शर्टचा 'नॅशनल युनिफॉर्म' होता स्त्रियांचे ड्रेस मात्र विविध रंगाच्या, विविध डिझाईनच्या चमकत्या चायना सिल्क कापडाचे होते या चायना सिल्कने अलीकडे संपूर्ण आशिया खंडाला वेड लावले आहे

माझ्या समोरच्या सोफ्यावर एक फिलिपिनो युवती बसली होती चंद्रकिरणासारखी शांत शीतल प्रभा तिच्या मुखचंद्रावर फाकली होती स्पॅनिश मलाया व चायनीज यांचे संमिश्रण तिच्या गोड गोंडस चेहऱ्यावर जाणवत होते गव्हाळ गोरा रंग, मध्यम उंची, नाक अपर, पण डोळे मात्र टपोरे आणि विलक्षण बोलके, इतके की, तिच्या नाकाचे अपरेपण उठावदार व्हावे त्या बोलक्या डोळ्यात उत्सुकता, अगत्य, जिव्हाळा आणि जिज्ञासा, लिपस्टिकने रंगवलेली लालचुटुक जिवणी, दाट केसांचा बॉयकट, अंगात चॉकलेटी रंगाचा चायना सिल्कचा स्कर्ट-ब्लाऊज, त्यावर रुळणारी गळ्यातील टपोऱ्या मोत्यांची माळ...इतर स्त्रियांप्रमाणे हाताशी किंवा ओठाशी मदिरेचा प्याला नसलेली ती मदिराक्षी माझ्या शेजारी येऊन बसली तिचे नाव होते मर्चिडीस ! ..वा म्हणजे बॉनेट भेटली . मर्चिडीस भेटली. आता डिकी कोठे दिसतेय का ते मी पाहू लागले

माझे काही प्रश्न, मर्चिडीसचे काही प्रश्न, आमच्या औपचारिक गप्पा सुरू असताना, मर्चिडिसने एकदम आपुलकीचा, जिव्हाळ्याचा विषय सुरू केला,

" मनीषा, तुम्ही इंडियन लोक फार लकी आहात, मला तुमचा हेवा वाटतो "

" का बरं ?'

" कारण ज्या देशात भगवान श्रीकृष्णाने जन्म घेतला, त्याच देशात तुम्ही जन्मला आहात !'

एका रंगेल, फॅशनेबल, ख्रिश्चन फिलिपिनो युवतीच्या तोंडून भगवान श्रीकृष्णाचा अनपेक्षित उल्लेख ऐकून मी आश्चर्यचकित होऊन तिच्याकडे

पाहतच राहिले !

हे 'हरे कृष्णा हरे रामा 'च वेड हिने अमेरिकेतून 'इपोर्ट' केले की काय ? का वृंदावनातल्या गोपिकाच्या, 'दे रे कान्हा चोळी लुगडी ' या तगाद्याला कटाळून श्रीकृष्ण भगवान, उन्मत्त, रगेल फिलिपिनो गोपिकांबरोबर रासक्रीडा रमायला येथेही अवतरले आहेत ? नाहीतरी भगवानाच्या लीला अगाधच आहेत !

" पण मर्चिडीस, तुला आमच्या श्रीकृष्णाचे नाव कसे माहीत ? '

" मनिला शहरात, तुमच्या इडियातील ' प्रजापिता ब्रह्माकुमारी ' नावाचे एक सेंटर आहे तेथे काही इडियन सिस्टर्स राहतात त्याना ' बहेनजी ' म्हणतात त्या बहेनजी मला फार आवडतात त्या खूप गोड गोड बोलतात तुमच्या धर्माची माहितीही फार छान सागतात, मला तर अगदी ऐकत रहावेसे वाटते "

" काय ? येथे फिलिपाईन्समध्ये पण ब्रह्मकुमारीचे सेंटर आहे ? तुम्ही फिलिपिनो लोक जाता का तेथे ?"

' येथील ब्रह्मकुमारीचे सेंटर फार छान आहे शात आणि प्रशस्त मी तेथे नेहमी जाते अगदी प्रसन्न वाटते तेथे पुष्कळ फिलिपिनो लोक तेथे नित्य नेमाने जातात तेथे जाऊन मेडिटेशन करायला मला फार आवडते तुम्ही लोक काय बर म्हणता त्याला ?"

" योग .राजयोग !"

" हो हो राजयोग .योग लावून मनाला फार मोठे समाधान मिळते, शांती मिळते तेथे मी तुमच्या भगवान श्रीकृष्णाविषयी खूप ऐकले आहे व वाचलेही आहे भगवान श्रीकृष्ण लवकरच पुन्हा या पृथ्वीवर, इडियातच अवतरणार आहेत, असे सेंटरमधील बहेनजी नेहमी सागतात "

" मग मर्चिडीस, तू त्यांची शिष्या होणार का ?"

" मनीषा, तेच मात्र मला अवघड वाटते कारण त्या बहेनजी ब्रह्मचर्य पाळायला सांगतात, हे माझ्या नवऱ्याला मान्य नाही दुसरे म्हणजे त्या मासाहार पूर्णपणे वर्ज्य करायला सागतात त्यानी शिकवल्याप्रमाणे मद्यपान व धूम्रपान मी बद केले आहे परतु मांसाहार मात्र वर्ज्य करू शकत नाही. त्या बहेनजी म्हणे कधीही 'मीट ' खात नाहीत हे लोक 'मीट न खाता जगतात कसे कुणास ठाऊक ! '

" त्यात काय अवघड आहे ? आम्हीदेखील मांसाला स्पर्श करीत नाही मासच काय पण अडीदेखील आम्ही खात नाही ." हे मी वारवार मर्चिडीसला सागितले तरी तिला खर वाटेना तिचे आश्चर्य कमी होईना...

" रियली ? आय डोंट बिलीव्ह ! "

" मर्चिडीस, हे खरे आहे आम्ही कदापीही मासाहार करीत नाही किंबहुना, आमचा भारत हाच एक जगातील एकमेव देश आहे, की, येथील जवळजवळ पन्नास टक्के लोक शाकाहारी आहेत तुम्ही ख्रिश्चन लोक ईस्टरच्या महिन्यात शक्यतो मासाहार घेत नाही मुस्लिम धर्मीय देखील रमझानच्या महिन्यात मांसाहार पूर्णपणे वर्ज्य करतात बौद्धधर्मीय भिक्षुकावस्थेत असताना मासाहाराला स्पर्श करीत नाहीत परतु आम्ही जैन धर्मीय लोक तर सपूर्ण आयुष्यभर मासाहार त्याज्य समजतो, निषिद्ध मानतो, त्याला चुकूनही स्पर्श करीत नाही "

" वंडरफुल ! माझा विश्वासच बसत नाही ! पण त्यामुळे तुम्हाला अशक्तपणा येत नाही ? तुमचे डॉक्टरसाहेब सुद्धा शाकाहारी आहेत ? "

मांसाहाराव्यतिरिक्त आहारात समाविष्ट करण्यासारख्या, खाण्यासारख्या कितीतरी गोष्टी आहेत शाकाहार देखील माणसाला व्यवस्थित जगवू शकतो, शरीराला भरपूर जीवनसत्त्व देऊ शकतो हे मी मर्चिडीसला नाना प्रकारे समजावून सागण्याचा प्रयत्न केला पण तिच्या चेहऱ्यावरचे आश्चर्य काही कमी होत नव्हते त्या आश्चर्यात आता आमच्याबद्दल आदर आणि कौतुक याचीही भर पडली होती

" तुमच्या देशातील असख्य लोक मांसाहार निषिद्ध समजतात म्हणूनच मला वाटते, ' लॉर्ड श्रीकृष्ण ' तुमच्या भारत देशाच्या धरतीवर अवतरणार असावेत...तुम्ही लोक मांसाहाराला साधा स्पर्शसुद्धा करीत नाहीत मी मात्र दोन महिनेसुद्धा ' मीट ' वर्ज्य करू शकले नाही एकदा मी तसा प्रयत्न केला होता पण त्या वेळी फक्त शाकाहारी पदार्थ खाल्ल्यामुळे माझी प्रकृती बिघडली, शरीरातील व्हिटॅमिन्स कमी झाल्यामुळे खूप अशक्तपणा आला परतु पुन्हा एकदा मी तुमच्याप्रमाणे शुद्ध शाकाहार घेण्याचा अवश्य प्रयत्न करेन "

मनिला शहरात असलेल्या प्रजापिता ब्रह्मकुमारीच्या केंद्रामध्ये, श्रीकृष्ण भगवान, गीता वगैरे विषयावर होत असलेली व्याख्याने व योगसाधना यामुळे ती भलतीच प्रभावित झाली होती

' प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय ' ही सस्था गेली पन्नास वर्षं आध्यात्मिक मार्गाने विश्वपरिवर्तनाचे महान कार्य करीत आहे परदेशामध्ये देखील हा पारमार्थिक ज्ञानाचा मार्ग सध्या लोकप्रिय होऊ लागला आहे या कार्याला जीवन वाहून घेणारे ब्रह्माकुमार व ब्रह्मकुमारी, हिंदू धर्म, हिंदू सस्कृती, भगवद् गीता याचे अत्यत गोड व मधुर वाणीत, सुलभ

सोप्या मार्गाने विवरण करून सांगतात या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाने आधीच सुसमृद्ध असलेल्या भारतीय संस्कृतीमध्ये मोलाची भर घातली आहे, ती म्हणजे सर्व धर्म ऐक्य ! हीच आजच्या क्षणाची निकडीची गरज आहे हिंदू, मुस्लिम, बौद्ध व ख्रिश्चन या धर्मांचा तुलनात्मक अभ्यास करून परमपिता परमेश्वर एकच आहे व तो म्हणजे 'शिव' असून तो निर्गुण निराकार व ज्योतिर्मय आहे, असे प्रतिपादन प्रामुख्याने या ईश्वरीय विश्वविद्यालयामध्ये केले जाते परमेश्वर ज्योतिर्मय आहे व त्याचे हे ज्योतिर्मय स्वरूप सर्वच धर्म मान्य करतात

शिव परमात्म्याशी जिवा-शिवाचा सुसंवाद साधण्याचा एकमेव मार्ग म्हणजे मेडिटेशन योगसाधना राजयोग, असे हा ज्ञानमार्ग सांगतो हा अंतिम आणि सर्वोत्तम मार्ग सर्वच धर्म दर्शवतात आजच्या या अणुयुगात क्षणोक्षणी मृत्यूच्या छायेत वावरणाऱ्या मानवाच्या अस्थिर अस्वस्थ आशंकित मनाला शांती मिळवण्यासाठी योगसाधनेचा मार्ग सहजगत्या स्वीकारावासा वाटतो मूळ गाभा एकच आहे फक्त प्रकटीकरणाचा मार्ग भिन्न आहे मद्यपान, धूम्रपान तसेच हुंडापद्धती, अशा समाज पोखरणाऱ्या, अनिष्ट घातकी समाजशत्रूंना नामोहरम करण्यासाठीदेखील हा ज्ञानमार्ग आध्यात्मिक मार्गाने प्रयत्न करतो

या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाची भारतात व विदेशात मिळून एकदर पंधराशे केन्द्र आहेत सौराष्ट्रातील माउंट अबू येथील शांत निसर्गरम्य परिसरात यांचे 'पांडव भवन' नावाचे प्रमुख केन्द्र आहे या पांडवभवनने आध्यात्मिक ज्ञानाबरोबर येथील प्रेक्षणीय स्थळामध्ये देखील मौलिक भर घातली आहे येथील प्रमुख बहेनजी रोज आपल्या शिष्यांना ईश्वरीय संदेश देतात त्याला 'मुरली' असे म्हणतात अशी मुरली सर्व केन्द्रामधून वाचली जाते माऊंट अबू येथील या प्रमुख केन्द्राला 'मधुबन' असेही म्हणतात

दोन वर्षांपूर्वीच आम्हा पति-पत्नींना माऊंट अबू येथील पांडवभवन या ईश्वरीय विश्वविद्यालयामध्ये तीन दिवसांच्या राजयोग शिबिरात सहभागी होण्याची संधी लाभली होती त्यामुळे प्रजापिता ब्रह्माकुमारीच्या या आध्यात्मिक मार्गाचा थोडासा परिचय घडला होता ते ज्ञान स्मरणात होतेच त्यानंतर इतक्या दिवसांनी फिलिपाईन्ससारख्या परक्या राष्ट्रात एक अनोळखी तरुणी अचानक भेटते, जिची श्रीकृष्णावर श्रद्धा आहे ब्रह्मकुमारीविषयी जिला आस्था आहे, हिंदू धर्माविषयी उत्सुकता आहे, भारतदेशाविषयी जिला आत्मीयताही आहे, अशा वेळी मग ती परकीय अजनबी ललना

आपली जिवाभावाची सखीच होऊन जाते !

'हरे कृष्णचे' वेड मर्चिडीसने इंपोर्ट केले नव्हते तर ! ते तिच्या अंत-करणात श्रद्धेच्या रूपाने फुलले होते ! भक्तीच्या रूपाने बहरले होते ! ज्ञानाच्या रूपाने जोपासले होते !

आमच्या दोघीतील औपचारिकपणा आता नाहीसा झाला होता आमच्या गप्पा चालू असताना मर्चिडीसचे पतिराज मि ज्यून ॲरियो आले ज्यून ॲरियोसारख्या 'जॉली' माणसाला औपचारिक ओळखीपाळखीची आवश्य-कताच नव्हती ते मोकळेपणाने मला म्हणाले,

"आमच्या मर्चिडीसला तुम्ही तुमच्या इंडियात घेऊन जा तिला इंडिया पहायची फार उत्सुकता आहे तसं पाहिलं तर आमचा फिलिपाईन्ससुद्धा फार छान आहे तुम्हाला कसा वाटला आमचा फिलिपाईन्स देश ?"

"सुंदर आहे की फिलिपाईन्स ! तुम्हा फिलिपिनो लोकांचा सौजन्यशील स्वभाव व प्रेमळ आदरातिथ्य पाहून आम्ही खूप भारावून गेलो आहे हे मनिला शहर फार सुरेख आहे येथे वारंवार यावेसे वाटेल आम्हाला !"

"थँक्यू सो मच ! मिसेस शहा, आमच्या या मनिला शहराच्या 'मनिला' या नावाचा देखील एक मनोरंजक इतिहास आहे 'मनिला' हे नाव कसे तयार झाले हे तुम्हाला माहीत आहे का ?"

"माहीत नाही, पण ॲरिओसाहेब, ते आपणाकडून ऐकायला मला आवडेल"

ज्यून ॲरियोसाहेबाना खूप उत्साह आला उत्साहाच्या भरात ते सांगू लागले,

"आमच्या मनिला शहरात 'पासिग' नावाची एक नदी वाहते ती तुम्ही पाहिलीच असेल त्या पासिग नदीमधे एके काळी भरपूर कमळांची फुले फुलत असायची तेव्हा फिलिपिनो लोकांना 'तुम्ही कोठे चालला आहात' असा जर कोणी प्रश्न विचारला तर ते फिलिपिनो भाषेत उत्तर द्यायचे, 'सा माय निलाद !' आमच्या फिलिपिनो भाषेत 'सा' याचा अर्थ— आत 'माय' याचा अर्थ—तेथे व 'निलाद' म्हणजे कमळाची फुले 'सा माय निलाद' म्हणजे 'जेथे कमळाची फुले फुलतात तेथे !' .कमल-पुष्पाच्या शहरात ! स्पॅनिश लोकानी 'सा माय निलाद' या शब्दाचा 'मायनिला' असा, छोटया आणि सोप्या शब्दात अपभ्रंश केला पुढे कालांतराने 'मायनिला'चे मनिला झाले जसे तुमच्या देशाचे 'इंडिया' हे नाव ब्रिटिशांची देणगी आहे, तसे आमच्या या शहाराला मनिला हे नाव स्पॅनिशानी बहाल केले पण मनिलाचे मूळ नाव किती मधुर होते. 'सा माय निलाद..' जेथे कमल-

पुष्पं विकसतात . "

माझ्या मनामधे वेगळ्याच काव्यपक्ती तरगू लागल्या,

'जहाँ डाल डालपर सोनेकी चिडियाँ करती है बसेरा
वो भारत देश है मेरा !'

पण आता एकेकाळच्या या सुवर्ण देशात सोन दुर्मीळ आणि अप्राप्य झाल आहे, तसेच या कमल-पुष्पाच्या देशातील कमल-पुष्पही नाहीशी झालेली दिसतात मी ज्यून ॲरियोंना म्हटल,

'फार छान व्युत्पत्ती आहे मनिला या नावाची ! मनिलामधे एकेकाळी फुलणारी कमळाची फुले आम्हाला आज पहायला मिळाली असती तर आम्हाला फार आनद झाला असता मनिलातील ते 'निलाद', कमलपुष्प मला वाटते आता पासिग नदीऐवजी येथील फिलिपिनो तरुणींच्या नयनात उमलली आहेत तुमच्या पत्नीचे, मर्चिडीसचे डोळेदेखील कमळासारखे सुदर आहेत !'

माझा हा उपमालकार ॲरियो दापत्याला कितपत समजला कुणास ठाऊक, पण कमलनयनी मर्चिडीस मात्र खुष झाली

बॉनेट रेयसच्या येथे जमलेल्या सर्व मैत्रिणी श्रीमत वर्गातील होत्या आर्थिकदृष्टचा आवश्यकता नव्हती तरी, आयुष्याला 'डलनेस' येऊ नये म्हणून त्यांतील प्रत्येकजण काहींना काही व्यवसाय किंवा नोकरी करीत होती एकजण देखील माझ्याप्रमाणे फक्त चूल आणि मूल यामध्ये गुरफटली नव्हती मी एल्‌एल् बी असून देखील काहीही करीत नाही याचेच सर्वांना आश्चर्य वाटत होते माझ्या निष्क्रीयतेबद्दल त्यांना वाटलेले आश्चर्य पाहून मी मात्र मनामधे माझ्या 'डल' आयुष्याबद्दल खजील झाले होते येथील स्त्रियाचे वाहत्या निर्झरासारखे उत्साही मनमोकळे जीवन पाहून मला माझ्या आळशीपणाची निरोद्योगीपणाची लाज वाटू लागली होती ..मी म्हणजे अशा हजारो लाखो भारतीय स्त्रिया. .

या निष्क्रीयतेला कारण मी स्वत का सर्वच स्त्री जात ?

माझ्या सपर्कातील पुरुष, का समस्त पुरुष वर्ग ?

आपली समाजरचना का सस्कृती ? का सस्कृतीच्या गोडस बुरख्याखालचे सस्कृतीचे अवडबर ! समस्या फार गहन आहे, उत्तर फार जटिल आहे ! पण कुणाच्या ना कुणाच्या तरी स्त्रीविषयीच्या अपेक्षेने तिचे भरारी मारणारे आकाक्षारूपी पख छाटले जातात. .सामर्थ्य असले तरी तिच्या पायातील बळ नष्ट केले जाते पर्यायाने समाजाचे अर्धांगच विकलाग केले जाते .

'मॅडम, तुम्हाला कोणत ड्रिंक हवय ?" या प्रश्नाने माझी विचारमालिका

तुटली

एनी सॉफ्ट ड्रिंक "

मर्चिडीसने सर्व मित्रमैत्रिणींप्रमाणे मादक मद्याचा प्याला न घेता,माझ्या-बरोबर पाचक लिंबू सरबताचा ग्लास उचलला पाठोपाठ दुसऱ्या माणसाने सुक्या मेव्याचा ट्रे आमच्यापुढे पेश केला काजू, बदाम, मनुके, किसमिस, सुकी अंजिरे व लाल स्ट्रॉबेरीसारखी काही सुकी फळे वगैरे डकडच्या काही वैशिष्टयपूर्ण पदार्थांचा मांसाहारी असल्यामुळे आपण आस्वाद घेऊ शकत नाही, निदान ही वेगवेगळी सुकी फळ तरी चाखून पाहू या, या विचाराने दोन-चार काजूबरोबर मी लाल रंगाच्या, स्ट्रॉबेरीसारख्या सुक्या फळाचा एक तुकडा उचलला व तोंडात टाकताना अगदी सहजगत्या मर्चि-डीसला चेष्टेच्या स्वरात विचारले,

" मर्चिडीस, ही सर्व ड्रायफ्रूटस् शाकाहारीच आहेत ना ?"

तो लाल सुक्या फळाचा छोटासा तुकडा नुकताच माझ्या जिभेवर विसावला होता तोच मर्चिडीस घाईघाईने मला म्हणाली,

" नो . नो. मनीषा, तू ते खाऊ नकोस ..दॅट इज नॉट फॉर यू ..ते तं पिगच्या मांसापासून बनवले आहे !"

वीजेचा शॉक बसल्यासारखी मी नखशिखात शहारले सारी लाज-शरम सोडून मी तो जिभेवरचा लाल तुकडा पटकन हातात काढून घेतला माझी गोंधळलेली अवस्था पाहून मर्चिडीसने एक रिकामी बशी माझ्या पुढ्यात ठेवली मला बाटवू पाहणारा तो डुकराच्या मांसाचा तुकडा मी बशीत ठेवून दिला आता जर मर्चिडीस जवळ नसती तर न कळत का होईना अभक्ष्य भक्षण झाले असते ! मी मर्चिडीसचे पुन:पुन्हा आभार मानले स्वत:ला माखरेत घोळवून ड्रायफ्रूटसमधेदेखील मानाने मिरवणाऱ्या या पिगच्या मांसाच्या तुकड्याला काय म्हणावे ! त्या आकर्षक फसव्या पदार्थाची चव सुद्धा कळाली नव्हती तरी तोंड अपवित्र झाल्यासारखे वाटले टॉयलेटमधे जाऊन अनेक वेळा चुळा भरून आले तरी नॉशिआ काही केल्या जाईना मर्चिडीसच्या सामंजस्यामुळे ही गोष्ट तेव्हा दुसऱ्या कोणालाही कळली नाही दुसरी कोणी तिच्याजागी असती तर अनेक आश्चर्यचकित उद्‌गारवाचकानी माझ्या फजितीचा तत्काल ऊहापोह झाला असता ही गोष्ट माझ्या पतीला देखील तेव्हा कळाली नाही नाहीतर कोणत्याही जैनधर्मीय व्यक्तीला हे जरा धर्मबाह्यच वाटायचे !

बॉनेटच्या विनतीप्रमाणे आम्ही सर्वजण त्याच्या बगल्याच्या मागील विस्तीर्ण बगीच्यामध्ये गेलो चारी बाजूला दाट उच वृक्षराजी व त्याच्या

पायथ्याशी शोभेच्या व फुलाच्या झाडांचे ताटवे होते ही सर्व वृक्षराजी मात्र नैसर्गिक आणि सजीव आहे याची साक्ष हालचालींच्या तालसूराने व गधानेच देऊन टाकली मध्यभागी निळ्याशार स्वच्छ पाण्याचा सुबक आकाराचा पोहण्याचा तलाव होता त्याच्या तीन काठावर जागोजागी टेबलखुर्च्या माडलेल्या होता व चौथ्या काठावर एक छोटासा मडप बाध-लेला होता तेथे डिनरचे सर्व पदार्थ ओळीने माडून ठेवले होते होम हॉस्पि-टॅलिटीचा फॉर्म भरताना आम्ही आमच्या नावापुढे 'शाकाहारी' ही माहिती भरून आमच्या शाकाहारी आहाराविषयी पूर्वसूचना दिली होती त्यामुळे आज बरेच दिवसानी चविष्ट जेवण मिळणार, फिलिपिनो लोकाचे काही वैशिष्ट्यपूर्ण पदार्थ चाखायला मिळणार या कल्पनेने भूक चागलीच प्रज्व-लित झाली होती त्या 'शाहीखान्याचे' आकर्षक प्रलोभन इद्रियाना उत्तेजित करीत होते

बगीच्यामध्ये जरा इधरउधर करून झाल्यानतर यजमानांनी आम्हाला 'डेलिशस डिनर' घेण्याची विनती केली आपापल्या डिशेस घेऊन आम्ही मडपामध्ये गेलो समोर जवळजवळ तीस-चाळीस प्रकारचे पदार्थ माडून ठेवले होते नाठाळ जिव्हेला ते आव्हानात्मक प्रलोभन खुणवत होते त्या विविध पदार्थांचे रगरूप तर आकर्षक होतेच, पण त्यांचा मधुर खमग स्वाद रसनेची उत्कठा वाढवू लागला होता

लोकानी वाढून घ्यायला सुरुवात केली दुधाने तोड भाजल्यामुळे मी मात्र आता ताकदेखील फुकून प्यायचे ठरवले होते वाढून घेण्यापूर्वी काय काय पदार्थ आहेत हे आधी पाहावे म्हणून मी तशीच पुढे सरकत राहिले साधारण दहा-बारा फूट अतर चालताच मी एकदम थबकले, जागच्या जागीच खिळले समोर एका भल्या मोठ्या नक्षीच्या तबकात एक पाढरे डुक्कर आख्खेच्या आख्खे शिजवून ठेवले होते ते कोवळे लुसलुशीत डुक्कर बिचारे आ वासून पडले होते जणू काही ते म्हणत होते

"हे अधाशी मनुष्यप्राण्या, खा. . मला खा आणि शमव तुझी राक्षसी भूक!"

आणि खरोखरच लोकानी त्या डुकराचे मास सुरीने हवे तसे कापून आपापल्या डिशेसमध्ये वाढून घेण्यास सुरुवात केली त्या सर्व लोकामध्ये मि बिनधास्तची स्वारी अग्रगण्य होती मनुष्यप्राण्याची क्षुधा शमवण्यासाठी स्वत चे प्राणार्पण करून, आ वासून पडलेल्या त्या निष्पाप देहाचा एकेक तुकडा कमी होऊ लागला त्या दृश्याकडे क्षणभर मीदेखील आश्चर्याने आ वासून पाहू लागले' आपल्याकडे खाटकाच्या दुकानात मेलेले बकरू

कापून टांगलेले रस्त्याने जाता-येता केव्हातरी पाहिले होते पण असे दृश्य मी आतापर्यंत कधीच पाहिले नव्हते कांदा-लसूणदेखील वर्ज्य समजणाऱ्या आमच्या जैनधर्मीय प्रवृत्तीला व दृष्टीला ते दृश्य पाहून भोवळ आल्यासारखी वाटली त्या 'डेलिशस डिनर' . 'शाही दावत 'वरची आमची वासनाच उडाली

"मिस्टर अँड मिसेस शहा, तुम्ही अजून काहीच का वाढून घेतलं नाही? तुमच्या डिशेस रिकाम्याच आहेत मी सर्व्ह करू का तुम्हाला?"

बॉनेटच्या प्रश्नाने मी भानावर आले

"नो, थँक्यू व्हेरी मच!" तिने आपुलकीने केलेल्या चौकशीबद्दल तिचे आभार मानून, सारी भीड बाजूला सारून मी बॉनेटला सरळ सरळ विचारले,

"तुम्ही डिनर फार सुंदर आकर्षक पद्धतीने सजवले आहे पदार्थदेखील भरपूर केले आहेत बॉनेट, तू एक कुशल गृहिणी आहेस! पण एक शंका विचारते, हे सर्व पदार्थ नॉन-व्हेज आहेत का व्हेजिटेरियन आहेत? आम्ही दोघेही मांसाहारी पदार्थ खात नाही म्हणून विचारते"

"ओ माय गॉड! तुम्ही 'मीट' खात नाही? मग तुम्ही कशावर जगता? रियली वंडरफुल! तुम्हाला मांस चालत नाही ना? ओके, मग तुम्ही हे पदार्थ घ्या, हे फक्त मासे व अंडी यापासून बनवले आहेत, यात मांस नाही"

असे म्हणत चार पदार्थांकडे बॉनेटने अंगुलीनिर्देश केला

प्रत्यक्ष डुकराचे वगैरे मांस नसलेले पण मासे किंवा अंडी घातलेले पदार्थ म्हणजे शुद्ध शाकाहारी पदार्थ अशी बॉनेटची व्याख्या होती तर!

इतका वेळ अदृश्य झालेली मर्चिडीस, आमचा शाकाहारी पदार्थांचा धावा ऐकून मोठ्या लगबगीने आमच्याकडे आली

"नो नो बॉनेट! हे पदार्थसुद्धा त्यांना चालणार नाहीत हे मासे व अंडीसुद्धा खात नाहीत!"

"ओ गॉड! व्हेरी व्हेरी सॉरी! मला हे माहीत नव्हते पण थांबा हं, मी माझ्या कुकला तुमच्यासाठी दुसरं काहीतरी करायला सांगते"

पण डॉक्टरांनी तिला थांबवले,

"नो, थँक यू तुम्ही आमच्यासाठी काहीही करायला सांगू नका वास्तविक आम्हाला मुळीसुद्धा भूक नाही फार तर आम्ही फक्त कॉफी घेऊ"

"ओ के मी तुमच्यासाठी कॉफी आणि फ्रूटस् आणायला सांगते"

बॉनेट पुन्हा जथ्यात दिसेनाशी झाली सर्वजण मोठ्या उत्साहाने, चवीने

जेवू लागले मी आणि माझे पती, दोघेजण मात्र एका टेबलाजवळ शांतपणे कॉफीची वाट पाहत बसलो जी गोष्ट फक्त मर्चिडीसला माहीत होती ती आता साऱ्या महफिलीला माहीत झाली

"तुम्ही कधीच 'मीट' खात नाही?"

"आश्चर्य आहे! पण मासाशिवाय तुम्ही जगू कसे शकता?"

"तुमच्या शरीराला योग्य ती व्हिटॅमिन्स कशी मिळतात?"

"मासाहार न घेतल्यामुळे तुम्हाला वीकनेस जाणवत नाही का?"

अनेक आश्चर्योद्‌गारानी सारा आसमंत भरून गेला या उद्‌गारांची सवय झाल्याने आता आम्हाला अवघडल्यासारखे वाटले नाही

मि बिनधास्त अनेक पदार्थांनी भरलेली डिश घेऊन मुद्दाम आमच्या टेबलावर येऊन बसले इतर परदेशी लोकांच्या आश्चर्योद्‌गारात त्यानीही आपल्या उद्‌गाराची शांतपणे भर घातली

"व्हॉट ए पिटी! मॅन मेड प्रॉब्लेम' रहा उपाशी"

भूक प्रज्वलित करून, रसनेला आव्हान देऊन आमच्या 'मॅन मेड प्रॉब्लेम' ने आम्हाला असे भरल्या ताटावरून उठवले होते यजमानाना, त्यांच्या इतर पाहुण्याना व आमच्या मि बिनधास्तनाही आमची कीव वाटत होती, पण त्याना काय ठाऊक आम्हीदेखील त्यांची कीव करीत होतो! पण काय करणार? इथेही मॅन मेड प्रॉब्लेमच!

आमच्या तोंडाला पाणी सुटावे किंवा आमच्या काही तत्त्वाची खिल्ली उडवावी या हेतूने मि बिनधास्तने आमच्यासमोर वसून मिटक्या मारीत अनेक पदार्थांचा समाचार घ्यायला सुरुवात केली होती, मधे मधे त्याचे व्हिस्की पानही चालू होते

"काय स्वादिष्ट पदार्थ आहेत एकेक! डॉक्टरसाहेब, नमुना तरी पहा!"

"मि बिनधास्त, हिंदूधर्मात, इतकेच नव्हे तर मुस्लिम धर्मातदेखील डुकराचे मास निषिद्ध समजतात फक्त ख्रिश्चन समाजामधे त्याला मान्यता आहे तुम्ही तर उच्चवर्णीय हिंदू आहात मग हे पिगचे मास तुम्हाला कसे चालते?"

माझा प्रश्न ऐकून मि- बिनधास्तनी कपाळावरच हात मारून घेतला

"अहो वहिनी, पिग नव्हे, पोर्क म्हणा पोर्क!"

"डुकराला पिग न म्हणता पोर्क म्हटले म्हणजे ते शुद्ध होते का? शब्द बदलला की प्राणी बदलतो का?"

"तुम्ही लोक स्वतःही उपाशी राहणार आणि आम्हालाही चवीने जेवू देणार नाही'

तेवढ्यात आमच्यासमोर केळी, अननस, पपई आणि आबा या फळाचे काप ठेवले गेले चांदीच्या टी सेटमध्ये कॉफीही हाजीर झाली

" अरेरे काय हे अभक्ष्य भक्षण करताय ! डिनरची सगळी मजा घालवली तुम्ही मी आपला दुसरीकडेच कोठेतरी जाऊन बसतो झाल " असे वैतागाने म्हणत, आपली डिश उचलून मि बिनधास्त उठले हा कलियुगीन कृष्ण चार-पाच फिलिपिनो गवळणीच्या घोळक्यात जाऊन बसला !

कॉफी घेताना माझे मन मर्चिडीस आणि मि बिनधास्त यांची तुलना करू लागले मि बिनधास्तच्या पार्श्वभूमीवर मर्चिडीसची प्रतिमा अधिक उजळ होऊ लागली ।

शेवटी अमेरिकन गीत सगीताने महफिल रगली आम्हाला मात्र आता यजमानाचा निरोप घ्यावासा वाटू लागले यजमानाचा निरोप घेतेवेळी सौ अजलीताईने बॉनेटला, सोलापूरचे वैशिष्ट्य असलेले लाखेचे ककण भेट म्हणून दिले तिच्या कपाळावर लाल रगाची टिकली लावली कालच्या ज्युली फर्नांडिसच्या टिकली प्रकरणामुळे, आजच्या हळदीकुकू समारभाचे वेळी मी जरा अलिप्तच राहिले. बॉनेटची प्रतिक्रिया मात्र ज्युलीपेक्षा एकदम वेगळी झाली बॉनेटला कपाळावरची टिकली फार आवडली ककण देखील तिने लगेच घालून आपले सुशोभित हात सर्वांना कौतुकाने दाखवले ज्युली अविवाहित होती, विवाहाला इच्छुक नव्हती बॉनेट विवाहित होती आपल्या ससारात तृप्त होती विवाहित बॉनेटला सौभाग्याचे अहेव लेण भावणारच !

मर्चिडिस गाडीतून हॉटेलवर परतताना डोळ्यापुढे येत होते ते स्वत च्या प्राणाचे बलिदान करून आ वासून पडलेले ते मूक निष्पाप, गोंडस पिग !

अडी व मासे याना शाकाहारी समजणारी यौवनलतिका बॉनेट ! " तुमचा इडिया देश मला फार आवडतो तुमच्याप्रमाणे मी देखील मासाहार वर्ज्य करण्याचा प्रयत्न जरूर करेन ! " असे आश्वासन देणारी, मद्यपान, धूम्रपानाचा त्याग करणारी, 'राजयोग' करणारी, 'लॉर्ड श्रीकृष्णा'-वर श्रद्धा ठेवणारी, एक ख्रिश्चन धर्मीय फिलिपिनो युवती, कमलाक्षी मर्चिडीस !

हॉटेलवर परतल्यानतर, कोणाच्या यजमानाकडे काय झाले, कोणी जेवणासाठी काय ठेवले, कोणी कोणता कार्यक्रम सादर केला वगैरे चर्चा व तुलनात्मक अभ्यास आमच्या सहकाऱ्यांत सुरू झाला एक सहप्रवासी म्हणाले,

" आमच्याकडे पार्टीनतर वेस्टर्न पद्धतीचे डान्स झाले "

" आमच्याकडे पाहुण्याच्या मनोरंजनार्थ कॅबरे डान्स ठेवला होता ती फिलिपिनो डान्सर काय नाचली म्हणता !"

" बिनधास्त, तुमच्या यजमानाकडे काय काय झाले ?"

कॅबरे डान्स वगैरे ऐकून, फिलिपाईन्स प्लाझा हॉटेलात न जाता, मि. रेयसच्या घरी जाऊन आपण झक मारली असेच मि बिनधास्तला वाटले पश्चात्तापदग्ध सुरात ते म्हणाले,

" आमच्या यजमानांच्या घरी झाला ना.. बांगड्या भरण्याचा व हळदी कुंकवाचा सोवळा कार्यक्रम !"

आठ

# वॅरियो फियेस्टा....

'सा माय निलाद'...' जेथे कमल पुष्पाचे ताटवेच्या ताटवे फुलतात त्या मनिला शहरात आम्ही चाललोय ' असे मोठ्या अभिमानाने सांगणाऱ्या फिलिपिनोंवर आज, ' कोणत्याही क्षणी जेथे बाँब स्फोटामुळे अग्निफुले फुलण्याची शक्यता आहे त्या मनिला शहरात,' असे सांगण्याची वेळ आली आहे एके काळी जेथे कमलिनी बहरत होत्या तेथे आता धगधगते अंगार फुलण्याची शक्यता होती. संघर्षाच्या ठिणग्या उडत होत्या

पासिग नदी मोठ्या विश्वासाने ज्या सागरामध्ये समर्पित होत होती त्याच सागराने तिच्या कुशीत राहणाऱ्या, अंगाखांद्यावर वाढलेल्या लेकरांना चक्रीय वादळ प्रदान केली होती सागराने सरितेच्या विश्वासाला तडा दिला होता

मानवी क्रोध व निसर्ग कोप दोन्ही हातात हात घालून रुद्र नाट्य करण्याच्या पवित्र्यात होते!

आज मनिलाच्या वास्तव्यातील शेवटचा दिवस आणि शेवटची रात्र! सुदैवाने आतापर्यंत आमचा बालही बाका झाला नव्हता भीतीचे बादल दूर झाले होते तरीही मनाचे आकाश पूर्णपणे निरभ्र झाले नव्हते

' पीस थ्रू लव्ह ' प्रेममार्गाने शांतता, हा अधिवेशनाच्या आजच्या दिवसाचा प्रमुख विषय आजच्या सन्माननीय प्रमुख पाहुण्या म्हणजे मदर टेरेसा मूर्तिमत प्रेम म्हणजे मदर टेरेसा! मूर्तिमत सेवाभाव म्हणजे मदर

टेरेसा ! मदर टेरेसा म्हणजे शांतीचे प्रतीक ! सदिच्छाचे, सद्भावनेचे सदाचरणाचे प्रतीक ! मदर या शब्दातच सर्व काही आले

ठीक अकरा वाजता सर्वांच्या नजरा मागे वळल्या मदर टेरेसा या धीर-गंभीर, उदात्त, विशाल, प्रेमळ व्यक्तिमत्त्वाने गंभीर पावले टाकत सभागृहा-



मध्ये प्रवेश केला मदर टेरेसा .विश्वाची विशाल माता, जगत्जननी ! नोबेल पारितोषिक विजेत्या ! 'लिव्हिंग सेंट' म्हणून सारे जग आज याच्याकडे मोठ्या आदराने पाहत आहे

मनिलामध्ये आजकाल राजकीय अराजक माजले होते विरोधी पक्षाच्या विध्वसक धमक्यामुळे व कृतीमुळे देशाच्या राष्ट्राध्यक्षाला सुद्धा सार्वजनिक ठिकाणी जाणे मुष्किल झाले होते अशा अस्थिर, अशांत, अराजक पार्श्व-भूमीवर मदर टेरेसासारख्या शातिदूताचे, प्रेममूर्तीचे आगमन अत्यत प्रभाव-शाली वाटले विनाशाच्या वातावरणात, विध्वसाच्या छायेत ही लहान मूर्ती प्रेममय शातीचा महान विधायक सदेश घेऊन आली होती

सभागृहामधे मदर टेरेसाचे पदार्पण होताच आम्ही सर्व सभासद भारल्या-सारखे आज्ञाधारकपणे उभे राहिलो त्या उदात्त व्यक्तिमत्त्वामुळे सर्वांची मस्तक नकळत झुकली मदर टेरेसा भारदस्त चालीने पुढे गेल्या वयाची सत्तरी उलटली तरी प्रकृती काटक, उत्साह अपूर्व, आत्मविश्वास जबर-दस्त !

येथे जरब नव्हती, दिलासा होता धमकी नव्हती, प्रेमळ आश्वासन होते दरारा नव्हता, नम्रता होती अगारे नव्हते, शीतलता होती भय नव्हते, शाती-समाधान होते सघर्ष नव्हता, सलोखा होता !

मदर टेरेसा स्थानापन्न होताच चाहत्यांनी त्याच्याभोवती गर्दी केली. मी व माझे पती हिरालाल दोघेही तेवढ्या गर्दीत जाऊन मदर टेरेसाना प्रणाम करून आलो त्यांनाही आम्ही गजाननाची प्रतिमा भेट दिली त्या भेटीच्या मोबदल्यात मदर टेरेसांच्या प्रसन्न मुखमडलावर फुललेले स्मित, फाकलेली प्रभा आम्ही आस्थेने अत करणात साठवून ठेवली त्यांच्याशी हस्तादोलन करताना त्यांच्या गोऱ्यापान मऊ गुबगुबीत शीतल हस्तस्पर्शातून संदेश लहरी माझ्या शरीरात शिरशिरल्या, या आभासामुळे माझ्या देहात अनामिक सवेदना निर्माण झाली, अत्यानदाने हृदयाची स्पदने वाढली. शातपणे मी माझ्या आसनावर येऊन बसले फार मोठा दिलासा, मूक आश्वासन घेऊन !

त्या सदेश लहरी, ते मूक आश्वासन आता शब्दरूपी निर्झर होऊन मदर टेरेसाच्या वाणीच्या रूपाने वाहू लागले शब्दाशब्दातून चादण शिपू लागल प्रेमभावनाच्या जलधाराचा वर्षाव होऊ लागला

या विशाल मातेने आपल्या भाषणाची सुरुवातच महात्मा गाधीजींना आदराजली वाहून केली एक परदेशीय, परधर्मीय महिला महात्मा गांधीना प्रेषित मानून त्यांच्या उपदेशाने प्रेरित झाली आहे ती उदार महिला आज

विशाल जगत्जननी होऊन महात्मा गांधींचा व येशू ख्रिस्ताचा महान उपदेश सक्रीय अमलात आणीत आहे भारतासारख्या परदेशातील गोरगरिबासाठी, उपेक्षितासाठी, गरजूसाठी तिने आपले सर्वस्व वाहिले आहे पच्याहत्तर वर्षांची ही महिला आजदेखील दिवसातील अठरा तास उपेक्षिताची, दु:खिताची निरपेक्ष सेवा करण्यात घालवू शकते, कारण कधीही न आटणारा प्रेमभावनेचा निर्झर तिच्या अंत:करणात उत्स्फूर्तपणे वाहत आहे कलकत्ता शहरातील एका आश्रमात या जगन्मातेने अशा काही निराश्रित उपेक्षित पन्नास हजार वृद्ध लोकांना सप्रेम, सादर आश्रय दिला आहे की, ज्या वृद्धाच्या शिरावर कोणाच्याही आधाराचे छत्र नव्हते, ज्याना मरायला देखील अंथरूण नव्हते । बालकापासून वृद्धापर्यंत असे या मातेचे विश्वव्यापक कार्य आहे । त्या कार्याच्या महतीला नोबेल पारितोषिक हा सन्मान देखील थिटा आहे ! मदर टेरेसा म्हणजे लोखंडाचं सोनं करणारं परीस आहे ।

श्रोत्याना मंत्रमुग्ध करून टाकणारी, मदर टेरेसाची वाणी सुरू झाली—

"परमेश्वराने मनुष्यजातीची सेवा करायला पृथ्वीवर पाठवलेले दोन प्रेषित म्हणजे महात्मा गांधी व येशू ख्रिस्त । येशू ख्रिस्ताने आपल्या शेजाऱ्यावर प्रेम करायला शिकवले तर महात्मा गांधींनी शत्रूवर देखील प्रेम करायला शिकवले महात्मा गांधी म्हणाले होते,

'जो रंजल्यागांजल्याची सेवा करतो तो ईश्वराची सेवा करतो
जो गोरगरिबावर प्रेम करतो, तो ईश्वरावर प्रेम करतो !'

"प्रत्येकाने आपल्या अंत:करणातील परमेश्वराला ओळखायला शिकले पाहिजे एकमेकाच्या सुखदु:खात सहभागी झाल्यानंतर ईश्वरी प्रेमाचा साक्षात्कार घडतो त्या ईश्वराचे जगावर एवढे अपार प्रेम आहे की त्याने आपल्या लाडक्या पुत्रालाच, येशूला या जगाच्या कल्याणासाठी अर्पित केले

"सध्या जगातील उपेक्षिताची भूक फक्त भाकरीची नाही, तर प्रेमाची, आपुलकीची, जिव्हाळ्याची आहे उपेक्षिताच्या अंत:करणातील ती प्रेमाची भूक त्याची आपुलकीची अपेक्षा तुम्ही पूर्ण करा अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक गरजाबरोबर जगाला तुमच्या हृदयातील प्रेमगंगेचीही तितकीच आवश्यकता आहे त्यासाठी तुम्ही सक्रीय कार्य केले पाहिजे ज्याच्या डोक्यावर छत्र नसते तेच लोक बेघर नसतात, तर ज्याना समाजात केवळ उपेक्षा आणि अवहेलनाच प्राप्त होते, ज्याना आपले म्हणणारे कोणी नसते, तेच लोक खऱ्या अर्थाने बेघर असतात, तेच खऱ्या अर्थाने उपाशी असतात, तेच खऱ्या अर्थाने वस्त्रहीन असतात नग्नता म्हणजे केवळ वस्त्राचा अभाव नव्हे,

तर माणुसकीचा अभाव !"

मायेच्या, ममतेच्या ऊबदार स्पर्शासाठी काही दुर्दैवी जीव कसे आसुसलेले असतात याचा टेरेसानी एक स्वानुभव सांगितला लंडन शहरामधे मदर टेरेसांना एक अशक्त दुबळा वृद्ध भिकारी थंडीमधे कुडकुडत असताना दिसला त्याला पाहून या प्रेमळ मातेच्या अंतःकरणात जिव्हाळ्याची मायेची ऊब निर्माण झाली मदर टेरेसानी त्या भिकाऱ्यास तावडतोब आवश्यक ती मदत देऊ केली त्याच्या कुडकुडत्या कृश शरीरावर आपल्या अंगावरची गरम शाल पांघरली, व जाताना त्याच्याकडे सुहास्य नजरेने पाहून त्याच्या-बरोबर शेकहॅन्ड केले त्या प्रेमळ हस्तांदोलनामुळे तो भिकारी अत्यानंदाने सद्गदित होऊन त्यांना म्हणाला,

'कितीतरी दिवसांनी मला आज मानवी स्पर्शाची ऊब मिळाली !'

निराश्रितांना आधार देऊन, उपेक्षितांना प्रेम देऊन, जगण्याच्या आशा-अपेक्षा त्यांच्या वठलेल्या मनामधे पल्लवित करण्याची, जगण्याची उमेद, इच्छाशक्ती निर्माण करण्याची ताकद या परीसस्पर्शामधे आहे !

एवढ्या प्रचंड सभागृहातील हजारो श्रोते संमोहित होऊन मदर टेरेसांची अमृतवाणी श्रवण करीत होते,

"माझ्या प्रिय रोटेरियन बंधू-भगिनींनो, तुमच्या रोटरी विश्वाचे या वर्षीचे ध्येयवाक्य आहे, 'सेवेची नित्य नवी क्षितिजे शोधून काढा' मानव-तेच्या दृष्टीने केवढा महान संदेश आहे हा ! तुमच्या या आशियाई अधिवेशनाचे ब्रीद आहे 'ऐक्य ! त्या दृष्टीने गरजू, उपेक्षित लोकांचे क्षेत्र हे तुम्हा-आम्हाला फार मोठे सेवाकार्य करण्याचे आव्हान आहे उपेक्षितांच्या अपेक्षा सफल करा प्रेम करून घेण्याचा आनंद त्यांना मिळवून द्या त्याच्या कितीतरी अधिक पटींनी प्रेम करण्याचा आनंद तुम्हाला प्राप्त होईल !"

"किती तरी कळ्या उमलण्यापूर्वी खुडल्या जातात, त्याचप्रमाणे असंख्य निष्पाप बालकांची जन्मण्यापूर्वीच निर्घृण हत्या केली जाते मातेच्या कुशीतच त्यांचे जीवन संपवले जाते कुमारी व माता त्या नाकारत असलेल्या, स्वतःच्या उदरातील निष्पाप जीवांचा जन्म घेण्याचा व जगण्याचा हक्क ही देखील ज्वलंत समस्या आहे ईश्वराने बायबलमध्ये सांगितले आहे, 'स्वतः आई जरी आपल्या मुलाला विसरत असेल, तरी पण मी त्याला विसरू शकत नाही' तरीही अशी हजारो बालकं, कळी उमलण्यापूर्वीच खुडली जातात याला कारण समाजाकडून मिळत असलेली उपेक्षा आणि अवहेलना अशा उपेक्षित स्त्रियांना मानाने राहण्याचा व अशा बालकांना ताठ मानेने आनं-दाने जगण्याचा अधिकार आपण प्राप्त करून दिला पाहिजे." हेही मदर

टेरेसांनी आवर्जून सांगितले

आपल्या हळू क्षीण तरीही मृदु गंभीर आणि प्रभावी आवाजात मदर टेरेसा बोलत होत्या त्या आवाजाला एक प्रकारची धार होती वाणीला ओघ होता त्या भव्य सभागृहात कमालीची शांतता पसरली होती ते भारदस्त वक्तृत्व, तो शब्द न् शब्द प्रत्येकजण मंत्रमुग्ध होऊन ऐकत होता

"पालकांनी आपल्या सर्व मुलांना एकत्र घेऊन ईश्वराची प्रार्थना करायला शिकवलं पाहिजे ज्या घरामध्ये सर्वजण एकत्र येऊन अशी सामुदायिक प्रार्थना करतात, त्याच घरातील लोक सुखासमाधानाने एकत्र राहू शकतात त्याच घरामध्ये शानता नांदू शकते घराघरातून अशी शांतता निर्माण झाली तरच साऱ्या दुनियेत शांततेचे साम्राज्य निर्माण होऊ शकेल।"

मदर टेरेसांची ती मधुर अमृतवाणी प्रेमपूर्वक दिलासा देऊन गेली, जणू काही अमृतमय अभयदान। सेवेचे कंकण हाती बांधलेल्या कार्यकर्त्यांना ती एक प्रेरणाच होती।

शांतिदूत, सेवा प्रेमाच्या प्रेषिता, जगतमाता मदर टेरेसा बोलायच्या थांबल्या, तरी आम्ही सर्वजण मंत्रमुग्ध, स्तब्ध, अंतर्मुख झालेले होतो संदेश देण्याचे, प्रेरित करण्याचे, स्फुल्लिंग फुलवण्याचे, ठसा उमटवण्याचे कार्य संपताच, ही अनासक्त, निर्मोही, निरपेक्ष, विशाल माता सभागृह सोडून जायला निघाली पुनश्च आम्ही सर्वजण मंतरल्यासारखे आदराने उभे राहिलो जाता जाता मदर टेरेसांनी कृतज्ञ भावनेने स्वतःचे शिर झुकवून आमच्या श्रद्धापूर्ण अभिवादनाचा स्वीकार केला

त्या संमोहित व्यक्तिमत्त्वाचा, आदर्श कार्याचा, उदार अंतःकरणाचा प्रभाव दीर्घकाळ राहील असाच होता।

मदहोश जल्वा! एक महफिल संगीतनृत्यमय जलसा सुनहरी शाम। शेवट गोड असेल तर सर्व काही गोड। निरोपसमारंभापूर्वीचा व अधिवेशनातील अंतिम कार्यक्रम मनोरंजन बॅरियो फियेस्टा। हा कार्यक्रम फोक आर्ट थिएटरमध्ये होता हे फोक आर्ट थिएटर म्हणजे एक कलापूर्ण भव्य इमारत आश्चर्य म्हणजे ही एवढी भव्य इमारत फक्त सत्याहत्तर दिवसांत, अडीच महिन्यात बांधून झाली आणि या गोष्टीचा प्रत्येक फिलिपिनो व्यक्तीला अभिमान वाटतो आपल्यासारख्या परदेशी लोकांशी बोलताना त्यांचा हा स्वाभिमान एखाद्या तरी वाक्यातून डोकावतोच। समुद्र मागे हटवून तयार केलेल्या या बारा हेक्टर रेक्लमेशन सिटी-

मधील अन्याचशा भव्य इमारती कुठल्या तरी कार्यक्रमाच्या, अधिवेशनाच्या, सेमिनारच्या अथवा परिषदेच्या निमित्ताने अत्यंत वेगाने उभ्या करण्यात आल्या आहेत एखादी आतरराष्ट्रीय कनव्हेन्शन आपल्या देशात भरवायची अशी कल्पना फिलिपाईन्स सरकारच्या मनात येताच, त्या कल्पनाना साकार रूप देण्याच्या दृष्टीने अनेक योजना त्वरित अमलात आणण्यासाठी प्रयत्न केले जातात आपला देश इतर प्रगत देशाच्या, कोणत्याही बाबतीत मागे राहता कामा नये, साऱ्या जगाचे आपल्याकडे लक्ष वेधवे जावे ही फिलिपिनोच्या अतरीची ओढ आहे

हे फोक आर्ट थिएटर जसे फक्त सत्याहत्तर दिवसात उभे केले, तसेच येथून जवळच असलेली मनिला फिल्म फेस्टिव्हलची प्रचड इमारत फक्त नव्वद दिवसात निर्माण करण्यात आली आहे फिलिपाईन्स एग्झिबिशन बिल्डिग ही तर फक्त चौदा दिवसात तयार केली गेली ही गोष्ट येथील गाईड जेवढ्या अभिमानाने सागतो, तेवढ्याच अभिमानाने इतर फिलिपनो लोक देखील आपल्याला आवर्जून सांगतात

आपल मूल चालू लागल्यावर, बोलू लागल्यावर जस कौतुक आणि आनद मातेच्या चेहऱ्यावर उमटतो, तसेच कौतुक, आनद आणि अभिमान, आपल्या देशाच्या प्रगतीविषयी बोलताना, या फिलिपिनोंच्या शब्दाशब्दांतून प्रकटत असतो

पाचशे रुपये भरून, बॅरियो फियेस्टा या कार्यक्रमाची दोन तिकीटे घऊन आम्ही फोक आर्ट थिएटरच्या भव्य कलागृहात प्रवेश केला हा अधिवेशनाचाच एक महत्त्वाचा कार्यक्रम होता तरी येथेही जेवण व मनोरजनही ' फ्री ' नव्हतेच

फोक आर्ट थिएटर विविध स्त्री-पुरुषानी फुलले होते इपोर्टेड सेंटचा धुद करणारा सुगध दरवळला होता सुरेल सगीताचे मधुर स्वर कर्णेंद्रियाना सुखवीत होते बॅंकॉकच्या रोझगार्डनमध्ये जसे गुलाब आढळले नाहीत, तसे या कमळाच्या मनिला शहरात देखील कमलपुष्प आढळली नाहीत पण येथील कमलपुष्प ज्यांच्या सुनयनात फुलली होती, खुलली होती त्या कमल-नयनी, कमलाक्षी मात्र फॅन्सी पोशाख घालून इतस्तत वहरल्या होत्या एके काळी वनी वनी फुललेल्या कुमुदिनी आज स्थलातर करून जणू जनामध्ये विलसल्या होत्या या बहुरगी बहुढगी कमलिनीचे भ्रमर मात्र आजदेखील सारे एकजात बनाना शर्टच्याच राष्ट्रीय गणवेषात वावरत होते सभागृहामध्ये आकर्षक पद्धतीने माडलेल्या ' डिनर 'चा मधुर सुवास रसनेच्या इच्छाशक्ती पल्लवीत करीत होता एकदर पचेंद्रियानाच येथे मेजवानी होती ।

येथे मात्र शुद्ध शाकाहारी पदार्थ मासाहारी पदार्थापासून पूर्णपणे बाजूला माडून ठेवलेले होते फसगत होण्याची किंवा आमच्या ' मॅन मेड प्रॉब्लेम'मुळे आम्ही उपाशी राहण्याची शक्यता नव्हती व्हेजिटेबल पीज पुलाव, न्युडल्स, ब्रेड, पुडिंग, केक, सुरळीच्या वड्या, काही मिठाई आणि चक्क एक गोड करंजीसारखा पदार्थ देखील ! ही सारी खाद्ये एका कतारीत आमचा इन्तजार करीत बसली होती खर नयनसुख आणि रसनासुख मिळाल असेल तर ते गरम गरम कांदा भज्यामुळे ! जेवण वाढून घेऊन आम्ही कुठल्या-तरी टेबलावर येऊन बसलो पदार्थ चविष्ट होते, पण कोणत्याही पदार्थात मिरची अथवा मसाले नव्हते

भोजनाचा समाचार घेत असताना कलागृहाच्या प्रवेशद्वाराकडे माझे लक्ष गेले मिसेस बॉनेट व मिस्टर रेयस एकमेकाच्या हातात हात गुफून प्रवेश करीत होते, जणू काही रूपगर्विता इंग्लंडची महाराणी एलिझाबेथच राजाच्या हातात हात गुफून मोठ्या दिमाखाने पधारत होती बॉनेटची भेट होण्यापूर्वीच ते रेयस युगुल आपल्या श्रीमंत मित्रमैत्रिणींच्या घोळक्यात दिसेनासे झाले मला खरी प्रतीक्षा होती ती मर्चिडीस ॲरिओ हिची उद्या मनिला सोडण्या-पूर्वी मर्चिडीसची भेट व्हावी असे उत्कटतेने वाटत होते

जेवण चालू असतानाच बेरा बियर, व्हिस्की, जीन वगैरे मद्याचे व सत्री-अननस याच्या ज्यूसचे ग्लास घेऊन काही ड्रिंक हवय का म्हणून विचारून गेला हे मद्य आणि फ्रूट ज्यूस डिनरच्या तिकीटात समाविष्ट आहेत की त्यांचे वेगळे बिल भरावे लागेल याविषयी आम्हाला काहीच माहीत नव्हते. नेहमीप्रमाणे क्षणभर संकोच दूर सारून एका बेराला स्पष्टपणे विचारले,

" या ड्रिंकचे बिल या तिकिटातच आहे की स्वतंत्र बिल द्यावे लागेल?" डॉलरच्या ' लिमिटेड स्टॉकमुळे अशी जागरुकता बाळगणे क्रमप्राप्तच होते माझा प्रश्न पुरा होतो न होतो तोच,

" हाय ! हॅलो डॉ शहा अँड मिसेस शहा ! हाऊ आर यू ?"..

मर्चिडीसचे पती मि ॲरियो, धूमकेतूसारखे अचानक कुठून उपस्थित झाले कुणास ठाऊक ! मी बेराला ड्रिंक्सच्या बिलाविषयी प्रश्न विचारीत होते ते ॲरियोसाहेबानी ऐकले की काय या शंकेच्या संकोचाने मला अवघडल्या-सारखे झाले

स्वन ची डिश घेऊन मि ॲरियो आमच्या टेबलवर बसले आम्ही नको म्हणत असतानादेखील त्यानी आमच्यासाठी ज्यूस व आमच्या काही मित्रा-साठी बियर आग्रहाने मागवली आमच्या मित्रानी बियरचे पेल्यावर पेले रिचवायला सुरुवात केली मी मात्र शरमेने अर्धमेली झाले होते ज्यूसचा

एक ग्लासदेखील संपवायला नको वाटत होता माझा प्रश्न व वेटराने त्याचे दिलेले उत्तर. "ड्रिंकचे बिल वेगळे द्यावे लागेल मॅडम" ॲरियोसाहेबानी खुर्चीत बसता बसता ऐकले असावे म्हणूनच त्यानी आमचा पाहुणचार, आमची खातीरदारी करण्याची संधी साधून घेतली असावी तासाभराने सर्व ड्रिंक्सचे आलेले भरमसाठ बिल, मर्चिडीसचे पती मि ॲरियो यानी आम्हाला न जुमानता स्वतःच भरले, तेही,

"तुमची सेवा करायची मला संधी मिळाली हा माझा सन्मान आहे।" असे प्रसन्नपणे म्हणत।

मि ॲरियो एक फिलिपिनो तर आम्ही भारतीय ना रक्ताचे नाते, ना समाजाचे, ना देशाचेही काल बॉनेटच्या घरी झालेली जुजबी औपचारिक ओळख तेवढी। उद्या पुन्हा एकमेकाना भेटण्याची दुर्मिळ शक्यता तरीही त्याच्या सभ्यतेचा फायदा घेऊन आमच्या भारतीय साथीदारानी अधाशी-पणाने वाढवलेले भरमसाठ बिल मि ॲरियोंनी मोठ्या आनदाने दिले केवळ माझ्या एका मूर्ख प्रश्नामुळे ॲरियोसाहेबांच्या खिशाला विशेष तोशीस पडली नसावी ना? या शकेने मन कातरले जात होते तशाही मन-स्थितीत मी ॲरियोसाहेबाना विचारले,

"आज तुमची पत्नी तुमच्याबरोबर आली नाही का?"

"अरे हो, मी तुम्हाला सागायला विसरलोच आमची मुलगी आजारी आहे त्यामुळे मर्चिडीसला आज येता आले नाही पण उद्या मात्र ती तुम्हाला भेटायला जरूर येणार आहे"

"तुमची पत्नी मर्चिडीस मला फार आवडली ती दिसायलाही सुदर आहे आणि स्वभावानेही गोड आहे अल्पकाळातच आमचा चागला स्नेह जमला"

"ती अशी सुस्वरूप आहे म्हणून तर मी तिच्याशी विवाह केला"

"पण काहो मि ॲरियो, फिलिपिनो पुरुषाच्यापेक्षा मला तरी फिलिपिनो स्त्रियाच अधिक खूबसूरत आणि आकर्षक वाटल्या असे का?'

"जगातील सर्वच स्त्रिया पुरुषाच्यापेक्षा सुदर असतात तुमच्या दिवगत पतप्रधान श्रीमती इदिरा गाधी तर किती सुदर आणि रुबाबदार होत्या, जणू काही सौंदर्यसम्राज्ञीच। आमच्या लेडी मार्कोस आणि श्रीमती गांधीची चागली मैत्री होती त्याची निर्घृण हत्या झाल्याचे कळाल्यावर आम्हा सर्वां-नाच फार वाईट वाटले एवढे दुष्ट लोक आहेत का हो तुमच्या इडियात?"

"तसे काही देशद्रोही माथेफिरू सर्वच देशात असतात तुमच्या फिलि-पाईन्समध्येसुद्धा आज तशीच स्फोटक परिस्थिती आहे की।"

" ओ येस  आय ॲग्री ! पण काय हो डॉक्टरसाहेब, तुमच्या इंडियामध्ये, आमच्या फिलिपाईन्सप्रमाणे भ्रष्टाचार आहे का ? गरीब लोक एकदम गरीब आणि श्रीमंत एकदम श्रीमंत अशी विषम समाजरचना आहे का ?"

आर्यावर्तात श्रीकृष्ण भगवानांनी सत्ययुग सुरू केले आहे, असे मर्चिडीसने ॲरियोसाहेबांना सांगितले होते की काय ? कुणीही संभ्रमित व्हावं असाच तो प्रश्न होता हात दाखवून अवलक्षण नको या भीतीने तो तसाच निरुत्तरित राहिला होता

बहुतेक सर्वांचे ते शानदार डिनर घेऊन झाले होते थोड्याच वेळात त्या भव्य कलागृहात एकदम अंधार झाला वाद्यांच्या जल्लोषात व विजेच्या चमचमाटात डॉ कार्लोस कॅन्सेको आणि लेडी मारिया अरोरा यांचे शाही आगमन झाले डॉ कार्लोस कॅन्सेको यांनी फिलिपाईन्स देशाचा परंपरागत राष्ट्रीय पोशाख परिधान केला होता त्याच्यावर देखील कॉन्फरन्सचा बॅज् लावायला ते विसरले नव्हते त्यांच्या या आगळ्या रूपाकडे व वेषाकडे त्यांची पत्नी वारंवार कौतुकाने पाहत होती

रंगमंचाचा मखमली पडदा दूर झाला या मंचावर देखील 'कॅलाबाऊ' प्राण्याचे मुखवटे व भाले यांनी सजावट केली होती एका बाजूला चर्च व दुसऱ्या बाजूला मशीद यांची रेखाचित्रे फिलिपाईन्स मधील दोन प्रमुख धर्म सुचवत होते

मी ॲरियोसाहेबांना विचारले,

" आमच्या भारत देशामध्ये मयूर या पक्ष्यास राष्ट्रीय पक्ष्याचा मान आहे तसेच हत्ती हा प्राणी राष्ट्रीय प्राणी आहे त्यामुळे आमच्याकडे मयूर पक्षी व हत्ती यांची शिकार करण्यास कायद्याने मनाई आहे तुम्ही लोक सर्व प्राण्यांचे मांस खाता तुमच्या फिलिपाईन्समध्ये तुमच्या या 'कॅलाबाऊ' या राष्ट्रीय प्राण्यास मारण्याविषयी अथवा त्याचे मांस खाण्याविषयी काही कायदेकानून किंवा नियम आहेत का ?"

आमच्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर द्यायला, हवी ती माहिती आम्हाला पुरवायला मि ॲरियो अगदी तत्पर असत,

" 'कॅलाबाऊ' या प्राण्याने दुसऱ्या महायुद्धाचे वेळी फिलिपिनो लोकांच्या खाद्याला खांदा लावून जपानचा हल्ला परतवून लावला त्यामुळे आम्ही या प्राण्यास राष्ट्रीय प्राण्याचा मान दिला आहे सध्या शेतकरी लोक या प्राण्याचा ओझं वाहण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर उपयोग करतात कॅलाबाऊच्या कत्तलीविषयी आमच्याकडेही काही नियम आहेत हा प्राणी म्हातारा झाल्यानंतरच त्याची कत्तल करता येते. याचे मांस बैलाच्या मांसाशी मिळते

जुळते असल्यामुळे, अल्प प्रमाणात त्याचा खाद्य म्हणून वापर केला जातो "

'टिकलिंग' नावाच्या फिलिपिनो राष्ट्रीय नृत्याने मनोरंजन कार्यक्रमास प्रारंभ झाला त्यानंतर विविध सांस्कृतिक व ऐतिहासिक नृत्य-नाटिका सादर करण्यात आल्या फिलिपिनो नृत्यावर चिनी, मलायी व जपानी नृत्याचा फार मोठा प्रभाव आढळतो यामध्ये एक प्रकारचे मार्दव व माधुर्य आढळते परंतु भारतीय नृत्यातील चुणुक, चापल्य, गतिशीलता, थायलंड काय किंवा फिलिपाईन्स काय किंबहुना पाश्चिमात्य पद्धतीच्या नृत्यातदेखील जाणवत नाही मोठमोठी कथानक, प्रसंग, भावनाविष्कार नृत्याच्या व हाव-भावाच्या माध्यमातून सादर करण्याचे सामर्थ्य केवळ आपल्या भारतीय नृत्य प्रकारातच आढळते कदाचित या कल्पनेला आत्मश्लाघेचा दर्प असू शकेल

या जलशाची सांगता झाली, बाबू नृत्याने पूर्वेकडचा हा एक अपूर्व नृत्यप्रकार ! या बाबू डान्सने मात्र आम्हा सर्व प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करून सोडले हे बाबू नृत्य आम्ही थायलंडमध्येही पाहिले होते पण त्याने आमच्या मनाचा विशेष ठाव घेतला नव्हता या फिलिपिनोंनी सादर केलेल्या बांबू नाचाने मात्र आम्हाला जिंकले हे नृत्य गतिमय व तालबद्ध होते खाली बसून बाबू आपटणारे व त्यामध्ये विजेच्या चपळाईने पदन्यास करीत नृत्य करणारे नर्तक, विशिष्ट सूर ताललयीत बेभान झाले होतेच, पण त्यांनी आमचे देखील भान हरपून टाकले होते

मी भानावर आले ती मि ॲरियोच्या प्रश्नाने,

" मिसेस शहा, तुम्हाला या नृत्यात सहभागी व्हायला आवडेल का ?"

" वा ! का नाही आवडणार ? मलाच काय, कोणालाही धुंद होऊन या नृत्यात आनंदाने सामील व्हावेसे वाटेल असाच मनोहर, मनोरम्य नृत्याचा प्रकार आहे हा बाबू डान्स !" ..

भाव खाऊन मि ॲरियोंना मी चक्क थाप मारून दिली माघार कशाला घ्या ? हे नृत्य करायचा थोडाच आपल्यावर प्रसंग येणार आहे !

आणि अगदी अनपेक्षितपणे स्टेजवरील सर्व कलाकार नर्तक व नर्तिका बाबू घेऊन प्रेक्षकांमध्ये हजर झाले ! प्रेक्षकांपैकी जे कोणी डान्समध्ये भाग घेण्यास उत्सुक होते, त्यांना ते फिलिपिनो नर्तक आग्रहाने आमंत्रण देऊन बाबू डान्सचा पदन्यास शिकवू लागले कोणाला जमत होते तर कोणाला ते अवघड वाटत होते या बांबूमध्ये डान्स करून पाहण्याचे प्रयोग करणारे बहुसंख्य पाश्चिमात्यच लोक होते खरे उत्सुक आणि उत्साही ! आशियाई प्रेक्षक यामध्ये सहभागी होण्यास विशेष उत्सुक दिसले नाहीत पुरुषांच्यापेक्षा

स्त्रियाना हा पदन्यास लवकर आत्मसात करता येत होता

मि अँरियोंपुढे भाव खाऊन मारलेली थाप आता माझ्याच अंगलट आली होती अँरियोसाहेबाच्या आग्रहाखातिर, बाबू डान्समध्ये भाग घेण्याचे काम, मी मोठ्या कौशल्याने माझ्या पतिराजाच्या गळयात अडकवून टाकले स्वत च्या रूपामुळे व नृत्यकौशल्याच्या अभावामुळे, भारतीय सौंदर्याची व कलागुणाची प्रतिमा डागळू न देणे मला सयुक्तिक वाटले होते

पतिराज मोठ्या उत्साहाने बाबू नृत्य शिकायला गेले होते एका फिलिपिनो कमलाक्षीने त्याना प्राथमिक पावल वन टू थ्री फोर .(ता थै थै था) . कशी टाकायची ते समजावून सांगितले...आणि त्या फिलिपिनो षोडशीबरोबर, कधी बाबूवर पाय टाकून तर कधी पायावर बांबू टाकून बाबू नृत्याचा दिलखुश जलवा सुरू झाला

हा पदन्यास वाटतो तेवढा सोपा नसतो त्यासाठी भरपूर तालमीची आवश्यकता असते

पतिराजाचा डान्स चालू असताना मि अँरियोंनी दोन-तीन फोटो खेचले त्या अप्रतिम नृत्याला वाहवा ! सुभानल्ला ! अशी उत्स्फूर्त दाद द्यावीशी वाटली, तोच अँरियो साहेब म्हणाले, " मनीषा, डान्स करताना तुझ्या नवऱ्याला काही झाले तर त्याला मी जबाबदार नाही ह ! "

मी एकदम घाबरले नाहीतरी मला यांच्या पायावर जोराने बाबू पडेल किंवा बाबूखाली पाय चेंगरेल अशी भीती वाटतच होती कारण याचा पदन्यास सारखा चुकत होता मी बेचैन होत म्हणाले,

" मि अँरियो, डॉक्टरांना डान्स करायला तुम्हीच भाग पाडले त्याना काही इजा झाली तर तुम्हीच जबाबदार आहात त्यांची पावल सारखी चुकीची पडताहेत, त्यामुळे त्याच्या पायाला काही दुखापत तर होणार नाही ना ? "

माझी चिंताग्रस्त मुद्रा व गभीर स्वर ऐकून अँरियो महोदय मोठ्या मिष्किलपणे हसत मला म्हणाले,

" नो .नो डोंट वरी ! तसे काही होणार नाही तुम्ही निष्कारण घाबरू नका इजा झाली तर त्याच्या पायाला होणार नाही, हृदयाला होऊ शकेल व्हॉट आय मीन टू से ..तुमचे पतिराज जर डान्स शिकवणाऱ्या आमच्या त्या फिलिपिनो युवतीच्या प्रेमात पडले तर तुम्ही मला दोष देऊ नका ह !

मी एकदम उसळून म्हणाले,

' फिलिपिनो पोरींच्यावर फिदा व्हायला, माझा नवरा अमेरिकन अथवा

ऑस्ट्रेलियन तरुणासारखा नादान नाही ।"

"ओ मनीषा, यू आर जेलस् ।"

"नो. नेव्हर ! आम्ही भारतीय पतिपत्नी सात जन्म एकमेकाचे साथीदार असतो आमचे प्रेम उथळ नसते सांभाळायचे असेल तर तुमच्या त्या चचलयौवन ललिकेलाच साभाळा ।"

माझे सात जन्माच्या साथीचे पुराण ॲरियो साहेबाच्या गळी कितपत उतरले देव जाणे ! पण केवळ चार-पाच मिनिटासाठी माझ्या पतिदेवासह बाबू नृत्य करणाऱ्या त्या फिलिपिनो अनोळखी षोडशीबद्दल मात्र मला क्षणभर मत्सर वाटल्यावाचून राहिला नाही शेवटी 'जेलसी दाय नेम इज वुमन !' हेच खर !

ॲरियोसाहेब अजूनही विनोदी मूडमध्ये होते

"मनीषा, तू आता अमेरिकन ऑस्ट्रेलियन तरुणांचा उल्लेख केलास त्यावरून एक मजेशीर प्रसंग आठवला परवा माझ्या एका मैत्रिणीच्या विवाहसमारभाला मी गेलो होतो तेथे ब्राईडच्या अनेक फिलिपिनो मैत्रिणीदेखील उपस्थित होत्या माझ्या मैत्रिणीचा, एका हँडसम, स्मार्ट श्रीमत ऑस्ट्रेलियन तरुणाशी मोठ्या ऐश्वर्याने विवाह सपन्न झाला विवाहसोहळा पार पडताच त्या रुबाबदार ऑस्ट्रेलियन नवरदेवाकडे पाहून नववधूची एक तरुण मैत्रीण रडू लागली मी त्या तरुणीला विचारले,

'तू का रडते आहेस ? विवाह तुझ्या मैत्रिणीचा झालाय तुझा नाही !'

त्या रडत असलेल्या तरुणीने मुसमुसतच माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले, 'म्हणूनच मी रडतेय !'

अशा या आमच्या पागल फिलिपिनो तरुणी !"

ॲरियो साहेबानी आपल्या कॅमेऱ्याने माझ्या पतिराजाचे बांबू नृत्याचे दोन-तीन फोटो अचूक टिपले होते माझ्या आत्मविश्वासाला शह देण्यासाठी किंवा कदाचित मला चिडवण्यासाठी.. काही असो आम्ही भारतात परतल्यानतर साधारण एक महिन्याने मि ॲरियोंनी ते रगीत फोटो आठवणीने आमच्याकडे पाठवून दिले ॲरियोसाहेबाची फोटोग्राफी वाखाणण्याजोगी होती आणि फोटोतील ती सुकुमार सुनयना देखील ! माझ्या पतीला पाच मिनिट का होईना बांबूच्या तालावर नाचायला लावणारी ती अनजान, अजनबी फिलिपिनो सवत फोटोच्या रूपाने बळे बळेच आमच्या अल्बममध्ये शिरून ठाण माडून बसली आहे !

तरीसुद्धा ती तरुणी आम्ही केव्हाच विसरून गेलोय पण मर्चिडीस आणि तिचे पती ॲरियोसाहेब मात्र चिरकाल आमच्या स्मरणात राहिले आहेत !

'मबुहाय'च्या मधुर स्वरानी बॅरियो फियेस्टाचा रगीत आणि रगेल दिलचस्प जल्वा सपला..

'दिल यूही शाद रहे बज्म आबाद रहे
आजकी शाम हमे जिंदगीभर याद रहे !'

रात्री एक वाजता ॲरियोसाहेबांनीच आम्हाला आमच्या हॉटेलवर, आपल्या आलिशान मोटारीतून सोडले आमच्या खोलीत, जवळच्या काही गोड-तिखट पदार्थांनी आम्ही त्याचा पाहुणचार केला मुक्तकठाने तारीफ करीत त्यांनी सर्व पदार्थांचा आस्वाद घेतला त्याना मिरची आणि वेलदोडा हे पदार्थ ठाऊक नव्हते हे कळल्यावर आम्हाला आश्चर्य वाटले वेलदोडा प्रकार काय आहे हे त्याना कळावे म्हणून आम्ही त्याना वेलदोडेही खाण्यास दिले वेलदोड्याचा थडगार स्पर्श व थोडासा मधुर स्वाद त्याना अत्यत नावीन्यपूर्ण आणि कुतूहलपूर्ण वाटला खमग तिखटाची चमचमीत राणी मिरची, आणि गोड माधुर्याचा घमघमीत राजा वेलदोडा माहीत नाही म्हटल्यावर केवळ मासाहाराला चटावलेल्या त्यांच्या रसनेच्या अज्ञानाची व अपुरेपणाची कीव करावीशी वाटली !

समेलनाची भैरवी सागता.. मबुहाय !
मबुहाय वेलकम्, बेस्ट लक, सेंड ऑफ, गुडबाय, सी यू अगेन !
मबुहाय सुस्वागतम्, शुभेच्छा, निरोपसमारभ !
मबुहाय फिर मिलेंगे, खुदा हाफिज, अलविदा !
मबुहाय ..सायोनारा !

मबुहाय म्हणजे सार काही ! एवढा अनेकार्थी आणि बहुअर्थी उदगार-वाचक शब्द जगातील इतर कुठल्या भाषेत असेल अस वाटत नाही !

रोटरी विश्वाचे या वर्षीचे ध्येय 'सेवेची नित्य नवी क्षितिज शोधा' अधिवेशनाचे ब्रीद-- 'ऐक्य'

"शैक्षणिक माध्यमातून शातता ',' सामजस्यातून शांतता ' 'प्रेममार्गाने शातता ' एकदर सेवा, शातता आणि ऐक्य या विषयावर आधारलेली रोटरीची ही आशियाई रीजनल कनव्हेन्शन सपली

डॉ कार्लोस कॅन्सेको यांच्या विनोदी शैलीतील भाषणानतर फिलिपिनो भाषेतील निरोपाचे समूहगान झाले त्या गीताचे वेळी आम्ही सर्वजण-- तीन हजार रोटेरियन्स उठून उभे राहिलो सर्वांनी एकमेकाच्या करात कर गुफले माझ्या एका हातात जपानी माणसाचा हात व दुसऱ्या हातात कोरियन माणसाचा हात होता विश्वबधुत्वाची अखड शृखलाच तयार झाली होती

पृथ्वी खूप लहान झाल्यासारखी भासली हे विश्वचि माझे घर आपण सारे भाई भाई पृथ्वी या एकाच महामातेची लेकरे ! एक सूर एक ताल. एक विचार एक आचार असे विलोभनीय ऐक्य क्षणभर जाणवले !

पण क्षणाची ही जाणीव त्या क्षणापुरतीच ! केवळ कल्पनेचा खेळ सत्य यापेक्षा फार वेगळे असते, प्रखर असते एकाच मातेच्या उदरी जन्मलेले, एकाच रक्ताचे दोन बंधू प्रेमाने, एक मताने एकत्र राहू शकत नाहीत मग पृथ्वीची ही कोट्यावधी लेकरे, विश्वबंधू एकीने, गुण्यागोविंदाने कसे नांदू शकतील ? ऐक्य, बंधुभाव, विश्वप्रेम, शांती हे सारं तत्त्वांच्या, संमेलनाच्या, अधिवेशनाच्या आकर्षक चौकटीतच अडकून पडत तत्त्वाच्या या नाजूक पाखराचे, मऊ मुलायम सोनेरी पंख, प्रखर वास्तवात उतरताना गळून पडतात

कनव्हेन्शन कधी सुरू झाली आणि कधी संपली कळलसुद्धा नाही खिसा मोकळा झाला होता पण संपुष्टात न येणारा द्विगुणितच होणारा, दरवळत राहणारा, आयुष्यभर साथ देणारा आल्हाददायक अनुभूतीचा आनंद मना-मध्ये कायमचा भरून राहिला

फिलिपाईन्समधून निघताना एकच रुखरुख लागली होती मर्चिडीस आज पण भेटली नाही तिचे पती मि ॲरियो देखील आज आले नव्हते आपल्याला निरोप द्यायला त्यांना यावेसे वाटले नसावे त्यांना कदाचित आपली आठवण देखील राहिली नसेल आपण मात्र वेड्यासारखी त्यांची प्रतीक्षा करीत बसलो आपण कुठले, आणि ते कुठले ! बॉनेट रेयसच्या घरच्या मेजवानीत ओळख झाली, थोड्याशा गप्पा झाल्या, आणि आपण लगेच त्याला दीर्घ परिचय, मैत्री समजून बसलो !

'अशी पाखरे येती आणि स्मृती ठेवुनी जाती
दोन दिसाची रंगत संगत दोन दिसाची नाती !'

मनिला शहरातील रोक्सास रोडवरून आमची बस मनिला इंटरनॅशनल एअर पोर्टकडे निघाली तास-दीड तासाने आम्ही 'पाल' फिलिपाईन्स एअर लाईन्सच्या विमानाने सिंगापूरला जाण्यासाठी उड्डाण करणार होतो

हॉटेल मनिला मिडटाऊनच्या, पंचविसाव्या मजल्यावरील 'टॉवरिंग इन्फर्नो' मधून आमची सहीसलामत सुटका झाली होती

फिलिपाईन्समधील सागरी तुफान व मनिला शहरातील राजकीय, तप्त अराजक यांनी आम्हाला चार दिवस सातत्याने भीतीच्या अक्राळ-विक्राळ वाकुल्या दाखवल्या होत्या पण प्रत्यक्ष आमच्या केसाला सुद्धा धक्का लागला

नव्हता एका भयप्रद दु:सह स्वप्नातून आमची सुखरूप मुक्तता झाली होती
सकट, तेही मृत्यूच्या भीतीचे, जेव्हा शिरावर टांगत्या तलवारीसारखे लटकत असते, मृत्यूच्या भयानक सावल्या आपल्यासमोर अकाळ-विकाळ अंगविक्षेप करीत असतात त्या वेळी मनाची शांती ढळलेली असते, धीर सुटलेला असतो, चित्त विचलित झालेले असते, हृदय बेताब बेकरार झालेले असते, सदसद्विवेक बुद्धीवरचा काबू उडालेला असतो, मती गुग झालेली असते, प्रत्येक क्षणी एक अनामिक हुरहूर जीव जाळत असते, जीव कापसा-सारखा जळत असतो, अंत:करण हळवे आणि हलके झालेले असते पण जेव्हा ते अरिष्ट दूर होते, तो भयप्रद काल इतिहासाच्या पडद्यामागे जाऊ लागतो, भूतकाळात जमा होतो, तेव्हा त्या कोसळू पाहणाऱ्या आपत्तीच्या भयानक क्षणाची आठवण देखील, वर्तमानात सुखद स्वप्नासारखी रोमांचकारी वाटते त्या वेळी आपण कसे घाबरलो होतो, आपली कशी त्रेधा उडाली होती, कशी पाचावर धारण बसली होती, त्यावेळी अंगावर भीतीने कसा काटा उभा राहत होता, ते सार स्मरताना सुद्धा आता मनामध्ये रोमहर्षक सुखद शहारे उठतात ज्या घटना डरावन्या वाटत होत्या त्याची याद आता सुहानी सुनहरी वाटत होती!

मनिलात आगमन होताना, मनिला इंटरनॅशनल एअर पोर्ट जेवढा प्रशस्त वाटला होता त्यापेक्षा आज मनिलातून गमन करताना अधिक आकर्षक प्रसन्न व सुंदर भासला याचे कारण कदाचित येथील लोकांचे प्रेम, आपुलकी, प्रेमळ आदरातिथ्य, येथे प्राप्त झालेले काही हृदयस्पर्शी अनुभव, किंवा येथून सुरक्षित झालेली मुक्तता! काहीही असू शकेल

बँकॉकच्या विमानतळावरील सुरक्षा अधिकाऱ्याला अचूक गवसलेली ती इवलीशी सुरी मी आता कडक बंदोबस्तामध्ये ठेवली होती त्यामुळे मी अगदी निर्धास्त होते

आम्ही सिक्युरिटी चेकअप करून घेण्यासाठी निघालो, तोच मागून कोणीतरी आमचे नाव पुकारले मागे वळून पाहतो तो आम्हा दोघा पतिपत्नींना आश्चर्याचा सुखद धक्का बसला! मर्चिडीस व मि ॲरियो आम्हाला निरोप द्यायला आले होते क्षणभर विश्वासच बसेना ..ही केवळ वरवरची उथळ ओळख नव्हती, औपचारिक फ्रेंडशिप नव्हती, हा खरा जिव्हाळा होता, ही खरी मैत्री होती ॲरियो दांपत्यामध्ये आणि आमच्या-मध्ये निर्माण झालेल्या आपुलकीची, अनौपचारिक प्रेमाची साक्ष होती

"डॉ शहा अँड मिसेस शहा, आमच्या मुलीची प्रकृती बरी नसल्यामुळे आम्ही आपणाला यापूर्वी भेटू शकलो नाही त्याबद्दल रिअली सॉरी!"

"आपली मुलगी आजारी असताना सुद्धा तुम्ही आम्हाला आवर्जून भेटायला आलात हे पाहून खरोखर फार आनंद झाला आहे आता कशी आहे तुमच्या मुलीची प्रकृती ?"

"तिला अजून टेंपरेचर आहेच आम्हाला आज कोठेच जाऊ देत नव्हती त्यामुळे आम्ही सकाळी पी आय सी सी वर देखील येऊ शकलो नाही आता मात्र तिला झोप लागली आहे, म्हणून आम्ही घाईघाईने येऊ शकलो"

"पण आता मुलीजवळ कोण आहे ?"

"माझी मम्मी आहे ना तिच्याजवळ" मि ॲरिओ म्हणाले

बॉनेटच्या घरी शोधूनही कोणी वृद्ध व्यक्ती मला आढळली नाही त्यामुळे मि ॲरिओच्या घरी त्यांची 'मम्मी' आहे हे ऐकून मनाला नकळत समाधान वाटले म्हणूनच मी त्या दृष्टीने विचारले,

"तुमच्या फिलिपाईन्समधे, इग्लड-अमेरिकेप्रमाणे वृद्ध लोक आपल्या मुलांपासून वेगळे राहतात की आपापल्या मुलांच्या जवळच राहतात ?"

"ऑफकोर्स मुलांच्या जवळच राहतात त्यालाही काही अपवाद असू शकतील. परंतु आमच्या प्रत्येक क्षेत्रात अमेरिकेचा प्रभाव असला तरी, त्याच्याप्रमाणे आमच्याकडे वृद्ध लोक सहसा एकाकी पडत नाहीत वृद्ध लोकांना आमच्या कुटुंबात आदराचे मानाचे स्थान असते" हे सांगताना ॲरिओ साहेबांचा चेहरा अभिमानाने फुलला होता

एक आकर्षक बॉक्स माझ्या हातात ठेवत मर्चिडीस म्हणाली,

"ही आमच्या फिलिपाईन्सची स्पेशल मिठाई मी आपल्यासाठी आणली आहे तुम्हाला ती आवडेल अशी आशा आहे"

"थँक यू व्हेरी मच मर्चिडीस! तुला आमच्यासाठी खरोखर फार तसदी घ्यावी लागली. तू प्रेमाने आणलेली ही मिठाई स्वीकारताना मला फार आनंद वाटतोय. पण...पण...यात तुमचे ते पिग सॉरी ह .ते पोर्क नाही ना ?"

ॲरिओ दांपत्य खळखळून हसलं नंतर मर्चिडीस गंभीर होऊन म्हणाली,

"ओ.. नो . नो ! ही शुद्ध दूध आणि नारळाची मिठाई मी स्वतःच्या हाताने खास तुमच्यासाठी बनवली आहे आणि बर का डॉ शहा व मिसेस् शहा, मी देखील तुमच्याप्रमाणे मांसाहार वर्ज्य करण्याचा हळूहळू प्रयत्न करणार आहे. मी तसा निश्चय केला आहे या बाबतीत मला तुम्हा दोघांची नेहमी आठवण येईल !"

मांसाहार निषिद्ध आहे हे मर्चिडीसला पटले होते स्वतःच्या घरी बावर्ची

असताना, आपली मुलगी आजारी असून देखील हिने ही मिठाई आमच्या-साठी स्वहस्ते तयार केली होती अधिवेशनाच्या निरोप समारंभापेक्षा आम्हाला निरोप द्यायला येणे या दापत्याला अधिक महत्त्वाचे व जिव्हा-ळ्याचे वाटले कसलं हे नात ? कसली ही ओढ ?

" मनीषा, तुमच्या इडियातील प्रजापिता ब्रह्माकुमारीच्या बहेनजीना माझे प्रणाम सांग हं ! "

" जरूर ! आपण उभयता भगवान श्रीकृष्णांच्या जन्मभूमीला, आमच्या भारत देशाला भेट द्यायला अवश्य या आपले ' मबुहाय ' करताना आम्हाला फार आनद होईल "

अती जलद गतीने निरोपाच्या मबुहायची वेळ झाली

" मनीषा, इडियात गेल्यानतर मला विसरू नकोस ह...मबुहाय ! "

" आपल्या बहिणीला कोणी विसरेल का ? "

मर्चिडीसचे टपोरे, बोलके, गहिरे डोळे पुष्कळ काही सांगून गेले मर्चिडीस-सारख्या पाखराने आपली स्मृती तर ठेवलीच होती, पण दोन दिवसाच्या गमतीजमतीमध्ये अनत काळाचे अनामिक अतूट नातेही जोडले होते

मबुहाय मर्चिडीस ! सा माय निलाद...जेथे कमलपुष्प फुलतात, त्या कमलाक्षीच्या कमलनयनींच्या मनिला, मबुहाय ! समोहक सौंदर्य, सुवासिक गध, सुगम्य सगीत, सुदर रगसगती, सुहास्य सौजन्य यांचा सुरेख सगम झालेल्या फिलिपाईन्स देशा, मबुहाय ! मबुहाय !

नऊ

# शॉपिंग पॅरडाईज

'जन्नत ! जन्नत ! पृथ्वीवर स्वर्ग जर कोठे असेल तर तो येथे आहे ! येथे आहे ! येथेच आहे !'

काश्मीरच्या कुदरतचा करिश्मा पाहून दीवाना झालेला जन्नतनशीन बादशहा शहाजहान असे आश्चर्याने उदगारला होता !

हाँगकाँग सिंगापूर या विलासी नगरींचे रंगीन वैभव पाहून आजच्या खरेदीशोकीन जगातले रंगेल बादशहा मोठ्या हैरतमध्ये पडतात आणि म्हणतात,

'पृथ्वीवर स्वर्ग जर कोठे असेल तर तो येथे आहे, येथे आहे येथेच आहे !'

शॉपिंग पॅरडाईज ! हेवन. खरेदीचे नंदनवन स्वर्गनगरी मोह-नगरी ..मायानगरी किमयानगरी झगमगीत प्रलोभनाची जादूनगरी... सुनहरी जन्नत ! एक अजीब भूलभुलैय्या !

प्रसिद्धीचा मनमोहक झगमगीत सोनेरी साज लेऊन दुनियेला दिपवून टाकणारे, भुलवून सोडणारे पागल करणारे दोन भूमिखंड . सिंगापूर आणि हाँगकाँग ! एक दिलचस्प आकर्षण !

हिंदुधर्मीयांची मनोकामना असते की आयुष्यात एकदा तरी काशी-रामेश्वराची तीर्थयात्रा घडावी !

मुस्लिम धर्मीय अल्लाजवळ दुआ मागतात की जिंदगीमध्ये एकदा तरी पाक मक्का मदिनेच्या हाजयात्रेची मुराद पुरी व्हावी !

ख्रिश्चन धर्मीय गॉडफादरजवळ प्रार्थना करतात की, आयुष्यात कधी तरी पवित्र जेरूसलेम आणि व्हॅटिकन सिटीला जायची सुवर्ण संधी प्राप्त व्हावी।

बौद्ध धर्मीयाची इच्छा असते की जीवनात एक वेळ तरी बुद्धगयेच्या पुण्यदर्शनाचा अलभ्य लाभ घडावा।

खरेदीशोकीन धर्मीयाना तीव्रतेने वाटते की सिंगापूर आणि हाँगकाँग या पावन तीर्थांची, आयुष्यात एकदाच नव्हे, तर वारवार महायात्रा घडावी। पुण्यभूमीचे दर्शन व्हावे . भरघोस आर्थिक लाभ घडावा भरगच्च महा-प्रसाद मिळावा .पुंजी रूपी पुण्य गाठीला लागावे .डोळ्याचे पारणे फिटावे . जीवनाचे सार्थक घडावे।

सिंगापूर, हाँगकाँग हेच काशी-रामेश्वर, हीच मक्कामदिना, हेच जेरूसलेम आणि हीच बुद्धगया। सर्व धर्मीयाचा सुवर्ण संगम घडवणारी सर्व धर्मी-याचे अपूर्व ऐक्य साधणारी तीर्थक्षेत्र . महाक्षेत्र।

मानवाचे धर्म निरनिराळे व अनेक असले तरी तो सर्वश्रेष्ठ परमपिता परमेश्वर अल्ला मसीहा एकच आहे तसेच या हाँगकाँग, सिंगापूर क्षेत्री येणाऱ्या मुसाफिराचे मजहब अलग अलग असले तरी सर्वांचे आराध्य दैवत एकच असते.. लक्ष्मी।

या महातीर्थांचे एकमेव महादैवत लक्ष्मी जगदंबा . सारी दुनिया जिच्या तालावर चालते, जिच्या इशाऱ्यावर नाचते ती महामाया महालक्ष्मी।

येथे आराधना, भक्ती, पूजाअर्चा, अभिषेक आरती, नमाज प्रार्थना सारं काही चालत ते या महादेवी महालक्ष्मीचे। या सर्वांगसुंदर महालक्ष्मीचा महिमा काय वर्णावा।

काशी, रामेश्वर, मक्का मदिना येथे यात्रेकरू जातात ते पुण्य कमवायला सिंगापूर, हाँगकाँग या स्वर्गनगरीत मुसाफिर येतात माया कमवायला आणि माया गमवायला देखील।

एके ठिकाणी पुण्यसंचय लागतो तर दुसरे ठिकाणी धनसंचय।

एके ठिकाणी आध्यात्मिक आराधना होते तर दुसरे ठिकाणी ऐहिक भोग विलासांची सुखसाधना।

एके ठिकाणी आसक्तीची फुल फुलतात तर दुसरीकडे अनासक्तीची।

एका दुनियेत अमर, चिरकालीन शाश्वत सुख प्राप्त होते, तर दुसऱ्या जगात चंचल क्षणभंगुर अशाश्वत आनंद मिळतो।

एके ठिकाणी आत्मा प्रसन्न होतो तर दुसरे ठिकाणी पचेंद्रिय !

प्रवासी कपनीच्या चावटपणामुळे किंवा आमच्या प्रावतनामुळे, कदाचित आमचा पुण्यसचय कमी पडल्यामुळे असेल, पण ऐन वेळी हाँगकाँग हे तीर्थ आमच्या यात्रेतून वगळण्यात आले त्यामुळे आता सारी भिस्त, साऱ्या आशा अपेक्षा सिंगापूर नगरीवरच ! काशी घडणार पण रामेश्वर नाही, मक्केचे दीदार पण मदिनेचे नाही अधूरी यात्रा, अपुरच पुण्य ! ' याचि देही याचि डोळा ' आता हाँगकाँगची वारी कधी घडेल तेव्हा घडो तूर्त सिंगापूरचा तरी पुरता लाभ घडावा, इच्छा अपेक्षाची ' मुरादोकी झोली ' भरावी, ही यात्रा सफल सपूर्ण व्हावी हीच आता सिंगापूर क्षेत्रीच्या महालक्ष्मी आद्य दैवतापुढे प्रार्थना !

लावण्यवती फिलिपिनो हवाईसुदरीच्या प्रेमळ सुहास्य आतिथ्याचा सुखद वर्षाव करीत, मनिला ते सिंगापूर हे २३८३ किलोमीटर्सचे अतर तीन तासात अत्यत आरामात उल्लघताना आमच्या फिलिपाईन्स हवाई जहाजाला देखील उत्साहाचे विहगम पख फुटले होते

सिंगापूर . सौदा सौदागर आणि सौदामिनीचा सुवर्ण सगम ! पण आम्ही मात्र सौदा आणि सौदामिनीच्या शोधात आलेले सौदागर नव्हतो

सिंगापूरच्या पुण्यभूमीवर आम्ही पदार्पण केले, ते मात्र माया कमवायला नसून फक्त माया गमवायला, पुण्यसचय तर गाठीला नव्हताच, पण होता तोही धनसचय सपवायला ! खरेदी जगताच्या या सरताज स्वर्गनगरीमधे आम्ही प्रवेश केला तो महालक्ष्मीच्या महासागरात लक्ष्मीचाच जलौघ समर्पित करण्यासाठी, महालक्ष्मीच्या माथ्यावर लक्ष्मीचाच अभिषेक करण्यासाठी !

या महानगरीमधे लोकशाही नादत असली तरी, येथे हुकुमत चालते ती डॉलर या हुकूमशहाची ! महाराणी महालक्ष्मीचा तो कार्यक्षम प्रधानमत्री या जादूनगरीचा जादूगार आहे सिंगापूर डॉलर ! तो मुठीत असेल तरच या डॉलरच्या रियासतीत, खरेदी धर्माचे पालन करता येते, आराधना करता येते सुखोपभोगाची, ऐषआरामाची साधना फलद्रूप होते पचनेंद्रियांना महा-सुख लाभते !

सिंगापूरच्या हवाई अड्ड्यावर उतरनाच खरोखर स्वर्गाच्या प्रवेशद्वारा-जवळ आल्यासारखे वाटले थुईथुई नाचणारी कारजी आमच्या स्वागतार्थ नृत्यझकार करीत होती गगा व झमझम नद्या जलप्रपाताच्या रूपाने येथे अवतरल्या होत्या त्या जलप्रपातांच्या रम्य दर्शनाने नयनाना अमृतसुख प्राप्त झाले होते सुखद शीतलतेने मनोवृत्ती पल्लवीत झाल्या होत्या

कलात्मकता, भव्यता, प्रशस्तता, स्वच्छता, शांतता आणि प्रसन्नता यांच्या रूपात वावरणाऱ्या अप्सरा मन मोहून टाकीत होत्या अनेक प्रकारचे डेरेदार, सुशोभित, आल्हाददायक वृक्ष नम्र सलामी देत उभे होते उंची, गुबगुबीत गालिच्यांनी आमच्या चरणकमलासाठी मखमली पायघड्या घातल्या होत्या जादूमय फिरत्या जिन्यांनी व सरकलेल्या चालत्या रस्त्यांनी आम्हाला हलकेच त्या प्रचंड आवारातून पैलतीरावर नेले आम्ही संमोहित होऊन सिंगापूर या जन्नत, पॅरडाईज, स्वर्गनगरीमध्ये प्रवेश केला

विमानतळाच्या बाहेर येऊन आम्ही आमच्या गाईडची व गाडीची प्रतीक्षा करू लागलो येथील रम्य वातावरणात आमचे सहप्रवासी मि बिनधास्त भलतेच भारावून गेले होते अत्यानंदाने त्यांना सिगरेटची सनई फुंकण्याची किक् आली मोठ्या रुबाबात सिगरेट सुलगावून, जळकी काडी व सिगरेटचे रिकामे पाकीट मि बिनधास्तने खाली फेकून दिले मनिला-सिंगापूर प्रवासात फिलिपाईन्स विमान सेवेच्या सौजन्याने मोफत मिळालेल्या मद्याचे मि बिनधास्त यांनी मुक्तकंठाने प्राशन करून घेतले होते त्याबरोबर मिळालेल्या खाऱ्या बदामाची दोन-चार पाकिटे त्यांनी खिशात सरकवली होती त्या बदामाची मि बिनधास्तना आता धूम्रपान करताना आठवण झाली खिशातून एकेक पाकीट बाहेर येऊ लागले मि बिनधास्तला कोणी टॉंटिंग केले नाही असे क्वचितच होई

"मि बिनधास्त, विमानात फक्त बदामाची पाकिटच खिशात घातलीत ना ? हवाई सुंदरींनी विक्रीला ठेवलेली एखादी व्हिस्कीची बाटली नाही ना कोंबली खिशात ?" .

प्रत्येक टोमण्याचे सडेतोड उत्तर देण्यास बिनधास्तसाहेब तत्परच असत

"अहो, आपल्याकडे बाटलीला काय तोटा आहे ? त्यातली एखादी फिलिपिनो हवाई सुंदरी मात्र अवश्य खिशात घालावीशी वाटली !"

बदामाचे एकेक पाकीट रिकामे करीत मि बिनधास्त खाली फेकू लागले सिंगापूर शहरातील सुव्यवस्थेच्या आणि स्वच्छतेच्या नियमाबाबतीत मी आधी कशात तरी वाचले होते त्यामुळे मि बिनधास्तचे मनमुराद स्वच्छंदी वर्तन पाहून मीच चिंताग्रस्त झाले न राहवून शेवटी मीच म्हणाले,

"मि बिनधास्त, बँकॉक विमानतळावर सापडलेल्या माझ्या सुरीनेसुद्धा आपणा कोणावर आफत येऊ दिली नाही पण तुम्ही खाली फेकलेला हा यत्किंचित कचरा मात्र निश्चितच आपल्या सर्वांना संकटात टाकणार आहे"

"ते कस काय हो ? असा निकामी केरकचरा खाली फेकायचा नाही, तर काय खिशात जपून ठेवायचा असतो काय ?"

" अहो बिनधास्त, कोठेही केर करायला, असे स्वच्छंदी वागायला आपण अजून भारतात आलो नाही म्हटल ! शहराच्या स्वच्छतेच्या दृष्टीने असा कोठेही कचरा टाकणे येथे दखलपात्र गुन्हा समजतात अशा गुन्हेगारास भरपूर दड व तुरुगवासाची शिक्षादेखील येथे सुनावली जाते असे मी वाचले आहे "

" जाऊ द्या हो, वहिनी ! सिगापूरला येऊन अशा मस्त वातावरणात सिगरेटचे धुद झुरके मारण्यात काय मजा आहे हे नाही तुम्हाला कळायचे उगीच मास्तरकी करून तुम्ही सगळा मूड खराब करून टाकला असे स्वच्छतेचे नियम वगैरे फक्त पुस्तकात लिहिण्यासाठी व तुमच्यासारख्याना वाचण्यासाठी असतात, वागण्यासाठी नाही ! '

मि बिनधास्तचे हे वाक्य पुर होतय न होतय तोच एक सिंगापुरी व्यक्ती मोठ्या लगबगीने आमच्याकडे आली व मि बिनधास्तना उद्देशून इग्लिशमधे म्हणाली,

" नो स्मोकिंग प्लीज . येथे धूम्रपानास सक्त मनाई आहे आणि आपण हा खाली टाकलेला कचरा उचलून कृपया कचरा पेटीत टाका असा कोठेही कचरा टाकणे या गुन्ह्यास पाचशे अमेरिकन डॉलर्स जुर्माना व प्रसगी जेलची सजा देखील येथील गव्हर्नमेंट फर्मावते आपण नवीनच आलेले दिसता म्हणून आपणास हा गुन्हा माफ केला आहे. पण पुनश्च असे वागू नका "

सिगरेटच्या धुद वलयात तरगणाऱ्या मि बिनधास्तचे पाय क्षणात जमिनीला लागले आमच्याकडे न पाहताच त्यांनी तोंडातील सिगार विझवली मुकाट्याने विझवलेली सिगार, बदामाची फेकून दिलेली पाकिटं, सिगरेटचे पाकीट व जळकी काडी सार काहीबिनधास्त महोदयांनी घाईघाईने गोळा केले, आता या कचऱ्याचे काय करायचे याचा क्षणभर विचार करून तातडीने तो सारा कचरा आपल्या खिशात कोबला त्या विनोदमूर्तीची एवढी गभीर, चिंताग्रस्त मुद्रा मी प्रथमच पाहिली तो बहुमोल ' प्रेशस ' खजिना खिशाच्या तिजोरीत सुरक्षितपणे ठेवल्यानतर मि बिनधास्तने माझ्याकडे मूकपणे पाहिले व आपले हात कोपऱ्यापर्यंत जोडले खिशातून पाचशे अमेरिकन डॉलर्स घालवण्यापेक्षा तो कचराच खिशात ठेवलेला काय वाईट ? त्या वेळी मला झालेला आनद काय वर्णावा ? माझ्या मास्तरकीचा विजय झाला होता ना !

या भोगविलास नगरीत, भोग भोगण्याविषयी देखील काही नियम आहेत सार्वजनिक ठिकाणी मद्यपान व धूम्रपान करण्यास सक्त मनाई आहे. थुक-

दाणीव्यतिरिक्त इतरत्र थुंकणे हादेखील येथे गंभीर गुन्हा समजला जातो आपल्याकडील पान-तंबाखूची पिंक मारणाऱ्या पिचकारी बहाद्दुरांची येथे मोठी नाजूक अवस्था होत असेल !

येथील तीन दिवसाच्या वास्तव्यात आम्हाला मार्गदर्शन करण्यासाठी बालकृष्णन नावाचा गाईड, आरामगाडी घेऊन हजर झाला सिंगापूर . स्वर्गनगरीचे दर्शन घडवायला कृष्णदेव हवाच ! मग तो बालकृष्ण असला तरी सर्वज्ञच असणार हा बालकृष्ण सध्या सिंगापूरचा नागरिक असला तरी वंशाने तो भारतीय आहे कृष्ण म्हणजे तो भारतभूमीतच जन्मलेला असणार ! पण हा बालकृष्ण रंगाने काळासावळा होता तरी ढंगाने यशोदेच्या बालकृष्णासम अल्लड, अवखळ, नटखट, नादान मात्र दिसला नाही कदाचित हा त्याच्या प्रौढवयाचा परिणाम असेल किंवा देशांतराचा ! किंवा स्वर्गांतराचा !

बसचालक चिनी वंशाचा असावा असे त्याची ती प्रसिद्ध करड्या नजरेची फट सूचित करीत होती त्याच्या सशयित चेहऱ्याकडे पाहून त्याला त्याचे नाव वगैरे विचारावे असे आम्हाला वाटले नाही किंवा परदेशी व्यक्ती भेटताच तिचे नाव, गाव, वगैरेबद्दल माहिती विचारावीशी वाटणे, अशी साचेबद उत्सुकता आता या दहा-बारा दिवसात बरीच शमली होती

आमच्याकडे एकदम दुर्लक्ष करून, बसमधील वायरलेस सेटवर कोणाशी तरी काहीतरी बोलत त्या चिनी ड्रायव्हरने बस चालू केली बस चालू होताच सकल महिला मंडळाच्या उत्साहाला आता उधाण आले प्रत्येकीने बरोबर आणलेली रस्त्याची नावे, दुकानाचे पत्ते याची लांबलचक यादी बाहेर काढली आणि शंकाचे, प्रश्नाचे चौकस सत्र सुरू झाले

" येथे पेनिनसुला शॉपिंग सेंटर कोठे आहे ?"

" येथे हायस्ट्रीट सेंटर कोठे आहे ?"

" येथे साड्या कोठे चांगल्या मिळतात ?"

" येथे बारगेनिंग मोठ्या प्रमाणावर चालते असं ऐकलय ते खरं आहे का ?"

" येथे नाईट मार्केट पण आहे ना ? बरं झालं बाई रात्रीदेखील खरेदी करता येईल "

" येथे सोन्याचा दर काय आहे ?"

" टी व्ही, घड्याळ, वगैरे इलेक्ट्रॉनिक वस्तू येथे स्वस्त मिळतात की हाँगकाँगला ?"

अशा अनेक तोफांचा बालकृष्णन बिचारा एकटा शिकार झाला पण अशा

रोज रोजच्या तोफगोळ्यांना तो पुरता निढावला असावा कदाचित येथे रोज रोज घडणाऱ्या अशा अनेक नाट्यप्रसंगांना कटाळूनच त्या चिनी ड्रायव्हरने आमच्याकडे वळूनसुद्धा पाहिले नसावे आमच्या प्रश्नांच्या भडिमाराचा बालकृष्णनवर यत्किंचितही परिणाम झाला नाही तो अत्यंत निर्विकारपणे म्हणाला,

" आपण प्रवासाने दमला असाल आज विश्रांती घ्या उद्या रविवार असल्यामुळे येथील काही मार्केट बंद असतात उद्या आपण साईट सीईंगला जाऊ सोमवार-मंगळवारी तुम्हाला खरेदी करता येईल "

आमच्या उत्साहावर बालकृष्णनच्या शांत उत्तराने व उद्या आलेल्या रविवारने विरजण घातले भरतीचे ओहोटीत रूपांतर झाले न्यूटन रोडवरील ' रॉयल हॉटेल 'पर्यंत जाईपर्यंत समस्त महिला मंडळ थिजलेल्या दह्याप्रमाणे स्तब्ध झाले

न्यूटन रोडवरील रॉयल हॉटेलपुढे आमची बस थांबली बसमधून उतरताना मि बिनधास्त सवयीनुसार बालकृष्णनच्या कानात काहीतरी कुजबुजले बालकृष्णनने मात्र मि बिनधास्तच्या खाजगी प्रश्नाचे उत्तर, माईक हातात घेऊन जाहीररीत्या दिले,

" मित्रांनो, तुम्ही बँकॉकहून आला आहात त्यामुळे बँकॉकसारखे लाईव्हली शो येथेदेखील असतील अशी तुमची कल्पना असेल पण ती चुकीची आहे येथे आपणाला तसे लाईव्हली शो पहायला मिळणार नाहीत "

मि बिनधास्त वगैरे मंडळींचा उत्साह क्षणात मावळला आता या केवळ नावाच्या कृष्णनवर अवलंबून राहण्यात अर्थ नाही, या विचाराने मि बिनधास्तनी आपल्या चौकशीचा मोर्चा दुसरीकडे वळवला येथे लाईव्हली शो नाही हे ऐकून आम्हालादेखील आश्चर्य वाटले कारण सिंगापूर येथील नाईटक्लबविषयी बरच काही ऐकल होत व प्रथितयश लेखकांचे लेखदेखील वाचले होते पण येथे तर वेगळेच ऐकायला मिळाले होते

सौदामिनीच नाहीत म्हटल्यावर सौदागराचे सौद्याचे स्वप्न साकार कसे होणार ? आपल्या देशाची प्रतिमा बँकॉकसारखी बदनाम होऊ नये अशा सिंगापूर सरकारच्या व कदाचित बालकृष्णनच्यादेखील प्रांजल सदिच्छा असाव्यात !

येथील रॉयल हॉटेलमध्ये देखील फ्रूट ज्यूस सादर करून आमचे स्वागत करण्यात आले या रॉयल हॉटेलमध्येही खालच्या मजल्यावर एक छोटंस शॉपिंग सेंटर आहे त्यातील एका कृत्रिम फुलांच्या शो-रूमने माझे लक्ष वेधले येथे असंख्य प्रकारची कृत्रिम फुल व वेलीही होत्या ती फुल व वेली अगदी

बेमालूम नैसर्गिक वाटत होत्या  पण बँकॉकच्या मानाने येथील दर जवळ-जवळ दुप्पट असल्यामुळे त्याची खरेदी मी थोडीशी लांबणीवर टाकली  अशी नाजूक फुल फार दिवस साभाळायला नको  मी अशा फुलाची खरेदी बँकॉक येथे न करता सिगापूरसाठी राखून ठेवली होती  पण येथे असलेल्या त्याच्या भरमसाठ किमती पाहून सुरुवातीलाच माझे मन नाराज झाले  शेजारच्या दुसऱ्या दुकानात मी शिरले  तेथे शिरताच एक नावीन्यपूर्ण चीज मला आढळली.. एका लाकडी ठोकळ्यामध्ये छोटी चार माकडे कोरली होती  आपण नेहमी तीनच माकडे पाहतो  पण येथे चार होती  नेहमीप्रमाणे एका माकडाने आपल्या तोंडावर हात ठेवले होते  दुसऱ्याने आपल्या कानावर व तिसऱ्याने आपल्या डोळ्यावर दोन्ही हात ठेवले होते आणि चौथ्या माकडाने ? तिघांच्या त्या चौथ्या अनाहूत साथीदाराने आपले दोन्ही हात ठेवले होते आपल्या गुप्तेंद्रियावर !   .मला तरी हे खूप सूचक वाटले

बँकॉकचा लाईव्हली शो येथे नको

मनिलातील उन्मत्त नदीशी प्रीतिसगम येथे नको.  आणि

किल्लीच्या आकड्याने करून दाखवलेली प्रणयक्रीडाही येथे नको .!

जणू काही आपल्या मर्कट लीलातून हा आदिपुरुष, आदिमानव, कटु बोलू नका, अप्रिय ऐकू नका व वाईट पाहू नका या शाश्वत सदेशाबरोबर ब्रह्मचर्याचादेखील महान सदेश देत आहे असं वाटलं ! लैंगिक सुखाला चटावलेले अनेक प्रवासी बँकॉकप्रमाणे सिंगापूर येथेदेखील मोठ्या अपेक्षा बाळगून येतात  त्या प्रेमवीराना तर या अजनीपुत्र हनुमानाचा हा इशारा नसेल ना ? तसे असेल तर ते निश्चितच स्वागतार्ह आहे

सिगापूर येथे नाईटक्लब आहेत की नाहीत, येथे 'मीना बझार' भरतो की नाही हा आमचा विषयच नव्हता  पण बँकॉकप्रमाणे उघड उघड प्रलोभन मात्र आम्हाला तरी येथे कोठेच आढळली नाहीत  अर्थात् दृष्टी तशी सृष्टी !

रविवार   सिगापूर वास्तव्यातील पहिला प्रात:काल   ब्रेडबटरचा नाश्ता उरकून आम्ही खाली आलो  गेले अकरा दिवस सतत असा 'कॉंटिनेंटल ब्रेकफास्ट' घेऊन ब्रेड हा पदार्थ मनातून आता पुरता उतरला होता  घरी परत गेल्यानतर निदान सहा महिने तरी या ब्रेडबटर युतीचे तोंड पहायचे नाही असे ठरवून टाकले होते

सिगापूरची ज्याची प्रथम वारी होती, ते सर्व आम्ही वारकरी साईट सीईंगला उत्साहाने निघालो  बालकृष्णन आम्हाला प्रथम 'सँतोषा आयलंड'-

वर नेणार होता आमची बस त्या दिशेने निघाली तोच अचानक जोराचा मुसळधार पाऊस कोसळू लागला या भर पावसात सिंगापूरचे 'साईटसीईंग' कसे करायचे या विचाराने आम्ही सर्वजण थोडेसे नाराज झालो आमची ही चिंता बालकृष्णनच्या लक्षात आली

" मित्रमडळींनो, घाबरू नका हा पाऊस जसा अचानक आला तसाच अचानक थांबेल वातावरण पुनश्च लखलखीत होईल मुसळधार पाऊस पडून गेलाय असे तुम्हाला जाणवणार देखील नाही येथे जवळजवळ वर्षभर अशा प्रकारचा पाऊस पडतो "

आणि खरोखरच मुसळधार कोसळणारा पाऊस काही मिनिटातच थांबला थडगार हवेच्या रूपाने आपली सुखद स्मृती ठेवून ! त्या आल्हाददायक हवेत मन अधिक उल्हसित झाले चार चार महिने एकाच ऋतूच्या हवामानाला कटाळलेल्या मनाला, एकाच दिवसातील थोडीशी गर्मी, नतर वर्षा व त्यानतर पुनश्च लखलखीत ऊन व सुखद हवा असं समिश्र हवामान खूपच भावल जीवाची दीर्घकाल उलघाल करणारा ग्रीष्म ऋतू नको. विरही प्रियजनाना सावनभादोची चार चार महिने प्रतीक्षा करायला नको की प्रेमी युगुलाना गुलाबी थडीचा इतजार करायला नको '

सिंगापूर हे जवळजवळ विषुववृत्तावर असल्यामुळे येथे बाराही महिने एकच ऋतू असतो पहाटेपासून स्वच्छ सोनेरी ऊन, मधेच जोराचा पाऊस, पुन्हा थोडा वेळ ऊन व सध्याकाळी सुखद गार हवा येथे प्रतिवर्षी ९७ ते ९८ इच पाऊस पडतो

प्रसन्न वातावरणात, सिंगापूरच्या प्रशस्त रस्त्यावरून आमची बस धावत होती रस्त्याच्या दुतर्फा गगनचुबी इमारती उभ्या होत्या एकेक इमारत कमीतकमी सत्तरऐंशी मजल्याची ! मधे मधे नवीन इमारती उभ्या करण्याचे काम वेगाने चालू होते तरीही सर्वत्र कमालीची शातता व स्वच्छता

आज साऱ्या जगाचे लक्ष आपल्याकडे आकर्षित करणारे हे छोटेसे सिंगापूर बेट एकेकाळी या सुसस्कृत जगाला अज्ञात होते ब्रिटिश अधिकारी सर थॉमस रॅफल्स याला इ स १८१९ साली प्रथम या बेटाचा शोध लागला त्या वेळी या बेटावर मनुष्यवस्ती होती, पण अतिशय तुरळक केवळ दीडशे ते दोनशे मलेशियन मच्छीमार त्या वेळी येथे राहत होते नतर हळूहळू येथील लोक-वस्ती वाढत जाऊन इ स १८२४ साली ती दहा हजारच्या दरम्यान झाली एकोणीसाव्या व विसाव्या शतकात मात्र या बेटाची प्रगती व विकास झपाट्याने होऊ लागला बहुसख्य लोक चीनमधून देशातर करून येथे येऊन राहिले आज येथील लोकसंख्या पचवीस लाखाच्या दरम्यान आहे आणि

आश्चर्य म्हणजे या छोट्याशा सिंगापूर देशाला त्याच्या लोकसंख्येएवढेच म्हणजे पंचवीस लाख परदेशी प्रवाशी प्रतिवर्षी भेट देतात ! येथील पंच्याहत्तर टक्के लोक चिनी वंशाचे आहेत, चौदा टक्के लोक मलेशियन, व उरलेल्या अकरा टक्क्यामधे भारतीय व पाकिस्तानी लोक आहेत येथील भारतीय लोकामधे तामिळी व पंजाबी लोक प्रामुख्याने आढळतात विमानतळावरील अधिकाऱ्यांपासून व्यापारधंद्याच्या अनेक क्षेत्रात, भारतीय लोक आम्हाला बहुसंख्येने आढळले त्यामुळे आपण दूरवर कोठे परदेशात नसून मुंबईसारख्या शहरातच आहोत असाच सतत आभास होत होता

जगाच्या आर्थिक उलाढालीवर प्रभुत्व गाजवणाऱ्या या देशामधे मनुष्यप्राण्याची दोन वेळची भूक भागवणारे अन्नधान्य मात्र पिकत नाही येथे सर्व प्रकारचे अन्नधान्य आयात केले जाते सिंगापूर हे बेट आकाराने अत्यंत छोट असून त्याची लांबी २६ मैल व रुंदी फक्त १४ मैल आहे याचे क्षेत्रफळ २२४ चौरस मैल आहे आकाराच्या मानाने येथे लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे दाट लोकसंख्येमुळे येथील सरकारपुढे कुटुंबनियोजन हा एक फार मोठा प्रश्न आहे लोकसंख्या वाढीमुळे येथील मुळातच कमी असलेली जागा दिवसेंदिवस माणसांनी राहण्यासाठी व्याप्त केली त्यामुळे येथील जंगले नाहीशी झाली शेतीदेखील अत्यंत अल्प प्रमाणात आढळते त्यामुळे येथील लोकजीवन सर्वस्वी व्यापार, उद्योग आणि पर्यटक यावर अवलंबून आहे जे काही थोडेफार शेती उत्पादन होते ते रबर, नारळ व काही फळांचे होते अन्नधान्य, भाज्या, फळफळावळ यांची मोठ्या प्रमाणावर आयात करावी लागते अलीकडच्या काळात, पोल्ट्री व पिग्ज याच्या उत्पादनास येथे महत्त्व प्राप्त झाले आहे

मनुष्याने व्याप्त करून जी काही जमीन येथे शिल्लक आहे, तीदेखील सुपीक नाही तरीसुद्धा तिच्यावर अनेक प्रक्रिया करून वेगवेगळ्या प्रकारची वृक्षराजी उगवण्याइतपत ती सुपीक करण्यात आली आहे जंगल आणि शेतीमळे यांची निसर्गरम्य दृश्य अभावाने पाहायला मिळतात त्यामुळेच की काय, येथील लोकांना वृक्षराजीचे, शोभेच्या रोपट्यांचे व फुलांचे विलक्षण वेड आहे उपलब्ध असलेल्या जमिनीवर जागोजागी हिरव्यागार ताटव्याचा साज चढलेला आढळतो ज्या ठिकाणी नैसर्गिक वृक्षराजी वाढवणे शक्य नाही त्या ठिकाणी निसर्गाच्याच तोडीच्या कृत्रिम वृक्षराजीने सजावट केलेली आढळते फुलांच्या बाबतीतही तसेच येथे नैसर्गिक फुलांइतक्याच सुंदर रंगसंगतीच्या नाजूक, आकर्षक फुलांचे ताटवे पाहायला मिळतात मनिलाला बॉनेटच्या घरी असलेल्या, एकदम नैसर्गिक दिसणाऱ्या कृत्रिम वृक्षासारखे

अनेक प्रकारचे वृक्षदेखील येथे विकत मिळतात येथील अनेक मोठमोठ्या हॉटेल्समधे, ऑफिसमधे, सुपर मार्केटमधे अशा प्रकारच्या कृत्रिम वृक्षांच्या, झुडपाच्या व फुलाच्या सहाय्याने निसर्ग फुलवण्यात आलेला असतो या देशातील नागरिक जसे इतर देशातून दत्तक आलेले आहेत, तशी सृष्टिदेवता देखील मानवी प्रयत्नानी प्रसन्न करवून फुलवलेली आहे

सिगापूर हीदेखील मुबईसारखीच इग्रजांची निर्मिती ! एका इग्रज अधिकाऱ्यानेच याचा शोध घेतला ब्रिटिशानी जवळजवळ दीडशे वर्ष सिंगापूरवर राज्य केले त्यानतर इ स १९६३ साली सिंगापूर व मलेशिया याचे सयुक्त सरकार स्थापण्यात आले व इ स १९६५ साली सिंगापूर हे स्वतत्र राष्ट्र झाले ही सारी प्रगती, ही सारी घोडदौड, हा सारा विकास केवळ या वीस वर्षातला !

सध्या येथे लोकशाही राष्ट्रपद्धती आहे आशिया खडातील जपान, थायलड, फिलिपाईन्स या राष्ट्रांप्रमाणे सिंगापूरनेदेखील आपली मागास वल्कले त्यागली आहेत इतर प्रगत देशाप्रमाणे येथे देखील प्रत्येक क्षेत्रात स्त्री, पुरुषाच्या खाद्याला खांदा लावून काम करते आहे येथे स्त्री-पुरुषाना समान वेतन मिळते

मलेशियापासून सिंगपूर हे स्वतत्र राष्ट्र झाले असले तरी याची सस्कृती, मलाया सस्कृतीच आहे सिंगापूरची राष्ट्रभाषाही मलायाच आहे व्यवहाराची भाषा आहे इग्लिश, जी सर्वांनाच अवगत आहे येथे असलेले तामिळ लोक एकमेकांशी तामिळ भाषेतच बोलतात येथे रस्त्यावरून फिरताना अनेक वेळा रेडिओवरचे दाक्षिणात्य सगीत व हिंदी फिल्मी सगीत ऐकायला मिळते तामिळ व हिंदी चित्रपटदेखील येथे लोकप्रिय आहेत

सरकारी गृहरचना निर्माण करून सिंगापूर सरकारने सर्वसामान्य लोकासाठी देखील राहण्याची उत्तम व्यवस्था केली आहे त्यामुळे दाट लोकसख्या असून देखील येथे कोठेही झोपडपट्टी हा प्रकार नाही घरोघरी सर्व प्रकारच्या आधुनिक सुखसोयी उपलब्ध आहेत प्रत्येक घरी लाईटच्या मीटरप्रमाणे गॅसचे देखील मीटर आहे त्यामुळे 'गॅस सपला' याची चिंता कोणाही गृहिणीस छळत नाही येथील चिनी लोक सरकारी गृहरचनेपेक्षा त्यांच्या पूर्वीच्या पद्धतीच्या घरातच राहणे अधिक पसत करतात येथील त्याच्या वसाहतीला 'चायना टाऊन' असे म्हणतात येथील हिंदी व चिनी लोक सलोख्याने भाई भाई प्रमाणे राहतात असे बालकृष्णन सागत होता पण ही जरा अतिशयोक्तीच वाटली वस्तुस्थिती त्यांनाच ठाऊक ! कमीत कमी बालकृष्णन आणि आमच्या बसचा चिनी चालक यांच्यात तरी सलोखा

आम्हाला कधीच आढळला नाही

वीस वर्षांच्या अल्प कालावधीत सिंगापूरसारख्या छोट्याशा देशाने, दुनियेच्या सरताजामध्ये मानाचे चमकते स्थान प्राप्त केले आहे सिंगापूरला सध्याचे हे अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे त्याला अनेक कारणे आहेत मुख्य म्हणजे सिंगापूर हा जागतिक वाहतुकीचा केंद्रबिंदू आहे हिंदी महासागर व चिनी समुद्रातून जा-ये करणाऱ्या जहाजाच्या दृष्टीने सिंगापूर मध्यवर्ती आहे युरोप ते जपान, युरोप ते ऑस्ट्रेलिया व चीन ते भारत असा प्रवास करणाऱ्या जहाजाना मधे थाबण्याच्या दृष्टीने सिंगापूर हे अत्यंत सोयीस्कर ठिकाण आहे इग्लड व युरोप ते जपान, आस्ट्रेलिया अशा विमान वाहतुकीच्या दृष्टीनेही सिंगापूर हे मध्यवर्ती केंद्र आहे सिंगापूर या मध्यवर्ती केंद्राचा, विमान व जहाजे याना इधन भरून घेण्याच्या दृष्टीने फार मोठा उपयोग होतो अशा प्रकारे सिंगापूर या शहराला जलमार्ग व हवाईमार्ग या दोन्ही वाहतुकीच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे त्यामुळे सिंगापूरने व्यापाराचे ' इटर नॅशनल हेड क्वार्टर ' हा मान मिळवला आहे शिवाय सिंगापूर हे ' ड्यूटी फ्री पोर्ट ' असल्यामुळे येथील स्वस्ताईमुळे ही आंनरराष्ट्रीय बाजारपेठ देखील झाली आहे

समुद्र किनाऱ्याजवळ येऊन आमची बस थाबली पुढील प्रवास आम्ही स्टीमरमधे बसून सुरू केला छोटचाशा समुद्रपर्यटनानतर आम्ही एका बेटावर उतरलो हेच ते ' सँतोषा आयलड ' येथेच पूर्वी सिंगापूर या बेटासाठी ब्रिटन आणि जपान याच्यामधे युद्ध झाले होते याच बेटावर अनेक ब्रिटिश व जपानी योद्धयानी प्राणार्पण केले होते हे सँतोषा आयलड म्हणजे त्या हुतात्म्याचे स्मारक ! शाततेचे स्मारक !

या आयलडवर एक 'व्हॅक्स म्युझियम' आहे आत शिरताच पावले जागच्या जागी थबकली समोरच्या दृश्याने मनाची पकड घेतली. मध्यभागी एक भल मोठ्ठ प्रशस्त टेबल आहे त्याच्या एका बाजूला काही भारतीय व काही ब्रिटिश लष्करी अधिकारी बसले आहेत दुसऱ्या बाजूला जपानी सैन्याधिकारी बसलेले आहेत काही जण उभे आहेत सर्वांच्या अगावर लष्कराचे गणवेष आहेत ब्रिटिश अधिकाऱ्याच्या चेहऱ्यावर विजयाचा आनद झळकतो आहे प्रखर स्वाभिमानाने त्याचे निळे डोळे चमकताहेत जपानी अधिकाऱ्याचे चेहरे पराजयाच्या जाणिवेने काळवडले आहेत एक प्रकारचे औदासीन्य त्याच्या दृष्टीत झाकळलय टेबलावरच्या करारनाम्यावर सह्या केल्या जात आहेत ब्रिटन व जपान यांच्या युद्धामधे ब्रिटनचा जय झाला जपानने ब्रिटनपुढे

शरणागती स्वीकारली सिंगापूर ब्रिटिशाच्याच ताब्यात राहिले त्या वेळी झालेल्या तहाचे हे दृश्य ! जिवंत .मूर्तिमत हुबेहूब जणू काही तो शरणागतीचा तह समक्ष आपल्यापुढेच घडतोय ! टेबलाभोवती बसवलेले ब्रिटिश व जपानी अधिकाऱ्याचे मेणाचे पुतळे होते ते जय-पराजयाचे भाव त्यांच्या चेहऱ्यावर जिवंत झाले होते त्याच्या पार्श्वभूमीवर, त्या युद्धाशी माहिती निवेदन करणारी ध्वनिमुद्रिका शांतपणे चालू होती ते दृश्य पाहून भूतकाळातील ती ऐतिहासिक घटना आपल्या समोर साक्षात घडत आहे असा भास झाल्यावाचून राहत नाही

याच म्युझियममध्ये आम्हाला स्वातंत्र्यपूर्व काळातील महात्मा गांधींच्या चळवळीविषयी हेड लाईनमधे छापलेल्या बातम्यांचे जुने इंग्लिश न्यूज पेपर फ्रेम करून ठेवलेले आढळले त्यातील एका वर्तमानपत्रात गांधीजींना ' महात्मा ' उपाधी देण्यात आली ही ठळक अक्षरातील बातमी आम्ही तेथे प्रत्यक्ष वाचली महात्मा गांधीजींविषयी प्रेम व आदर देशोदेशी कसा बहरत आहे याची ती मूर्तिमत साक्ष होती

त्यानंतर आम्ही सँतोषा आयलंडवर असलेले ' कोरल म्युझियम ' पाहण्यासाठी गेलो व्हॅक्स म्युझियमपासून हे जवळच आहे दगडाच्या दोन-तीन कृत्रिम गुफा तयार केल्या असून त्यामधे समुद्रासारखे दृश्य तयार केले आहे त्या गुफामधे हे प्रवाळ संग्रहालय थाटले आहे जणू काही आपण समुद्रतळाच्या पाताळातच आलो आहोत ! समुद्रातील प्रवाळ कसे निर्माण होतात, ते कसे वाढतात, ते कसे जगतात व कसे मृत होतात हे येथे दाखवले आहे त्यांना देखील जन्म-मृत्यू असतात, बाल्यावस्था, वृद्धावस्था असते या जिवंत प्रवाळाच्या चैतन्यमय हालचाली जवळून पाहणे हा दृष्टिसुखाचा फार मोठा अनुभव आहे क्षणभर असे वाटले की वेगवेगळ्या रंगाच्या आकाराच्या पुष्परचनेचेच हे प्रदर्शन आहे एकेक प्रवाळ म्हणजे परमेश्वरनिर्मित आकर्षक मोहक पुष्परचनाच ! त्यांच्या त्या नाजूक हालचाली पाहून वाटते की ते जिवंत प्रवाळ आपल्या इवल्याशा सुकुमार माना डोलावून एकमेकांशी हितगुज करताहेत या प्रवाळामधे देखील इतके असंख्य आकार आणि नानाविध रंगछटा असतात हे पाहून विधात्याच्या अजब निर्मितीविषयी बुद्धी अवाक् होऊन जाते येथे देखील आमचे सहप्रवासी भूवैज्ञानिक डॉ बी जी देशपांडे यांनी या प्रवाळाविषयी आम्हाला बहुमोल माहिती दिली

आता या सँतोषा आयलंडपासून सिंगापूरला परतीचा प्रवास सुरू झाला अंतर तेच परंतु परत जाण्याचा मार्ग भिन्न बसने आम्ही मोनो ट्रेनच्या एका स्टेशनवर आलो ही मोनोट्रेन म्हणजे आपली फुलराणी ! स्टेशन

येताच या मोनोट्रेनचे दरवाजे आपोआप उघडतात व प्रवासी आत बसताच पुन्हा आपोआप बद होतात ही मोनोट्रेन देखील भलती स्वच्छ आणि सुदर होती एक एक स्टेशन मागे टाकीत आमच्या झुक झुक गाडीचा प्रवास रम्य निसर्गातून सुरू झाला एका बाजूला समुद्र-किनारा, दुसऱ्या बाजूला रम्य वृक्षराजी रविवार असल्यामुळे सागरकिनारा माणसानी फुलला होता. बँकॉकजवळील पताया बीचप्रमाणे येथे देखील पुष्कळ लोक जलक्रीडेचा मुक्त आनद लुटत होते

मोनोट्रेनमधून आम्ही केबलकारच्या एका स्टेशनवर उतरलो पुढचा प्रवास केबलकारने सँतोषा आयलड ते सिंगापूर अशी केबलकारची दुहेरी वाहतूक चालू होती एक येण्यासाठी व दुसरी जाण्यासाठी अशा या केबलकारमधून समुद्रावरून प्रवास करताना सिंगापूर शहराचे सौंदर्य न्याहाळता येते

आरामगाडी, स्टीमर, मोनोट्रेन व केबलकार अशा अनेक माध्यमातून झालेली ही मिनी जर्नी फारच सुखावह वाटली भूमार्ग, जलमार्ग, व हवाई-मार्ग अशा विविध मार्गांतून सचार घडल्यानतर आमचे पाय पुनश्च सिंगापूर भूमीला लागले

आता थोडीशी सध्याकाळ राहिली होती त्या अवधीत उद्यापासून सुरू करायच्या खरेदी मोहिमेसाठी न्याहाळणीचे काम उरकून घेतले येथील सरुगन रोड नावाच्या रस्त्यावर बहुसख्य भारतीय व पाकिस्तानी व्यापाऱ्यांची दुकाने आहेत परदेशात आल्यापासून रोजच्या सवयीनुसार एका दुकान-दाराशी आम्ही इंग्लिशमध्ये बोलू लागलो तर त्या दुकानदाराने आम्हाला हिंदीतून विचारले,

"तुम्ही भारतीय आहात, मग हिंदी भाषेत का बोलत नाही ?"

स्वत ची मातृभूमी सोडून, अर्थार्जनासाठी परदेशात स्थायिक झालेल्या आपल्या या काही देशबाधवांची अपेक्षा होती की,आम्ही राष्ट्रभाषेत बोलावे दक्षिण भारतीयाशी हिंदीत बोलणे, तेही परदेशासारख्या तिसऱ्याच ठिकाणी, हे प्रथम आम्हाला धाडसच वाटले परतु कोणीतरी आपल्याशी हिंदीत का होईना पण भारतीय भाषेत बोलावे अशी त्यांची अपेक्षा असावी त्यामुळे आम्ही दुसऱ्या काही दुकानदारांशी हिंदीतून बोलायला सुरुवात केली, तर ते मुद्दाम आखडूपणाने आपल्याला हिंदी कळत नाही असे दाखवून इंग्लिशचाच वापर करायचे

या सरुगन रोडवर आम्हाला 'कोमला निवास नावाचे एक उडपी हॉटेल आढळले येथील मद्रासी पदार्थ खाऊन बरेच दिवस अतृप्त राहिलेल्या रसनेला तृप्ती लाभली सिंगापूरच्या वास्तव्यातील पोटापाण्याचा प्रश्न आता

सुटला होता

रात्रीचे नऊ वाजले होते दुकान बद झाली होती टॅक्सीची प्रतीक्षा करीत आम्ही बराच वेळ उभे होतो रात्रीच्या वेळी टॅक्सी रिकामी असेल तर तिच्या टपावरचा हिरवा लाईट लागलेला असतो असा हिरवा दिवा लागलेल्या दिसेल त्या टॅक्सीला आम्ही हात करीत होतो पण एक तास झाला तरी एकही टॅक्सी रिकामी असूनदेखील थांबेना कितीतरी रिकाम्या टॅक्सी आल्या आणि भरधाव गेल्या परदेशचा मामला, रात्रीची वेळ, शरीर थकलेले होते तरी पायपीट सुरू होती बरीच पायपीट झाल्यानतर समजले, येथे अशी कोठेही टॅक्सी मिळत नाही त्यासाठी टॅक्सी स्टॅंडवरच थाबावे लागते दुसर विशेष म्हणजे अपघाताचे दुष्परिणाम टाळण्यासाठी, टॅक्सीत व इतर खाजगी गाडीत, वाहन चालकाप्रमाणेच पुढील आसनावर बसणाऱ्या दुसऱ्या व्यक्ती-नेही, आसनपट्टा आपल्या कमरेला बाधावा लागतो सुरक्षिततेच्या दृष्टीने हा नियम योग्य आहे या नियमाचे उल्लघन केल्यास कायदेशीर दड होत असल्यामुळेच याचे पालनही येथे काटेकोरपणे केले जाते

येथे ऑर्चर्ड रोडसारख्या झोन एरीयातून जाणाऱ्या वाहनासाठीदेखील काही नियम आहेत प्रत्येक खाजगी छोटया गाडीत अथवा टॅक्सीत प्रत्येक वेळी कमीतकमी चार लोक असलेच पाहिजेत चारपेक्षा कमी लोक असले तर भरमसाठ दड भरावा लागतो वाहनांची गर्दी कमी करून शहरात शातता राखण्याचे दृष्टीने असे नियम खरोखर अत्यावश्यक आहेत पर्यायाने इधनाचीही बचत होते प्रदूषण प्रतिबधाच्या दृष्टीनेदेखील असे नियम उप-युक्त ठरतील

दहा

# भूलभुलैय्या....

सिंगापूर नगरीतील आजच्या द्वितीय दिनी सकाळीच आम्ही येथील सुप्रसिद्ध ' टायगर बाम गार्डन ' पाहण्यासाठी निघालो

काश्मीरला गेल्यावर शालीमार बाग व निशात बाग पाहिलीच पाहिजे म्हैसूरला जाऊन वृंदावन गार्डन आवर्जून पाहायला पाहिजे त्याचप्रमाणे प्रत्येक परदेशी मुसाफिराने, सिंगापूर स्वर्गनगरीमधील ही अभूतपूर्व दिव्य गार्डन पाहिलीच पाहिजे असे सिंगापूरवासीयाचे व सरकारचे देखील आग्रहाचे मत आहे त्या आग्रहाला मान देऊन आम्ही ' टायगर बाम गार्डन ' जवळ येऊन पोहोचलो

ही टायगर बाम गार्डन प्रत्यक्ष पाहिल्यानंतर मात्र आमच्या भ्रमाचा भोपळा फुटला या गार्डनमध्ये नयनरम्य मनोहर दिलखूश असे काहीच आढळले नाही या गार्डनच्या नावातील खरा किंवा कमीतकमी खोटा टायगर तरी आढळेल अशी अपेक्षा होती पण तोदेखील कोठे दिसला नाही पण त्याऐवजी चिनी पुराणातले, चिनी दंतकथातले हीरो म्हणजे ड्रॅगॉन, सूसर, मगर, अजगर, खेकडे, कासव असे भयंकर प्राणी, राक्षस, राक्षसिणी व अद्भुत भयानक लांबलांब दाढी-मिशा असलेले भूतबाबा यांचेच प्रचंड पुतळे जागोजागी स्थानापन्न केलेले होते कदाचित वर्षानुवर्षं ठाण मांडून बसलेल्या या भयंकर प्राण्यांच्या व भूतबाबाच्या भीतीने या गार्डनच्या नावातील टायगरला पळून जावे लागले असेल व त्याच्या सहवासात निर्माण झालेल्या

मस्तकशूळावर बाम थापावा लागला असेल

निसर्गप्रिय, पुष्पप्रिय सिंगापूर नगरीतील या सुप्रसिद्ध गार्डनमध्ये मनोहर फुलांचे ताटवेदेखील आढळले नाहीत नाहीतर त्या भयानक अद्‌भुत प्राण्यांचे दर्शन झालेल्या दृष्टीला तेवढीच शीतलता प्राप्त झाली असती मधे मधे जी काही फुलझाडे होती ती देखील ड्रॅगॉनच्या व सुसरी-मगरींच्या भयाने कोमेजल्यासारखी भासत होती टायगर देखील जेथे तग धरू शकला नाही, तेथे या नाजूक निष्पाप फुलझाडांनी कसे फुलावे, बहरावे ?

या सर्व राक्षसांना, प्राण्यांना, भूतांना, जणू काही अभयदान देणारी, आशीर्वाद देणारी गौतम बुद्धाची एक प्रचंड मूर्ती, उच्च पॅगोड्यावर विराजमान आहे तेवढाच काय तो दिलासा, तेवढच काय ते मांगल्य येथे आढळले

या गार्डनचे दुसरे नाव 'हॉ पार व्हिला' असे आहे 'ऑ बून हॉ' आणि 'ऑ बून पार' हे दोन चिनी बंधू टायगर बाम नावाचे औषध तयार करून स्वतः सायकलवरून सिंगापूरच्या रस्त्यावरून विकत फिरत असत या बंधूंची आई ब्रह्मी व वडील चिनी होते कालांतराने या औषधामध्ये या चिनी बंधूंना कोट्यवधी रुपये मिळाले म्हणून त्यांनी गमत म्हणून किंवा आपल्या स्मृतिप्रीत्यर्थ ही 'हॉ पार व्हिला' किंवा 'टायगर बाम गार्डन' आपल्या कल्पनेप्रमाणे इ स १९७३ साली निर्माण केली.

मनिला शहरातील स्फोटक तप्त वातावरणात भयाच्या कल्पनेची जी दुःखद स्वप्न पडत होती, ती सिंगापूर येथील या टायगर बाम गार्डनमधील भयानक आकृतींच्या रूपाने साकार झाली की काय अशी शंका मनाला चाटून गेली.

जहाँगीर व शहाजहानसारख्या निसर्गसौंदर्यवेड्या कलाकार मुघल बादशहांनी साकार केलेल्या एकापेक्षा एक नयनरम्य, अवर्णनीय, स्वर्गतुल्य बगीचे पाहिलेल्या या कलाप्रेमी मनाला, नावाप्रमाणेच रूपानेही विचित्र असलेली ही टायगर बाम गार्डन काही भावली नाही

येथील भयानक आकृत्या पाहून मनस्तापाने जर डोके दुखू लागले तर या डोकेदुखीवरील रामबाण उपाय टायगर बाम तेवढा या गार्डनमध्ये भरपूर विकत मिळतो आपल्या टायगर बामची देशोदेशी भरपूर विक्री व्हावी यासाठीच अशा प्रकारे जगावेगळी जाहिरात करण्याचा खास मार्ग कंपनीने शोधून काढला नसेल ना ?

टायगर बाम गार्डनमधून बाहेर पडताना एका दुःसह स्वप्नातून मुक्ती मिळाल्यासारखे वाटले कधीकाळी शहाजहान बादशहा जर या टायगर बाम गार्डनमध्ये अवतरला तर निश्चितच तो उत्स्फूर्तपणे उद्‌गारेल,

' जहन्नुम जर कोठे असेल तर येथे आहे . येथे आहे .येथे आहे !'

टायगर बाम गार्डनमध्ये खरोखर एक बामची बाटली विकत घेऊन सिंगापूर येथील खरेदीस शुभारंभ केला व आम्ही बोटॅनिकल गार्डन पाहण्यास निघालो

फिलिपाईन्समधील ताल व्होलकॅनो पहायाला जाताना गाईड जून व बसचालक हे देखील आमच्याबरोबर भारतीय पदार्थांच्या यथेच्छ फराळात सामील झाले होते आजदेखील बरोबर आणलेल्या सर्व पदार्थांचा फडशा पाडायचा म्हणून आम्ही आपापल्या मेव्याच्या पोतड्या खोलल्या तोच आमच्या या चिनी बसचालकाने आपल्या सशयित डोळयाच्या फटीतून करड्या नजरेने आमच्याकडे पाहिले त्याला देखील आम्ही आमचा स्वदेशी मेवा ऑफर करणार होतो पण तत्पूर्वीच आपल्या सक्त स्वरात त्याने आम्हाला ताकीद दिली– वॉर्निंग दिली,

" गाडीमध्ये काहीही खाऊ नका सीट व खालचे गालीचे खराब झाल्यानतर साफ करणे फार अवघड जाते "

स्वच्छतेच्या नियमाच्या दृष्टीने त्याचे म्हणणे योग्य होते पण पहिल्या दिवसापासून सशयित नजरेने पाहणाऱ्या त्या चिनी ड्रायव्हरला आम्ही भारतीय काय जुमानतोय ! शिवाय आम्हा भारतीयाना छोटया-मोठ्या प्रवासात सतत काहीतरी चघळायची दांडगी सवय ! मुखशुद्धी चालू ठेवल्याशिवाय प्रवास मजेशीर वाटतच नाही मि बिनधास्तसह आम्ही सर्वांनीच अगदी बिनधास्तपणे फराळावर ताव मारला

टायगर बाम गार्डनच्या पार्श्वभूमीवर येथील बोटॅनिकल गार्डन खूपच रम्य वाटली परिसर शात व प्रसन्न आहे येथे विविध प्रकारची नैसर्गिक फुलझाडे व शोभेची झाडे विक्रीसाठीही आहेत येथे नैसर्गिक फुलांवर सोन्याने मढवून विविध प्रकारचे अलकार तयार केले जातात

शेवटी येथील प्रसिद्ध हिऱ्याचा कारखाना पाहिला हिरे, नील, सफायर, रुबी, पर्ल अशा प्रकारची असख्य रत्न येथे तयार केली जातात त्याच्यावर पैलू पाडून त्याचे अनेक प्रकारचे अलकार येथे विक्रीस असतात हे जडजवाहिरात म्हणजे या सुवर्णनगरीत येणाऱ्या सौदागराचे फार मोठे आकर्षण. पण सिंगापूर येथे हिरे आणि सोन यांच्या नादाला लागायचे नाही असे आधीच ठरवले होते निरपेक्ष बुद्धीने हा हिऱ्यामाणकांचा कारखाना पाहून झाल्यानतर येथील साईट सींईग प्रकार सपला.

आता या ' शॉपिंग पॅरडाईज'मध्ये फक्त शॉपिंग खरेदी सिंगापूर महाक्षेत्रावर धनसंपत्तीचा अभिषेक !

महालक्ष्मीची महापूजा ! डॉलररूपी फुलाची व अक्षताची उधळण ! बरोबर महाप्रसाद न्यायचा होता ना ! तोही ' इंपोर्टेड '!

सरंगन रोड, हायस्ट्रीट, ऑर्चर्ड रोड, सॅंगो स्ट्रीट, हे या मायाजालातील महामार्ग, पेनिनशुला प्लझा, पीपल्स पार्क, चायना टाऊन, हायस्ट्रीट सेंटर, मलेशिया ॲर्केड, संतराम हाउस, ही या चक्रव्यूहातील सुपर मार्केटस् प्रत्येक सुपर मार्केट पंचवीस-तीस मजली, तळापासून वरपर्यंत झुलवणारे चकचकीत जिने, कमालीची शांतता व स्वच्छता, जागोजागी नैसर्गिक व कृत्रिम वृक्षांची, ताटव्यांची सजावट, चिनी सेल्स गर्ल्स, व वस्तूचे संभ्रमित करणारे दर. या मोहजालातून बाहेर पडणे मुश्किल होते !

येथील सॅंगो स्ट्रीटवर एक नाईट मार्केटदेखील आहे येथील दुकाने रात्री बारा वाजेपर्यंत उघडी असतात दोनचार दिवस राहणाऱ्या परदेशी प्रवाशांनी दिवसाभर भरपूर खरेदी करावीच परंतु वेळ पुरला नाही तर रात्रीदेखील त्यांना खरेदी करता यावी हा त्यामागील हेतू असावा हे नाईट मार्केटदेखील अनेक मजली आहे वरती जाण्यासाठी गाडी साठीही वेगळा जिना आहे येथील सर्व दुकाने मात्र चिनी लोकांचीच आहेत म्हणजे हे देखील एक चायना टाऊनच होते चप्पल, बूट, तयार कपडे, इलेक्ट्रॉनिक वस्तू, घड्याळ, सूट-केसेस, छत्र्या यांची छोटी छोटी असंख्य दुकाने येथे आहेत सर्व वस्तू स्वस्त, पण एकाच वस्तूची किंमत प्रत्येक दुकानात वेगवेगळी, त्यामुळे फसगत होण्याची मोठी शक्यता येथील प्रत्येक दुकानाच्या बाहेर गिऱ्हाईक आणि दुकानदार यांच्यात सतत बारगेनिंग चालू होते त्या चिनी विक्रेत्यांच्या जालीम नजरेचा व त्यांच्या अंतरंगाचा जसा आपल्याला ठाव लागत नाही, तसाच येथील वस्तूंच्या गुणवत्तेचा व योग्य किंमतीचाही अंदाज बांधता येत नाही या नाईट मार्केटच्या समोर असंख्य चिनी स्त्रिया मोठमोठ्या शेगड्या पेटवून त्यावर अनेक मांसाहारी पदार्थ गरम गरम करून विकत होत्या बॅंकॉकमधील इंद्रामार्केटची येथे प्रकर्षाने आठवण झाली या चिनी भूलभुलैयात विशेष खरेदी करावी वाटली नाही

सरंगन रोड व हायस्ट्रीट येथील बाजार जरा आपुलकीचा वाटला कारण या भागात भारतीय व्यापारी बहुसंख्य आहेत तामिळी व पंजाबी लोकांची साड्यांची दुकाने आहेत कपडालत्ता व इलेक्ट्रॉनिक वस्तू येथे स्वस्त मिळतात छोट्या-मोठ्या प्रत्येक दुकानाबाहेर अनेक टेलिव्हिजन सेटस् विक्रीस होते मग ते दुकान कपड्याचे असो अथवा किराणामालाचे किंमती

मात्र प्रत्येक दुकानात वेगवेगळ्या मायानगरीच्या या चक्रव्यूहात मती गुग झाल्यामुळे निर्णय शक्ती दुबळी होऊन जाते अशा समोहित अवस्थेत खिसातील मायावी डॉलर हळूहळू कसा अदृश्य होऊ लागतो याचा मात्र थागपत्ताही लागत नाही

लोक आपले, भाषा आपली, सूर सगीतही आपलेच परकेपणा जाणवतो तो मात्र त्या आपल्या लोकाच्या, आपल्याच लोकांशी वागण्यातला येथे एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, ती म्हणजे येथील लोकांना गिऱ्हाइकाची मुळीच पर्वा नाही कारण येथे कस्टमर्सना तोटाच नाही 'घ्यायचे असेल तर घ्या नाहीतर चालू लागा' अशीच भावना सर्वत्र आढळते गिऱ्हाईक दुकानात खरेदी करीत असेल तरी, 'आमचा आता लच टाईम आहे, टी टाइम आहे,' म्हणत काही काही दुकानदार गिऱ्हाइकाना सरळ बाहेर काढत

भारतीय गिऱ्हाईक म्हटल्यावर हे विक्रेते आणखीनच उदासीन, निरुत्साही का तर म्हणे, भारतीय लोक फार बारगेनिग करतात' या मात्र चक्क 'चोराच्या उलटचा ।' गिऱ्हाईकाना आकर्षित करण्यासाठी बारगेनिगचे आमिष हेच लोक आधी दाखवतात आधी भरमसाठ किमत सागून, नतर बारगेनिगचा घोळ घालून सागितलेल्या किमतीच्या निम्म्या किमतीत वस्तू विकायची हे बारगेनिगचे समोहन निर्माण करण्यात, या जादूनगरीतील चिनी जादूगाराचा विशेष हातखडा आहे हातचलाखीने गिऱ्हाइकाना भुलवून वर पुन्हा चिनी व्यापाऱ्यासह भारतीय, पाकिस्तानी व्यापारीही साजूक आरोप करतात की भारतीय लोक खरेदीपेक्षा घासाघीसच फार करतात पुण्यसचय करून मनुष्य-प्राणी स्वर्गलोकी गेला तरी तेथे मानवच समजला जात असेल, त्याप्रमाणे सिगापूरच्या या खरेदीनदनवनात देखील भारतीय माणसाने आपला आयुष्यभराचा धनसचय उधळून भरमसाठ खरेदी केली तरी 'भारतीय लोक खरेदी कमी पण बारगेनिग अधिक करतात' असा शिक्कामोर्तब करून त्यांची अवहेलनाच येथे केली जाते आपण आपल्या देशात घासाघीस कुठ करतो ? साधी पादत्राण विकत घेतली तरी वरचे पच्याण्णव पैसे सुद्धा कमी करा असे न म्हणता आपण शभर पैसे देऊन टाकतो

बारगेनिग ही या किमयानगरीचीच एक किमया आहे अशा ठिकाणी निष्पाप लोक मात्र निष्कारण बदनाम होतात ही देखील या मोहजालाचीच एक किमया !

येथील मोठ मोठ्या सुपर मार्केटमधील कोणत्याही इपोर्टेड सुरीचे' दर्शन मात्र मी कटाक्षाने टाळले कारण मायदेशाहून आणलेली ती लिबू

फेम सुरी स्वत चे जबरदस्त अस्तित्व मला क्षणभर देखील विसरू देत नव्हती मग येथील इंपोर्टेड सुरीच्या वाट्याला जायची माझी काय बिशाद! हिरे आणि सोन याबरोबरच सुरीची खरेदी देखील वर्ज्य करून टाकली होती आमचे सुदैवी सहकारी निर्धास्तपणे काटे-चमचे, सुऱ्या याचे सेट खरेदी करीत होते,

शॉपिगच्या या अजीब चक्रव्यूहात आम्ही अगदी लीलया शिरलो, पण यातून बाहेर पडायचा मार्ग मात्र सहजतेने सापडेना कोणते ना कोणते तरी प्रलोभन मन गुतवून ठेवत होते तहानभुकेचे, वेळकाळाचे भान राहिले नव्हते मोहमायेने बेभान करून मायानगरीत आम्हाला पुरते गुरफटून टाकले होते इथल्या स्वस्ताई आणि मस्ताई या मायावी जादूगारणीनी समोहित केले होते

सपुष्टात येणारा डॉलर मात्र खरेदीची ही धुद नशा उतरवण्यास प्रारभ करतो तहानभूक हरपायला लावणारी ही शॉपिगची धुद नशा उतरताच तहानभुकेची प्रकर्षाने जाणीव होऊ लागते फिरून फिरून थकवा आलेला असतो कोणत्याही दुकानात बसण्याची व्यवस्था नसल्यामुळे उभे राहून पायाला गोळे आलेले असतात घशाला कोरड पडलेली असते एखाद्या दुकानदाराला पिण्यासाठी पाणी मागावे तर तो चक्क सुनवतो की, आमच्या-कडे पिण्याचे पाणी नाही ! धनद्रव्याची सारी गगाजली समर्पित करून सुद्धा तृष्णा शमवण्यासाठी घोटभर पाणी सुद्धा येथे कोणाकडून आपुलकीने मिळत नाही चिनी दुकानदाराप्रमाणे भारतीय दुकानदार देखील आपल्याशी असे तुटकपणे वागतात याचीच खरोखर खत वाटते

सरगन रोडवरील एका पजाबी व्यक्तीच्या दुकानात मी आणि सोला-पूरच्या सौ अजली होशिग दुपारच्या वेळी गेलो होतो आमची खरेदी होईपर्यंत माझे पती डॉ शहा व सौ अजलीचे पती डॉ होशिग इतर काही वस्तू पाहण्यासाठी ' सिमलिम टॉवर ' येथे गेले आमची चुकामूक होऊ नये म्हणून आम्ही दोघीनी त्याच पजाबी महाशयाच्या दुकानात त्या दोघाची वाट पाहत थाबावे असे आधी ठरले होते दुपारची वेळ असल्यामुळे तहानेने कठ सुकला होता म्हणून आम्ही त्या पजाबी दुकानमालकाला पिण्यासाठी पाणी मागितले ..तर त्या भारतीय, पजाबी महोदयानी आम्हाला येथे प्यायचे पाणी नाही असे स्पष्टपणे सागितले आश्चर्य म्हणजे हे महाशय दुकानाच्या मागच्याच खोलीत राहत होते त्यांची बायको, मुल व त्या खोलीत थाटलेला त्याचा ससार आम्हाला स्पष्ट दिसत होता ! एका भारतीयाने, आपल्या मातृदेशातून आलेल्या आपल्या देशबधू-भगिनीना पिण्यासाठी साध

पाणी देखील द्यायचे नाकारले होते! कुठं गेली ती भारतीयाची 'अतिथी देवो भव' संस्कृती!

तहानलेल्या जीवांचा आत्मा शांत करणे हे या स्वर्गनगरीमधे पुण्यकर्म समजले जात नसावे. सारं पुण्यकर्म, पुण्यसंचय म्हणजे केवळ येन केन प्रकारेन धनसंचय, असंच इथलं बहुधा समीकरण आणि 'सामीलीकरण' असावं!

अतिथीस देवासम न मानता खुद्द आपण भारतीय लोक देखील संकटासमान समजू लागलो आहोत, तर मग या परदेशी दत्तक गेलेल्या, भारतीयत्व विसरलेल्या, लोकांना दूषण देण्याचा आपल्याला तरी अधिकार आहे का?

तृष्णा शमवण्यासाठी चार घोट पाणी आम्हाला जिथं मिळाले नाही, तिथं मग बसण्यासाठी आसनाची तरी अपेक्षा कशी करायची? दोन्ही डॉक्टर-साहेबांची प्रतीक्षा करीत मी व सौ. अंजलीताई त्याच पंजाबी भाईसाहेबांच्या दुकानात तिष्ठत उभ्या राहिलो. तर थोड्याच वेळात आमच्या त्या भाई-साहेबाने आम्हाला विचारणा केली,

"तुमची खरेदी संपलीय ना, मग तुम्ही अजून येथे का थांबला आहात?"

"आमचे नवरे आम्हाला येथे घ्यायला येणार आहेत. म्हणून आम्ही त्यांची प्रतीक्षा करीत थांबलो आहोत. पाच-दहा मिनिटांत येतीलच ते."

हे ऐकताच त्या भारतीय सभ्य गृहस्थाने आम्हाला सक्त स्वरात बजावले.

"माझे दुकान म्हणजे काही प्रतीक्षा गृह नाही. तुम्ही येथे थांबू नका. दुसरीकडे कोठेतरी जाऊन थांबा."

त्यांच्या या अपमानास्पद बोलण्याचा आम्हा दोघींनाही खूप राग आला. आम्ही त्यांच्याकडे परत करून बाजूला ठेवलेल्या सर्व वस्तू खरेदी करण्यास नकार दिला व ताडकन् त्यांच्या दुकानातून बाहेर पडलो, विषण्णता व मन-स्ताप घेऊन. तो अपमान, ती अवहेलना सारं काही सहनशक्तीच्या पली-कडचं होतं. पण कसा आणि कोणावर राग काढणार? त्या प्रसंगापासून येथील भ्रमजालातील स्वस्त आणि मस्त खरेदीच्या संमोहक भ्रमाचा अक्षरशः निरास झाला.

पाणी मागताच अनेक प्रकारचे ज्यूस वगैरे पेय स्वखर्चाने पेश करणारे कुठं ते फिलिपाईन्सचे आतिथ्यशील, सौजन्यशील, फिलिपिनो लोक, तर कुठं हे बेगरजू, बेपर्वा, उद्धट, तुसड्या स्वभावाचे सिंगापूरचे लोक! येथील माणूसघाण्या माणसांमध्ये भारतीय लोक देखील मागे नाहीत ही गोष्ट अत्यंत खेदाची वाटली.

तरीही आपण लोक येथे निर्लज्जपणे खरेदी करण्यासाठी मोठ्या प्रमाणा-

वर जातो ही त्याहून मोठी खत आहे सिंगापूर येथील लोकाना लक्ष्मीची धुद नशा चढली असावी कळसूत्री बाहुल्याप्रमाणे महालक्ष्मीच्या तालावर स्वत नाचताना व जगालाही नाचवताना ही माणस, माणुसकीच विसरली असावीत असे वाटले

या नगरीत सर्वकाही मिळते, स्वस्त आणि मस्त ! पण या खरेदीतून मानसिक समाधान, निर्भेळ आनद मात्र प्राप्त होत नाही येथील शॉपिगमध्ये डिग्निटी किंवा ग्रेस जाणवत नाही जाणवते ते फक्त ' गरजवताला अक्कल नसते ' हेच !

अशा वेळी स्वाभिमानी मनाला ही जन्नत, जहन्नुम भासू लागते, पॅरडाईज इन्फर्नोसमान वाटू लागतो, स्वर्गाचे स्वर्गीयपण नाहीसे होते

जेवढा परदेशी मालाचा वापर जास्त, तेवढे ऐश्वर्य आणि आधुनिकता अधिक असे समीकरण आजकाल झाले आहे ! येथे देखील लोकमान्य टिळ-कानी सुरू केलेली स्वदेशीची व परदेशी मालावर बहिष्कार टाकण्याची चळवळ प्रकर्षाने स्मरते स्वदेशाभिमान जागृत होऊन या परदेशी मालाची होळी पेटवावीशी वाटते पण त्या होळीला प्रज्वलित करणारे ते निखारे आता केव्हाच शमले आहेत ' इपोर्टेड 'च्या क्रेझखाली स्वदेशीचे ते धग-धगते अगारे गाडले गेले आहेत त्याना प्रफुल्लित करणारे स्वदेशीचे वारे देखील आत्ता सुस्तावून नाहीनासे झाले आहेत ' इपोर्टेड ' च्या क्रेझखाली स्वदेशी मालाचीच होळी करण्याचा चग बांधलाय असे वाटते !

आणि मग मनातील मृगजळ हळूहळू नाहीसे होऊ लागते. समोहक मृग-जळाने वेढलेल्या स्वर्गनगरीचे सत्य रूप स्पष्ट होऊ लागते .

ही स्वर्गनगरी नव्हे.. तर सुवर्णलका आहे रावणाची ! .. येथे रामाचे आदर्श नाहीत तर, फक्त रावणाचे चमकते दमकते सुवर्ण आहे, ज्याला ना आदर्शांचा आकार आहे ना तत्त्वांचा आधार !

अकरा

# गुलदस्ता....

मनिलाला अमूर्त स्वरूपातील कमलिनी विपुल भेटल्या बँकॉकच्या रोझ-गार्डनमधे नावाचे तरी रोझ आढळले, पण मूर्त स्वरूपाचा एखादा कृत्रिम 'एव्हरग्रीन' पुष्पगुच्छ आपले घरकुल सजवायला न्यावा अशी खूप इच्छा होती बँकॉकला अशी कृत्रिम फुलं जागोजागी स्वस्त दरात विकत मिळत होती, पण पुढील प्रवासाच्या दगदगीत ती कोमेजून जायला नकोत म्हणून काही अनुभवी स्नेह्यांच्या सल्ल्यानुसार त्यांची खरेदी सिंगापूर येथे करण्याचे योजले होते पण बँकॉकच्या मानाने तेवढी फुलं येथे विक्रीला आलेली आढळली नाहीत येथे त्यांच्या किमतीही भरमसाठ होत्या मनिलाच्या मिसेस बॉनेट रेयसच्या बंगल्यातील वृक्षाप्रमाणे एखादा चिरतरुण सदाबहार वृक्ष खरेदी करण्याची आणि घरी परतल्यावर, बंगल्यात निसर्ग फुलवून मित्र-मैत्रिणींना चकित करण्याची मनीषा होती, पण ती सफल होण्याची चिन्हे दिसेनात

एका सुपर मार्केटच्या दहाव्या मजल्यावर अशा कृत्रिम फुलांचे व रोप-ट्यांचे विक्रीकेंद्र असल्याचे समजले आम्ही मोठ्या उत्साहाने तेथे गेलो तेथे विक्रीस असलेले अनेक शोभिवंत आणि बेमालूम नैसर्गिक दिसणारे वृक्ष पाहून आपले स्वप्न साकार झाल्यासारखे वाटले मोठ्या वृक्षाच्या फांद्या सुट्या करून त्याचे छोटे पॅकिंग करता येते, शिवाय वजनालाही हलके असल्यामुळे मी दोन वेगवेगळे वृक्ष पसंत केले त्यांच्या किमतीची चौकशी करताच बंग-ल्यात सृष्टिसौंदर्य फुलवायचे माझे स्वप्न सिंगापूरच्या भ्रमजालामधेच विरून

गेले तशा एकेका झाडाची किंमत कमीत कमी पाच हजार रुपयापासून पन्नास हजार रुपयापर्यंत होती । हा कृत्रिम निसर्ग फुलवणे माझ्या आवाक्याबाहेरचे होते त्याला बहरायला लागणारी माझ्याजवळची गंगाजली केव्हाच आटली होती ।

या खरेदीच्या नंदनवनात आपणास एखाद सुंदर रोपटे अथवा पुष्पगुच्छही मनासारखा मिळाला नाही ही रुखरुख निसर्गवेड्या, सौंदर्यवेड्या, रसिक मनाला अद्याप लागून राहिली होती या स्वर्गनगरीमध्ये अनेकांच्या मनोकामना सफल करणारे अनेक कल्पवृक्ष असतील, पण माझी मात्र अल्पशी मुराद पुरी करणारा छोटा ताटवाही मला प्राप्त झाला नव्हता धनसंचयाबरोबर पुण्यसंचयही कोठेतरी कमी पडला असावा ।

आज सिंगापूर वास्तव्यातील शेवटचा दिवस संध्याकाळी सहा वाजता विमानतळावर जायचे होते तत्पूर्वी खरेदीच्या अभिषेकाची सांगता करायची होती या मायानगरीचे शेवटचे दर्शन करावे, या सुवर्णलंकेला शेवटचे हात जोडावेत म्हणून बाहेर पडलो होतो वेळ सकाळची होती मार्केटमधून फेरफटका मारीत असतानाच

"एक्स्क्यूज मी मॅडम .मॅडम प्लीज. "

कोणीतरी मागून आवाज दिला मी मागे वळून पाहिले, तो एक उंच गोरापान तरुण हातामध्ये अनेक प्रकारच्या कृत्रिम फुलांचे गुच्छ घेऊन माझ्या पाठोपाठ आला होता मी त्याची फुलं विकत घ्यावीत अशी आर्जवी विनंती करून एकेक गुच्छ तो मला दाखवू लागला तो कोणीतरी फुलविक्रेता असावा त्याच्या हातातील सर्वच पुष्पगुच्छ मोहक व आकर्षक होते तीन दिवस मी फुलांच्या शोधात होते त्या फुलांचे अनेक गुलदस्ते आज अचानक माझा मागोवा घेत माझ्या पुढ्यात आले होते, बहरले होते स्वर्गनगरीतील कल्पवृक्ष प्रसन्न झाला होता

तो विक्रेता तरुण चिनी नव्हता, मलेशियन नव्हता, भारतीयही दिसत नव्हता त्याच्या रंगरूपावरून तो युरोपियन वाटत होता कोणी का असेना, माझ्या दृष्टीने मात्र माझे फुलांचे लोभस स्वप्न साकार करण्यासाठीच हा 'सपनोंका सौदागार' असा अचानक प्रकटला होता त्या सौदागराला मी एकेका गुच्छाची किंमत विचारू लागले मी पसंत केलेल्या एका गुलाबाच्या गुलदस्त्याची किंमत त्याने मला '२५ सिंगापूर डॉलर्स' सांगितली तशी तो किंमत रास्त होती पण एकदा मागून पहावे म्हणून मी बिचकतच तो गुलदस्ता १० सिंगापूर डॉलर्सला देणार का विचारले आणि आश्चर्य ' तो तरुण, तो भला मोठा पुष्पगुच्छ मला १० सिंगापूर डॉलर्सला द्यायला ताबड-

तोब तयार झाला त्या सुवर्णसधीचा लाभ घेऊन मी तो गुलदस्ता त्वरित खरेदी केला

तो तरुण विक्रेता पुढे गेला त्याने मला त्याच्याजवळची फुल विकत घेण्यासाठी आर्जव केली होती, विनती केली होती मी सांगितलेल्या कमी किमतीत त्याने एक गुच्छ मला राजीखुशीने लगेच देऊन टाकला याचे मात्र मला क्षणभर आश्चर्य वाटले, पण शेवटी आपल्याला हवा तसा गुलदस्ता प्राप्त झाला या आनदात मी त्या तरुणाविषयी कसलीही चौकशी केली नाही त्या फुलविक्रेत्याला मी विसरूनही गेले या खरेदीच्या नदनवनातील एक तरी मोहक आकर्षक गुलदस्ता आपल्या पदरी पडला याचाच आनद अपार होता

सध्याकाळी चार वाजता आम्ही हॉटेलवर परतलो आता उरलेल्या दोन तासांत पॅकिंग मोहीम ! बरोबर आणलेल्या डॉलर राजाने आमची साथ सोडली होती त्याला येथील इद्रजालाने पुरते घेरले होते या सुवर्ण लंकेतील सुवर्णरूपी लोहचुबकाने त्याला आकर्षित केले होते तो आमच्यासह परत येणे अशक्यच विविध ऐहिक सुखसाधनांचे मायावीरूप घेऊन तो आमच्या खोलीत प्रकटला होता

दोन तास कसरत करून सामानाचे पॅकिंग एकदाचे आवरले

सिंगापूरला नवीन घड्याळ घ्यायचे म्हणून मी घरून निघताना साधे इलेक्ट्रॉनिक घड्याळ घातले होते आता परतताना हे घड्याळ परत कशाला न्यायचे या विचाराने मी ते कोणाला तरी बक्षीस देऊन टाकायचे ठरवले आमचे सामान खाली नेणाऱ्या हॉटेलमधील एका मुलाला मी ते घड्याळ देऊ केले

' हे घड्याळ तुला आमच्यातर्फे बक्षीस घे "

एवढ मोठ बक्षीस पाहून तो खूष होईल व आभार मानेल असे मला वाटले होते पण तो पोरगा मोठ्या रुबाबात मला म्हणाला,

" तुमच ते घड्याळ द्या फेकून त्या कचऱ्याच्या पेटीत ! "

त्याचे ते उर्मट उत्तर ऐकून आम्ही पतिपत्नी अवाकच झालो ! हॉटेलमधे काम करणाऱ्या त्या मुलाला ते घड्याळ कस्पटासमान वाटले तरी ते कचऱ्याच्या पेटीत टाकायचे मला धैर्य झाले नाही मी ते पर्समधे जपून ठेवले

त्या मुलाने दिलेला सल्ला मी माझ्या लिंबू कापायच्या सुरीबाबत मात्र तत्परतेने अमलात आणला बँकॉक विमानतळावरील यावी सुरक्षा अधिकाऱ्याने ज्या मामूली सुरीवरून माझ्या नेक इराद्यांविषयी सशय घेतला होता, एअर फ्रान्सच्या विमानातील फ्लाईट पर्सरने अत्यंत बहुमोल समजून जी सुरी मला साभार परत दिली होती ती माझी अशी इतिहासप्रसिद्ध मूल्यवान

सुरी मी मोठ्या नि:स्वार्थी मनाने सिंगापूरच्या कचरापेटीस अर्पण केली विमानातूनच जी समुद्रार्पण करावीशी वाटत होती ती अशा वेगळ्या मार्गाने केव्हातरी सिंगापूरच्या समुद्रामधे स्वाहा केली जाणार होती

घरी गेल्यानतर त्या सहचारिणीची मला पावलोपावली आठवण आल्या-शिवाय राहणार नव्हती पण आयुष्यात कधी कधी अशा गोष्टी सोडाव्या लागतात !

त्या समर्पणानतर खूप हलक हलक आणि निश्चित वाटू लागल पुढील प्रवासात आता कुणाचा अकुश नको की कसली बोचणारी चुभन नको !

सिंगापूर महाक्षेत्राची महायात्रा अशी सपली ! सध्याकाळी आम्ही विमानतळावर उपस्थित झालो दोन तासाने एअर क्वांटासच्या विमानाने आम्ही मुबईस जाण्यासाठी उड्डाण करणार होतो आमच्याबरोबरची पुरुष मडळी सामानाचे वजन वगैरे शेवटच्या सोपस्कारात गुतली होती तोपर्यंत आम्ही जगातील या उत्कृष्ट विमानतळाचे निरीक्षण करीत बसलो होतो सकाळी घेतलेला फुलाचा गुलदस्ता मी हातातच धरला होता कारण तो बॅगेत ठेवणे शक्यच नव्हते मुबईला जाईपर्यंत तो गुलदस्ता मी हातात हळुवारपणे साभाळून नेणार होते त्यामुळे साहजिकच माझ्या मैत्रिणींच्या त्या फुलांविषयीच गप्पा चालल्या होत्या

"गुलाबाची फुल काय गेंदेदार आहेत ग !"

"मनीषा, तुला अगदी लकीली हा गुच्छ मिळाला बघ !"

आता वाटू लागल होत त्या तरुणाजवळचे आणखी दोन-चार पुष्पगुच्छ विकत घ्यायला हवे होते, पण कुठला तो भेटायला ? तेवढ्यात कोणीतरी पृच्छा केली .

"एस्क्यूज मी मॅडम आपका ये गुलदस्ता बहोत प्यारा है आप बबई जा रही है क्या ?"

हिंदी भाषा आणि तो पुरुषी आवाज कुठेतरी ऐकल्याचे आठवले ..मी मागे वळून पाहिले .माझ्या मागच्या खुर्चीत तो बसला होता. रग गोरा-पान तरतरीत नाक काळेभोर डोळे. उच धिप्पाड देहयष्टी याच तरुणाने सकाळी मला हा पुष्पगुच्छ विकला होता . सकाळी मला तो युरो-पियन वाटला होता सूक्ष्म निरीक्षणानतर, काळेभोर डोळे व काळे कुळकुळीत केस त्याचे वेगळेच राष्ट्रीयत्व सुचवीत असल्याचे लक्षात आले मी त्याच्या-कडे औत्सुक्याने पाहत असताना त्याने स्वत:ची ओळख करून दिली

"मेरा नाम इस्लाम, मैं लाहोर पाकिस्तानसे आया हूँ आपके हाथमे ये

ुलदस्ता देखतेही मैंने आपको पहचान लिया. "

अरे .म्हणजे मी समजले तसा हा कोणी सेल्समन नव्हता .हा जरी पाकिस्तानी होता तरी एका अर्थाने हा आपला बांधव आहे, या जाणिवेने मी त्याला आस्थेने विचारले,

"मग सकाळी आपण फुलाचे गुच्छ का विकत फिरत होता ?"

"मी दोन दिवसापूर्वी बँकॉकहून येथे आलो पण येथे येताच माझी ट्रॅजेडी झाली येथे एका फाईव्हस्टारमधे मी उतरलो, व बॉश घेण्यासाठी बाथरूममधे गेलो बॉश घेतल्यानंतर येऊन पाहतो तो माझ्या खिशातील सारेच्या सारे अमेरिकन डॉलर्स व एक सोन्याची चेन सारे काही चोरीला गेले होते"

"बहोत बुरा हुआ पण तुम्ही खोलीचे दार लॉक करून घेतले नव्हते का ?"

"लॉक केले होते पण कोणीतरी दुसऱ्या किल्लीने ते उघडून चोरी केली असावी सिंगापूर येथे करायची खरेदी तर राहिलीच, परंतु हॉटेलचे बिल देण्यासाठी व जेवण्यासाठी देखील माझ्याकडे पैसे राहिले नव्हते इसतरह मैं बडी मुसीबतमे फस गया म्हणून बँकॉक येथे खरेदी केलेल्या काही वस्तू मी येथे विकण्यास सुरुवात केली मी माझ्या बीबीला व रिश्तेदाराना भेट देण्यासाटी असे दहा-बारा गुलदस्ते बँकॉक येथे खरेदी केले होते मगर अफसोस! ते विकून मी थोडेफार पैसे जमा केले अल्लाच्या मेहेरबानीने बॅगेतील पासपोर्ट व परतीचे तिकिट तेवढे वाचले आणि हा एक गुलदस्ता खास बीबीसाठी शिल्लक ठेवला आहे अब कोई चिंता नही !"

परदेशात असं काही अनपेक्षित घडलं म्हणजे किती शोचनीय अवस्था होते मला त्या तरुणाची अक्षरश कीव वाटली

"भाईसाहब, तुमची ही दर्दभरी हकीकत ऐकून मला फार वाईट वाटले आपण आपल्या पत्नीसाठी घेतलेला गुलदस्ता मी आपणाकडून घ्यायला नको होता सॉरी ह ! हवा तर तुम्ही हा गुलदस्ता परत घ्या तुमची पत्नी बिचारी घरी तुमचा इंतजार करीत बसली असेल तिच्यासाठी कमीतकमी तुम्ही हा गुच्छ तरी घेऊन जा"

"नो थँक यू ! तुम्हीच ठेवा ही फुल तुमच्याजवळ तुमच्या हातात हा गुलदस्ता फार छान दिसतोय ! आप बुरा मत मानना तुम्ही ही फुल घेतली नसती तरी मी ती दुसऱ्या कोणाला तरी विकलीच असती ना ! तुम्ही ती दहा डॉलरला विकत घेतलीत पण प्रसंगी मी ती तुम्हाला पाच डॉलरलादेखील दिली असती, इतकी मला पैशाची गरज होती तुमच्याप्रमाणेच आणखी तिघा-चौघानी मेहेरबानी केली आणि त्या पैशातूनच मी

हॉटेलचं बिल कसबसं भागवून खोली सोडली आता सर्व सामान घेऊन मी येथे आलो आहे सामान येथील क्लॉक रूममधे टाकून देणार आहे व एक-दोन दिवस येथेच कसेबसे काढणार आहे तोपर्यंत पैशाचा काहीतरी बंदोबस्त होईल ”

इस्लामची ती कहानी ऐकून आम्हा सर्वजणींनाच खेद वाटला, त्याची खूप दयाही आली लक्ष्मीच्या नगरीत दैववशात लक्ष्मीने याच्याकडे पाठ फिरवली होती त्याने आपल्या प्रिय पत्नीसाठी घेतलेले गुलदस्ते विकण्याची आफत त्याच्यावर ओढवली होती व त्यांतीलच एक गुलदस्ता मी त्याच्याकडून विकत घेतला होता त्यामुळे क्षणभर असं वाटलं की दुसऱ्या कोणाच्या तरी गुलिस्तानमधील गुल आपल्या गुलशनमधे येऊन फुलले आहेत मला उगीचच अपराध्यासारखे वाटू लागले मी मोठ्या जिव्हाळ्याने इस्लामला म्हणाले,

“ तुम्ही हा गुलदस्ता खरोखरच परत घ्या त्याची किंमतही तुम्ही मला परत देऊ नका तुम्हाला आमच्याकडून आणखी काही आर्थिक सहाय्य हवं असेल तर निःसंकोचपणे सांगा आपणास अल्पशी मदत करण्याचा मौका आम्हाला मिळाला तर खुशीच होईल ”

हे ऐकून इस्लाम भारावून गेला व मोठ्या कृतज्ञतेने मला म्हणाला,

“ शुक्रिया जी, बहोत बहोत शुक्रिया ! आप एक बहनकी तरह मेरी बडी प्यारसे पूछताछ कर रही है, इसीमें मुझे सबकुछ मिला ! तुम्ही मुळीच चिंता करू नका दोन दिवसात माझी आर्थिक समस्या नक्की सुटेल हा गुलदस्ता तुमचा आहे, आणि तो तुमच्याजवळच ठेवा या भावाकडून भेट समजा हवा तर ”

माझ्या हातातील त्या गुलदस्त्याने दोन राष्ट्रातील, दोन अलग अलग मंझिलच्या दोन मुसाफिरामध्ये काही क्षण भाईबहनचा एक अजीब रिश्ता निर्माण केला होता .मी थोडा वेळ अंतर्मुख झाले तोच डॉक्टरसाहेब व इतर मंडळी प्रवासाची पुढची तजवीज करून आले आता थोड्याच वेळात आम्हाला निघायला पाहिजे होतं पण तत्पूर्वी मी डॉक्टरांची व इस्लाम-भाईची ओळख करून दिली त्याच्यावर ओढवलेला कठीण प्रसंग ऐकून, ते सर्वजणच हळहळले इस्लामची दर्दभरी कहानी ऐकताच मि बिनधास्त सुटकेचा निःश्वास टाकीत म्हणाले,

“ आपण सर्वांनी डॉ शहा व श्री वल्लभ बेनके यांचे आभार मानायला हवेत या दोघांनी बरोबर आणलेल्या विघ्नहराच्या आशीर्वादामुळेच आपला हा प्रवास निर्विघ्नपणे पार पडला मनिलातील एवढ्या तंग परिस्थितीतून-

देखील आपण सुखरूपपणे बाहेर पडलो ही सारी त्या विघ्नहर्त्याचीच कृपा म्हणायची ! वहिनी, या इस्लामभाईलादेखील तुमच्याजवळची श्रींची एक प्रतिमा देऊन टाका "

या बाबतीत मात्र सर्व मडळीनी प्रथमच मि बिनधास्तच्या सुरात सूर मिसळला,

" खरोखर ज्या विघ्नहर्त्याच्या कृपेने आपला आतापर्यंतचा प्रवास निर्विघ्न-पणे पार पडला, त्याच विघ्नहराच्या आशीर्वादामुळे आपण आपापल्या घरी सुखरूप पोहोचलो म्हणजे झाले घरचे लोक आपली मोठ्या उत्सुकतेने वाट पाहत असतील " .

घरट्यात बसून कटाळलेल्या पाखराला उत्तुग आकाशात उच उच भरारी मारावीशी वाटली, पण गगनात उच भरारी मारून होताच दमलेल्या पखाना, थकलेल्या जिवाला पुन्हा घरट्याच्या मायेच्या उबीत शिरण्याची ओढ लागली

आमचे एकेक साथीदार सिक्युरिटी चेकअपसाठी निघाले इतका वेळ आमची बातचीत शातपणे ऐकत असलेल्या इस्लामला मी एक विघ्नहराची मूर्ती खरोखरच सप्रेम भेट देत म्हणाले,

" ये आपकी हमेशा रक्षा करेगा ! "

मनिला येथील कॉनफरन्समध्ये भेटलेल्या सईदखान भाईसाहबबरोबर मी एक प्रतिमा कराची पाकिस्तानला पाठवली होती दुसरी आता या इस्लामभाईबरोबर लाहोर पाकिस्तानला विघ्नहराच्या पायगुणाने तरी पाकची अण्वस्त्रांची राक्षसी महत्त्वाकांक्षा नष्ट व्हावी !

माझी भेट आनदाने स्वीकारीत इस्लाम म्हणाला,

" बहोत बहोत शुक्रिया ! मैं भी लाहोरके दर्गेमें आपकी खुशी और सलामतीके लिये दुआ मागूगा हमे याद रखना ! "

" जरूर भाईसाहब, ये गुलदस्ता हमेशा आपकी याद दिलायेगा.. "

अस म्हणत मी इस्लामभाईला अलविदा म्हटल, आणि एक आगळं बंधू-प्रेम मनाच्या गुलदस्त्यात साठवून हातातील कृत्रिम गुलदस्त्याची असली महक अत करणात साठवीत एअर क्वांटासच्या जबो जेटमधे पदार्पण केल

ही स्वर्गनगरी नव्हे, सुवर्णलका काही क्षणांतच सोडायची

रावणाच्या सुवर्ण लकेवर विजय प्राप्त झाल्यानतर तिचे सुवर्णमय वैभव आणि ऐश्वर्य पाहून लक्ष्मण उद्गारला होता

" रम्य ही स्वर्गाहून लका ! " अयोध्येला न परतता त्या स्वर्गाहून रम्य सुवर्णलकेतच रहावे असा लक्ष्मणाला मोह झाला होता... लक्ष्मणाची ही

अवस्था, मग आपल्यासारख्या यत्किंचित पामराची काय कथा! परंतु श्रीरामाला मात्र अयोध्या नगरी आणि कौसल्या मातेचे पवित्र चरण यांच्या दर्शनाची उत्कंठा लागली होती. त्या सुखापुढे स्वर्गसुखदेखील कमीच होते

'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी।'

'अनहर्ड मेलोडीज आर मोअर स्वीट दॅन दोज हर्ड!' दुरून डोंगर साजरे .दुरून साजऱ्या गोजऱ्या दिसणाऱ्या डोंगराचे खाचखळगेही जवळून पाहून झाले होते

तुलनात्मक अभ्यासानंतर, स्वदेशाबद्दल आपल्या मनामध्ये असलेल्या उणिवाची जागा, श्रेष्ठतेची जाणीव भरून काढते प्रिय व्यक्तीच्या विरहानंतरच तिच्या सहवासाचे प्रेमाचे खरे मोल कळते मातृभूमीच्या महिम्याचा खरा साक्षात्कार तिच्यापासून दूर परदेशी गेल्यावरच घडतो आणि असे वाटते स्वर्ग धुंडाळण्यासाठी दूर देशी जाण्याची गरज नाही . खरा स्वर्ग येथेच आहे. येथेच आहे आपल्याच देशात आपल्याच जन्मभूमीत आपल्याच घरात . होम इज हेवन! घरद्वार हेच हरद्वार!

इस्लामकडून घेतलेला, गुलदस्ता तर याच सत्याची प्रखर जाणीव करून देत होता!..

परतायची आता विलक्षण ओढ लागली होती विशाल, उत्तुंग, गहन, गंभीर, गगन, व अगम्य, अथांग, गहिरा सागर याच्यामधील अज्ञात पोकळीतून, धरतीच्या, मायभूमीच्या, घरकुलाच्या ज्ञात कुशीमध्ये शिरण्यासाठी मन उत्सुक झाले होते परदेशी उडालेल्या आम्हा पाखराचे उबदार मबुहाय करायला उत्सुक झालेल्या स्वजनाचे प्रियजनाचे प्रेमळ 'मबुहाय' स्वीकारण्याची उत्कंठा लागली होती!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६९०
४४२२०
३०।१२।९६

'मबुहाय' सौ. मनीषा शहा, नारायणगाव (जि पुणे)